# वीटभट्टी व्यवसायातील कामगार कुटुंबातील काम करणाऱ्या बालकांच्या शैक्षणिक व आरोग्यविषयक स्थितीचा अभ्यास

## विशेष संदर्भ - कराड तालुका, जिल्हा सातारा

एम. फिल. (विद्यानिष्णात) पदवीकरीता शोधप्रबंध


संशोधक

**अर्चना शांताराम बोऱ्हाडे**

मार्गदर्शक

**डॉ. मनिषा शिरोडकर**

सहाय्यक प्राध्यापक

यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ सोशल वर्क

जकातवाडी, सातारा



समाजकार्य विभाग

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ

गुलटेकडी, पुणे - ३७

एप्रिल २०१८

# घोषणापत्र

मी खाली सही करणार अर्चना शांताराम बोऱ्हाडे .
असे घोषित करतो / करते की, वीटभट्टी व्यवसायातील कामगार कुटुंबातील काम करणाऱ्या बालकांच्या शैक्षणिक व आरोग्यविषयक स्थितीचा अभ्यास, विशेष संदर्भ:- कराड तालुका, जिल्हा सातारा नावाचा प्रकल्प अहवाल प्रा. डॉ. मनिषा शिरोडकर यांच्या मार्गदर्शनाखाली तयार करुन समाजकार्य विद्यानिष्णांत अभ्यासक्रमाच्या परिपूर्ततेसाठी टिळक महाराष्ट्र विद्यापीठास सादर करीत आहे. सदर संशोधन कार्य पूर्णतः माझे स्वतःचे मूळ काम असून कोणत्याही प्रकल्प अहवालाची नक्कल करण्यात आलेली नाही. दुय्यम तथ्य स्त्रोतांचा योग्य संदर्भ व उल्लेख संदर्भसूचीमध्ये केलेला आहे.

संशोधक विद्यार्थ्याची स्वाक्षरी

ठिकाण :- पुणे

दिनांक :- 08 / 05 / 2018

स्वाक्षरी :

..................

# ऋणनिर्देशन

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या समाजकार्य विद्याशाखा अंतर्गत '**वीटभट्टी व्यवसायातील कामगार कुटुंबातील काम करणाऱ्या बालकांच्या शैक्षणिक व आरोग्यविषयक स्थितीचा अभ्यास : विशेष संदर्भ - कराड तालुका, जिल्हा सातारा**' हा शोध प्रबंध सादर करत आहे.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठातील समाजकार्य विभागाने सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षामध्ये एम.फिल (विद्यानिष्णांत) पदवीसाठी मला प्रवेश दिला त्याबद्दल मी त्यांची मन:पूर्वक आभारी आहे. समाजकार्य विभागाचे प्रमुख डॉ. प्रकाश यादव सर तसेच समाजकार्य विभागातील प्राध्यापिका श्रीमती कार्तिकी सुबकडे मॅडम यांनी वेळोवेळी मला जे मार्गदर्शन व सहकार्य केले त्याबद्दल मी त्यांची ऋणी आहे.

गुरुवर्य, आदरणीय मार्गदर्शक डॉ. मनिषा शिरोडकर यांच्या मार्गदर्शनाखाली मला हा शोध प्रबंध पूर्ण करण्याचे भाग्य लाभले यासाठी मी त्यांची सदैव ऋणी राहीन. त्यांनी केलेले मोलाचे मार्गदर्शन यामुळे माझा संशोधन अभ्यास योग्य प्रकारे पूर्णत्वास गेला असून त्यांच्या मार्गदर्शनाअभावी हे अशक्य होते. संशोधन अभ्यास पूर्ण करताना मला कोणताही अडथळा निर्माण होणार नाही याची त्यांनी प्रकर्षाने काळजी घेतली. तसेच माझा शोध प्रबंध पूर्ण करण्यासाठी त्यांनीच सदैव पुढाकार घेऊन माझ्याकडून तो पूर्ण करुन घेतला. त्यामुळे थोड्या शब्दात त्यांचे आभार व्यक्त करणे अगदी अशक्य आहे. माझा शोध प्रबंध पूर्ण करण्यामध्ये डॉ. मनिषा शिरोडकर मॅडम यांचा महत्त्वाचा वाटा व त्यांचेच श्रेय आहे.

तसेच संशोधन विषयाची निवड करताना, संशोधन अभ्यासाच्या प्रत्येक टप्प्यावर मला मार्गदर्शन व सहकार्य करणाऱ्या डॉ. मीनल नरवणे मॅडम, संचालक, मानव विकास केंद्र, यशदा, पुणे यांचीही मी खूप आभारी आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली मला 'संशोधन' या विषयाचे सखोल ज्ञान प्राप्त झाले आहे. त्यामुळे

मी त्यांची सदैव आभारी राहीन. तसेच संशोधन अभ्यासासाठी आवश्यक ती दुय्यम साधने उपलब्ध करुन देण्यामध्येही नरवणे मॅडम व मानव विकास केंद्र, यशदा यांचे मला मोठे सहकार्य लाभले आहे.

संशोधन अभ्यासासाठी माहिती संकलन करण्याच्या कामात कराड तालुक्यातील श्री. प्रमोद माने, श्रीमती भाग्यश्री कदम व श्री. सचिन पाटील यांनी मला सहकार्य केले. त्यांच्या सहकार्यानेच माझे माहिती संकलन कमी वेळेत व अधिक योग्यप्रकारे पूर्ण होऊ शकले. तसेच माझे मित्र डॉ. श्याम जाधव यांनी मला संशोधनासंबंधी महत्त्वाच्या बाबींवर सतत मार्गदर्शन केले आहे. त्यामुळे या सर्वांचे आभार मानणे महत्त्वपूर्ण ठरते.

तसेच माझ्या शोध प्रबंधाच्या अगदी सुरुवातीपासून ते संशोधन पूर्णत्वास जाईपर्यंत वेळोवेळी मला सहकार्य करणारे व मला प्रेरणा देणारे माझे पती श्री. अमर अशोक ढाले यांचीही मी मनापासून आभारी आहे. माझ्या संशोधन अभ्यासाच्या प्रत्येक कामात, प्रत्येक क्षणी त्यांनी मला सहकार्य केले आहे. त्यांचे सहकार्य व प्रेरणा यामुळेच मी माझा शोध प्रबंध पूर्ण करु शकले.

सर्वात शेवटी जिच्यामुळे मी इथपर्यंत शिक्षण घेऊ शकले, एम.फिल पदवीसाठी प्रबंध सादर करु शकले ती माझी 'आई' हीची मी मनापासून खुप आभारी असून त्याबद्दल मी तिची सदोदीत ऋणी राहील.

तसेच मला या शोध प्रबंधासाठी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष मदत करणाऱ्या, ज्ञात व अज्ञात सर्व लहान-मोठ्यांची मी मनापासून आभारी आहे.

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| | घोषणापत्र | |
| | प्रमाणपत्र | |
| | ऋणनिर्देशन | |
| | अनुक्रमणिका | |
| | सारणी व आलेख सूची | |
| | **प्रकरण पहिले : संशोधन विषयाची ओळख** | |
| १ | प्रस्तावना | १ |
| १.१ | बालकामगार : व्याख्या | १ |
| १.२ | बालकामगार : कारणे व परिणाम | २ |
| १.३ | संघटित व असंघटित क्षेत्रातील बालकामगार | ३ |
| १.४ | बालकामगार : संख्यात्मक माहिती | ३ |
| १.५ | भारतीय राज्यघटना : बालकांसाठी तरतुदी | ४ |
| १.६ | बालकामगारांचे हक्क | ५ |
| १.७ | बालमजुरी प्रतिबंधात्मक कायदे | ८ |
| १.८ | बालमजुरी निर्मुलन : विविध प्रकल्प वा उपाय योजना | १० |
| १.९ | वीटभट्टी व्यवसायाचे स्वरुप व त्यातील बालमजुरी | १२ |
| १.१० | सारांश | १६ |
| १.११ | संदर्भ | १ |
| | **प्रकरण दुसरे : संदर्भ साहित्याचा आढावा** | १९ |
| २ | प्रस्तावना | १९ |
| २.१ | शोध निबंध | १९ |
| २.२ | संशोधन अहवाल | २१ |
| २.३ | कायदे विषयक साहित्य | २४ |
| २.४ | इतर सामग्री : संदर्भ ग्रंथ वा पुस्तके | २६ |
| २.५ | सारांश | ३२ |
| | **प्रकरण तिसरे : संशोधन पध्दती** | ३३ |
| ३ | प्रस्तावना | ३३ |

| अ. क्र. | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| ३.१ | समस्या सूत्रण | ३३ |
| ३.२ | संशोधन विषयाची व्याप्ती व मर्यादा | ३४ |
| ३.३ | संशोधन अभ्यासाचे महत्त्व | ३५ |
| ३.४ | अभ्यास विषयाचे क्षेत्र : कराड तालुका (सातारा जिल्हा) | ३६ |
| ३.५ | संकल्पनांच्या कार्यवाहीच्या व्याख्या | ३६ |
| ३.६ | अभ्यास विषयाची चलपदे | ३७ |
| ३.७ | संशोधन अभ्यासाची उद्दिष्ट्ये | ३७ |
| ३.८ | संशोधन अभ्यासाची गृहितकृत्ये | ३७ |
| ३.९ | संशोधन प्रश्न | ३८ |
| ३.१० | अभ्यास विषयाची नितीमुल्ये | ३८ |
| ३.११ | संशोधन आराखडा | ३९ |
| ३.१२ | नमुना आराखडा | ३९ |
| ३.१३ | माहिती संकलन : साधने व माहितीचे स्त्रोत | ४२ |
| ३.१४ | माहिती संकलन : दुय्यम साधने | ४५ |
| ३.१५ | प्रकरणीकरण | ४६ |
| ३.१६ | सारांश | ४६ |
| | **प्रकरण चौथे : माहितीचे सारणीकरण व विश्लेषण** | ४७ |
| ४ | प्रस्तावना | ४७ |
| ४.१ | इतर संशोधन अहवालाच्या आधारे माहितीचे विश्लेषण | ४८ |
| ४.२ | सर्वसामान्य माहितीचे विश्लेषण | ४९ |
| ४.३ | वीटभट्टी व्यवसायातील कामगार कुटुंबांच्या कामाचे सामान्य स्वरुप | ५४ |
| ४.४ | वीटभट्टी व्यवसायातील बालकामगार व त्यांच्या कामाचे स्वरुप | ५९ |
| ४.५ | वीटभट्टी व्यवसायातील बालकांची शैक्षणिक स्थिती व समस्या | ६८ |
| ४.६ | वीटभट्टी व्यवसायातील बालकांची आरोग्य स्थिती | ९० |
| ४.७ | वीटभट्टी मालकांकडून पुरविण्यात आलेल्या सोईसुविधा | १२८ |
| ४.८ | वीटभट्टीवरील बालकांसाठी उपलब्ध शासकीय सुविधा वा योजना | १३३ |
| ४.९ | सारांश | १४२ |

| अ. क्र. | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| | **प्रकरण पाचवे : निष्कर्ष, गृहितकृत्यांची पडताळणी, शिफारशी व संशोधन विषयाचा सारांश** | १४३ |
| ५ | संशोधन अभ्यासातील निष्कर्ष : प्रस्तावना | १४३ |
| ५.१ | कामगार कुटुंबाच्या सर्वसामान्य स्थिती विषयक निष्कर्ष | १४३ |
| ५.२ | कामगार कुटुंबांच्या कामाचे सामान्य स्वरुप यासंबंधीत निष्कर्ष | १४३ |
| ५.३ | वीटभट्टी व्यवसायातील बालकामगार व त्यांच्या कामाचे स्वरुप याविषयी निष्कर्ष | १४४ |
| ५.४ | कुटुंबातील मुलींच्या कामाच्या स्थिती विषयक निष्कर्ष | १४५ |
| ५.५ | वीटभट्टी व्यवसायातील बालमजुरीच्या कारणासंबंधीत निष्कर्ष | १४५ |
| ५.६ | बालकांच्या शैक्षणिक स्थिती विषयक निष्कर्ष | १४६ |
| ५.७ | कुटुंबातील मुलींच्या शैक्षणिक स्थिती विषयक निष्कर्ष | १४७ |
| ५.८ | सद्यस्थितीत वीटभट्टीवरील बालकांना उपलब् झालेल्या शैक्षणिक सुविधांविषयी निष्कर्ष | १४८ |
| ५.९ | बालकांच्या आरोग्य स्थिती विषयक निष्कर्ष | १४९ |
| ५.१० | आरोग्यसंबंधी उपचाराच्या स्थिती विषयक निष्कर्ष | १५० |
| ५.११ | कुटुंबातील मुलींच्या आरोग्य स्थिती विषयक निष्कर्ष | १५१ |
| ५.१२ | वीटभट्टी मालकांकडून पुरविण्यात आलेल्या सुविधांबाबत निष्कर्ष | १५३ |
| ५.१३ | वीटभट्टीवरील बालकांसाठी उपलब्ध शासकीय सुविधा वा योजनांबाबत निष्कर्ष | १५५ |
| ५.१४ | गृहितकृत्यांची पडताळणी | १५८ |
| ५.१५ | प्रमुख शिफारशी | १६५ |
| ५.१६ | सारांश | १६८ |
| ५.१७ | संशोधन विषयाचा सारांश | १६९ |
| | **परिशिष्ठे** | |
| १ | संदर्भ सूची | १७४ |
| २ | कराड तालुका नकाशा | १७७ |
| ३ | पालकांसाठी मुलाखत अनुसूची | १७८ |
| ४ | निरीक्षण अनुसूची | १९१ |
| ५ | वीटभट्टी मालकांसाठी मुलाखत अनुसूची | १९२ |

| अ. क्र. | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| ६ | अंगणवाडी सेविका मुलाखत अनुसूची | १९४ |
| ७ | शिक्षण अधिकारीकरीता मुलाखत अनुसूची | १९६ |
| ८ | जिल्हा सरकारी कामगार अधिकारीकरीता मुलाखत अनुसूची | १९७ |
| ९ | शाळा मुख्याध्यापकांसाठी मुलाखत अनुसूची | १९९ |
| १० | वैद्यकीय अधिकारीकरीता मुलाखत अनुसूची | २०१ |
| ११ | खाजगी दवाखान्यातील डॉक्टरांकरीता मुलाखत अनुसूची | २०२ |
| १२ | कुटुंब तक्ता | २०३ |

# सारणी व आलेख सूची

## अ) सारणी सूची


| सारणी क्र. | सारणीचे शिर्षक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १.१ | बालकामगारांची आकडेवारी : भारत व महाराष्ट्र (१९७१ ते २०११) | ४ |
| १.२ | ५ ते १४ वयोगटातील बालकामगारांची शैक्षणिक स्थिती (Main and Marginal Worker) | ७ |
| ४.१ | कामगार कुटुंबांच्या स्थलांतराचा प्रकार | ४९ |
| ४.२ | स्थलांतरीत कुटुंबांचे मुळ राज्य | ५० |
| ४.३ | कामगार कुटुंबांचा भाषानिहाय तपशील | ५२ |
| ४.४ | कामगार कुटुंबांचा मुख्य व्यवसाय | ५४ |
| ४.५ | कामगार कुटुंबांचे वीटा बनविण्याचे लक्ष्य | ५६ |
| ४.६ | कुटुंबांच्या वीटभट्टी कामाचे तास | ५८ |
| ४.७ | बालकांच्या कामाच्या तासांचा तपशील | ६३ |
| ४.८ | बालकांच्या सद्य शैक्षणिक स्थितीचा तपशील | ६८ |
| ४.९ | बालकांच्या शिक्षणासाठी उपलब्ध सुविधेचा तपशील | ७१ |
| ४.१० | सद्यस्थितीत शाळेत जाणाऱ्या बालकांच्या समस्या | ७६ |
| ४.११ | बालकांच्या शिक्षणाबाबत पालकांचा दृष्टीकोन | ७८ |
| ४.१२ | मुलींच्या सद्य शैक्षणिक स्थितीचा तपशील | ८० |
| ४.१३ | कुटुंबातील मुलींची सामान्य शैक्षणिक स्थिती | ८२ |
| ४.१४ | मुलींच्या शिक्षणाबाबत पालकांचा दृष्टीकोन | ८४ |
| ४.१५ | बालकांना प्राप्त झालेल्या शैक्षणिक सुविधा | ७८ |
| ४.१६ | बालकांच्या शिक्षणासाठी आवश्यक असलेल्या सुविधांचा तपशील | ८८ |
| ४.१७ | व्यवसायानुरुप बालकांना निर्माण होणारे आरोग्यसंबंधी धोके | ९० |
| ४.१८ | बालकांच्या आजाराचे स्वरुप | ९५ |
| ४.१९ | बालकांच्या खेळण्याच्या ठिकाणाबाबत तपशील | ९७ |
| ४.२० | बालकांच्या विश्रांतीच्या कालावधीचा तपशील | ९९ |
| ४.२१ | बालकांना विश्रांती न मिळण्याच्या कारणांचा तपशील | १०० |
| ४.२२ | बालकांची आरोग्य तपासणी न होण्याची कारणे | १०३ |
| ४.२३ | आहारातील समाविष्ट पोषक घटकांची वारंवारिता | १०५ |
| ४.२४ | सरकारी दवाखान्यात न जाण्याच्या कारणांचा तपशील | १०८ |

| सारणी क्र. | सारणीचे शिर्षक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| ४.२५ | आरोग्यसंबंधी प्राप्त झालेल्या शासकीय सुविधांचा तपशील | ११० |
| ४.२६ | मुलींना मिळत असलेल्या मार्गदर्शनाचा तपशील | ११४ |
| ४.२७ | मासिक चक्रावेळीच्या स्वच्छतेबाबतचा तपशील | ११८ |
| ४.२८ | मुलींच्या मासिक चक्रासंबंधीत तक्रारींचा तपशील | १२० |
| ४.२९ | आरोग्य तक्रारी असतानाही मुली कामे करतात : कारणांचा तपशील | १२३ |
| ४.३० | वीटभट्टीवरील मुलींच्या लग्नाची वयोमर्यादा | १२६ |

# ब) आलेख सूची


| आलेख क्र. | आलेखाचे शिर्षक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| ४.१ | वीटभट्टीवरील ५ ते १४ वयोगटातील मुले व मुली | ५१ |
| ४.२ | वीटा बनविण्याच्या कामाची नेमकी वेळ | ५७ |
| ४.३ | वीटभट्टी व्यवसायातील बालकामगारांची संख्या | ५९ |
| ४.४ | बालके करत असलेल्या कामाचे प्रकार (स्वरुप) | ६१ |
| ४.५ | मुली करत असलेल्या घरातील कामांचे स्वरुप | ६५ |
| ४.६ | वीटभट्टी व्यवसायातील बालमजुरीची कारणे | ६६ |
| ४.७ | वीटभट्टीपासून शाळेचे अंतर | ७२ |
| ४.८ | बालके शाळेत जात नसल्याच्या कारणांचा तपशील | ७३ |
| ४.९ | सद्यस्थितीत शाळेत जाणाऱ्या व शाळेत न जाणाऱ्या मुला-मुलींचा तपशील | ८१ |
| ४.१० | बालकांच्या सर्वसाधारण आरोग्य स्थितीचा तपशील | ९४ |
| ४.११ | बालकांच्या आरोग्य तपासणीचा तपशील | १०२ |
| ४.१२ | बालकांच्या दैंनदिन आहारातील समाविष्ट घटक | १०४ |
| ४.१३ | आरोग्यसंबंधी उपचाराच्या सुविधेचा तपशील | १०७ |
| ४.१४ | मुलींच्या आरोग्यसंबंधी तक्रारींचा तपशील | ११२ |
| ४.१५ | मुलींच्या नियमित आरोग्य तपासणींचा तपशील | ११५ |
| ४.१६ | मासिक चक्राविषयी मुलींचा संख्यात्मक तपशील | ११६ |
| ४.१७ | मासिक चक्रावेळी वापरण्यात येणारी साधने | ११७ |
| ४.१८ | आरोग्यसंबंधी तक्रारी असताना मुलींच्या कामाची स्थिती | ११२ |
| ४.१९ | वीटभट्टी मालकांकडून पुरविण्यात आलेल्या सुविधांचा तपशील | १२८ |

# प्रकरण पहिले
# संशोधन विषयाची ओळख

## १ प्रस्तावना :

बालमजुरी ही एक गुंतागुंतीची आर्थिक व सामाजिक समस्या आहे. तिची सांस्कृतिक आणि सामाजिक पाळेमुळे खोलवर रुजलेली आहेत. जगात सर्वत्र तसेच भारतातही लाखो बालकामगार असून त्यांच्या शिक्षणावर, विकासावर व भविष्यातील उदरनिर्वाहावर अयोग्य परिणाम होत आहे. बालकामगारांपैकी बहुतेक जण धोकादायक परिस्थितीत काम करीत असल्याने त्यांचे अपरिमित शारीरिक व मानसिक नुकसान होत असते. बालकामगार त्यांचे शिक्षण, आरोग्य, मनोरंजन, सहभाग या बाल हक्कांपासून वंचित राहतात. बालमजुरी ही केवळ कुटुंबालाच नव्हे तर अवघ्या देशालाही आर्थिकदृष्ट्या नुकसानकारक आहे. कारण बालमजुरीमुळे कुटुंबे ही गरिबी व अकुशल कामाच्या विळख्यात अडकून पडतात व पिढ्यानपिढ्या हे चक्र असेच चालू राहते. त्यामुळे ही कुटुंबे दारिद्रयाच्या विळख्यातून बाहेर पडत नाहीत व पर्यायाने देशही. म्हणूनच बालमजुरी ही समस्या मानवी विकास तसेच राष्ट्रीय विकासाच्या दृष्टीने घातक आहे.

### १.१ बालकामगार : व्याख्या

बालकामगारांच्या विविध व्याख्या करण्यात आलेल्या आहेत. त्या व्याख्या पुढीलप्रमाणे आहेत.

#### अ) बालमजुरी निर्मुलन व प्रतिबंध अधिनियम १९८७ :

या कायद्यामध्ये नमुद करण्यात आलेले धोकादायक १८ व्यवसाय व ६५ प्रक्रिया यामध्ये काम करणारी १४ वर्षाखालील बालके म्हणजे बालकामगार होय.

#### ब) महाराष्ट्र राज्य कृती आराखडा २००७ :

बालकामगार म्हणजे १४ वर्षाखालील, शाळेत जाणारी अथवा न जाणारी, तसेच बालमजुरी निर्मुलन व प्रतिबंध कायद्यामध्ये नमूद केलेल्या किंवा नमूद नसलेल्याही कामामध्ये पुर्णवेळ किंवा अर्धवेळ गुंतलेली सर्व मुले.

**क) आंतरराष्ट्रीय कामगार संघटना :**

बालमजुरांमध्ये अपरिपक्व वयात प्रौढासारखे जीवन जगणाऱ्या मुलांचा समावेश होतो. आरोग्याला तसेच मानसिक आणि शारिरीक विकासाला हानिकारक परिस्थितीमध्ये, तुटपुंज्या, वेतनावर त्यांना तासनतास काम करावे लागते, बऱ्याच जणांना कुटूंबापासून दूर रहावे लागते. उज्जवल भविष्यासाठी अर्थपूर्ण शैक्षणिक संधीपासून बऱ्याच वेळा अशी मुले वंचित राहतात.

**ड) ऑपरेशन्स रिसर्च ग्रुप, बडोदा :**

५ ते १५ वर्षातील मुलं जेव्हा मोबदला मिळो वा ना मिळो, कुटुंबात किंवा कुटूंबापासून दूर राहून कुठल्याही वेळी अर्थोत्पादन कार्यात गर्क असतात. तेंव्हा ती बालमजुरी असते.

अशा प्रकारे वरील विविध व्याख्यांचा विचार करता, प्रामुख्याने १४ वर्षाखालील बालके 'बालकामगार' म्हणून गणले जातात. तसेच शाळेत जाणारी किंवा न जाणारी, कामाचा मोबदला मिळत असो वा नसो व पुर्णवेळ वा अर्धवेळ अशा स्वरुपात काम करणारी सर्वच बालके ही बालमजुरीमध्ये मोडतात.[१]

## १.२ बालकामगार : कारणे व परिणाम

### १.२.१ कारणे :

बालकामगार असण्याची आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक स्वरुपाची विविध कारणे आहेत. यामध्ये प्रामुख्याने कुटुंबाची बिकट आर्थिक परिस्थिती, रोजगारासाठी कुटुंबांचे वारंवार होणारे स्थलांतर, पालकांची शिक्षणाबाबतची उदासिनता, कौटुंबिक परंपरागत व्यवसाय बालकांना शिकविणे, बालवयातील कामांमुळे बालकांच्या आरोग्यावर होणाऱ्या दुष्परिणाबाबत पालकांचे अज्ञान, मुलींचे समाजातील दुय्यम स्थान इ. प्रमुख कारणे कारणीभूत ठरतात. तसेच बालमजुरी निर्मुलनासाठी कायदेशीर तरतुदी व त्याच्या अंमलबजावणीसाठी पुरेशा यंत्रणेचा अभाव, सरकारी अधिकाऱ्यांची उदासिनता व राजकीय इच्छाशक्तींचा अभाव इ. कारणे ही समस्या वाढविण्यास जबाबदार असतात.

कारणे काहीही असली तरी लहान वयात काम करावे लागल्याने बालकांवर त्याचे परिणाम होताना दिसून येतातच.[२]

### १.२.२ परिणाम :

बालमजुरीमुळे बालके शिक्षण, खेळणे, आराम व निकोप वाढ ह्या सर्व हक्कांपासून वंचित राहतात. अति व धोकादायक कामे तसेच वयाच्या तुलनेत जास्त कष्टाची कामे करावी लागल्याने बालकांच्या शारिरीक, मानसिक व भावनिक आरोग्यावर दूरगामी परिणाम घडून येतात. कुटूंबाच्या आर्थिक सक्षमतेसाठीच बालकांना काम करावे लागते. शिक्षणाच्या अभावाने बालकांना बिन कौशल्याची कामे करावी लागतात. एकूणच बालमजुरीचा सर्वात मोठा दुष्परिणाम म्हणजे मुले त्यांचे बालपणच हरवून बसतात.[२]

## १.३ संघटित व असंघटित क्षेत्रातील बालकामगार :

बालकामगारांचे वर्गीकरण प्रामुख्याने संघटित व असंघटित क्षेत्रातील व्यवसायानुसार करता येऊ शकते. संघटित क्षेत्रामध्ये येणारे व्यवसाय वा उद्योग हे नोंदणीकृत असतात. त्यामुळे अशा व्यवसायांमध्ये काम करणाऱ्या बालकांना संघटित क्षेत्रातील बालकामगार म्हणता येते. जसे की, नोंदणीकृत दुकाने, कारखाने इ. तसेच असंघटित क्षेत्रातील व्यवसाय वा उद्योग हे नोंदणीकृत नसतात. यामध्ये बहूतेक व्यवसाय हे बेकायदेशीररित्या चालविले जातात. त्यामुळे अशा व्यवसायात काम करणाऱ्या बालकांना असंघटित क्षेत्रातील बालकामगार म्हटले जाते. उदा. रस्त्यावरील फेरीवाले, चहाची टपरी, घरकाम करणारी मुले, वीटभट्टी व्यवसायात काम करणारी बालके इ.[२]

## १.४ बालकामगार : संख्यात्मक माहिती

बालकामगार हा आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय व राज्य पातळीवर भेडसावणारा सार्वत्रिक स्वरुपाचा प्रश्न आहे. स्वातंत्र्य प्राप्तीपूर्वी व स्वातंत्र्य प्राप्तीनंतरही भारतात मोठ्या प्रमाणात बालकामगार हे धोकादायक तसेच बिगर धोकादायक व्यवसायामध्ये काम करत होते. सर्वप्रथम १९७१ मध्ये झालेल्या जणगणना अहवालापासून भारतातील बालकामगारांची आकडेवारी निदर्शनास येऊ लागली. यानुसार भारतात तसेच महाराष्ट्रात १९७१ ते २०११ या कालावधीत असणाऱ्या ५ ते १४ वयोगटातील (**Main And Marginal Child Worker**) बालकामगारांची संख्या पुढील प्रमाणे आहे.

**सारणी क्र. १.१**

**बालकामगारांची आकडेवारी : भारत व महाराष्ट्र (१९७१ ते २०११)**

| अ.क्र. | जणगणना वर्ष | भारत | महाराष्ट्र |
|---|---|---|---|
| १ | **१९७१** | १,०७,५३,९८५ | ९,८८,३५७ |
| २ | **१९८१** | १,३६,४०,८७० | १५,५७,७५६ |
| ३ | **१९९१** | १,१२,८५,३४९ | १०,६८,४२७ |
| ४ | **२००१** | १,२६,६६,३७७ | ७,६४,०७५ |
| ५ | **२०११** | १,०१,२८,६६३ | ७,२७,९३२ |

सारणी क्र. १.१ मधील आकडेवारीवरुन असे दिसून येते की, भारतात १९७१ पासून बालकामगारांची संख्याही चढत्या-उतरत्या स्वरुपात राहिलेली आहे. १९७१ नंतर १९८१ मध्ये बालकामगारांच्या संख्येत वाढ झाली असून १९९१ मध्ये ही संख्या कमी झालेली दिसते. पुढे २००१ मध्ये भारतातील बालकामगारांची संख्या पुन्हा वाढलेली असून २०११ मध्ये ती काही प्रमाणात कमी झालेली आहे. तसेच महाराष्ट्रात १९९१ नंतर बालकामगारांची संख्या क्रमाक्रमाने कमी होत गेल्याचे दिसून येते. जणगणना २०११ नुसार महाराष्ट्रात ७,२७,९३२ बालकामगार आहेत. त्यामध्ये ४ लाख ०२ हजार ३८८ मुले असून ३ लाख २५ हजार ५४४ मुली आहेत.[3]

यावरुन भारतात तसेच महाराष्ट्रात बालकामगारांची संख्या कमी-कमी झालेली असली तरी आजही बालकामगार अस्तित्वात आहेत हे स्पष्ट होते. यातून 'बालमजुरी' समस्येचे मुळापासून उच्चाटन झाले नसल्याचे प्रकर्षाने दिसून येते.

## १.५ भारतीय राज्यघटना : बालकांसाठी तरतुदी

भारतीय राज्यघटनेमध्ये बालकांसाठी काही मुलभूत हक्क समाविष्ट आहेत. तसेच लोक वा समाज कल्याणासाठी ध्येय धोरणे ठरविणे, विविध योजना राबविणे यासाठी शासनावर नैतिक दृष्ट्या बंधनकारक असतील अशी मार्गदर्शक तत्त्वे ही घटनेमध्ये नमुद आहेत. ही मार्गदर्शक तत्वे बालकांनाही लागू आहेत.

**कलम १५ :** स्त्रिया व लहान बालकांसाठी विशेष तरतुद करण्याची परवानगी राज्यांना देण्यात आलेली आहे.

**कलम २१ अ** : शिक्षण हा ६ ते १४ वयोगटातील प्रत्येक बालकाचा मुलभूत हक्क. **कलम २४** : १४ वर्षाखालील कोणत्याही बालकास एखाद्या कारखान्यात, खाणीत वा अन्य धोक्याच्या ठिकाणी कामावर ठेवले वा लावले जाऊ शकत नाही.

**कलम ४५** : ० ते ६ वर्षापर्यंतच्या सर्व बालकांना सक्तीचे मोफत शिक्षण तसेच बालगृहांची सुविधा पुरविणे आवश्यक आहे.

**कलम ३९ ई** : लहान तसेच कोवळ्या वयातील बालकांचा गैरवापर केला जाऊ नये. तसेच बालकांचे वय लक्षात घेऊन त्यांच्या क्षमतेला न झेपणारी कामे करण्याची सक्ती केली जाऊ नये असे सदर कलमात म्हटले आहे.

**कलम ३९ फ** : बालकांना निकोपपणे, स्वातंत्र्याच्या व प्रतिष्ठेच्या वातावरणात विकसित होण्याची संधी आणि सुविधा दिल्या जातील. तसेच बालकांचा शोषणापासून व नैतिक अधः पतनापासून बचाव केला पाहिजे.[४]

अशा सर्व तरतुदींच्या आधारे बालकांना घटनात्मक संरक्षण पुरविण्यात आले आहे. यामुळे बालकांना चांगले आरोग्य व शिक्षण मिळविणे तसेच धोकादायक कामांपासून स्वतःचे सरंक्षण करण्याचा अधिकार प्राप्त होतो. प्रत्यक्षात मात्र बालकामगारांच्या बाबतीत या सर्व तरतुदींचे उल्लंघन होत असल्याचे दिसून येते.

### १.६ **बालकामगारांचे हक्क** :

बालकांना त्यांचे मुलभूत हक्क प्राप्त व्हावेत यासाठी आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय पातळीवरुन अनेक प्रयत्न करण्यात आलेले आहेत. त्यानुसार सर्वसामान्य बालकांच्या तुलनेत बालकामगारांच्या बाबतीत या मुलभूत हक्कांना अधिक महत्त्व प्राप्त होते. कारण बालकामगारांच्या दृष्टीने बाल हक्कांचे उल्लंघन होताना दिसून येते. तसेच बालकांच्या सर्वांगिण विकासामध्ये शिक्षण व आरोग्य हे दोन घटक अत्यंत महत्त्वाचे आहेत. मात्र चांगले आरोग्य व शिक्षण मिळविण्याच्या हक्कांपासूनही बालकामगार वंचित राहत असल्याचे दिसून येते. यासाठी प्रामुख्याने बालकांच्या हक्काविषयी आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय पातळीवरील प्रयत्न जाणून घेणे गरजेचे आहेत.

### १.६.१ **बालकांचे हक्क : आंतरराष्ट्रीय पातळीवरील प्रयत्न**

आंतरराष्ट्रीय पातळीवर संयुक्त राष्ट्र संघाने 'बालकांची हक्क संहिता' तयार केली आहे. या संहितेस २० नोव्हेंबर १९८९ रोजी अनेक राष्ट्रांच्या प्रतिनिधींनी मंजूरी

दिली. भारताने ऑगस्ट १९९२ मध्ये बाल हक्क संहितेस मंजुरी दिली. सदर संहितेतील कलम ३२ हे प्रामुख्याने बालमजुरी प्रतिबंधात्मक आहे. या कलमानुसार आर्थिक शोषणपासून तसेच कुठल्याही धोकादायक, शिक्षणाच्या, शारीरिक व मानसिक प्रगतीच्या आड येणाऱ्या कामापासून संरक्षण मिळविण्याचा बालकांचा हक्क सर्व राष्ट्रांनी मान्य केला आहे. म्हणजेच या कलमानुसार बालमजुरी पासून सरंक्षण मिळविणे हा प्रत्येक बालकाचा हक्क आहे. तसेच या संहितेनुसार बालकांना सर्वांगिण पोषक जीवनमान, शिक्षणाचा हक्क व समान संधी, निरोगी आयुष्य व वैद्यकीय मदत मिळविणे, सामाजिक सुरक्षा व विम्याची सुविधा इ. हक्क प्राप्त होतात.[५]

### १.६.२ बालकांचे हक्क : भारतातील प्रयत्न

भारताने १९७४ मध्ये 'बालकांचे राष्ट्रीय धोरण' तयार केले होते. हे धोरण आंतरराष्ट्रीय बाल हक्क संहितेच्या धर्तीवरच आधारलेले आहे. या धोरणाच्या अनुषंगाने बालकांचे मुलभूत हक्क भारतीय कायद्यामध्ये समाविष्ट करण्यात आले आहेत. भारतामध्ये बालकांना शिक्षण, निरोगी आयुष्य जगणे, आजारपणात वैद्यकीय मदत, अत्याचारापासून संरक्षण, करमणूक, सांस्कृतिक जीवन, कला यामध्ये भाग घेणे, आर्थिक शोषण, धोकादायक तसेच शिक्षणाच्या, शारीरिक व मानसिक प्रगतीच्या आड येणाऱ्या कामापासून संरक्षण मिळविणे इ. महत्त्वपूर्ण हक्क प्रदान करण्यात आलेले आहेत. तसेच बाल हक्कांच्या सरंक्षणासाठी 'बाल हक्क कायदा २००५' नुसार राष्ट्रीय व राज्य पातळीवर बाल हक्क आयोगांची स्थापना करण्यात आली आहे.[५]

अशा प्रकारे आंतरराष्ट्रीय पातळीवर तसेच भारतातही बालकांना विविध हक्क बहाल केले असले तरी अद्यापही जगात सर्वत्र 'बालमजुरी' अस्तित्वात आहे. थोडक्यात बालकामगार असणे म्हणजेच बाल हक्कांचे उल्लंघन होणे होय. प्रामुख्याने बालकामगारांच्या बाबतीत शिक्षण व आरोग्य या हक्कांचे मोठ्या प्रमाणात उल्लंघन होत असल्याचे दिसून येते.

### १.६.३ बालकामगार : शिक्षणाचा हक्क

आंतरराष्ट्रीय पातळीवरील बाल हक्क संहितेमधील कलम २८ नुसार तसेच भारताचे 'राष्ट्रीय बालक धोरण' अंतर्गत तरतुद 'ड' व 'ई' नुसार सर्व बालकांसाठी प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करण्याचे मान्य करण्यात आले आहे.[५] तसेच भारतात 'मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम' २००९ मध्ये अंमलात आला. या

अधिनियमाद्वारे प्राथमिक शिक्षण घेणे हा प्रत्येक बालकाचा मुलभूत हक्क आहे.[६] परंतु बालकामगार शिक्षणापासून वंचित राहत असल्याचे पुढील आकडेवारीवरुन दिसून येते.

**सारणी क्र. १.२**

**५ ते १४ वयोगटातील बालकामगारांची शैक्षणिक स्थिती**

**(Main and Marginal Worker)**

| अ.क्र. | देश/राज्य | एकूण बालकामगार | शाळेत जाणारे बालकामगार | शालाबाह्य बालकामगार |
|---|---|---|---|---|
| १ | भारत | १,०१,२८,६६३ | ४९,४१,६१८ | ५१,८७,०४५ |
| २ | महाराष्ट्र | ७,२७,९३२ | ३,७८,६१८ | ३,४९,३१४ |

(**स्त्रोत : जणगणना अहवाल २०११**)

सारणी क्र. १.२ मधील आकडेवारीवरुन हे स्पष्ट होते की, भारतात शालाबाह्य बालकामगारांचे प्रमाण अधिक आहे. तसेच महाराष्ट्रात एकूण बालकामगारांपैकी शाळेत जाणाऱ्या बालकामगारांची संख्या जास्त आहे. असे असले तरी केवळ शालाबाह्य बालकामगारांची संख्या विचारात घेता हेही प्रमाण खूप जास्त असल्याचे दिसून येत आहे.

तसेच भारतात एकूण ५१,८७,०४५ शालाबाह्य बालकामगारांमध्ये २९,४९,२६९ इतकी मुले तर २२,३७,७७६ इतक्या मुली आहेत. महाराष्ट्रातील एकूण ३,४९,३१४ शालाबाह्य बालकामगारांमध्ये १,९९,४८७ मुले व १,४९,८२७ मुली आहेत. यावरुन भारतात व महाराष्ट्रात शाळेत जाणाऱ्या बालकामगारांमध्ये मुलांच्या तुलनेत मुलींचे शाळेत जाण्याचे प्रमाण कमी असल्याचे स्पष्ट होते.[७]

थोडक्यात शिक्षणाच्या अधिकार, २००९ नुसार प्रत्येक मुलाला प्राथमिक शिक्षण सक्तीचे करण्यात आले आहे. तसेच बालकामगार निर्मुलन व प्रतिबंध अधिनियम १९८६ प्रमाणे १४ वर्षाच्या बालकांची धोकादायक तसेच बिगर धोकादायक कामातून मुक्तता करणे आवश्यक आहे. म्हणजेच कायद्यान्वये १४ वर्षापर्यंतचे प्रत्येक बालक हे शाळेत असणे अपेक्षित आहे. परंतु अद्यापही अनेक बालकामगार हे शालाबाह्य आहेत.

### १.६.४ बालकामगार : आरोग्याचा हक्क

बाल हक्कानुसार जास्तीत जास्त निरोगी आयुष्य जगणे, आजारपणात वैद्यकीय मदत मिळविणे, अतिश्रम तसेच धोकादायक कामांपासून सरंक्षण मिळविणे हा बालकांचा हक्क आहे.[५] व्यवसायाच्या स्वरुपानुसार, तेथील वातावरणानुसार बालकामगारांच्या

आरोग्याला विविध प्रकारचे धोके निर्माण होतात. उदा. त्वचारोग, श्वसनाचे विकार, मणक्याचे आजार, अपघात, अंपगत्व, इतर शारिरीक इजा, विषारी द्रव्यांने छातीचे विकार, फुफ्फुसाचे आजार, डोळ्यांचे त्रास, सततची अंग व डोकेदुखी इ. मुळे बालकांचे आरोग्य धोक्यात येते. तसेच कामाच्या स्वरुपानुसार अनेक संसर्गजन्य आजारांनाही बालके बळी पडतात.[८]

तसेच कामाच्या ठिकाणी बालकामगारांचा शारिरीक छळ देखील होत असतो. दिवसभर बालकामगार काम करत असतात, त्यांचे कामाचे तास अनिश्चित असतात, कामावर सुट्टी मिळत नाही, त्यामुळे कामाच्या ठिकाणी तसेच कामाव्यतिरिक्तही त्यांना पुरेसी विश्रांती मिळणे, खेळ, करमणूक, मनोरंजनाचा उपभोग घेणे शक्य होत नाही. यामुळे बालकामगारांच्या दृष्टीने त्यांचा आरोग्याचा हक्कही डावलला जातो.[९]

एकूणच बालकामगार समस्येचे स्वरुप पाहता असे लक्षात येते की, बालके शाळेत जाऊ लागली तर ती बालमजुरीतून मुक्त होतील म्हणून शिक्षण हा बालमजुरी निर्मुलनाचा महत्त्वपूर्ण असा घटक आहे. परंतु अद्यापही भारतात तसेच महाराष्ट्रात अनेक १४ वर्षाखालील बालकामगार शालाबाह्य असल्याचे दिसून येते. यात मुलांच्या तुलनेत मुलींच्या गळतीचे प्रमाण अधिक आहे. तसेच बाल वयात कठिण व अति श्रमाची कामे करावी लागल्याने त्याचा विपरीत परिणाम बालकांच्या आरोग्यावर होतो. त्यामुळे बालकामगारांचे आरोग्य हाही एक गंभीर प्रश्न निर्माण झालेला आहे. प्रत्येक बालकास आर्थिक, सामाजिक शोषण विरहित मोकळ्या वातावरणात मनसोक्तपणे निरोगी आयुष्य जगता आले पाहिजे. बालकामगारांनाही त्यांचे हक्क उपभोगता आले पाहिजेत म्हणूनच 'बालमजुरी' ही समाजातील एक अनिष्ट प्रथा असून तिचे मुळापासून उच्चाटन होणे आवश्यक आहे.

## १.७ बालमजुरी प्रतिबंधात्मक कायदे :

बालमजुरी समस्येची तीव्रता लक्षात घेता भारतामध्ये बालमजुरी निर्मुलनासाठी विविध कायदे करण्यात आले आहेत. सदर कायद्यान्वये बालमजुरीस बंदी असून त्याविरुध्द शिक्षेच्या तरतुदी कायद्यांमध्ये करण्यात आलेल्या आहेत. या विविध कायद्यांच्या विशिष्ट अटी व शर्तीनुसार तसेच बालकांच्या वयानुसारच त्यांना कामावर ठेवले जाऊ शकते. उदा. कारखाना कायदा १९४७, किमान वेतन कायदा १९४८,

वेठबिगार निर्मुलन कायदा १९७६, अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा १९५६, भारतीय दंड विधान संहिता १८६० इ. असे काही महत्त्वाचे कायदे आहेत.[९]

तसेच बालमजुरी निर्मुलन संदर्भात देशात बाल न्याय (काळजी व सरंक्षण) कायदा २००० व बालमजुरी निर्मुलन (प्रतिबंध व नियमन) कायदा १९८६ हे दोन कायदे अधिक कठोर व महत्त्वपुर्ण आहेत.

### १.७.१ बालमजुरी निर्मुलन (प्रतिबंध व नियमन) कायदा १९८६ :

सदर कायद्यामध्ये नमूद असलेले १८ व्यवसाय व ६५ प्रक्रियांमध्ये १४ वर्षाखालील बालकांना कामाला लावणे हा गुन्हा आहे. बालकांना १ तासाची विश्रांती धरुन ६ तासापेक्षा जास्त तास काम करवून घेणे, रात्री ७ ते सकाळी ८ वाजेपर्यंतच्या कालावधीत बालकांना कामावर ठेवणे, बालकांकडून जास्त वेळ काम करवून घेणे, बालक एकाच दिवशी दोन आस्थापनांवरती काम करीत असणे या सर्व बाबींवर बंदी घालण्यात आली आहे. मात्र या कायद्यातंर्गत विशिष्ट परिस्थितीत काम करणारी बालके ही अपवाद ठरतात. जसे की, एखाद्या कुटुंबात धोकादायक स्वरुपाचा व्यवसाय चालतो व त्यात कुटुंबातील बालके काम करतात. तसेच घरच्या घरी करण्यात येणाऱ्या धोकादायक तसेच निर्धोक कामात मदत करणारी बालके व शासनाच्या शाळेत असणारे बालक कितीही लहान असले तरी काम करु शकते. अशा ठिकाणी काम करणारी बालके सदर कायद्याच्या कक्षेत येत नाहीत.[१०]

### १.७.२ बाल न्याय (काळजी व सरंक्षण) कायदा २०००/सुधारित कायदा २००६:

सदर कायद्यान्वये बालक म्हणजे १८ वर्षाखालील व्यक्ती होय. सदर कायदा प्रामुख्याने विधी संघर्षित तसेच विशेष काळजी व सरंक्षणाची गरज असलेल्या बालकांसाठी अत्यंत महत्त्वाचा ठरतो. कायद्यातील प्रकरण दोन मधील ‘कलम २६’ अंतर्गत बालकामगारांसाठी विशेष तरतुद करण्यात आलेली आहे. म्हणजेच सदर कायद्याअंतर्गत बालकामगारांना देखील सरंक्षण प्राप्त होते. कायद्यातील तरतुदीनुसार बालकांचे योग्य पुनर्वसन करता यावे यासाठी अनेक समित्या/मंडळे स्थापण्यात आलेली आहेत.[११] यामध्ये बाल न्याय मंडळ, निरिक्षणगृह, विशेष सुधारगृह, बाल कल्याण समिती, बालगृह व निवारागृहे इ.चा समावेश होतो. या सर्व शासकीय सुविधा महिला व बाल विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या अंतर्गत पुरविण्यात येत आहेत.[१२]

अशा प्रकारे भारतात १४ वर्षाखालील बालकांना विविध प्रकारच्या व्यवसायांमध्ये कामास लावण्यावर किंवा काम करण्यास कायदेशीर बंदी घालण्यात आलेली आहे. तरीही अपवादात्मक परिस्थितीत १४ वर्षाखालील बालके काम करताना दिसून येत आहेत.

## १.८ बालमजुरी निर्मुलन : विविध प्रकल्प वा उपाय योजना

प्रामुख्याने १९९१ नंतर देशात तसेच महाराष्ट्रात बालकामगारांची संख्या हळूहळू कमी झाल्याचे दिसून येते. कारण या समस्येची तीव्रता लक्षात आल्यानंतर बालमजुरी निर्मुलनासाठी राष्ट्रीय व राज्य पातळीवर विविध कार्यक्रम व योजना राबविण्यास सुरुवात झाली. सदर उपाययोजना वा प्रकल्पांची थोडक्यात माहिती पुढील प्रमाणे आहे.

### १.८.१ राष्ट्रीय बालकामगार प्रकल्प (National Child Labour Project) :

केंद्रिय मंत्रिमंडळाने १९८८ मध्ये राष्ट्रीय बालकामगार धोरण या अंतर्गत बालमजुरी उच्चाटनासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले त म्हणजे ‘राष्ट्रीय बालकामगार प्रकल्प’ होय. सुरुवातील १९८८ मध्ये हा प्रकल्प भारतातील १२ जिल्ह्यांमध्ये राबविण्यात आला व पुढे २००७ पर्यंत भारतात एकूण २५० जिल्ह्यांमध्ये सदर प्रकल्प सुरु झाला. महाराष्ट्रात १९९५ व १९९६ मध्ये प्रथम सोलापून व ठाणे या जिल्ह्यात हा प्रकल्प सुरु झाला. सद्यस्थितीत महाराष्ट्रात एकूण १६ जिल्ह्यांमध्ये हा प्रकल्प राबविला जात आहे.[१३]

अ) **प्रकल्पाचा उद्देश** : बालकामगारांचे शैक्षणिक पुनर्वसन करणे हे सदर प्रकल्पाचे महत्त्वाचे उद्दिष्ट्य आहे. त्यानुसार ९ ते १४ वर्षे वयोगटातील बालकांसाठी प्रत्येक जिल्ह्यात विशेष प्रशिक्षण केंद्रे चालविली जातात. या केंद्रामध्ये ३ वर्षांच्या कालावधीत अनौपचारिक शिक्षण दिले जाते व त्यानंतर बालकास वयानुरुप मुख्य शाळेच्या प्रवाहात दाखल केले जाते. तसेच बालकांना वयानुसार व्यावसायिक प्रशिक्षण, पूरक आहार, आरोग्य सेवा व बालकास रु. १५०/- इतके विद्यावेतन इ. सुविधा पुरविल्या जातात. तसेच बालकांना पुन्हा कामाला जावे लागू नये यासाठी त्यांच्या कुटुंबांचे उत्पन्न वाढविणे आवश्यक आहे. यादृष्टीने विविध शासकीय योजनांचा लाभ बालकांच्या पालकांना मिळवून देण्याचा प्रयत्नही सदर प्रकल्पांतर्गत केला जातो.[१३]

**ब)** **प्रकल्पाची महाराष्ट्रातील कार्यवाही (कामगिरी)** : महाराष्ट्रातील १६ जिल्ह्यांमध्ये प्रकल्प सुरु झाल्यापासून (प्रत्येक जिल्ह्याचा प्रकल्प सुरु झाल्याचा कालावधी वेगवेगळा आहे) सन २०१३ पर्यंतची आकडेवारी उपलब्ध आहे. या आकडेवारी नुसार महाराष्ट्रातील एकूण ४१३ विशेष प्रशिक्षण केंद्रामधून ८१,७९६ बालकामगारांनी शिक्षण घेतलेले आहे. यापैकी मुख्य शाळेच्या प्रवाहात दाखल झालेल्या बालकामगारांची संख्या २५,३५८ इतकी आहे.[१४]

### १.८.२ कृती दल २००६ :

'बालमजुरी' समस्येचे भारत तसेच महाराष्ट्रातून समूळ उच्चाटन करण्याच्या उद्देशाने २००६ मध्ये प्रत्येक जिल्ह्यामध्ये कृतीदल स्थापन करण्याचा शासन निर्णय घेण्यात आला. कृतीदलाची स्थापना करण्यामागे प्रामुख्याने १४ वर्षाखालील बालकामगारांची मालकांच्या तावडीतून व छळातून मुक्तता करणे, बालकामगार व त्यांच्या कुटुंबियांचे पुनर्वसन करणे तसेच बालकामगारांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात दाखल करणे इ. मुख्य उद्दिष्ट्ये आहेत. यानुसार जिल्हानिहाय अधिकारी व जिल्हादंडाधिकारी (कृतीदल प्रमुख) यांच्या थेट नियंत्रणाखाली प्रत्येक जिल्ह्यामध्ये कृतीदल स्थापन करण्यात येते.[१५]

**अ)** **प्रकल्पाची महाराष्ट्रातील कार्यवाही (कामगिरी)** :

सन २००६ ते २०१३ पर्यंत महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यामधून एकत्रितपणे २,१५४ धाडसत्रांचे आयोजन करण्यात आले असून त्यामध्ये ३,४०८ आस्थापनांवर छापे टाकण्यात आलेले आहेत. या धाडसत्रांमधून महाराष्ट्र राज्यात एकूण ५,३२७ बालकामगारांची मुक्तता करण्यात आलेली आहे. सन २००६ ते २०१३ या कालावधीत सातारा जिल्ह्यामध्ये आयोजित ७५ धाडसत्रांच्या आकडेवारीनुसार एकूण ४४ आस्थापनांवर छापे टाकण्यात आलेले आहेत. या छाप्यांमधून ९३ बालकामगारांना मुक्त करण्यात आले असून ६ मालकांविरुध्द कार्यवाही करण्यात आलेली आहे.[१४]

अशा प्रकारे भारतात व महाराष्ट्रात बालमजुरीची समस्या सोडविण्यासाठी राष्ट्रीय बालकामगार प्रकल्प व कृतीदल असे दोन महत्त्वाचे प्रकल्प सुरु आहेत. सदर दोन्ही प्रकल्पांचे महत्त्वाचे उद्दिष्ट्य हे बालकामगारांची कामातून मुक्तता करणे तसेच बालकांचे शैक्षणिक व कौटुंबिक पुनर्वसन करणे हेच आहे.

### १.८.३ महिला व बाल विकास विभागाचे विविध कार्यक्रम व योजना :

महिला व बाल विकास विभागामार्फत प्रामुख्याने बालकांचे शिक्षण व आरोग्य या दृष्टीने विशेष प्रयत्न केले जात असल्याचे दिसून येते. ज्यामध्ये एकात्मिक बाल विकास योजना, सबला योजना, अनौपचारिक शिक्षण (३ ते ६ वयोगटातील बालकांसाठी अंगणवाडी केंद्र), THR (Theat Home Ration), लसीकरण इ. सुविधांचा समावेश होतो. या विभागामार्फत काळजी व सरंक्षणाची गरज असलेली तसेच विधी संघर्षग्रस्त बालके यांच्यासाठी दत्तक विधान योजना, बालगृहे, विशेष गृह, निरीक्षण गृह, बाल संगोपन केंद्र, अनुरक्षण गृह यांसारख्या संस्था चालविल्या जातात. या सर्व सुविधांचा लाभ बालकामगारांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा ठरतो.[१६]

### १.८.४ अशासकीय संस्थांचे उपक्रम :

बालकामगार तसेच बालकांचे आरोग्य, शिक्षण, करमणूक, विकासाच्या दृष्टीने विविध कार्यक्रम राबविण्याऱ्या अनेक बिगर शासकीय संस्था आहेत. उदा. चाईल्ड लाईन, सेव्ह द चिल्ड्रेन इ. तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवरील ‘युनिसेफ’ ही संस्था बालकांच्या कल्याणासाठी अनेक देशात व राज्यांमध्ये कार्यरत आहे.[१७]

अशा प्रकारे बालमजुरी नष्ट करणे, बालकामगारांना त्यांचे सर्व हक्क उपभोगता यावेत, त्यांना चांगले आरोग्य व शिक्षण प्राप्त व्हावे तसेच त्यांना मनसोक्तपणे, मोकळेपणाने आपले जीवन जगता यावे याकरिता भारतात तसेच महाराष्ट्रात शासकीय व अशासकीय पातळीवर विविध प्रयत्न केले जात आहेत. मात्र अद्यापही या प्रयत्नांना पूर्णतः यश प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

## १.९ वीटभट्टी व्यवसायाचे स्वरुप व त्यातील बालमजुरी :

### १.९.१ असंघटित क्षेत्रातील व्यवसाय :

वीटभट्टी हा व्यवसाय असंघटित क्षेत्रामध्ये मोडणारा व्यवसाय आहे. बांधकाम क्षेत्रातील लहान उद्योग असे वीटभट्टी व्यवसायाचे स्वरुप आहे. भारतात अनेक राज्यात विटभट्टी व्यवसाय चालतो. विविध संशोधन अहवालाच्या अभ्यासावरुन भारतात प्रामुख्याने राजस्थान, पंजाब, हरियाणा, चंदीगढ, उत्तरप्रदेश, बिहार, मध्यप्रदेश, पश्चिम बंगाल, कर्नाटक, गुजरात व महाराष्ट्र इ. राज्यांमध्ये वीटभट्टी व्यवसाय मोठ्या प्रमाणात

चालत असल्याचे स्पष्ट होते. तसेच महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये वीटभट्टी व्यवसाय चालत आहे.[१८]

वीटभट्टी व्यवसाय हंगामी स्वरुपाचा असून यामध्ये हंगामी कालावधीतच रोजगार निर्मिती होते. तसेच वीटभट्टी व्यवसाय विखुरलेल्या स्वरुपात असल्याने यामध्ये काम करणारे कामगारही विखुरलेलेच असतात. या व्यवसायामध्ये स्थलांतरीत कामगारांचे प्रमाण सर्वाधिक आहे. त्याचप्रमाणे सदर व्यवसायात काम करणाऱ्या बालकांचे प्रमाणही अधिक असल्याचे दिसून येते. तसेच वीटभट्टी व्यवसायातील काम हंगामी व अनिश्चित स्वरुपाचे असल्याने यातील कामगार कुटुंबांची आर्थिक स्थिती ही बेताची वा बिकट असल्याचे दिसून येते. वीटभट्टी व्यवसायातील कामगार असंघटित असल्याने त्यांना कोणत्याही शासकीय सुविधांचा लाभ तसेच किमान वेतन कायदा, कारखाना कायदा यांसारख्या कायद्यांचे सरंक्षण मिळत नसल्याचे दिसून येते. कामाच्या ठिकाणी कामाचे तास निश्चित नसणे, जास्त वेळ काम करुन कमी वेतन मिळणे, कामाच्या ठिकाणी अनेक धोके उद्भवतात त्यापासून संरक्षण नसणे यांसारख्या विविध समस्या या व्यवसायातील कामगारांच्या असल्याचे दिसून येतात.[१८]

कुटुंबाचा व्यवसाय म्हणून व बिकट आर्थिक परिस्थिती यामुळे व्यवसायात मदत करण्याच्या हेतूने पालक कुटुंबातील लहान मुलांना वीट बनविण्याच्या कामामध्ये गुंतवतात. त्यामुळे मोठ्या संख्येने बालकेही या क्षेत्रात ओढली जातात. या क्षेत्रात काम करणाऱ्या बालकांना 'असंघटित क्षेत्रातील बालकामगार' म्हटले जाते. याप्रमाणे जणगणना अहवाल २००१ नुसार भारतात असंघटित क्षेत्रातील बालकामगारांचे प्रमाण जास्त आहे. या अहवालानुसार भारतात सर्वात अधिक बालकामगार हे ढाबा, हॉटेल्स, ज्वेलरी व्यवसायात, पान, विडी, सिगारेट बनविणे, अगरबत्ती, धुप, धुण्याची पावडर बनविणे, बांधकाम व्यवसाय, घरकामे, कार्पेट बनविणे, वाहन दुरुस्ती, रत्न पाडणे, कुंभारकाम, हातमाग व विणकाम तसेच विटभट्टी व फरशा बनविणे या असंघटित क्षेत्रातील तसेच धोकादायक स्वरुपातील व्यवसायामध्ये काम करणारी आहेत. यामध्ये विटभट्टी व्यवसायात काम करणाऱ्या बालकामगारांचे प्रमाण हे ६.९६% आहे.[३]

**१.९.२ वीट बनविण्याची प्रक्रिया** :

वीटभट्टी व्यवसायाचा हंगाम हा सहा महिन्याचा असून साधारणतः नोव्हेंबर ते मे या कालावधीत वीटभट्टीचे काम चालते. वीटा बनविण्याच्या संख्येवरुन कामगारांची गरज

निर्माण होते. त्यानुसार एका वीटभट्टीवर कमीत कमी ५ ते ६ व जास्तीत जास्त २० ते २५ कामगार कुटुंबे आढळून येतात. तसेच वीट बनविण्यासाठी प्रामुख्याने माती, पाणी, कोळसा, ऊसाचा चोथा, कोळशाचा भुगा, बारीक माती, मीठ इ. साहित्य लागते. वीटभट्टीवरील प्रत्येक कामगार कुटुंबांना दिवसभराचे वीटा बनविण्याचे लक्ष्य ठरवून देण्यात आलेले असते. यानुसार कुटुंबे दिवसाला ५०० ते २००० पर्यंत वीटा तयार करतात. या कामाची संपूर्ण कुटुंबाना एकत्रितपणे मजुरी देण्यात येते. दिवसाला १००० वीटा तयार केल्यास कुटुंबाला ५००/- ते ७००/- रुपये इतकी मजुरी मिळते.

कामगार कुटुंबे वीटा बनविण्यासाठी गरजेनुसार मातीचा ढिग, त्यात पाणी व ऊसाचा चोथा एकत्रित करुन पायाने तुडवून वीटांसाठी चिख्खल तयार करतात. काही वीटभट्टयांवरती ट्रॅक्टरच्या रोटरच्या सहाय्याने माती कालविण्यात येते. साधारणपणे ७ ते ८ तास मातीचे मिश्रण तसेच ठेवण्यात येते. वीट व्यवस्थितरित्या थापता यावी यासाठी जमीन सपाट करुन घेतली जाते. आकारानुसार वीटांच्या साच्यामध्ये कालविलेला चिख्खल टाकण्यात येतो. सपाट जमिनीवर वीटेचा साचा उलटा टाकण्यात येतो व या प्रकारे कच्च्या वीटा बनविण्यात येतात. पुढील ३ दिवसात सर्व बाजूने वीटा वाळल्यानंतर भट्टीसाठी वीट वाहून नेता यावी म्हणून त्या रांगेमध्ये उभ्या करण्यात येतात.

कच्च्या वीटा भाजण्यासाठी वीटभट्टीवरती एक जागा ठरवून तिथे भट्टी लावण्यात येते. भट्टी लावताना आवश्यक तेवढे थर करुन कोळसा व मीठाच्या सहाय्याने भट्टी पेटविण्यात येते. अशा प्रकारे भट्टी लावल्यानंतर १५ दिवस वीट भाजण्याची प्रक्रिया चालू राहते व त्यानंतर पक्की वीट विक्रीसाठी तयार होते.[१९]

### १.९.३ वीटभट्टी व्यवसायातील बालकामगार : महाराष्ट्र

महाराष्ट्रात अनेक जिल्ह्यात वीटभट्टी व्यवसाय चालत असून या व्यवसायात अधिकाधिक बालकामगार असल्याचे दिसून येते. या सदंर्भात यशदा, पुणे या संस्थेचा २०११-१२ मधील अहवाल महत्त्वपूर्ण ठरतो.

राज्य शासनाची अंगीकृत संस्था असलेली यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा), पुणे यातील ‘मानव विकास केंद्र’ या विभागामार्फत सन २०११-१२ मध्ये महाराष्ट्रात बालकामगारांचे सर्वेक्षण करण्यात आले होते. सदर सर्वेक्षण राष्ट्रीय बालकामगार प्रकल्प नसलेल्या १९ जिल्ह्यांमध्ये करण्यात आले होते (१६ जिल्ह्यांव्यतिरिक्त). शहरी भागात म्हणजेच जिल्ह्याचे ठिकाण, महानगरपालिका,

नगरपालिका किंवा नगरपरिषद हद्दीतील सर्व ठिकाणे, जिल्ह्यातील सर्व तालुक्यांची व ग्रामपंचायत हद्दीतील सर्व ठिकाणे तसेच जिल्ह्यात किंवा तालुक्यात वीटभट्टी असलेली ठिकाणे व पर्यटन स्थळे इ. सर्व ठिकाणी सर्वेक्षण करण्यात आले होते. या अहवालानुसार NCLP नसलेल्या १९ जिल्ह्यांमध्ये एकूण ३३,६४५ बालकामगार आढळून आले. त्यापैकी १४,८३९ बालके ही बालमजुरी प्रतिबंध व नियमन कायदा १९८६ अंतर्गत बंदी असलेल्या १८ व्यवसाय व ६५ प्रक्रियामध्ये काम करत असलेली होती.

या अहवालामध्ये १९ जिल्ह्यांत सर्वाधिक बालकामगार ज्या व्यवसायात गुंतलेले आहेत त्या व्यवसायांना प्रथम (१), त्यापेक्षा थोड्या कमी प्रमाणात बालकामगार ज्या व्यवसायात गुंतलेले असतील त्यास द्वितीय (२) व द्वितीय स्थितीपेक्षा कमी प्रमाणात बालकामगार ज्या व्यवसायात असतील त्यास तृतीय (३) क्रमांक (Rank) देण्यात आले आहे. प्रत्येक जिल्ह्यात संबंधित व्यवसाय कितव्या क्रमांकावर (Rank) आहे याप्रमाणे जिल्ह्यांचे वर्गीकरण करण्यात आले आहे.

सदर अहवालानुसार १९ पैकी ७ जिल्ह्यांमध्ये वीटभट्टी व कौले बनविणे हा प्रथम क्रमांकाचा व्यवसाय आहे की, ज्यामध्ये सर्वाधिक बालकामगार आहेत. एकूण ३ जिल्ह्यांमध्ये सर्वाधिक बालकामगार असलेला हा द्वितीय क्रमांकाचा व्यवसाय आहे. तसेच एका जिल्ह्यांमध्ये हा तृतीय क्रमांकाचा व्यवसाय आहे. म्हणजेच एकूण १० पेक्षा अधिक जिल्ह्यांमध्ये वीटभट्टी व कौले बनविणे हा व्यवसाय मोठ्या प्रमाणात चालत आहे व या व्यवसायात बालमजुरीचे प्रमाण अधिक असल्याचे स्पष्ट होते.

यानुसार वीटभट्टी व्यवसाय प्रथम क्रमांकावर असलेल्या ७ जिल्ह्यांमध्ये नगर, पुणे, भंडारा, सातारा, उस्मानाबाद, रायगड, वर्धा या जिल्ह्यांचा समावेश होतो. यापैकी सातारा व पुणे या दोन जिल्ह्यात वीटभट्टीत काम करणाऱ्या बालकामगारांची संख्या अधिक आहे. तसेच सातारा जिल्ह्यातील कराड तालुक्यातच वीटभट्ट्यांचे प्रमाण अधिक असून या जिल्ह्यात सर्वाधिक बालकामगार हे वीटभट्टी व्यवसायातच आढळून आलेले आहेत. यावरुन असे स्पष्ट होते की, महाराष्ट्रात वीटभट्टी हा व्यवसाय मोठ्या प्रमाणात चालत असून या व्यवसायात काम करणाऱ्या बालकामगारांचे प्रमाण अधिक आहे.[२०]

तसेच 'बालमजुरी निर्मुलन कायदा' १९८६ मध्ये नमूद असलेल्या ६५ प्रक्रियांमध्ये वीटभट्टी व्यवसायाचा समावेश आहे. त्यामुळे वीटभट्टी व्यवसायात १४ वर्षाखालील बालकांना काम करण्यास बंदी आहे असे दिसून येते. प्रत्यक्षात मात्र सदर कायद्यान्वये

अपवादात्मक स्थितीत काम करणाऱ्या बालकांविरुध्द कार्यवाहीस मर्यादा घालण्यात आलेल्या आहेत. या कायद्यानुसार कुटुंबात किंवा घरच्या घरी करण्यात येणाऱ्या धोकादायक तसेच निर्धोक कामात मदत करणारी बालके, शासनाच्या शाळेत असणारी बालके कितीही लहान असली तरी काम करु शकतात. म्हणजेच अशी बालके कायद्याच्या कक्षेत येत नाहीत.[१०]

त्यानुसार वीटभट्टी व्यवसायातील बालकेही प्रत्यक्षरित्या मालकांकडून कामावर ठेवली जात नाहीत. तर बालके आपल्या कुटुंबासमवेत काम करतात म्हणून या व्यवसायाला घरगुती व्यवसायाचे स्वरुप प्राप्त होते. यामुळे सदर कायद्यांतर्गत वीटभट्टी व्यवसायातील बालकामगारांविरुध्द कार्यवाही करण्यात अडचणी येत असल्याचे दिसून येते. म्हणूनच वीटभट्टी व्यवसायात बालमजुरी मोठ्या प्रमाणात आढळून येते.

### १.१० **सारांश** :

सदर प्रकरणात 'बालमजुरी' समस्येचे स्वरुप व व्याप्ती, भारतातील तसेच महाराष्ट्रातील बालकामगारांची संख्यात्मक माहिती, बाल हक्क व त्यांचे उल्लंघन, बालमजुरी प्रतिबंधात्मक कायदे तसेच असंघटित क्षेत्रातील वीटभट्टी व्यवसायातील बालमजुरी इ. बाबींचे सविस्तर विवेचन देण्यात आले आहे. बालमजुरी निर्मुलनासाठी विविध कायदे व प्रकल्पांच्या माध्यमातून तसेच शासकीय व अशासकीय पातळीवर अनेक प्रयत्न केले गेले आहेत किंवा केले जात आहेत. परंतु अद्यापही बालमजुरी समस्येचे मुळापासून उच्चाटन झालेले नाही. त्यामुळे 'बालमजुरी' ही एक व्यापक व अतिशय जटिल स्वरुपाची समस्या असल्याचे सदर प्रकरणातील माहितीवरुन स्पष्ट होते.

### १.११ **संदर्भ** :

१. यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे (२००९), "बालमजुरी निर्मलन प्रकल्प-संदर्भ साहित्य", बाल हक्क कक्ष-संशोधन व प्रलेखन विभाग.

२. डॉ. वायदंडे शशिकांत, टि. म. विद्यापीठ, पुणे (एप्रिल २०११), "महाराष्ट्रातील असंघटित क्षेत्रातील बालमजुरी निर्मुलनासंबंधी धोरणांचा चिकित्सक अभ्यास", विद्यावाचस्पती (समाजशास्त्र) पदवीसाठी प्रबंध, पुणे. पान नं. ६ व ७, १८ ते २२.

३. Barman Bhupen[1] and Barman Nirmalendu[2] (Feb.2014), "A Study on Child Working Population in India", IOSR Journal Of Humanities And Social

Science (IOSR-JHSS) Volume 19, Issue 2, Ver. I, PP 01-05 e-ISSN: 2279-0837, p-ISSN: 2279-0845. www.iosrjournals.org

४. तुकाराम जाधव व महेश शिरापूरकर (जाने २०११), “भारतीय राज्यघटना व घटनात्मक प्रक्रिया-खंड १”, युनिक अॅकॅडमी प्रकाशन, पान क्र. ५४,५८,५९,७२.

५. डॉ. वैद्य शांता (२००५), “बालकांचे हक्क”, मराठी अनुवादीत पुस्तिका, युनिसेफ प्रकाशन.

६. The Right of Children to Free and Compulsory Education ACT, 2009, No. 35 of 27 August 2009, New Delhi. www.maharashtra.gov.in

७. Census of India (जनगणना अहवाल), २०११. www.censusindia.gov.in

८. Yadav Surendra Kumar and Sengupta Gowri (2009), “Environmental and Occupational Health Problems of Child Labours : Some Issues and Challenges for Future”, J Hum Ecol, 28(2) : Page No. 143-148, ©Kamla-Raj 2009, Website : www.ncpcr.com

९. केंद्र सरकार व प्रसारण मंत्रालय प्रकाशन विभागातर्फे (जुलै १९९५), “योजना : नियोजन व विकास समर्पित”, अंक १२, प्रसिध्द. Vol. XXII, No. XII, पान नं. ११ ते १४, www.yojana.gov.in

१०. The Child Labour (Prohibition and Regulation) Act 1986, The Schedule (See Sec.3) www.maharashtra.gov.in

११. बालन्याय (काळजी व संरक्षण) अधिनियम २००० / सुधारित २००६ www.maharashtra.gov.in

१२. महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे (२०११), “बाल न्याय अधिनियम व बालकांचे हक्क”, माहिती पुस्तिका, पुणे.

१३. यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे (२०१३), “राष्ट्रीय बालकामगार प्रकल्प- कार्यात्मक मार्गदर्शिका”, महाराष्ट्र शासन, कामगार विभाग, निर्मिती : यशदा, पुणे. पान नं. १ ते ७, www.yashada.org

१४. मानव विकास केंद्र, यशदा, पुणे (२०१२-१३), “बालकामगारांचे अनुधावन : कृतीदल व राष्ट्रीय बालकामगार प्रकल्पाद्वारे शैक्षणिक पुनर्वसन केलेले बालकामगार”, संशोधन अहवाल. निर्मिती : यशदा, पान नं. ५ व ६५

१५. मानव विकास केंद्र, यशदा, पुणे (मे २०१२), “कृतीदल सदस्यांकरीता मार्गदर्शिका”, यशदा, पुणे. शा. नि. क्रमांक, सीएलए-२००७/(३९२) काम-७ अ, मंत्रालय, मुंबई -३२, दि.३ जुलै, २००७.

१६. महिला व बाल विकास विभागाचे विविध कार्यक्रम व योजना : शासकीय वेबसाईट - www.womenchild.maharashtra.com

१७. Non-Government Organizations (अशासकीय वा स्वयंसेवी संस्था)

१) www.childline.org.in २) www.unicef.org ३) www.savethechildren.in

१८. National Commission for Protection of Child Rights, GoI (Jan 2015), “Status Report on School Participation and availing of Health and Nutrution services for children of Migrant Labourers”, Study conducted on behalf of NCPCR. www.ncpcr.com

१९. मानव विकास केंद्र, यशदा, पुणे (२०१३-१४), राष्ट्रीय बालकामगार प्रकल्पांतर्गत जिल्ह्यांचे क्षेत्रनिहाय मॅपिंग “सातारा जिल्ह्यातील वीटभट्टीवर काम करणाऱ्या बालकांचा अभ्यास”, संशोधन अहवाल. यशदा, पुणे.

२०. Human Development Centre, Yashada, Pune (2011-12), “Survey of Child Labours in Non NCLP Districts in Maharashtra” Yashada, Pune. Page no.15, 16,74 to 76.

# प्रकरण दुसरे
# संदर्भ साहित्याचा आढावा

## २. प्रस्तावना :

प्रस्तुत संशोधन अभ्यासासाठी 'वीटभट्टी व्यवसायातील बालमजुरी' विषयाशी संबंधित अनेक दुय्यम साधनांचा आधार घेण्यात आला आहे. यामध्ये संशोधन अहवाल, शोध निंबध, शासनाचे प्रकाशित व अप्रकाशित अहवाल, शासनाची मासिके, शासननिर्णय, बालमजुरी संबंधित कायदे, अशासकीय संस्था, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संस्थांची माहिती, शासकीय वेबसाईटवरील माहिती, विविध शासकीय योजनांचा तपशील इ. दुय्यम सामग्रीचा समावेश आहे. सदर दुय्यम सामग्रीतून प्राप्त झालेल्या माहितीचा थोडक्यात आढावा पुढीलप्रमाणे आहे.

## २.१ शोध निबंध :

२.१.१ **Barman Bhupen[1] and Barman Nirmalendu[2] (Feb.2014), "A Study on Child Working Population in India", IOSR Journal Of Humanities And Social Science (IOSR-JHSS) Volume 19, Issue 2, Ver. I, PP 01-05 e-ISSN: 2279-0837, p-ISSN: 2279-0845.** www.iosrjournals.org

सन २०१४ मध्ये 'भारतातील बालकामगारांचा अभ्यास' या विषयावर सदर शोध निंबध सादर केला आहे भारतातील बालकामगारांची एकूण संख्या व त्यांची सद्यस्थिती, बालमजुरीची कारणे व परिणाम अभ्यासणे, व्यवसायानुरुप बालकामगारांचे वर्गीकरण तसेच आवश्यक उपाययोजना सूचविणे हे सदर शोध निबंधाचे प्रमुख उद्देश होते. सदर शोध निंबधातील निष्कर्षानुसार भारतामध्ये असंघटित क्षेत्रातील व धोकादायक व्यवसायातील बालकामगारांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. उदा. चप्पल काम, हॉटेल्स व रेस्टॉरंट, विटभट्टी व फरशा बनविणे इ. यातील जनगणना अहवाल २००१ च्या विश्लेषणानुसार असंघटित क्षेत्रातील वीटभट्टी व्यवसायामध्ये गुंतलेल्या बालकामगारांची टक्केवारी ६.९६% इतकी आहे. सदर शोध निंबधाच्या माध्यमातून भारतातील असंघटित क्षेत्रातील बालकामगारांचे एकूण प्रमाण, त्यांच्या कामाचे स्वरुप, वेतन, शालेय स्थिती, बालमजुरीची कारणे व समस्या इ. विषयी माहिती प्राप्त होते.

यावरुन वीटभट्टी व्यवसायातील बालकामगारांचा अभ्यास करणे किती महत्त्वाचे आहे हे संशोधकाच्या लक्षात आले. याआधारे वीटभट्टी व्यवसायातील बालकामगारांची व्याप्ती, त्यांची शैक्षणिक व आरोग्य स्थिती अभ्यासणे या दृष्टीकोनातून संशोधन अभ्यासाची उद्दिष्ट्ये व गृहितकृत्ये ठरविण्यात आली.

**२.१.२ Yadav Surendra Kumar and Sengupta Gowri (2009), "Environmental and Occupational Health Problems of Child Labours : Some Issues and Challenges for Future", J Hum Ecol, 28(2) : Page No. 143-148, ©Kamla-Raj 2009, Website :** www.ncpcr.com

कामाच्या करत ठिकाणची स्थिती, वातावरण व व्यवसायाचे स्वरुप यानुसार बालकामगारांच्या आरोग्य संबंधी उद्भवणारे धोके किंवा समस्या यावर सदर शोध निंबध २००९ प्रसिध्द करण्यात आला होता. सदर शोध निंबधानुसार भारतात शेतीकाम, बांधकाम, हंगामी स्वरुपाचे व्यवसाय तसेच उद्योगधंदे इ. मध्ये बालकामगारांची संख्या जास्त असून यात बालके अधिक धोकादायक कामे करत आहेत. प्रत्येक व्यवसायानुरुप बालकामगारांचे आरोग्य विषयक धोके नमुद करण्यात आलेले आहेत.

शोध निबंधाच्या निष्कर्षानुसार बांधकाम व्यवसायाचे स्वरुप हे असंघटित, विखुरलेले व घरगुती कामे असून सदर व्यवसाय किंवा कामे ही कायद्याच्या कक्षेबाहेरची आहेत. त्यामुळे या व्यवसायातील बालकामगारांची सुरक्षितता व आरोग्य विषयक समस्यांकडे अधिक दुर्लक्ष होते. यानुसार वीटभट्टी व्यवसाय हा बांधकाम क्षेत्रातील एक भाग व छोटा व्यवसाय समजला जातो. त्यामुळे वीटभट्टी व्यवसायानुरुप त्यातील बालकामगारांच्या आरोग्य संबंधीत समस्या व धोक्याचे स्वरुप हे वेगळे असू शकते हे संशोधकाच्या निदर्शनास आले. यानुसार वीटभट्टी व्यवसायातील बालकांची आरोग्य स्थिती जाणून घेणे यादृष्टीने संशोधन अभ्यासाचे उद्दिष्ट्य व गृहितकृत्य ठरविण्यात आले. तसेच या व्यवसायातील मुलींच्याही आरोग्य विषयक समस्यांचा स्वतंत्र व सखोल अभ्यास करण्याचे ठरविण्यात आले. एकूणच 'बालकामगारांची आरोग्य स्थिती' या विषयाची पार्श्वभूमी समजण्यासाठी सदर संदर्भ साहित्याचा आढावा अत्यंत उपयुक्त ठरला आहे.

## २.२ संशोधन अहवाल :

### २.२.१ डॉ. वायदंडे शशिकांत, टि. म. विद्यापीठ, पुणे (एप्रिल २०११), "महाराष्ट्रातील असंघटित क्षेत्रातील बालमजुरी निर्मुलनासंबंधी धोरणांचा चिकित्सक अभ्यास", विद्यावाचस्पती (समाजशास्त्र) पदवीसाठी प्रबंध, पुणे. पान नं. ६ व ७, १८ ते २२.

बालमजुरीच्या समूळ उच्चाटनासाठी राज्य व केंद्र शासनामार्फत अनेक धोरणे व कार्यक्रम राबविले जात असूनही अद्याप भारतात बालमजुरी नष्ट झालेली नाही. त्यामुळे शासकीय धोरणांमध्ये काही त्रुटी आहेत का हे जाणून घेण्यासाठी सदर संशोधन अभ्यास करण्यात आला होता. यामध्ये असंघटित क्षेत्रातील बालमजुरी निर्मुलन संबंधीत धोरणांचा अभ्यास करण्यात आला आहे. सदर संशोधन अहवालाची प्रस्तावना संशोधकासाठी जास्त उपयुक्त ठरली आहे. ज्यामध्ये 'बालमजुरी' विषयाची व्याप्ती म्हणजेच बालकामगारांचे प्रकार व संख्या, बालमजुरीची कारणे व परिणाम, बालकामगारांचे हक्क इ. विषयी माहिती मिळते.

तसेच बालमजुरी प्रतिबंधात्मक कायदे व शासनाची धोरणे याविषयी सविस्तर माहिती प्राप्त होते. या आधारे असंघटित क्षेत्रातील बालकामगारांचा अभ्यास या विषयाचे महत्त्व विशद होते. सदर संशोधन अहवालातील उपयुक्त माहितीचा संशोधकाने अभ्यास विषयाच्या प्रस्तावनेसाठी स्वतःच्या भाषेत योग्य ठिकाणी व आवश्यकतेनुसार वापर केलेला आहे.

### २.२.२ Human Development Centre, Yashada, Pune (2011-12), "Survey of Child Labours in Non NCLP Districts in Maharashtra" Yashada, Pune. Page no.15,16,74 to 76.

सन २०११-१२ मध्ये यशदा, पुणे या संस्थेमार्फत महाराष्ट्रात व्यवसायानुरुप बालकामगारांची नेमकी संख्या शोधण्यासाठी सर्वेक्षण करण्यात आले होते. प्रामुख्याने राष्ट्रीय बालकामगार प्रकल्प नसलेल्या १९ जिल्ह्यांमध्ये हे सर्वेक्षण करण्यात आले होते. सदर सर्वेक्षण अहवालामध्ये बालकांचे वय, लिंग, स्थंलातर स्थिती, बालकांची शैक्षणिक स्थितीचे सविस्तर विश्लेषण देण्यात आलेले आहे. या अहवालातील **Table 4 : Top 3 Occupations in a Districts** मध्ये जिल्हानिहाय व्यवसायानुरुप आढळून आलेल्या बालकामगांची संख्या व टक्केवारी दर्शविण्यात आली आहे. यानुसार महराष्ट्रात १९ पैकी

११ जिल्ह्यामध्ये वीटभट्टी हा पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या क्रमांकाचा व्यवसाय आहे की ज्यामध्ये सर्वाधिक बालकामगार गुंतलेले आहेत हे स्पष्ट होते.

सदर अहवालावरुन महाराष्ट्रात सातारा जिल्ह्यामध्ये कराड तालुक्यातच विटभट्टयांचे प्रमाण अधिक असून या जिल्ह्यात सर्वाधिक बालकामगार हे विटभट्टी व्यवसायातच आढळून आल्याचे स्पष्ट होते. म्हणजेच संशोधनासाठी 'वीटभट्टी व्यवसायातील बालकामगार' हा अभ्यास विषय व 'सातारा जिल्ह्यातील कराड तालुका' हे अभ्यास क्षेत्र निवडण्याच्या दृष्टीने सबळ सदंर्भ साहित्य संशोधकास प्राप्त झाले. तसेच या आधारे सातारा जिल्ह्यातील विशेषतः वीटभट्टी व्यवसायातील बालमजुरी निर्मुलनासाठी NCLP प्रकल्पाची गरज व उपयुक्तता सिध्द करण्याचे महत्त्वही संशोधकाच्या लक्षात आले व त्यादृष्टीने अभ्यासास दिशा प्राप्त झाली.

**२.२.३ मानव विकास केंद्र, यशदा, पुणे** (२०१२-१३), **"बालकामगारांचे अनुधावन : कृतीदल व राष्ट्रीय बालकामगार प्रकल्पाद्वारे शैक्षणिक पुनर्वसन केलेले बालकामगार", संशोधन अहवाल. निर्मिती : यशदा, पान नं. ५ व ६५**

संशोधन अभ्यासामध्ये महाराष्ट्रातील एकूण १४ जिल्ह्यांचा समावेश होता. कृती दलामार्फत मुक्त करण्यात आलेले बालकामगार व NCLP प्रकल्पाअंतर्गत प्रशिक्षण केंद्रात शिक्षण घेतलेले बालकामगार यांची शैक्षणिक सद्यस्थिती अभ्यासणे हे सदर संशोधनाचे मुख्य उद्दिष्ट्य होते. सदर संशोधन अहवालाच्या प्रस्तावनेतून महाराष्ट्रातील १६ जिल्ह्यांमध्ये NCLP च्या माध्यमातून शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात दाखल झालेल्या बालकामगारांची आकडेवारी प्राप्त झाली. प्राप्त आकडेवारीवरुन बालकामगारांच्या शैक्षणिक पुनर्वसनामध्ये NCLP प्रकल्पाचे किती महत्त्व आहे हे लक्षात येते. तसेच २००६-२०१३ पर्यंत महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यामधून कृती दलामार्फत मुक्त करण्यात आलेल्या बालकामगारांची आकडेवारी प्राप्त झाली आहे. याद्वारे कृती दलामार्फत कामातून बालकांची मुक्तता झाल्यास त्यांचे शैक्षणिक पुनर्वसन करता येऊ शकते ही महत्त्वाची बाब अधोरेखित होते.

सातारा जिल्ह्यामध्ये NCLP प्रकल्प राबविला जात नाही. त्यामुळे या जिल्ह्यात वीटभट्टी व्यवसायातील बालकामगारांची मुक्तता व त्यांचे शैक्षणिक पुनर्वसन यादृष्टीने NCLP व कृतीदल या दोन्ही प्रकल्पांचे महत्त्व व गरज सिध्द करणे यादृष्टीने संशोधन अभ्यास विषयाकडे पाहण्याची नवी दृष्टी संशोधकास प्राप्त झाली. त्यानुसार संशोधन

विषयाचे क्षेत्र निवडताना, संशोधनाचे महत्त्व, व्याप्ती व उद्दिष्ट्य ठरविण्यासाठी या संदर्भ साहित्याचा उपयोग झालेला आहे.

**२.२.४ मानव विकास केंद्र, यशदा, पुणे (२०१३-१४), राष्ट्रीय बालकामगार प्रकल्पांतर्गत जिल्ह्यांचे क्षेत्रनिहाय मॅपिंग "सातारा जिल्ह्यातील वीटभट्टीवर काम करणाऱ्या बालकांचा अभ्यास", संशोधन अहवाल. यशदा, पुणे.**

सन २०१३-१४ मध्ये सातारा जिल्ह्यातील वीटभट्टीवरील बालमजुरांचे मॅपिंग करण्यात आले होते. यामध्ये कराड तालुक्यातील १४१ वीटभट्टयांचे सर्वेक्षण केले होते. यामध्ये वीटभट्टी व्यवसायाचे स्वरुप, बालकामगारांची व्याप्ती व कारणे, बालकांचे शिक्षण व आरोग्य संबंधीत घटकांचा अभ्यास करण्यात आला होता. या अहवालानुसार कराड तालुक्यात वीटभट्टी व्यवसायात १४ वर्षाखालील एकूण ६८८ बालके आढळून आली होती. त्यापैकी १३५ बालके वीटभट्टीवर प्रत्यक्ष काम करताना दिसून आली होती. तसेच या संशोधन अहवालातून वीटभट्टीवरील बालकांच्या शैक्षणिक व आरोग्य स्थितीची देखील माहिती प्राप्त झाली.

यानुसार २०१३-१४ मध्ये प्राप्त झालेली माहिती व त्या आधारित निष्कर्षांचा उपयोग संशोधकाने स्वतःच्या संशोधन अहवालातील माहिती विश्लेषणासाठी केलेला आहे. यावरुन वीटभट्टी व्यवसायातील बालकामगारांची त्यावेळची स्थिती व सद्यस्थिती यातील फरक किंवा साम्य लक्षात येण्यास मदत होते. प्रामुख्याने संशोधकाने हाती घेतलेल्या संशोधन विषयाची विश्वासार्हता तपासण्यासाठी सदर संदर्भ साहित्याचा उपयोग होतो. यावरुन वीटभट्टी व्यवसायातील बालमजुर, त्यांची शैक्षणिक व आरोग्य स्थिती या विषयी सखोल ज्ञान व माहिती प्राप्त होते.

**२.२.५ National Commission for Protection of Child Rights, GoI (Jan 2015), "Status Report on School Participation and availing of Health and Nutrution services for children of Migrant Labourers", Study conducted on behalf of NCPCR.** www.ncpcr.com

NCPCR, भारत सरकार तर्फे २०१५ मध्ये स्थलांतरीत कामगार कुटुंबातील ० ते १४ वयोगटातील बालकांना शिक्षण, आरोग्य व पोषक आहारासंबंधीत उपलब्ध सुविधांबाबत संशोधनात्मक अभ्यास केला होता. यामध्ये मोठ्या प्रमाणात व वारंवार स्थलांतर होत असलेल्या महाराष्ट्र, पंजाब, पश्चिम बंगाल, कर्नाटक, गुजरात व दिल्ली या सहा राज्यांचा समावेश होता. तसेच सर्वाधिक स्थलांतरीत कामगार कुटुंबे आढळणारे

शेतमजुरी, बांधकाम व वीटभट्टी व्यवसाय, तसेच फेरीवाले व इतर व्यवसाय निवडण्यात आले होते.

सदर संशोधन अभ्यासामधून महाराष्ट्र तसेच महाराष्ट्र तसेच इतर राज्यातील वीटभट्टी व्यवसायातील शैक्षणिक व आरोग्य स्थितीचे विश्लेषण व निष्कर्ष प्राप्त होतात. याआधारे वीटभट्टी व्यवसायाचे सार्वत्रिकीकरण व त्यातील एकजीनसीपणा निदर्शनास येतो. त्यामुळे महाराष्ट्रातील वीटभट्टी व्यवसायातील बालमजुरांची व्याप्ती व त्यांच्या शैक्षणिक व आरोग्य स्थितीचा अभ्यास करणे या संशोधन अभ्यास विषयाचे महत्त्व लक्षात येते. तसेच संदर्भ साहित्यातील निष्कर्षाचा उपयोग संशोधकाने स्वतःच्या संशोधन अहवालातील प्राप्त माहितीच्या तुलनात्मक विश्लेषणासाठी केलेला आहे. एकूणच संशोधकाने हाती घेतलेल्या संशोधन विषयाची विश्वासार्हता तपासण्यासाठी सदर संदर्भ साहित्याचा उपयोग होतो.

## २.३ कायदे विषयक साहित्य :

### २.३.१ बालन्याय (काळजी व संरक्षण) अधिनियम २००० आणि सुधारित २००६, www.maharashtra.gov.in

सदर कायदा केंद्र शासनाचा असून विधी संघर्षित बालके, विशेष काळजी व सरंक्षणाची गरज असलेली बालके, तसेच बालकामगार यांच्यासाठी हा कायदा अत्यंत महत्त्वाचा आहे. कायद्यामध्ये बालकांच्या पुनर्वसनाशी संबंधीत उपाययोजना वा तरतुदींचे सविस्तर स्पष्टीकरण देण्यात आले आहे. तसेच कायद्याच्या अंमलबजावणीची प्राथमिक जबाबदारी प्रत्येक राज्यावर सोपविण्यात आली आहे. कायद्यानुसार बालकांचा विकास व पुनर्वसन यादृष्टीने आवश्यक सर्व सुविधा महिला व बाल विकास विभागामार्फत पुरविण्यात येत असल्याचेही स्पष्ट होते.

कायद्यातील प्रकरण दोन मधील ‘कलम २६’ मध्ये बालकामगार व त्याशी संबंधीत शिक्षेची तरतुद नमूद आहे. त्यामुळे बालकामगारांच्या दृष्टीने कायद्याची उपयुक्तता, त्यातील तरतुदी व उपाययोजना जाणून घेणे संशोधन अभ्यासासाठी गरजेचे होते. तसेच कायद्यानुसार महिला व बाल विकास विभागामार्फत पुरविण्यात येणाऱ्या सुविधांचा लाभ वीटभट्टी व्यवसायातील बालकामगारांना होत आहे किंवा नाही, नसल्यास का नाही, त्यातील अडचणी समजून घेण्यासाठी कायद्याचा अभ्यास करणे महत्त्वाचे होते. म्हणूनच

संशोधन विषयाच्या अभ्यासासाठी संशोधकाने सदर कायद्याचा संदर्भ साहित्यात समावेश केलेला आहे.

### २.३.२ The Child Labour (Prohibition and Regulation) Act 1986, The Schedule (See Sec.3) www.maharashtra.gov.in

'बालमजुरी निर्मुलन (प्रतिबंध व नियमन) कायदा १९८६' या कायद्यातून बालकामगारांशी संबंधीत विविध तरतुदींचा संदर्भ प्राप्त होतो. या कायद्यानुसार "CHILD" Means a person who has not completed his fourteen year of age. तसेच बालकामगारांना काम करण्यास प्रतिबंध करण्यात आलेले १८ व्यवसाय व ६५ प्रक्रिया यांची सविस्तर यादी कायद्यामध्ये देण्यात आलेली आहे. सदर कायद्यामध्ये बालकांचे शिक्षण, आरोग्य व सुरक्षितता या दृष्टीने महत्त्वपुर्ण तरतुदी करण्यात आलेल्या आहेत. कायद्याचे उल्लंघन झाल्यास त्याविरुध्द शिक्षेच्या तरतुदी सुध्दा त्यात नमुद आहेत. म्हणूनच सदर कायदा हा बालमजुरी निर्मलनाचा मुलभूत पाया असल्याने संशोधन अभ्यासाच्या दृष्टीने तो अत्यंत महत्त्वाचा ठरतो.

कायद्यानुसार प्रतिबंधीत ६५ प्रक्रियांमध्ये वीटभट्टी व्यवसायाचा समावेश होतो. त्यामुळे प्रामुख्याने 'वीटभट्टी व्यवसायातील बालमजुरी' या विषयी अभ्यास करता येऊ शकतो याबाबत संशोधकास निश्चितता प्राप्त झाली. प्रामुख्याने वीटभट्टी व्यवसायातील बालकांची आरोग्य स्थिती अभ्यासताना कामाच्या ठिकाणचे वातावरण, कामाचे तास व वेळ, विश्रांतीची वेळ, शारिरीक धोके इ. घटकांचा त्यात समावेश करणे आवश्यक असल्याचे संशोधकाच्या लक्षात आले.

### २.३.३ The Right of Children to Free and Compulsory Education ACT, 2009, No. 35 of 27 August 2009, New Delhi.

**शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्रमांक : विकाक २००९ / प्र. क्र. २९२ / प्राशि १ दिनांक १० मे २०१०.** www.maharashtra.gov.in

सदर कायद्यान्वये १४ वर्षाखालील बालकांना प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करण्यात आलेले आहे. त्यानुसार बालकामगारांच्या शैक्षणिक स्थितीचा अभ्यास करणे उपयुक्त ठरते. सदर कायद्यामध्ये बालकांचा शाळा प्रवेश, शाळाबाह्य मुलांचे सर्वेक्षण, शिक्षकांचे प्रशिक्षण, बालकांची क्षमता पातळी व पुढील वर्गातील प्रवेशाचे निकष, शाळा

व्यवस्थापन समिती व सातत्यपूर्ण सर्वंकष मुल्यमापन कार्यपध्दती इ. सर्व महत्त्वाचे नियम वा तरतुदींची सविस्तर माहिती देण्यात आलेली आहे.

या आधारेच वीटभट्टी व्यवसायातील बालकामगारांची सद्य शैक्षणिक स्थिती नेमकी कशी आहे हे जाणून घेण्याचे प्रमुख उद्दिष्ट्य संशोधकाने ठरविले. तसेच RTE नुसार वीटभट्टी व्यवसायातील शाळाबाह्य बालकामगारांच्या बाबतीत नेमकी कोणती कार्यवाही केली जाते, त्यांना कोणकोणत्या शालेय सुविधा पुरविण्यात येतात, त्यातील प्रमुख अडचणी व उपाययोजना हे सर्व जाणून घेणे आवश्यक असल्याचे संशोधकाच्या लक्षात आले. यासाठी माहितीचा स्त्रोत म्हणून वीटभट्टी परिसरातील शाळा मुख्याध्यापकांशी चर्चा करण्याचे ठरविण्यात आले. तसेच संशोधन विषयाची प्रस्तावना, महत्त्व, व्याप्ती, उद्दिष्ट्ये व गृहितकृत्ये ठरविण्यासाठी सदर साहित्याचा अधिक उपयोग झाला आहे.

## २.४ इतर सामग्री : संदर्भ ग्रंथ वा पुस्तके

### २.४.१ केंद्र सरकार व प्रसारण मंत्रालय प्रकाशन विभागातर्फे (जुलै १९९५), "योजना : नियोजन व विकास समर्पित", अंक १२, प्रसिध्द. Vol. XXII, No. XII, पान नं. ११ ते १४, www.yojana.gov.in

जुलै १९९३ मध्ये 'योजना' या शासकीय अंकामधील संघमित्रा बुधप्रिया लिखीत हा लेख विविध 'व्यवसायानुरुप बालकामगारांचे शोषण व आरोग्य विषयक समस्या' यावर भाष्य करतो. या लेखातील उपलब्ध माहितीनुसार "बालकामगार हा मानवी हक्क संरक्षणाचा विषय असून बालकामगारांना हे हक्क नाकारले जातात". सदर लेखामध्ये एक सविस्तर तक्ता देण्यात आलेला आहे. त्यामध्ये व्यवसाय प्रक्रिया, बालमजुरांची संख्या, कामाचे स्वरुप, आरोग्याचे धोके, कामाचे तास व कामाच्या ठिकाणचे वातावरण याविषयी सविस्तर विश्लेषण देण्यात आले आहे. याद्वारे व्यवसायानुरुप बालकामगारांची व्याप्ती व त्यांच्या आरोग्य स्थितीचे विदारक स्वरुप निदर्शनास येते. उदा. उत्तरप्रदेश मधील काच उद्योग, शिवाकाशीतील काडीपेटी उद्योग, भिवंडीतील जरी उद्योग इ.

यावरुन संशोधकास वीटभट्टी व्यवसायातील बालकामगारांच्या आरोग्य स्थितीचा अभ्यास करणे व त्यावर आवश्यक उपाययोजना सुचविणे किती महत्त्वाचे आहे हे समजण्यास मदत झाली. तसेच या व्यवसायातील कामगार मुलींच्याही आरोग्य स्थितीचा अभ्यास करणे गरजेचे असल्याचे लक्षात आले. म्हणूनच संशोधकास अभ्यास विषयाचे

महत्त्व, व्याप्ती, उद्दिष्ट्ये व गृहितकृत्ये ठरविताना सदर संदर्भ साहित्याचा उपयोग झाला आहे.

### २.४.२ **Census of India (जनगणना अहवाल), २०११** www.censusindia.gov.in

'बालकामगार' विषयाची व्याप्ती समजण्यासाठी बालकामगारांची एकूण संख्या माहिती असणे अत्यावश्यक आहे. 'जनगणना अहवाल' हा माहितीचा वैध स्त्रोत मानला जातो. त्यामुळे भारतातील व महाराष्ट्रातील बालकामगारांची संख्यात्मक माहिती मिळविण्यासाठी जनगणना अहवाल २०११ चा आधार घेण्यात आला. तसेच बालकामगारांच्या शैक्षणिक स्थितीसंबधी आकडेवारी देखील या अहवालातून उपलब्ध झाली आहे. यामध्ये भारत व महाराष्ट्रातील शिक्षण घेणारे व शिक्षण न घेणारे बालकामगार व त्यातील मुला-मुलींचे प्रमाण इ. महत्त्वपूर्ण संख्यात्मक मिळाली आहे.

जनगणना अहवालावरुन प्राप्त झालेल्या बालकामगारांच्या आकडेवारीवरुन संशोधन अभ्यास विषयाचे महत्त्व लक्षात येते. यावरुन वीटभट्टी व्यवसायातील बालकामगार मुला-मुलीची संख्या, यातील बालकामगार मुला-मुलींची शैक्षणिक स्थिती इ. विषयी अभ्यास करण्याचे महत्त्व विशद होते.

### २.४.३ **डॉ. वैद्य शांता** (२००५), **"बालकांचे हक्क", मराठी अनुवादीत पुस्तिका, युनिसेफ प्रकाशन.**

'बालकांचे हक्क' केंद्रस्थानी मानून ते हक्क बालकांना मिळवून देण्याच्या संदर्भात 'युनिसेफ' ही संस्था काम करते. संयुक्त राष्ट्र परिषदेने २० नोव्हेंबर १९८९ रोजी एक बाल हक्क संहिता तयार केली होती. त्याच संहितेचा मराठी अनुवाद करण्यात आलेला आहे. संहितेमधील बाल हक्कांची कलमवार सविस्तर मांडणी सदर पुस्तिकेत दिलेली आहे. तसेच पुस्तिकेत बाल हक्क संहितेवर आधारित भारत सरकारचा 'राष्ट्रीय कार्यक्रम व उद्दिष्ट्ये' व १९७४ मधील 'राष्ट्रीय धोरण' यातील तरतुदींचेही सविस्तर विवेचन देण्यात आले आहे. थोडक्यात सदर संहितेच्या अध्ययनातून बाल हक्कांविषयी आंतरराष्ट्रीय तसेच भारतातील धोरण व कार्यक्रम तसेच बालकांचे शिक्षण व आरोग्य विषयक हक्कांची सविस्तर माहिती संशोधकास मिळाली.

सदर संहितेतील कलम ३२ नुसार 'आर्थिक शोषणापासून आणि कोठल्याही धोकादायक, शिक्षणाच्या शारिरीक व मानसिक प्रगतीच्या आड येणाऱ्या कामापासून

संरक्षण मिळण्याचा मुलाचा हक्क सर्व राष्ट्रांना मान्य आहे'. त्यामुळे सदर कलम 'वीटभट्टी व्यवसायातील बालमजुरी' या विषयाच्या अभ्यासासाठी अत्यंत महत्त्वाचे ठरते. यातून चांगले आरोग्य, शिक्षण, कामाच्या ठिकाणी स्वच्छ वातावरण, कामाचे तास, विश्रांती इ. हक्कांपासून बालकामगार वंचित राहतात हे लक्षात आले. त्या आधारे वीटभट्टी व्यवसायातील बालकामगारांच्या दृष्टीने मुलभूत हक्कांचे महत्त्व समजण्यासाठी सदर संदर्भ साहित्य संशोधकास उपयुक्त ठरले आहे.

### २.४.४ **डॉ. प्रदिप आगलावे** (२०१५), **"सामाजिक संशोधन पध्दतीशास्त्र प तंत्रे", श्री संत प्रकाशन, नागपूर.**

संशोधन विषयाचा शास्त्र शुध्द पध्दतीने अभ्यास करण्याच्या दृष्टीने संशोधन पध्दतीचे सखोल ज्ञान असणे अत्यावश्य आहे. यासाठी अभ्यास विषयाची संशोधन पध्दती ठरविण्यासाठी संशोधनकाने सदर संदर्भ साहित्यांचा अभ्यास करुन योग्यरित्या संशोधन पध्दती समजून घेण्याचा प्रयत्न केला आहे. जसे की, आवश्यक नमुना आकार व निवड पध्दती, नमुना आकार ठरविण्याचे तंत्र, संशोधन आराखडा, तथ्य सकंलनाची साधने व तंत्र, माहितीचे सारणीकरण व विश्लेषण इ. सर्व बाबींचे सखोल वाचन व ज्ञान प्राप्त केले आहे. तसेच योग्य संशोधन पध्दतीच्या आधारे संशोधन अभ्यास पुर्ण केलेला आहे.

### २.४.५ **महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे** (२०११), **"बाल न्याय अधिनियम व बालकांचे हक्क", माहिती पुस्तिका, पुणे.**

बालकांचे शैक्षणिक व कौटुंबिक पुनर्वसन करण्यासाठी 'बाल न्याय कायदा' २००० करण्यात आला. या कायद्यानुसार बालकांची काळजी व सरंक्षण तसेच बाल हक्कांचे संरक्षण यासाठी महिला व बाल विभागामार्फत विविध उपक्रम राबविण्यात येतात. यामध्ये बाल विकासासाठी निरीक्षण गृह, विशेष गृह, बालगृहे, अनुरक्षण गृह, बाल संगोपन योजना, बाल मार्गदर्शन केंद्र, परिपालन सेवा, दत्तक विधान, बाल कल्याण समिती इ. सुविधांचा समावेश होतो. या सर्व उपक्रमांची सविस्तर माहिती सदर पुस्तिकेत देण्यात आलेली आहे.

बालकामगारांच्या शैक्षणिक व कौटुंबिक पुनर्वसनासाठी या सर्व सुविधा उपयुक्त ठरु शकतात ही महत्त्वपूर्ण माहिती यातून संशोधकास प्राप्त झाली. या आधारे वीटभट्टी व्यवसायातील बालकामगारांना सदर सुविधांचा लाभ देण्यात आलेला आहे का,

नसल्यास का नाही, त्यातील प्रमुख अडचणी समजून घेणे इ. सर्व बाबींचा सखोल अभ्यास करण्याची नवी दिशा संशोधकास प्राप्त झाली.

### २.४.६ महिला व बाल विकास विभागाचे विविध कार्यक्रम व योजना : शासकीय वेबसाईट - www.womenchild.maharashtra.com

देशातील बालकांच्या विकासामध्ये महिला व बाल विकास विभागाची भुमिका अत्यंत महत्त्वाची आहे. कारण बाल विकासाशी संबंधीत विविध कार्यक्रम व योजना राबविण्याची प्रमुख जबाबदारी या विभागावर असते. त्यानुसार सदर विभागामार्फत बाल विकासाच्या अनेक योजना भारतात तसेच महाराष्ट्रात राबविल्या जात आहे. यामध्ये बालकांचे शिक्षण व आरोग्याशी संबंधीत विविध महत्त्वपूर्ण कार्यक्रमांचा समावेश आहे. उदा. अंगणवाडीतील अनौपचारिक शिक्षण, अंगणवाडीमध्ये व THR (Theat Home Ration) पध्दतीने सकस आहाराचे वाटप, कुपोषित बालकांसाठी विशेष केंद्र, लसीकरण, पोषक आहार, तसेच ११ ते १८ वयोगटातील किशोरवयीन मुलींकरीता ‘सबला’ योजना इ. विविध योजनांची माहिती विभागाच्या शासकीय वेबसाईटवरुन प्राप्त झाली आहे.

सदर विभागाचे कार्यक्रम वा योजनांचा आढावा घेतल्यानंतर या सर्व सुविधा सर्वसामान्य बालकांप्रमाणे बालकामगारांच्या दृष्टीनेही अधिक महत्त्वाच्या आहेत हे निदर्शनास आले. त्यानुसार या सर्व शासकीय सुविधांचा लाभ वीटभट्टीवरील बालकामगार, ३ ते ६ वयोगटातील बालके तसेच किशोरवयीन मुली यांना मिळत आहे किंवा नाही हे अभ्यासण्याची एक दिशा संशोधकास मिळाली. या सर्व प्राप्त माहितीचा प्रामुख्याने संशोधन अभ्यासाचे उद्दिष्ट्य ठरविण्यासाठी उपयोग झाला.

### २.४.७ मानव विकास केंद्र, यशदा, पुणे (मे २०१२), “कृतीदल सदस्यांकरीता मार्गदर्शिका”, यशदा, पुणे.

**शासन निर्णय क्र : सीएलए-२००७/(४)/काम-४ मंत्रालय, मुंबई-३२, २ मार्च २००९**

‘बालकामगार’ या अनिष्ट प्रथेतून महाराष्ट्र राज्य मुक्त करण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यामध्ये जिल्हादंडाधिकारी यांच्या नियंत्रणेखाली ‘कृतीदल’ गठीत करण्यात येते. १४ वर्षाखालील बालकांची कामातून सुटका करणे, बालकांचे शैक्षणिक व कौटुंबिक पुनर्वसन हे कृती दलाचे मुख्य उद्दिष्ट्ये आहे. यानुसार कृतीदलाची कार्यपध्दती व

कार्यवाहीचे स्वरुप, कार्यकारी यंत्रणा, इतर शासकीय विभाग व अधिकारी यांच्या भूमिका व जबाबदाऱ्या याविषयी सविस्तर माहिती सदर मार्गदर्शिकेत दिलेली आहे.

प्रामुख्याने कृतीदलाच्या माध्यमातून सुटका करावयाची आहे अशा बालकामगारांचे प्रकार त्यात नमुद आहेत. यामध्ये वीटभट्टी व्यवसायातील बालकामगारांचा समावेश आहे. त्यामुळे या व्यवसायातील बालकामगारांच्या बाबतीत कृतीदलाची भूमिका व कार्यवाहीचे स्वरुप लक्षात झाले. या व्यवसायातील बालमजुरी कमी करण्याच्या दृष्टीने सातारा जिल्ह्यात आजवर कार्यवाही झाली आहे किंवा नाही, नसल्यास का नाही व त्यातील अडचणी इ. सर्व मुद्दे जाणून घेणे महत्त्वाचे आहे हे संशोधकाच्या लक्षात आले. या आधारे संशोधन अभ्यासासाठी बालकामगारांची वयोमर्यादा व व्याख्या ठरविणे तसेच विषयाचे महत्त्व, व्याप्ती, उद्दिष्ट्ये, अभ्यास विषयाचे क्षेत्र निवडीसाठी संशोधकास मदत झाली.

२.४.८ **Non-Government Organizations** (**अशासकीय वा स्वयंसेवी संस्था**) :

**अ**) **चाईल्ड लाईन संस्था** : www.childline.org.in

**ब**) **युनिसेफ** : www.unicef.org

**क**) **सेव द चिल्ड्रेन** : www.savethechildren.in

सर्वसामान्य बालके तसेच बालकामगारांसाठी आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय तसेच राज्य पातळीवर विविध अशासकीय संस्था (NGO) काम करत आहेत. अशा अशासकीय संस्थाची माहिती व त्यांचा कामाचा थोडक्यात आढावा संगणकाच्या माध्यमातून घेण्यात आला. संस्थाच्या स्थापनेचा उद्देश, बालकांच्या संदर्भातील कामाचे स्वरुप व व्याप्ती, बालकांसाठी राबविण्यात येणारे प्रकल्प व त्याची कामगिरी इ. ची सविस्तर माहिती संस्थेच्या वेबसाईटवरुन उपलब्ध झालेली आहे.

यावरुन बालकामगारांच्या सदंर्भात अशासकीय संस्थामार्फत विविध प्रकल्प वा कार्यक्रम राबविले जात असल्याचे लक्षात आले. त्यातून वीटभट्टी व्यवसायातील बालमजुरी कमी करणे, बालकांना शिक्षण व आरोग्य विषयक सुविधा पुरविणे यासाठी अशासकीय संस्थांचे सहाय्य घेता येऊ शकते किंवा नाही यादृष्टीने अभ्यास करण्याचा एक मार्ग संशोधकास उपलब्ध झाला.

**२.४.९ तुकाराम जाधव व महेश शिरापूरकर** (**जाने २०११**), **“भारतीय राज्यघटना व घटनात्मक प्रक्रिया-खंड १”**, **युनिक अॅकॅडमी प्रकाशन**, **पान क्र**. **५४**,**५८**,**५९**,**७२**.

भारतीय राज्यघटना व घटनात्मक प्रक्रियेची रुपरेषा लक्षात यावी या हेतूने सदर पुस्तकाची निर्मिती करण्यात आलेली आहे. सदर पुस्तकात राज्यघटनेतील सर्व विषयांचा स्वतंत्र प्रकरणाद्वारे सविस्तर उहापोह केला आहे. सदर पुस्तकातील प्रकरण ९ व १० हे अनुक्रमे मुलभूत हक्क व मार्गदर्शक तत्त्वे यावर आधारित आहेत. ही दोन्ही प्रकरणे संशोधन अभ्यासाच्या दृष्टीने महत्त्वाची आहेत.

राज्यघटनेत नमूद असलेल्या मुलभूत अधिकार व मार्गदर्शक तत्त्वांमध्ये बालकांशी संबंधीत व स्वतंत्रपणे असलेल्या काही अधिकार तसेच मार्गदर्शक तत्त्वांचा समावेश होतो. यातील कलम १५, कलम २१ अ, कलम २४, कलम ४५, कलम ३९ ई ही कलमे बालकामगारांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची ठरतात. ही कलमे म्हणजे एकप्रकारे बालमजुरी प्रतिबंधात्मक तरतुदी आहेत. अशा प्रकारे बालकामगारांशी संबंधीत या सर्व घटनात्मक तरतुदींची माहिती मिळविण्यासाठी सदर संदर्भ साहित्याची संशोधकास मदत झाली आहे.

**२.४.१० यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी**, **पुणे** (**२००९**), **“बालमजुरी निर्मलन प्रकल्प** : **संदर्भ साहित्य”**, **बाल हक्क कक्ष-संशोधन व प्रलेखन विभाग**, **पुणे**.

बालमजुरी निर्मुलन संबंधित सर्व घटकांची एकत्रितपणे माहिती उपलब्ध व्हावी या उद्देशाने सदर संदर्भ साहित्याची निर्मिती करण्यात आली होती. या साहित्यामध्ये बालमजुरीची व्याख्या, कारणे व परिणाम, बालमजुरीचे प्रकार, बालमजुरी विषयीचे समज व गैरसमज व बालमजुरी निर्मुलन संबंधित आंतरराष्ट्रीय तसेच राष्ट्रीय पातळीवरील प्रयत्न, धोरणे, कायदे व उपाययोजना इ. विषयी एकत्रित माहिती नमूद आहे.

सदर संदर्भ साहित्यातून बालमजुरीच्या व्याख्या व प्रतिबंधात्मक कायद्यांची सविस्तर माहिती संशोधकास प्राप्त झाली. संशोधकाने सदर माहितीचा संशोधन अभ्यासाच्या प्रस्तावनेमध्ये स्वतःच्या भाषेत आवश्यक त्या ठिकाणी वापर केलेला आहे.

**२.४.११ यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे** (२०१३), **"राष्ट्रीय बालकामगार प्रकल्प- कार्यात्मक मार्गदर्शिका", महाराष्ट्र शासन, कामगार विभाग, निर्मिती : यशदा, पुणे. पान नं. १ ते ७**, www.yashada.org

बालकामगारांचे शैक्षणिक पुनर्वसन करणे या प्रमुख उद्देशाने केंद्र शासनाने १९८८ मध्ये 'राष्ट्रीय बालकामगार प्रकल्प' सुरु केला. या प्रकल्पाची सविस्तर व एकत्रित माहिती उपलब्ध व्हावी म्हणून यशदा, पुणे मार्फत कार्यात्मक मार्गदर्शिका तयार केलेली आहे. या मार्गदर्शिकेतील पहिल्या भागामध्ये प्रकल्पाची उद्दिष्ट्ये, लक्ष्यगट, प्रकल्पाचे अंमलबजावणीचे धोरण, विशेष प्रशिक्षण केंद्र, जाणीव जागृती कार्यक्रम, बालकांना व्यावसायिक प्रशिक्षण, विद्यावेतन, पोषक आहार इ. घटकांची माहिती देण्यात आलेली आहे. यावरुन सदर प्रकल्प बालकामगारांच्या शैक्षणिक पुनर्वसनासाठी किती महत्त्वाचा आहे हे लक्षात येते.

सातारा जिल्ह्यात राष्ट्रीय बालकामगार प्रकल्प राबविला जात नाही. त्यामुळे या जिल्ह्यातील वीटभट्टी व्यवसायातील बालकामगारांची शैक्षणिक स्थिती अभ्यासणे उपयुक्त ठरेल हे संशोधकाच्या निदर्शनास आले. त्या आधारे संशोधन अभ्यासाचे महत्त्व, व्याप्ती, अभ्यास विषयाचे क्षेत्र, उद्दिष्ट्ये व गृहितकृत्ये ठरविण्यासाठी सदर संदर्भ साहित्य महत्त्वाचे ठरले.

## २.५ सारांश :

सदर प्रकरणामध्ये संशोधन अभ्यासासाठी उपयुक्त ठरलेल्या सर्व संदर्भ साहित्यांची सविस्तर माहिती देण्यात आलेली आहे. या सर्व दुय्यम सामग्रीच्या माध्यमातून प्राप्त झालेल्या महत्त्वपूर्ण माहितीमुळे संशोधन अभ्यासाला योग्य दिशा प्राप्त झाली. प्रामुख्याने संशोधन अभ्यास विषयाचे महत्त्व, व्याप्ती, उद्दिष्ट्ये, गृहितकृत्ये, विषयाची पार्श्वभुमी, क्षेत्र निवड तसेच संशोधन पध्दती ठरविणे याकरीता संदर्भ साहित्यांचा संशोधकास खूप उपयोग झाला आहे. तसेच यातील काही संशोधन अहवाल हे माहिती विश्लेषणादेखील उपयुक्त ठरले आहेत.

# प्रकरण तिसरे
# संशोधन पध्दती

**३ प्रस्तावना :**

संशोधन अभ्यासात 'वीटभट्टी व्यवसायातील बालमजुरी' या सामाजिक विषयाचे अध्ययन करण्यात आले आहे. संशोधनाचे मुख्य उद्दिष्ट्य वीटभट्टी व्यवसायात काम करणाऱ्या ५ ते १४ वयोगटातील बालकांच्या शैक्षणिक व आरोग्य स्थिती तसेच समस्यांचा अभ्यास करणे हे आहे. यासाठी संशोधनातील आवश्यक सर्व पायऱ्यांचा अवलंब करुन विषयाचा अभ्यास करण्यात आला आहे. सदर संशोधन अभ्यासाची पध्दती या प्रकरणामध्ये स्पष्ट करण्यात आली आहे.

**३.१ समस्या सूत्रण :**

बालमजुरी हा समाजाला भेडसावणारा गंभीर प्रश्न बनला आहे. बालमजुरीमुळे बालकांचे बालपण हरवून जाते. बालकांच्या शारीरिक, मानसिक व भावनिक विकासावर परिणाम होतो व पर्यायाने व्यक्ती विकासावरही. अशी ही बालमजुरीची प्रथा मानवी विकास, राष्ट्रीय व सामाजिक विकासाला घातक आहे. आज जगात सर्वत्र व मोठ्या संख्येने बालकामगार आढळून येत असून सद्यस्थितीत जागतिक स्तरावर जवळपास १३२ कोटी इतके बालकामगार आहेत. तसेच भारतात २०११ च्या जणगणनेनुसार १,०१,२८,६६३ इतके बालकामगार आहेत तर महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्यात ७,२७,९३२ बालकामगार आढळून आले आहेत.

तसेच जणगणना अहवाल २०११ च्या उपलब्ध आकडेवारीवरुन असे दिसून येते की, भारतातील एकूण १,०१,२८,६६३ बालकामगारांपैकी ५७,७५,४१६ (५७ टक्के) बालकामगार हे हंगामी व्यवसायात गुंतलेले असून हे प्रमाण जास्त आहे. हेच प्रमाण महाराष्ट्रामध्ये ३४ टक्के आहे. हे बालकामगार प्रामुख्याने ६ महिने किंवा त्यापेक्षा कमी कालावधीत कामे करणारी आहेत. म्हणजेच हे बालकामगार असंघटित व्यवसायातील बालकामगार आहेत. एकूणच सदर आकडेवारीवरुन असंघटित व्यवसायातील बालमजुरीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे असंघटित

क्षेत्रातील वाढती बालमजुरी ही नव्याने निर्माण होणारी समस्या आहे. थोडक्यात बालमजुरी ही अत्यंत व्यापक व सार्वत्रिक स्वरुपाची समस्या असल्याचे स्पष्ट होते.

बालमजुरी निर्मुलनासाठी आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय पातळीवर आजवर अनेक प्रयत्न करण्यात आलेले आहेत. यामध्ये बालमजुरी प्रतिबंधात्मक कायदे, विविध धोरणे व प्रकल्प व इतर उपाययोजनांची अंमलबजावणी केली जात आहे. परंतु आजही विविध व्यवसायामध्ये मोठ्या संख्येने बालकामगार आढळून येत आहेत. जसे की, वीटभट्टी व्यवसायात बालकामगार आढळून येतात. त्यामुळेच अद्यापही बालमजुरी समस्येचे समूळ उच्चाटन का होऊ शकलेले नाही हा संशोधनाच्या दृष्टीने पडलेला महत्त्वाचा प्रश्न आहे.

### ३.२ संशोधन विषयाची व्याप्ती व मर्यादा :

बालकामगार विषयाची व्याप्ती खूप मोठी आहे. बालकामगार हे विविध व्यवसायात विविध प्रकारची कामे करताना आढळून येतात. परंतु सदर संशोधन अभ्यास विषय हा 'वीटभट्टी व्यवसाया'पुरता मर्यादित आहे. तसेच सातारा जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये कमी-अधिक प्रमाणात वीटभट्टी व्यवसाय चालतो. परंतु संपूर्ण जिल्ह्यामध्ये सर्वाधिक वीटभट्टया ह्या कराड तालुक्यात आहेत. म्हणून वेळ, श्रम व पैसा यांचा विचार करता केवळ कराड तालुक्यातील वीटभट्टी व्यवसायात काम करणाऱ्या बालकांचा अभ्यास करण्यात आला आहे. तसेच बालकामगारांच्या विविध समस्या असतात. परंतु सदर संशोधन अभ्यासात बालकांच्या सर्वांगिण विकासाच्या दृष्टीने महत्त्वपुर्ण असणाऱ्या शैक्षणिक व आरोग्य विषयक स्थिती व समस्यांचाच अभ्यास करण्यात आला आहे.

सदर संशोधन अभ्यास विषयाच्या काही मर्यादा आहेत. जसे की, वीटभट्टी व्यवसायात काम करणाऱ्या कुटुंबांची, कामगारांची, कुटुंबातील बालकांची संख्या तसेच नावनिहाय तपशील इ. बाबत कोठेच नोंद नसल्याने या संदर्भातील माहिती किंवा यादी उपलब्ध होऊ शकली नाही. त्यामुळे नमुना निवड करताना, नमुना आकार ठरविताना काही मर्यादा आल्या. सदर संशोधन अभ्यासाकरीता केवळ वीटभट्टयांची यादी उपलब्ध होऊ शकली.

वीटभट्टी व्यवसायातील बालकामगारांचा अभ्यास करण्यात येत असल्याने बालकामगार विरुध्द कार्यवाहीच्या शंकेने किंवा भितीमुळे वीटभट्टी मालकांकडून सहकार्य मिळविण्यात व माहिती संकलनाच्या कार्यात काही अडथळे निर्माण झाले. त्याचप्रमाणे माहिती देण्यासाठी कामगारांचा जाणारा वेळ, त्यांच्या कामात येणारा व्यत्यय

इ. मुळे माहिती संकलनास वेळेचीही मर्यादा होती. कमीत कमी कालावधीत अधिकाधिक व अचूक माहितीचे संकलन करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

### ३.३ **संशोधन अभ्यासाचे महत्त्व** :

'बालमजुरी' ही देशातील मोठी समस्या असून या समस्येचे समुळ उच्चाटन होणे अत्यावश्यक आहे. सद्यस्थितीत असंघटित क्षेत्रात बालकामगारांची संख्या जास्त असून त्यामध्ये वीटभट्टी व्यवसायात बालकामगार अधिक प्रमाणात सक्रिय असल्याचे दिसून येते. महाराष्ट्रात बालमजुरी निर्मुलनासाठी 'राष्ट्रीय बालकामगार प्रकल्प' (NCLP) तसेच 'कृती दल' हे प्रकल्प प्रभावीपणे राबविले जात असले तरी प्रत्यक्षात या प्रकल्पांच्या काही मर्यादा आहेत. जसे की, NCLP प्रकल्प महाराष्ट्रात केवळ १६ जिल्ह्यांमध्येच राबविला जात आहे. यामध्ये सातारा जिल्ह्याचा समावेश नाही. त्यामुळे १६ जिल्ह्यांव्यतिरिक्त इतर जिल्ह्यांमधील बालकामगारांना या प्रकल्पाचा लाभ मिळत नाही.

तसेच महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमध्ये 'कृती दल' अस्तित्वात आहे. मात्र वीटभट्टी हा असंघटित स्वरुपाचा व्यवसाय असल्याने कृती दलामार्फत कार्यवाही करताना अनेक अडचणी येतात. वीटभट्टया विखुरलेल्या स्वरुपात असल्याने त्यातील बालकामगारही विखुरलेले असतात. वीटभट्टीला आस्थापना नसल्याने बालकामगार एका ठिकाणी एका आस्थापनेखाली एकत्रितपणे आढळून येत नाहीत. तसेच वीटभट्टी व्यवसायामध्ये बालकामगार हे प्रत्यक्षरित्या मालकांकडून नियुक्त केले जात नाहीत. त्यामुळे मालक व पालकांविरुध्दच्या कायदेशीर कार्यवाहीमध्ये अडचणी येतात. म्हणूनच **NCLP** प्रकल्प नसलेल्या सातारा जिल्ह्यात तसेच 'कृती दल' असूनही प्रत्यक्ष कार्यवाहीत येणाऱ्या अडचणी यामुळे वीटभट्टी व्यवसायातील बालकामगारांच्या स्थितीचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

तसेच वीटभट्टी व्यवसायातील बालकामगारांची व्याप्ती, कामाचे स्वरुप व कारणांचा अभ्यास करणे गरजेचे आहे. व्यवसायानुरुप बालकामगारांच्या शैक्षणिक व आरोग्य विषयक समस्या वेगवेगळ्या असतात. त्यानुसार वीटभट्टी व्यवसायातील बालकामगारांची शैक्षणिक, आरोग्य स्थिती व समस्यांचा अभ्यास करणे. तसेच मुलांच्या तुलनेत मुलींची शैक्षणिक व आरोग्य स्थिती, समस्या वेगळ्या असू शकतात म्हणून या सर्व बाबींचा सविस्तर अभ्यास करणे आवश्यक ठरते.

सदर संशोधन अभ्यासाच्या आधारे वीटभट्टी व्यवसायातील बालकामगारांच्या समस्या सोडविण्यासाठी शासनास योग्य शिफारशी सुचविता येतील. बालकामगारांसाठी

आवश्यक उपक्रम राबविण्यासाठी स्वयंसेवी संस्थांच्या दृष्टीने देखील हा संशोधन विषय महत्त्वाचा ठरेल. तसेच भविष्यात संबंधित विषयात संशोधन करु इच्छिणाऱ्या संशोधक विद्यार्थ्यांना संदर्भासाठीही सदर संशोधन अभ्यास उपयोगी ठरेल.

## ३.४ अभ्यास विषयाचे क्षेत्र : करा‍ड तालुका (सातारा जिल्हा)

संशोधन अभ्यासासाठी महाराष्ट्र राज्यातील सातारा जिल्ह्यातील कराड तालुका हे अभ्यास क्षेत्र म्हणून निवडण्यात आले आहे. यासाठी सन २०११-१२ मध्ये यशदा, पुणे या संस्थेतर्फे करण्यात आलेल्या बालकामगारांच्या सर्वेक्षण अहवालाचा आधार घेण्यात आला आहे. कारण सदर अहवालावरुन असे स्पष्ट होते की, महाराष्ट्रामध्ये NCLP प्रकल्प नसलेल्या जिल्ह्यांपैकी सातारा व पुणे या जिल्ह्यामध्ये वीटभट्टी व्यवसायात अधिक प्रमाणात बालकामगार काम करत आहेत. तसेच सातारा जिल्ह्यापेक्षा पुणे जिल्ह्यातील वीटभट्टी व्यवसाय हा मोठ्या प्रमाणात विखुरलेला आहे. तुलनेने सातारा जिल्ह्यातील कराड तालुक्यामध्येच सर्वाधिक वीटभट्ट्या असून यामध्ये काम करणारे बालकामगारही अधिक आहेत. त्यामुळे वेळ, पैसा, श्रम या दृष्टीकोनातून विचार करता सातारा जिल्ह्यातील कराड तालुका हे अभ्यास विषयाचे क्षेत्र म्हणून निवडण्यात आले.

## ३.५ संकल्पनांच्या कार्यवाहीच्या व्याख्या :

### ३.५.१ कराड तालुका :

महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यातील कराड हा एक तालुका आहे.

### ३.५.२ बालकामगार :

बालकामगार म्हणजे ५ ते १४ वयोगटातील ६ महिने तसेच ६ महिन्यांपेक्षा कमी किंवा जास्त काळ काम करणारी, शाळेत जाणारी अथवा न जाणारी, तसेच असंघटित क्षेत्रात काम करणारी बालके होय.

### ३.५.३ वीटभट्टी व्यवसाय :

वीटभट्टी व्यवसाय म्हणजे बांधकाम क्षेत्रातील एक लहान उद्योग होय.

### ३.५.४ वीटभट्टी कामगार कुटुंबातील बालके :

विटभट्टी व्यवसायात ५ ते १४ वयोगटातील काम करणारी बालके होय .

### ३.५.५ **शैक्षणिक स्थिती :**

काम करणाऱ्या किंवा काम न करणाऱ्या १४ वर्षापर्यंतच्या प्रत्येक मुला-मुलीने किमान इयत्ता ८ वी पर्यंतचे शिक्षण पुर्ण करणे आवश्यक आहे.

### ३.५.६ **आरोग्य स्थिती :**

बालकांची (मुला-मुलींची) शारिरीक वाढ व विकास तसेच निरोगी आरोग्याच्या दृष्टीने आवश्यक सुविधा कामाच्या ठिकाणी उपलब्ध होणे आवश्यक आहे. उदा. पुरेसी विश्रांती, खेळण्यासाठी पोषक वातावरण, कामाचे मर्यादित तास, व्यक्तिगत स्वच्छता, पोषण आहार, नियमित आरोग्य तपासणी इ. सर्व होय.

### ३.६ **अभ्यास विषयाची चलपदे :**

सदर संशोधन अभ्यास विषयातील चलपदे पुढीलप्रमाणे आहेत.

| **अवलंबित चल** | **परावलंबित चल** |
|---|---|
| १. बालकामगार | शिक्षण |
| २. व्यवसाय/कामाचे स्वरुप | आरोग्य स्थिती |

### ३.७ **संशोधन अभ्यासाची उद्दिष्ट्ये :**

१) वीटभट्टी व्यवसायातील बालकामगारांच्या कामांचे स्वरुप व कारणे अभ्यासणे.

२) बालकामगारांची सद्य शैक्षणिक स्थिती व समस्यांचा शोध घेणे.

३) वीटभट्टी व्यवसायातील बालकामगारांच्या आरोग्य स्थितीचा अभ्यास करणे.

४) मालकांकडून बालकामगारांना पुरविण्यात येणाऱ्या सुविधांविषयी जाणून घेणे.

५) वीटभट्टीवरील बालकामगारांना शासकीय योजना वा सुविधांचा लाभ मिळतो किंवा नाही हे अभ्यासणे.

### ३.८ **संशोधन अभ्यासाची गृहितकृत्ये :**

१) वीटभट्टी व्यवसायात १४ वर्षाखालील बालके काम करतात.

२) बालमजुरीमुळे बालकांच्या शैक्षणिक स्थितीवर परिणाम होतो. बालके शाळाबाह्य राहतात.

३) वीटभट्टी व्यवसायानुरुप बालकामगारांच्या आरोग्य समस्या असतात.

## ३.९ संशोधन प्रश्न :

१) वीटभट्टी व्यवसायात ५ ते १४ वयोगटातील बालके कोणकोणती कामे करतात?

२) वीटभट्टीवरती बालकांना काम करावे लागते यामागील प्रमुख कारणे कोणती?

३) वीटभट्टीवरील काम करणारी बालके सद्य स्थितीत शाळेत जातात का? नसल्यास का नाही?

४) वीटभट्टीवरील बालकामगारांच्या शैक्षणिक समस्या कोणत्या आहेत?

५) वीटभट्टी व्यवसायात बालकामगारांना आरोग्यसंबंधी कोणते धोके आहेत? त्यांच्या आरोग्यसंबंधी समस्यांसाठी कोणत्या सुविधा उपलब्ध आहेत?

६) वीटभट्टीवरील मुलींच्या व्यवसायानुरुप तसेच व्यक्तिगत आरोग्य विषयक समस्या कोणत्या आहेत?

७) वीटभट्टी मालकाने बालकांचे शिक्षण व आरोग्य यासंबंधी कोणत्या सुविधा उपलब्ध करुन दिलेल्या आहेत?

८) वीटभट्टीवरील बालकांचे शिक्षण व आरोग्य यासदंर्भात शासनामार्फत कोणत्या योजना राबविल्या जात आहेत? त्याचा वीटभट्टीवरील बालकांना लाभ झाला आहे का? नसल्यास त्यातील अडचणी कोणत्या?

९) वीटभट्टीवरील बालकामगारांच्या मुक्ततेसाठी करण्यात येणाऱ्या कायदेशीर कार्यवाहीचे स्वरुप व त्यामध्ये येणाऱ्या अडचणी कोणत्या?

## ३.१० अभ्यास विषयाची नितीमुल्ये :

सदर संशोधन अभ्यास करताना संशोधनासाठी आवश्यक असलेली सर्व नैतिक मूल्ये, तत्त्वे, व नियमांचा संशोधकाने अवलंब केलेला आहे. माहिती संकलन करताना उत्तरदात्यांविषयी कोणताही पूर्वग्रह बाळगण्यात आलेला नाही. उत्तरदात्यांची वेळ व विश्वास संपादन करुन व त्यांच्या पूर्व संमतीनेच माहिती संकलन करण्यात आले. तसेच उत्तरदात्यांचे कोणतेही नुकसार होणार नाही याची विशेष काळजी घेण्यात आली. प्राप्त होणाऱ्या माहिती विषयी पूर्णतः गोपनियता पाळण्यात आली आहे. तसेच माहिती घेताना

उत्तदात्यांच्याही विविध शंकांचे निरसन करण्यात आले आहे. सदर संशोधन हे वस्तुनिष्ठतेवर आधारित असून त्यामध्ये पुर्णतः वैज्ञानिक पध्दतीचा अवलंब केलेला आहे.

### ३.११ संशोधन आराखडा :

संशोधन अभ्यासासाठी वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा अवलंब करण्यात आला आहे. सदर संशोधन अभ्यासामध्ये वीटभट्टी व्यवसायाचे स्वरुप, वीटभट्टीवरील बालकामगारांची शैक्षणिक व आरोग्य स्थिती व समस्यांचा अभ्यास, बालकामगार करत असलेल्या कामांचे स्वरुप, कुटुंबातील मुलींची शैक्षणिक स्थिती व त्यांच्या आरोग्य संबंधीत समस्या, तसेच कुटुबांचे स्थलांतर, स्थलांतराचा प्रकार, कुटुंबाची जात, धर्म, भाषा इ. आधारावर कुटुंबाची वैशिष्ट्ये अभ्यासण्यात आली आहेत. यामुळे सदर सर्व वस्तुस्थितींचे वर्णनात्मक विवेचन करणे आवश्यक आहे.

यासाठी संशोधन अभ्यासाची उद्दिष्ट्ये, तथ्य सकंलनाचे योग्य स्त्रोत, नमुना निवड, प्रत्यक्ष तथ्य संकलन, प्राप्त तथ्यांचे वर्गीकरण, सारणीकरण तसेच तथ्यांचे विश्लेषण व निष्कर्ष इ. पायऱ्यांच्या आधारे संशोधन अभ्यास करण्यात आलेला आहे. म्हणूनच सदर संशोधन अभ्यासाचे स्वरुप वर्णनात्मक संशोधन आहे.

### ३.१२ नमुना आराखडा :

प्रस्तुत संशोधन अभ्यासातंर्गत पुढील नमुना आराखडा वापरण्यात आलेला आहे.

#### ३.१२.१ समग्र (Universe) :

सदर संशोधन अभ्यासासाठी सातारा जिल्ह्यातील कराड तालुक्यातील वीटभट्टयांचा अभ्यास करण्यात आला आहे. त्यानुसार कराड तालुक्यातील महसुल विभागाकडून वीटभट्टयांची यादी मिळविण्यात आली. प्राप्त यादीनुसार २०१५-१६ मध्ये कराड तालुक्यात एकूण २३१ वीटभट्टयांची नोंदणी झालेली आहे. जे संशोधन अभ्यासाचे एकूण समग्र आहे.

#### ३.१२.२ नमुना आकार :

**अ) वीटभट्टी कामगार कुटुंबे :**

वीटभट्टीवरती ५ ते १४ वयोगटातील काम करणारी बालके ज्या कुटुंबात असतील असेच कुटुंब हे संशोधन अभ्यासाचे लक्ष्यगट आहेत. संशोधन अभ्यासासाठी कराड

तालुक्यातील महसुल विभागाकडून वीटभट्टयांची गावनिहाय यादी मिळाली होती. परंतु वीटभट्टीवरील कामगार कुटुंबांतील ५ ते १४ वयोगटातील काम करणाऱ्या बालकांची संख्या व यादी उपलब्ध नव्हती. त्यामुळे लाभार्थी गटाची निवड करण्याकरीता सदर अभ्यासासाठी वीटभट्टीवरील 'कामगार कुटुंबे' हे एकक मानण्यात आले. त्यानुसार ५ ते १४ वयोगटातील काम करणारी बालके असणारी कुटुंबे शोधण्यासाठी सर्वेक्षण पध्दतीचा अवलंब करण्यात आला.

सर्वप्रथम किती वीटभट्टयांचे सर्वेक्षण करावे लागेल हे ठरविण्यात आले. त्यानुसार प्रत्येक वीटभट्टींवरती सरासरी ७ ते ८ कामगार कुटुंबे असतात. यानुसार २३१ वीटभट्टयांवरती सरासरी ८ याप्रमाणे १८४८ कामगार कुटुंबे असतील. म्हणून सर्वेक्षणासाठी कुटुंबांचा नमुना आकार ठरविण्याकरीता :

i) Robert V.Krejcie & D.W.Morgan (1970). Determining Sample Size for Research Activities. Educational and Psychological Measurement, 30, 607-610.

ii) Sample Size Calculator, Created by J Manno, Director Student Affairs Planning & Assessment Lehigh University, Bethlehem PA, Spring 2013 www.surveysystem.com

यांनी विकसित केलेल्या नमुना आकार तंत्राचा उपयोग करण्यात आला. यानुसार वीटभट्टीवरील १८४८ कुटुंबांपैकी ३१८ कामगार कुटुंबे इतका नमुना आकार ठरवून सर्वेक्षण करण्यात आले.

**ब) वीटभट्टी :**

एका वीटभट्टीवर सरासरी ८ कामगार कुटुंबे याप्रमाणे ४० वीटभट्टयांवरती ३१८ कामगार कुटुंबे आढळून येतील. त्यानुसार वीटभट्टयांचा नमुना आकार ४० (१७ टक्के) इतका ठरविण्यात आला.

**क) प्रत्यक्ष लक्ष्यगट कुटुंबे (५ ते १४ वयोगटातील काम करणारी बालके):**

प्रत्यक्ष ४० वीटभट्टयांवरील सर्वेक्षणात एकूण ३२० कामगार कुटुंबे आढळून आली. या ३२० कामगार कुटुंबापैकी १६१ कुटुंबात ५ ते १४ वयोगटातील काम करणारी बालके आढळून आली. त्यानुसार १६१ कामगार कुटुंबे इतका नमुना आकार ठरविण्यात आला.

**ड) वीटभट्टी मालक व शासकीय अधिकारी / कर्मचारी :**

संशोधन अभ्यासाच्या दृष्टीने वीटभट्टी मालकांशी चर्चा करणे गरजेचे होते. तसेच 'वीटभट्टी व्यवसायातील बालमजुरी' या विषयाशी संबंधित शासकीय अधिकारी व कर्मचारी यांच्याशी चर्चा करणे आवश्यक होते. मुख्यतः ५ ते १४ वयोगटातील काम करत असलेली १६१ कामगार कुटुंबे ही ४० वीटभट्ट्यांपैकी ३६ वीटभट्ट्यांवरती आढळून आली. त्यामुळे संबंधित ३६ (९० टक्के) वीटभट्टी मालकांची प्राथमिक माहिती घेण्यासाठी निवड करण्यात आली.

सर्वेक्षण करण्यात आलेल्या वीटभट्टी जवळील परिसरातील एकूण ६ प्राथमिक शाळेतील मुख्याध्यापक, एकूण ४ प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी, वीटभट्टी परिसरातील १० अंगणवाडी सेविका व वीटभट्टी परिसरातील ४ खाजगी दवाखान्यातील डॉक्टरर्स यांची निवड करण्यात आली. त्याचबरोबर सरकारी कामगार अधिकारी, उप शिक्षणाधिकारी (प्राथ.) व महिला व बाल विकास अधिकारी या सर्वांकडून प्राथमिक माहिती घेण्यात आली.

**३.१२.३ नमुना निवड पध्दती :**

**अ) वीटभट्टी :**

संशोधन अभ्यासासाठी कराड तालुक्यातील वीटभट्ट्यांची गावनिहाय यादी उपलब्ध असल्याने वीटभट्टी निवडीसाठी संभाव्यता नमुना निवड पध्दतीचा (Probability Sampling) अवलंब करण्यात आला. यामध्ये साधा यादृच्छिक नमुना निवड पध्दती अंतर्गत नियमित अंकन पध्दतीने २३१ पैकी ४० वीटभट्ट्यांची निवड करण्यात आली.

**ब) प्रत्यक्ष लक्ष्यगट कुटुंबे (५ ते १४ वयोगटातील काम करणारी बालके) :**

वीटभट्टी व्यवसायात ५ ते १४ वयोगटातील काम करणारी बालके असलेली कामगार कुटुंबे ही सदर संशोधन अभ्यासाचे लक्ष्यगट आहेत. त्यामुळे सर्वेक्षण पध्दतीचा अवलंब करुन निवडण्यात आलेल्या ४० वीटभट्ट्यांवरील सर्व कुटुंबांचे सर्वेक्षण करण्यात आले. सर्वेक्षणात ४० वीटभट्ट्यांवरती एकूण ३२० कामगार कुटुंबे आढळून आली. यानुसार ३२० कामगार कुटुंबांपैकी १६१ कुटुंबांमध्ये ५ ते १४ वयोगटातील काम करणारी बालके होती. म्हणून गैर-असंभाव्यता नमुना निवड पध्दतीतील (Non-Probability Sampling) सहेतुक नमुना निवड पध्दतीने (Purposive Sampling) ५ ते १४ वयोगटातील

काम करणारी बालके असलेली १६१ कामगार कुटुंबे संशोधन अभ्यासासाठी निवडण्यात आली.

**क) वीटभट्टी मालक व शासकीय अधिकारी / कर्मचारी :**

संशोधन अभ्यासाअंतर्गत ३६ वीटभट्टी मालक, विषयाशी संबंधित प्रमुख ३ शासकीय अधिकारी तसेच वीटभट्टी जवळील परिसरातील एकूण ६ प्राथमिक शाळेतील मुख्याध्यापक, एकूण ४ प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी, वीटभट्टी परिसरातील १० अंगणवाडी सेविका व वीटभट्टी परिसरातील ४ खाजगी दवाखान्यातील डॉक्टरर्स या सर्वांची गैर-असंभाव्यता नमुना निवड पध्दतीतील (Non-Probability Sampling) सहेतुक नमुना निवड पध्दतीने (Purposive Sampling) निवड करण्यात आलेली आहे.

## ३.१३ माहिती संकलन : साधने व माहितीचे स्त्रोत

प्रस्तुत संशोधनाकरिता प्राथमिक आणि दुय्यम आधार सामग्रीचा वापर करण्यात आला आहे. त्याचे सविस्तर स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे आहे.

### ३.१३.१ प्राथमिक साधने व माहितीचे स्त्रोत :

वीटभट्टीवरील ५ ते १४ वयोगटातील काम करणाऱ्या बालकांची शैक्षणिक व आरोग्य स्थिती, त्यांच्या समस्या तसेच सोईसुविधांच्या लाभाविषयी माहिती संकलनासाठी मुलाखत अनुसूची, कुटुंब तक्ता, निरीक्षण अनुसूची ही प्राथमिक साधने वापरण्यात आली आहेत.

**अ) मुलाखत अनुसूची :**

प्राथमिक माहिती संकलनासाठी मुलाखत अनुसूची वापरण्यात आली आहे. मुलाखत अनुसूची ही प्रामुख्याने वीटभट्टीवरती ५ ते १४ वयोगटातील काम करणारी बालके असलेल्या कुटुंबातील पालकांसाठी वापरण्यात आली. तसेच वीटभट्टी मालक, सरकारी कामगार अधिकारी, उप शिक्षणाधिकारी (प्राथ.), महिला व बाल विकास अधिकारी, वैद्यकीय अधिकारी, खाजगी दवाखान्यातील डॉक्टर, अंगणवाडी सेविका, प्राथमिक शाळांचे मुख्याध्यापक या सर्वांसाठी मुलाखत अनुसूचीचा वापर करण्यात आला आहे. मुलाखत अनुसूचीच्या माध्यमातून एकूण १६१ पालक, एकूण २३ शासकीय

अधिकारी व कर्मचारी तसेच ४ खाजगी दवाखान्यातील डॉक्टर्स यांच्याकडून माहिती घेण्यात आली आहे.

संशोधक व इतर सर्वेक्षकांनी वीटभट्टीवरील पालकांशी प्रत्यक्ष चर्चा करुन आवश्यक माहिती अनुसूचीमध्ये भरलेली आहे. तसेच सर्व शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांशी संशोधकाने स्वतः चर्चा करुन माहिती अनुसूचीमध्ये भरलेली आहे.

**ब) कुटुंब तक्ता :**

वीटभट्टीवर काम करणारी ५ ते १४ वयोगटातील बालके असणारी कुटुंबे (लक्ष्यगट) शोधण्यासाठी सर्वप्रथम ४० वीटभट्ट्यांवरील सर्व कुटुंबांचे सर्वेक्षण करणे आवश्यक होते. त्या अनुषंगाने कुटुंबाकडून माहिती घेण्यासाठी कुटुंब तक्ता तयार करण्यात आला होता. संशोधक व सर्वेक्षकांनी प्रत्यक्ष कुटुंब प्रमुखांशी चर्चा करुन कुटुंब तक्त्यामध्ये माहिती भरलेली आहे. एकूण ३२० कुटुंबे तक्ते भरण्यात आलेले आहेत. सदर कुटुंब तक्त्यामध्ये कुटुंबातील सदस्य संख्या, सदस्यांचे वय, कुटुंबांची जात, धर्म, भाषा, कुटुंबांचे स्थलांतर इ. स्वरुपाची माहिती घेण्यात आली. त्याचबरोबर बालकांची शैक्षणिक स्थिती व कामाची स्थिती याबाबत संख्यात्मक माहिती घेण्यात आली.

**क) निरीक्षण अनुसूची :**

वीटभट्टीवर प्राथमिक माहिती संकलन करताना प्रत्यक्ष निरीक्षणात येणाऱ्या बाबी नमुद करण्याकरीता निरीक्षण अनुसूची तयार करण्यात आली होती. याकरीता अनियंत्रित निरीक्षण प्रकारातील असहभागी निरीक्षण पध्दतीचा अवलंब करण्यात आला. त्या अनुषंगाने १६१ कुटुंबांकडून माहिती संकलन करताना संशोधक व इतर सर्वेक्षकांच्या निरीक्षणात आलेल्या सर्व बाबी निरीक्षण अनुसूचीत (१६१) नोंदविण्यात आलेल्या आहेत.

### ३.१३.२ प्राथमिक साधनांची पुर्वचाचणी :

मुलाखत अनुसूची, कुटुंब तक्ता व निरीक्षण अनुसुची तयार झाल्यानंतर प्रथम त्याची पुर्वचाचणी घेण्यात आली. याकरीता कराड तालुक्यातील उंब्रज परिसरातील वीटभट्ट्यांवरती संशोधकाने स्वतः माहिती घेतली. अनुसूचीतील प्रश्नानुसार योग्य व अचूक माहिती मिळते की नाही, विचारण्यात आलेल्या प्रश्नांची मांडणी, क्रम बरोबर आहे किंवा नाही इ. चा अभ्यास करण्यात आला.

पुर्वचाचणीतून आढळून आलेल्या त्रुटी दूर करुन मुलाखत अनुसूची, कुटुंब तक्ता व निरीक्षण अनुसूचीमध्ये बदल करण्यात आले. त्याचबरोबर संशोधन अभ्यासाचे मार्गदर्शक व 'बालमजुरी' विषयातील दोन तज्ञ मंडळी यांच्याशी चर्चा करण्यात आली व त्यांनी सुचविलेल्या दुरुस्त्या तसेच नविन प्रश्न अनुसूचीत समाविष्ट करण्यात आले. अशा प्रकारे अनुसूचीस अंतिम स्वरुप देण्यात आले.

### ३.१३.३ मुलाखत अनुसूचीचे वैशिष्टये :

१) मुलाखत अनुसूचीतील सर्व प्रश्न हे बंदिस्त व वैकल्पिक स्वरुपाचे होते.

२) मुलाखत अनुसूचीतील काही प्रश्न हे बहुपर्यायी स्वरुपाचे होते.

३) अनुसूचीतील प्रत्येक प्रश्न हा सुटसुटीत व सोप्या भाषेत विचारला गेला होता.

४) अनुसूचीतील सर्व प्रश्न व प्रश्नांचा क्रम हा संशोधन अभ्यासाच्या उद्दिष्टांनूसार ठेवण्यात आलेला होता.

५) वस्तुनिष्ठ माहिती मिळविण्यासाठी अनुसूचीमध्ये विचारण्यात आलेल्या प्रश्नांचे स्वरुप हे वस्तुनिष्ठच होते.

६) अनुसूचीचे बाह्य स्वरुप आकर्षक होते. अनुसूचीची मांडणी, मोकळी जागा, टंकलेखन, समास इ. सर्व बाबी आकर्षक दिसतील याचा विचार करुन अनुसूची तयार करण्यात आली होती.

### ३.१३.४ प्रत्यक्ष माहिती संकलन :

वीटभट्टी व्यवसायातील कामगार कुटुंबे हंगामी स्थलांतरीत असून यामध्ये परराज्यातील कामगार कुटुंबांचा समावेश अधिक असतो. त्यामुळे वीटभट्टीचा हंगाम संपण्यापूर्वी म्हणजेच अल्पकालावधीत माहिती संकलन पूर्ण करणे आवश्यक होते. दिवसभर वीटभट्टी कामगार कुटुंबीयांचे काम चालू असल्याने माहिती गोळा करताना त्यांच्या कामात अडथळा निर्माण होणार नाही, त्यांना त्रास होणार नाही याची काळजी घेणे आवश्यक होते. त्यांच्या कामात अडथळा निर्माण न करता, अल्पकालावधीत त्यांच्याकडून योग्य व अचुक माहिती मिळविणे हे एकट्या संशोधकाला शक्य नव्हते. तसेच प्राथमिक माहिती संकलनापूर्वी ३२० कुटुंबांचे म्हणजेच वेगवेगळ्या परिसरात

विखुरलेल्या ४० वीटभट्टयांचे सर्वेक्षण करावयाचे होते. यासाठी इतर सुशिक्षित सर्वेक्षकांची मदत घेण्यात आली होती.

माहिती संकलनाच्या कार्यात संशोधकाने इतर ५ सर्वेक्षकांचे सहाय्य घेतले आहे. मुलाखत अनुसुचीमधील मुलींचे प्रश्न विचारात घेता सर्वेक्षकांमध्ये महिला सर्वेक्षकांचा आवर्जून समावेश करण्यात आला होता. त्यानुसार प्रत्येक वीटभट्टीवर एक महिला व एक पुरुष सर्वेक्षक असेल याची काळजी घेण्यात आली. प्रत्यक्ष माहिती संकलन करण्यापूर्वी सर्व सर्वेक्षकांना प्रशिक्षण देण्यात आले. प्रशिक्षणामध्ये अनुसूचींची संख्या व स्वरुप, अनुसूचीतील प्रत्येक प्रश्ननिहाय चर्चा व शंकांचे निरसन, पालकांशी संवाद साधण्याचे कौशल्य, निरीक्षणातील बाबी, अनुसूचीचे प्रात्याक्षिक इ. घटकांचा समावेश होता.

अशा प्रकारे एकदिवसीय प्रशिक्षणानंतर दुसऱ्या दिवशी वीटभट्टीवरती प्रत्यक्ष सर्वेक्षण व माहिती संकलनास सुरुवात करण्यात आली.

### ३.१३.५ माहितीचे वर्गीकरण व विश्लेषण :

संकलनानंतर प्राप्त प्राथमिक माहितीची पडताळणी करण्यात आली. माहितीची उपयुक्तता तपासून विखुरलेल्या माहितीला व्यवस्थित क्रमबध्द व मर्यादित करण्यात आले. यानंतर उपलब्ध माहितीचे 'एक्सेल' सॉफ्टवेअरच्या माध्यमातून सारणीकरण करण्यात आले. सारणीकरणाद्वारे प्राप्त झालेल्या माहितीस अधिक स्पष्ट व समजण्यायोग्य बनविण्यात आले. तसेच गुणात्मक व संख्यात्मक आधारावर माहितीचे विश्लेषण करण्यात आले आहे.

## ३.१४ माहिती संकलन : दुय्यम साधने

प्रस्तुत संशोधन अभ्यासासाठी अनेक दुय्यम साधनांचा आधार घेण्यात आला आहे. यामध्ये संशोधन अहवाल, रिसर्च पेपर, शासनाचे प्रकाशित व अप्रकाशित अहवाल, शासकीय मासिके, शासननिर्णय, बालमजुरी संबंधित कायदे, अशासकीय संस्था, राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय संस्थांची माहिती, वेबसाईटवरील माहिती, विविध शासकीय योजना इ. दुय्यम सामग्रीचा समावेश आहे.

### ३.१५ **प्रकरणीकरण** :

संशोधन अभ्यास विषयाची स्वतंत्र प्रकरणांद्वारे सविस्तर मांडणी करण्यात आलेली आहे. यानुसार पुढील प्रकरणांमध्ये विषयाची विभागणी केलेली आहे.

**प्रकरण पहिले** : संशोधन अभ्यास विषयाची ओळख

**प्रकरण दुसरे** : संदर्भ साहित्याचा आढावा

**प्रकरण तिसरे** : संशोधन पध्दती

**प्रकरण चौथे** : माहितीचे सारणीकरण व विश्लेषण

**प्रकरण पाचवे** : निष्कर्ष, गृहितकृत्यांची पडताळणी, शिफारशी व संशोधन विषयाचा सारांश

**प्रकरण सहावे** : सारांश

### ३.१६ **सारांश** :

संशोधन विषयाचा शास्त्र शुध्द पध्दतीने अभ्यास करण्याच्या दृष्टीने प्रथम संशोधन पध्दतीचा सखोल अभ्यास करण्यात आला. या आधारे संशोधन अभ्यासासाठी वापरण्यात आलेली पध्दती सदर प्रकरणामध्ये मांडण्यात आली आहे. यामध्ये प्रामुख्याने समस्यासूत्रण, अभ्यास विषयाचे महत्त्व, विषयाची व्याप्ती व मर्यादा, उद्दिष्ट्ये, गृहितकृत्ये, नीतिमुल्ये, अभ्यासाचे क्षेत्र, संशोधन आराखडा, समग्र, नमुना निवड व आकार, माहिती सकंलन पध्दती व साधने, माहितीचे स्त्रोत इ. संबंधीत सविस्तर माहिती देण्यात आलेली आहे.

# प्रकरण चौथे
# माहितीचे सारणीकरण व विश्लेषण

## ४ प्रस्तावना :

विटभट्टी व्यवसायातील बालकामगारांची शैक्षणिक व आरोग्य स्थिती तसेच समस्या जाणून घेण्यासाठी सदर संशोधन विषय हाती घेण्यात आलेला आहे. त्यानुसार कराड तालुक्यात ४० वीटभट्टीवरील सर्वेक्षणात ५ ते १४ वयोगटातील बालकामगार असलेली एकूण १६१ कुटुंबे आढळून आली. त्यामुळे या कुटुंबातील पालकांकडून संशोधन अभ्यासाच्या उद्दिष्टांनुसार प्राथमिक माहिती घेण्यात आली आहे. तसेच अभ्यास विषयाशी संबंधीत शासकीय अधिकाऱ्यांकडूनही प्राथमिक माहितीचे संकलन करण्यात आले. यानुसार संकलित केलेल्या प्राथमिक माहितीचे सविस्तर विश्लेषण सदर प्रकरणामध्ये करण्यात आले आहे.

'एक्सेल' (Excel Sheet) सॉफ्टवेअर च्या माध्यमातून प्राप्त माहितीचे सारणीकरण व त्या आधारे विश्लेषण करण्यात आले आहे. प्राप्त माहितीचे विश्लेषण पुढील चार स्तरावर करण्यात आलेले आहे.

- **अ)** **कुटुंबाची सर्वसाधारण माहिती** : सर्वेक्षण केलेल्या ४० वीटभट्टयांवरील ३२० कुटुंबाकडून प्राप्त झालेल्या माहितीचे विश्लेषण करण्यात आले आहे.
- **ब)** **बालकांच्या कामाची स्थिती** : वीटभट्टी सर्वेक्षणातील एकूण ३२० कामगार कुटुंबाकडून प्राप्त माहितीच्या आधारे ५ ते १४ वयोगटातील काम करणाऱ्या बालकांचे संख्यात्मक विश्लेषण करण्यात आले आहे. तसेच प्रत्यक्षात ५ ते १४ वयोगटातील काम करणारी बालके ३२० पैकी १६१ कुटुंबात आढळून आलेली आहेत. यानुसार १६१ कुटुंबातील पालकांनी दिलेल्या प्राथमिक माहितीच्या आधारे बालकांच्या कामाचे स्वरुप व कारणे या विषयी विश्लेषण करण्यात आले आहे.
- **क)** **बालकांची शैक्षणिक स्थिती** : वीटभट्टीवरील ५ ते १४ वयोगटातील बालकांच्या शैक्षणिक स्थितीचे संख्यात्मक विश्लेषण ३२० कामगार कुटुंबाकडून प्राप्त माहितीच्या आधारे करण्यात आले आहे. तसेच बालकांची नेमकी शैक्षणिक स्थिती, त्यांच्या समस्या व उपलब्ध शैक्षणिक सुविधा याबाबत १६१ कुटुंबातील पालकाकडून प्राप्त माहितीच्या आधारावर विश्लेषण करण्यात आले आहे.

ड) **मुलींची आरोग्य स्थिती** : प्राथमिक माहिती घेण्यात आलेल्या १६१ कुटुंबापैकी १०३ कुटुंबांमध्ये मुली आहेत. त्यामुळे मुलींच्या आरोग्य स्थितीचे विश्लेषण १०३ कामगार कुटुंबांकडून प्राप्त माहितीच्या आधारे करण्यात आले आहे.

## ४.१ इतर संशोधन अहवालाच्या आधारे माहितीचे विश्लेषण :

'वीटभट्टी व्यवसायातील बालमजुरी' विषयावर यापुर्वी झालेले काही संशोधन अहवाल उपलब्ध आहेत. त्यानुसार सद्यस्थितीत सदर विषयाची प्राप्त झालेली माहिती ही पुर्वी झालेल्या संशोधन अहवालातील निष्कर्षाशी पडताळून पाहण्याचा प्रयत्न केला आहे. या अनुषंगाने संशोधकाने पुढील संशोधन अहवालाचा संदर्भ घेऊन सद्यस्थितीत प्राप्त माहितीचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न केला आहे.

### ४.१.१. मानव विकास केंद्र, यशदा, पुणे (२०१३-१४), राष्ट्रीय बालकामगार प्रकल्पांतर्गत जिल्ह्यांचे क्षेत्रनिहाय मॅपिंग "सातारा जिल्ह्यातील वीटभट्टीवर काम करणाऱ्या बालकांचा अभ्यास", संशोधन अहवाल. यशदा, पुणे.

सदर संशोधन प्रकल्प 'मानव विकास केंद्र' (CHD), यशदा, पुणे मार्फत सन २०१३-१४ मध्ये हाती घेण्यात आला होता. सदर संशोधन सातारा जिल्ह्यातील कराड तालुक्यामधील वीटभट्टी व्यवसायातील बालमजुरी संदर्भात होते. यासाठी कराड तालुक्यातील १४१ वीटभट्टयांचे सर्वेक्षण करण्यात आले होते. तसेच या व्यवसायातील बालमजुरांची संख्या, त्यांची शैक्षणिक व आरोग्य स्थितीविषयी अभ्यास करण्यात आला होता. सदर अहवालातील निष्कर्षाचा सदर प्रकरणात योग्य ठिकाणी वापर करण्यात आला आहे.

### ४.१.२ National Commission for Protection of Child Rights (NCPCR), GoI (Jan 2015), "Status Report on School Participation and availing of Health and Nutrution services for children of Migrant Labourers"

सदर संशोधन शेतकाम, बांधकाम व्यवसाय, वीटभट्टी व्यवसाय, फेरीवाले व इतर व्यवसायातील स्थलांतरीत कामगार कुटुंबांच्या संदर्भात होते. हे संशोधन महाराष्ट्र, पंजाब, पश्चिम बंगाल, कर्नाटक, गुजरात व दिल्ली या सहा राज्यांमध्ये करण्यात आले होते. या अहवालातील वीटभट्टी व्यवसायातील बालकांचे शिक्षण व आरोग्य स्थिती संबंधीत माहिताचा सदर प्रकरणात विश्लेषणासाठी योग्य त्या ठिकाणी वापर करण्यात आला आहे.

## ४.२ सर्वसामान्य माहितीचे विश्लेषण :

वीटभट्टी सर्वेक्षणातील ३२० कामगार कुटुंबाकडून प्राप्त झालेल्या प्राथमिक माहितीचे विश्लेषण पुढे देण्यात आलेले आहे.

### ४.२.१ कुटुंबाच्या स्थलांतराची स्थिती :

रोजगाराच्या शोधात अनेक कुटुंबे ही परराज्य, परजिल्हा व इतर तालुक्यांमधुन स्थलांतरीत होत असतात. हे स्थलांतर कायमस्वरुपी किंवा हंगामी स्वरुपात झालेले असते. यानुसार वीटभट्टी व्यवसायातील कुटुंबाच्या स्थलांतराची स्थिती पुढील सारणीमध्ये दर्शविण्यात आलेली आहे.

**सारणी क्र. ४.१**

**कामगार कुटुंबांच्या स्थलांतराचा प्रकार**

| अ. क्र. | स्थलांतराचा प्रकार | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | हंगामी | ३११ | ९७% |
| २ | स्थानिक | ९ | ३% |
| **एकूण** | | **३२०** | **१००%** |

सारणी क्र. ४.१ वरुन असे स्पष्ट होते की, कराड तालुक्यातील वीटभट्टी व्यवसायात हंगामी स्थलांतरीत कुटुंबाची संख्या अधिक असून तीचे प्रमाण ९७ टक्के आहे. केवळ ३ टक्के कुटुंबे ही स्थानिक असल्याचे दिसून येतात.

सन २०१३-१४ मधील CHD, YASHADA या संस्थेच्या अहवालानुसार वीटभट्टंयावरती सर्वाधिक ४३७ हंगामी स्थलांतरीत कुटुंबे आढळून आली होती. तसेच NCPCR, GOI च्या अहवालानुसार महाराष्ट्रामध्ये एकूणच हंगामी स्थलांतराचे प्रमाण अधिक आहे. तसेच महाराष्ट्रात सर्वाधिक हंगामी स्थलांतरीत कुटुंबे ही वीटभट्टी व्यवसायातच (८३ टक्के) दिसून आली आहेत.

### ४.२.२ स्थलातरीत कुटुंबांचे मुळ राज्य :

वीटभट्टी व्यवसायात हंगामी स्थलांतरीत कुटुंबांचे प्रमाण जास्त असल्याचे स्पष्ट होते. यानुसार ही कुटुंबे प्रामुख्याने कोठून येतात, त्यांचे मुळ ठिकाण कोणते आहे याविषयी माहिती घेण्यात आली. प्राप्त माहितीचे विश्लेषण पुढील सारणीमध्ये देण्यात आले आहे.

**सारणी क्र. ४.२**

**स्थलांतरीत कुटुंबांचे मुळ राज्य**

| अ. क्र. | मुळ राज्य | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | कर्नाटक | २५९ | ८१% |
| २ | महाराष्ट्र | ६१ | १९% |
| **एकूण** | | **३२०** | **१००%** |

सारणी क्र. ४.२ वरुन असे स्पष्ट होते की, वीटभट्टीवरील सर्वाधिक ८१ टक्के हंगामी स्थलांतरीत कामगार कुटुंबे कर्नाटक राज्यातून आलेली आहेत. उर्वरित १९ टक्के कामगार कुटुंबे ही महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यामधून आलेली आहेत. कर्नाटक राज्यातून आलेली ८१ टक्के कुटुंबे प्रामुख्याने विजापूर, इंडी, कन्नोली, शहादाबाद, चिंचोळी, इंगलगिरी, अथणी, अजरगुंड, अनकलंजी, बल्लाजेरी, गुलबर्गा, सिंदगी, उद्देबल इ. जिल्हा, तालुका व गावच्या ठिकाणाहून आलेली आहेत. तसेच महाराष्ट्रात प्रामुख्याने उस्मानाबाद, लातूर, सांगली, सोलापूर, इचलकरंजी इ. ठिकाणाहून कुटुंबे आलेली आहेत.

CHD, YASHADA या संस्थेच्या अहवालानुसार २०१३ -१४ मध्येही कराड येथील वीटभट्टीवरती सर्वाधिक स्थलांतरीत कुटुंबे कर्नाटक राज्यातून आलेली होती. तसेच NCPCR, GOI च्या अहवालानुसार वीटभट्टी व्यवसायासाठी प्रामुख्याने बिहार, उत्तरप्रदेश, कर्नाटक, झारखंड व महाराष्ट्र या राज्यातून हंगामी स्थलांतर करणारी कामगार कुटुंबे सर्वाधिक आहेत.

**४.२.३ कुटुंबातील ५ ते १४ वयोगटातील बालकांची लिंगनिहाय माहिती :**

वीटभट्टीवरील कामगार कुटुंबातील ५ ते १४ वयोगटातील बालकांची लिंगनिहाय संख्या पुढील आलेख क्र. ४.१ मध्ये दर्शविण्यात आली आहे.

**आलेख क्र. ४.१**

**वीटभट्टीवरील ५ ते १४ वयोगटातील मुले व मुली**




सोबतचा आलेख क्र. ४.१ वरुन असे स्पष्ट होते की, वीटभट्टी कामगार कुटुंबामधील १३२७ सदस्यांमध्ये ५ ते १४ वयोगटातील एकूण ३३३ बालके आहेत. या बालकांमध्ये ५७ टक्के मुले असून ४३ टक्के मुली आहेत. कामगार कुटुंबामध्ये ५ ते १४ वयोगटातील मुलींपेक्षा मुलांचे प्रमाण अधिक असल्याचे दिसून येते.

CHD, YASHADA, च्या संशोधन अहवालानुसार २०१३-१४ मध्ये कराड तालुक्यात १४१ वीटभट्टीवरती १४ वर्षाखालील एकूण ६८८ बालके आढळून आली होती. त्यामध्ये ३२१ मुले व ३६७ मुली असून यामध्ये मुलांपेक्षा मुलींचे प्रमाण अधिक होते. परंतु वीटभट्टी हा असंघटित, अनिश्चित स्वरुपाचा व्यवसाय असल्याने या व्यवसायाशी संबंधित स्थितीत सतत बदल होण्याची शक्यता अधिक असते.

तसेच NCPCR, GOI च्या अहवालानुसार वीटभट्टी व्यवसायातील कामगार कुटुंबांचा आकार मोठा असून त्यात ६ ते १४ वयोगटातील बालकांचे प्रमाण अधिक आहे. कारण या व्यवसायामध्ये काम करण्यासाठी कुटुंबामध्ये जेवढे जास्त सदस्य असतील तेवढे जास्त उत्पन्न कुटुंबाला मिळत असते. तसेच मुले असलेल्या कुटुंबांनाच वीटभट्टी मालक प्राधान्य देतात कारण कमी मजुरीमध्ये मुलांकडून अधिक काम करवून घेता येते. त्यामुळे या व्यवसायातील कुटुंबामध्ये प्रामुख्याने लहान बालकांचे प्रमाण जास्त असल्याचे दिसून येते.

### ४.२.४ कुटुंबांची भाषानिहाय माहिती :

वीटभट्टीवरील कामगार कुटुंबाच्या मातृभाषेचा तपशील पुढील सारणीमध्ये दर्शविण्यात आला आहे.

**सारणी क्र. ४.३**

**कामगार कुटुंबांचा भाषानिहाय तपशील**

| अ. क्र. | कुटुंबांची भाषा | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | कन्नड | २४८ | ७८% |
| २ | कन्नड व ऊर्दु | ३३ | १०% |
| ३ | मराठी | ३९ | १२% |
| **एकूण** | | **३२०** | **१००%** |

सारणी क्र. ४.३ वरुन असे स्पष्ट होते की, वीटभट्टीवरील सर्वाधिक ७८ टक्के कुटुंबांची मातृभाषा कन्नड आहे. तसेच १२ टक्के कुटुंबाची मातृभाषा ही मराठी असून उर्वरित १० टक्के कुटुंबाची मातृभाषा कन्नड व ऊर्दु असल्याचे दिसून येते. थोडक्यात वीटभट्टी व्यवसायामध्ये कन्नड भाषिकांची संख्या सर्वाधिक आहे.

CHD, YASHADA, सन २०१३-१४ च्या अहवालानुसार वीटभट्टीवरती सर्वाधिक कुटुंबे कन्नड भाषिक होती व त्यानंतर ऊर्दु भाषिक कुटुंबे होती. म्हणजेच कराड तालुक्यात कर्नाटक राज्यातून येणाऱ्या स्थलांतरीत कुटुंबांचे प्रमाण जास्त असल्याने कन्नड भाषिकांचे प्रमाण जास्त आहे.

### ४.२.५ कुटुंबांची सामाजिक प्रर्वग व धर्मनिहाय माहिती :

वीटभट्टी सर्वेक्षणातील ३२० कामगार कुटुंबामध्ये सर्वाधिक ३१ टक्के कुटुंबे अनुसूचित जातीची होती. अनुसूचित जमातीची १० टक्के तर भटक्या विमुक्त जाती व जमातीची २३ टक्के कुटुंबे होती. इतर मागासवर्गीय जातीची आणि खुल्या वर्गाची अनुक्रमे ३० टक्के व ६ टक्के कुटुंबे होती.

CHD, YASHADA, सन २०१३-१४ च्या संशोधन अहवालानुसार वीटभट्टीवरती अनुसूचित जातीची सर्वाधिक (४० टक्के) कुटुंबे होती. तसेच NCPCR, GOI च्या अहवालानुसार महाराष्ट्रात वीटभट्टी व्यवसायात सर्वाधिक ५६ टक्के कुटुंबे अनुसूचीत जातीची आहेत. एकूणच या सर्व संशोधन अभ्यासावरुन असे स्पष्ट होते की, वीटभट्टी

व्यवसायात आर्थिक दृष्ट्या मागासलेले अनुसूचीत जातीचे लोक सर्वाधिक प्रमाणात गुंतलेले आहे.

तसेच वीटभट्टीवरील ३२० कुटुंबांमध्ये ७० टक्के कुटुंबे ही हिंदू धर्मीय असून हे प्रमाण जास्त आहे. उर्वरित १६ टक्के कुटुंबे मुस्लिम धर्मीय व १४ टक्के कुटुंबे बौध्द धर्मीय आहेत. CHD, YASHADA, सन २०१३-१४ च्या अहवालानुसार या व्यवसायात हिंदू धर्मीय कुटुंबे (७९ टक्के) जास्त आहेत. म्हणजेच वीटभट्टी व्यवसायातील कामगार कुटुंबे विविध जाती व धर्माची असून त्यामध्ये अनुसूचीत जातीची व हिंदू धर्माची कुटुंबे सर्वात जास्त असल्याचे पहावयास मिळते.

- **संशोधन अभ्यासाच्या उद्दिष्टांनुसार माहितीचे विश्लेषण** :

वीटभट्टीवरील ३२० कुटुंबापैकी १६१ कुटुंबांमध्ये ५ ते १४ वयोगटातील काम करणारी एकूण ३३३ बालके आढळून आली आहेत. सदर १६१ कुटुंबातील पालकाकडून संशोधन अभ्यासाच्या उद्दिष्टांनुसार प्राथमिक माहिती घेण्यात आली. प्राप्त माहितीचे विश्लेषण पुढील प्रमाणे आहे.

### ४.३ वीटभट्टी व्यवसायातील कामगार कुटुंबांच्या कामाचे सामान्य स्वरुप :

वीटभट्टी व्यवसायातील कामगार कुटुंबाचे भट्टीवरील दैंनदिन कामाकाजाचे सामान्य स्वरुप कसे असते याविषयी कुटुंब प्रमुख म्हणजेच पालकांशी चर्चा करण्यात आली. ज्यामुळे या व्यवसायातील बालकांच्या कामाचे स्वरुप व स्थिती लक्षात येण्यास मदत होईल. या अनुषंगाने पालकांकडून प्राप्त झालेल्या माहितीचे सविस्तर विश्लेषण पुढील प्रमाणे आहे.

#### ४.३.१ कुटुंबाचा मुख्य व्यवसाय :

वीटभट्टीवरील १६१ कामगार कुटुंबांकडून त्यांचा मुख्य व्यवसाय जाणून घेण्यात आला. त्याचा तपशील पुढील सारणीमध्ये देण्यात आलेला आहे.

**सारणी क्र. ४.४**

**कामगार कुटुंबांचा मुख्य व्यवसाय**

| अ. क्र. | मुख्य व्यवसाय | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | शेती | २५ | १५% |
| २ | शेतमजुरी | ३८ | २४% |
| ३ | विटभट्टी | ९५ | ५९% |
| ४ | इतर मजुरीची कामे किंवा व्यवसाय | ३ | २% |
| **एकूण** | | **१६१** | **१००%** |

सारणी क्र. ४.४ वरुन असे स्पष्ट होते की, वीटभट्टी हा मुख्य व्यवसाय असणारे ५९ टक्के कुटुंबे असून ती सर्वाधिक आहेत. शेती हा मुख्य व्यवसाय असणारी १५ टक्के कुटुंबे आहेत असून मुख्य व्यवसाय म्हणून शेतमजुरी करणारी २४ टक्के कुटुंबे आहेत. तसेच २ टक्के कुटुंबे ही मुख्य व्यवसाय म्हणून इतर मजुरीची कामे करतात. उदा. बांधकाम व्यवसायातील कामे, गवंडी काम इ.

वीटभट्टीवरील काही कामगार कुटुंबाकडे स्वतःच्या मालकीची शेतजमीन असल्याचे दिसून येते. मात्र शेतीसाठी आवश्यक साधनसाम्रगीचा अभाव, बिकट आर्थिक परिस्थिती व पाण्याचा अभाव इ. कारणामुळे त्यांना शेती करता येत नाही किंवा शेतीतून खूप कमी उत्पन्न मिळते. त्यामुळे कुटुंबाला जास्त उत्पन्न वीटभट्टी व्यवसायातून मिळत असल्याने वीटभट्टी हाच मुख्य व्यवसाय असल्याचे सर्वाधिक कुटुंबांनी सांगितले आहे.

CHD, YASHADA, सन २०१३-१४ चा अहवाल तसेच NCPCR, GOI चा अहवाल या दोन्हीमधील माहितीवरुन असे दिसून येते की, मुळ गावी नियमित रोजगाराची साधने व संधी उपलब्ध होत नाही. त्यामुळे वीटभट्टी हाच बहुतांशी कुटुंबांचा मुख्य व्यवसाय बनला असून त्यासाठी वर्षानुवर्षे ही कुटुंबे हंगामी स्थलांतर करत आहेत.

### ४.३.२ वीट बनविण्याच्या कामाचे लक्ष्य :

वीटभट्टीवर प्रत्येक कामगार कुटुंबांना वीटा बनविण्याचे लक्ष्य ठरवून देण्यात आलेले असते. त्यानुसार कामगार कुटुंबे दिवसाला किती वीटांचे लक्ष्य पुर्ण करतात त्याचा तपशील पुढील सारणीमध्ये देण्यात आलेला आहे.

**सारणी क्र. ४.५**

**कामगार कुटुंबांचे वीटा बनविण्याचे लक्ष्य**

| अ. क्र. | वीटांचे लक्ष्य (दिवसाला) | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | ५०० ते १००० वीटा | ४५ | २८% |
| २ | १००० ते १५०० वीटा | ६१ | ३८% |
| ३ | १५०० ते २००० वीटा | ३७ | २३% |
| ४ | २००० पेक्षा जास्त वीटा | १८ | ११% |
| **एकूण** | | **१६१** | **१००%** |

सारणी क्र. ४.५ वरुन असे स्पष्ट होते की, वीटभट्टीवरील कामगार कुटुंबांचे वीटा बनविण्याचे लक्ष्य वेगवेगळे असते. त्यामध्ये सर्वाधिक ३८ टक्के कुटुंबे दिवसाला १००० ते १५०० वीटा बनवित असल्याचे दिसून येते. दिवसाला ५०० ते १००० वीटा बनविणारी २८ टक्के कुटुंबे असून २३ टक्के कुटुंबे दिवसाला १५०० ते २००० वीटा बनवितात. सर्वात कमी ११ टक्के कुटुंबे दिवसाला २००० पेक्षा जास्त वीटा बनवितात.

CHD, YASHADA, २०१३-१४ च्या अहवालानुसार दिवसाला १५०० ते २००० वीटा बनविणारी कुटुंबे अधिक आहेत. तसेच NCPCR, GOI च्या अहवालानुसार महाराष्ट्र व इतर राज्यातही वीटभट्टीवरील कुटुंबे दिवसाला १५०० ते २००० वीटांचे लक्ष्य पुर्ण करताना दिसून येतात. थोडक्यात वीटभट्टी कामगार कुटुंबे दिवसाला १५०० ते २००० हून जास्त वीटा बनविण्याचे काम करतात. तसेच वीटांचे बनविण्याचे हे लक्ष्य कुटुंबांतील बालकांच्या मदतीने पुर्ण केले जाते.

### ४.३.३ वीटा बनविण्याच्या कामाची वेळ :

वीटभट्टीवरील कामगार कुटुंबांच्या कामाची नेमकी कोणती वेळ असते याबाबतचा तपशील पुढील आलेख क्र.४.२ मध्ये दर्शविण्यात आला आहे.

**आलेख क्र. ४.२**

**वीटा बनविण्याच्या कामाची नेमकी वेळ**




सोबतचा आलेख क्र. ४.२ वरुन असे स्पष्ट होते की, वीटभट्टी कामगार कुटुंबांची कामाची वेळ ही वेगवेगळी असते. त्यानुसार २१ टक्के कुटुंबे पहाटे ते दुपार या कालावधीत वीटा बनविण्याची कामे करतात. सर्वाधिक ४२ टक्के कुटुंबे सकाळपासून संध्याकाळपर्यंत वीटांचे काम करतात. मध्यरात्र ते दुपार या कालावधीत काम करणारी १४ टक्के कुटुंबे असून या वेळेत काम करणारी ही सर्वात कमी कुटुंबे आहेत. तसेच २३ टक्के कुटुंबे अशी आहेत की, जी मध्यरात्री, सकाळी, दुपारी, रात्री, संध्याकाळी अशा कोणत्याही वेळेत कामे करतात. तसेच जास्त वीटा बनवायचा असल्यास दिवस रात्रही काम करावे लागत असल्याचे सांगण्यात आले.

कामाच्या गरजेनुसार कामगार कुटुंबे कोणत्याही वेळेत कामे करत असल्याचे दिसून येते. कधी मध्यरात्री तर कधी पहाटे उठून माती कालवून सकाळपर्यंत वीटा थापतात. नंतर दुपारच्या वेळेत इतर कामे म्हणजेच थापलेल्या वीटा पलटी करणे, वीटा रांगेत उभ्या करणे, वीटा थापण्यासाठीची जमीन सपाट करणे इ. करतात. काही कुटुंबे रात्री माती कालवून ठेवतात व सकाळ पासून दुपारपर्यंत वीटा थापतात आणि संध्याकाळी इतर प्रकारची कामे करतात. तसेच काही कुटुंबे संध्याकाळी माती कालवणे, सकाळ ते संध्याकाळ वीटा थापणे व मिळेल त्या वेळेत इतर कामे करतात.

थोडक्यात वीटभट्टीवरील प्रत्येक कुटुंब त्यांच्याकडील कामाचे स्वरुप व कामाचा आवाका यानुसार कोणत्याही वेळेत वीटभट्टीची कामे करतात. त्यामुळे कुटुंबातील सदस्य ज्या वेळेत वीटभट्टीची कामे करतात त्याच वेळेत कुटुंबातील बालकेही त्यांच्यासोबत काम करत असल्याचे पालकांनी सांगितले व प्रत्यक्ष निरीक्षणातूनही ही बाब स्पष्ट झाली आहे.

### ४.३.४ वीटभट्टीच्या कामाचे तास:

वीटा बनविण्याचे लक्ष्य पूर्ण करण्यासाठी कामगार कुटुंबे किती तास कामे करतात याबाबत पालकांकडून माहिती घेण्यात आली होती. त्यानुसार प्राप्त माहितीचा तपशील पुढील सारणीमध्ये दर्शविण्यात आला आहे.

**सारणी क्र. ४.६**

**कुटुंबांच्या वीटभट्टी कामाचे तास**

| अ. क्र. | कामाचे तास | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | ६ ते ८ तास | २४ | १५% |
| २ | ८ ते १० तास | १०२ | ६३% |
| ३ | १० ते १२ तास | ३५ | २२% |
| **एकूण** | | **१६१** | **१००%** |

सारणी क्र. ४.६ वरुन असे स्पष्ट होते की, वीटभट्टीवरील सर्वाधिक ६३ टक्के कुटुंबे ८ ते १० तास काम करणारी आहेत. तसेच १० ते १२ तास वीटभट्टीचे काम करणारी २२ टक्के कुटुंबे असून १५ टक्के कुटुंबे ६ ते ८ तास काम करत असल्याचे दिसून येते. थोडक्यात वीटा बनविण्याचे लक्ष्य पुर्ण करण्यासाठी कामगार कुटुंबे कोणत्याही वेळेत व जास्त तास कामे करताना दिसून येतात.

CHD, YASHADA, २०१३-१४ चा अहवाल व NCPCR, GOI च्या अहवालानुसार असे दिसून येते की, वीटभट्टी व्यवसायातील कामगार कुटुंबे ८ तासापेक्षा जास्त तास तसेच १२ तासही काम करतानाही दिसून येतात. एकूणच वीटभट्टी व्यवसायातील कामगार कुटुंबांच्या कामाचे स्वरुप पाहता असे लक्षात येते की, या कुटुंबांना एका दिवसात ५०० ते १५०० पर्यंत वीटा बनवायचा असतात. एवढ्या वीटा बनविण्यासाठी कामगार कोणत्याही वेळेत कितीही तास काम करत असून त्यांच्या कामाची निश्चित वेळ नसते. तसेच या कामात कुटुंबातील बालके पालकांना मदत करत असतात.

## ४.४ वीटभट्टी व्यवसायातील बालकामगार व त्यांच्या कामाचे स्वरुप :

वीटभट्टी व्यवसायात कामाचे स्वरुप व कामाचा आवाका यानुसार संपूर्ण कुटुंब एकत्रितपणे वीटांचे लक्ष्य पुर्ण करण्यासाठी काम करत असतात. त्यामुळे या व्यवसायातील बालकांच्या कामाचे नेमके स्वरुप, त्यांच्या कामाचे तास तसेच या व्यवसायातील बालमजुरीची कारणे जाणून घेणे गरजेचे आहे. त्या अनुषंगाने वीटभट्टीवरील ५ ते १४ वयोगटातील काम करणारी बालके असलेल्या १६१ कुटुंबातील पालकांकडून आवश्यक माहिती घेण्यात आली होती.

### ४.४.१ वीटभट्टी व्यवसायातील बालकामगारांची संख्या :

वीटभट्टी सर्वेक्षणात ३२० कामगार कुटुंबामध्ये ५ ते १४ वयोगटातील एकूण ३३३ बालके आढळून आली. या ३३३ बालकांपैकी वीटभट्टीचे काम करणाऱ्या बालकांची संख्या पुढील आलेख क्र. ४.३ मध्ये दर्शविण्यात आली आहे.

**आलेख क्र. ४.३**

**वीटभट्टी व्यवसायातील बालकामगारांची संख्या**




सोबतचा आलेख क्र. ४.३ वरुन असे स्पष्ट होते की, वीटभट्टीवरील ५ ते १४ वयोगटातील ३३३ बालकांपैकी २९७ (८९ टक्के) बालके वीटभट्टीची कामे करत असून हे प्रमाण सर्वाधिक आहे. उर्वरित केवळ ११ टक्के बालके वीटभट्टीची कामे करत नसल्याचे दिसून येते. तसेच वीटभट्टीची कामे करत असलेल्या बालकांमध्ये ५० टक्के मुले असून ३९ टक्के मुली आहेत. प्रामुख्याने जी बालके काम करत नाहीत त्यामध्ये ५ ते ७ वयोगटातील बालकांचा अधिक समावेश आहे. म्हणजेच या व्यवसायात ७ वर्षापुढील काम करणाऱ्या बालकांचे प्रमाण अधिक असल्याचे दिसून येते. असे असले तरी ५ ते ७ वयोगटातील काही बालके वीटभट्टी व्यवसायात जमीन सपाट करणे, वीटा पलटी करणे इ. हलक्या स्वरुपांची कामे करताना प्रत्यक्ष निरीक्षणात दिसून आली आहेत. एका वीटभट्टीवर ५ वर्षाच्या दोन लहान मुली जमीन सपाट करत असल्याचे प्रत्यक्षात दिसून आले. त्यामुळे वीटभट्टीच्या कामात लहानात लहान मुलांची कोणत्या ना कोणत्या प्रकारे मदत होऊ शकते हे स्पष्ट होते.

CHD, YASHADA, च्या अहवालानुसार २०१३-१४ मध्ये कराड तालुक्यातील १४१ वीटभट्टयांवरती १४ वर्षाखालील एकूण ६८८ बालके होती. त्यामध्ये १३५ (२० टक्के) बालके वीटभट्टीवर प्रत्यक्ष काम करताना दिसून आली होती. काम करणाऱ्या १३५ बालकांमध्ये ६५ मुले व ७० मुली होत्या. यावरुन २०१३-१४ च्या तुलनेत सद्यस्थितीत वीटभट्टीवरील बालकामगारांची संख्या (४० वीटभट्टीवरती २९७ बालकामगार) मोठ्या प्रमाणात वाढल्याचे दिसून येत आहे. तसेच NCPCR, GOI च्या अहवालानुसारही या व्यवसायात १० वर्षापुढील बालके मोठ्या प्रमाणात काम करताना दिसून आली आहेत.

एकूणच 'बालकामगार निर्मुलन (प्रतिबंध व नियमन) अधिनियम १९८६' नुसार १४ वर्षाच्या आतील बालकांची धोकादायक व बिगर धोकादायक कामातून मुक्तता करणे आवश्यक आहे. प्रत्यक्षात मात्र कराड तालुक्यातील वीटभट्टयांवरती मोठ्या संख्येने १४ वर्षाखालील बालके काम करताना दिसून येत आहेत.

### ४.४.२ वीटभट्टीवरील बालकांच्या कामाचे प्रकार (स्वरुप) :

वीटभट्टीवरती ५ ते १४ वयोगटातील २९७ बालके कामे करत असल्याचे दिसून येते. काम करणारी २९७ बालके वीटभट्टीवरील १६१ कुटुंबांमध्ये आढळून आली आहेत. त्यानुसार कुटुंबातील बालके वीटभट्टीवरती कोणकोणती कामे करतात या विषयी १६१ पालकांकडून माहिती घेण्यात आली. प्राप्त माहितीनुसार बालकांच्या कामांचे प्रकार पुढील आलेख क्र. ४.४ मध्ये दर्शविण्यात आले आहे.

**आलेख क्र. ४.४**

**बालके करत असलेल्या कामाचे प्रकार (स्वरुप)**

**(बहुपर्यायी प्रश्न)**




सोबतचा आलेख क्र. ४.४ वरुन हे स्पष्ट होते की, याबाबत पालकांनी बहुपर्यायी मते मांडलेली असून वीटभट्टी व्यवसायात बालके विविध प्रकारची कामे करताना दिसून येतात. सर्वाधिक ३४ टक्के बालके वीटा थापण्याचे काम करतात. वीटा पलटी करणे (३३ टक्के), वीटा थापण्यासाठी जमिन एकसमान करणे (३२ टक्के), वीटा वाळविण्यासाठी रांगेत उभ्या करणे (३२ टक्के), वीट बनविण्यासाठी माती/चिख्खल कालविणे (३१ टक्के) इ. प्रकारची कामे प्रामुख्याने बालके करत असल्याचे पालकांनी सांगितले आहे. तसेच भट्टीवर २८ टक्के बालके वीटा वाहून नेण्याचे काम करत असून ३ टक्के बालके भट्टी लावण्यासाठी मदत करतात. तसेच १४ टक्के पालकांनी बालके वीटभट्टीवर सर्व प्रकारची कामे करत असल्याचे सांगितले आहे.

पालकांच्या बहुपर्यायी मतांनुसार वीटभट्टी व्यवसायात बालके सर्व प्रकारची कामे कमी-अधिक प्रमाणात करत असतात. तसेच ही बाब प्रत्यक्ष प्रत्यक्ष निरीक्षणातही दिसून आली आहे. तुलनात्मकरित्या बालके वीटा थापणे, वीटा पलटी करणे, माती कालविणे, जमिन सपाट करणे व वीटा रांगेत उभ्या करणे इ. कामे अधिक प्रमाणात करतात. तसेच

५ ते ७ वर्षांची बालके वीटा थापण्यासाठी जमिन सपाट करणे, वीटा पलटी करणे, वीटा रांगेत उभ्या करणे इ. हलक्या स्वरुपाच्या कामात पालकांना मदत करताना निरीक्षणात दिसून आले आहे. तसेच वीटभट्टीवरील कामाच्या प्रकारामध्ये भट्टीसाठी वीटा डोक्यावर वाहून नेण्याचे काम सर्वाधिक प्रमाणात मुली व महिलाच करताना प्रत्यक्ष निरीक्षणात दिसून आल्या. क्वचितच एखाद्या भट्टीवर मुले वीटा वाहण्याचे काम करताना दिसले. एकूणच वीटभट्टी व्यवसायात वीटा थापण्याच्या कामात कुटुंबांना बालकांची सर्वात जास्त मदत होते. यामुळे वीटभट्टी व्यवसायात अद्यापही बालमजुरी दिसून येते.

CHD, YASHADA, २०१३-१४ च्या अहवालानुसार त्यावेळी वीटभट्टीवरील सर्वाधिक बालके वीटा वाहणे, माती कालविणे, वीटा पलटी करणे व वीटा थापणे या स्वरुपाची कामे करताना दिसून आली होती.

### ४.४.३ बालकांच्या कामाचे तास :

वीटभट्टीवरती बालके विविध प्रकारची कामे करताना दिसून येतात. कुटुंबांचे वीटा बनविण्याचे लक्ष्य एकच असल्याने कुटुंबांतील सदस्य दिवस-रात्र अशा कोणत्याही वेळेत कामे करतात. कामाचे लक्ष्य पुर्ण करण्यासाठी सर्वाधिक कुटुंबातील सदस्य ८ ते १० तास काम करताना दिसून येतात. त्याप्रमाणे कुटुंबांतील बालके किती तास कामे करतात याबाबत पालकांनी दिलेली माहिती पुढील सारणीमध्ये देण्यात आली आहे.

**सारणी क्र. ४.७**

**बालकांच्या कामाच्या तासांचा तपशील**

| अ. क्र. | बालकांच्या कामाचे तास | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | १ ते ४ तास | ४ | २% |
| २ | ४ ते ६ तास | १७ | ११% |
| ३ | ६ ते ८ तास | ८७ | ५४% |
| ४ | ८ तासापेक्षा जास्त | ४५ | २८% |
| ५ | मनात असेल तोपर्यंत | ८ | ५% |
| **एकूण** | | **१६१** | **१००%** |

सारणी क्र. ४.७ वरुन असे स्पष्ट होते की, सर्वाधिक ५४ टक्के बालके ६ ते ८ तास काम करतात. त्यानंतर २८ टक्के बालके ८ तासापेक्षा जास्त तास वीटभट्टीची कामे करतात. वीटभट्टीवर ४ ते ६ तास काम करणारी ११ टक्के बालके असून व २ टक्के बालके १ ते ४ तास काम करणारी आहेत. तसेच बालके मनात असेल तोपर्यंत काम करतात असे ५ टक्के पालकांनी सांगितले आहे. म्हणजेच कुटुंबांचे वीटांचे लक्ष्य पुर्ण करण्यासाठी बालकांनाही जास्त तास काम करावे लागत असल्याचे दिसून येते. तसेच पालकांसोबत बालके पहाटे, दुपारी, सकाळी, रात्री, संध्याकाळी अशा कोणत्याही वेळेत व पालक करतात तितका वेळ काम करत असल्याचे प्रत्यक्ष निरीक्षणात दिसून आले आहे. एका भट्टीवर १२ वर्षाचा मुलगा व १० वर्षाची मुलगी सकाळी ६ वाजेपासून आईसोबत माती /चिख्खल कालविण्याचे व नंतर वीटा थापण्याचे काम करताना दिसून आले.

CHD, YASHADA यांचा सन २०१३-१४ मधील अहवाल तसेच NCPCR, GOI चा अहवालावरुन वीटभट्टी व्यवसायातील कामगार कुटुंबे ही १२-१२ तास काम करत

असल्याचे स्पष्ट होते. तसेच कुटुंबातील बालकेही पालक करतात तितकाच वेळ काम करत असल्याचे दिसून येते.

बालमजुरी प्रतिबंध कायदा १९८६ नुसार कामाच्या ठिकाणी १४ वर्षाखालील बालकांना ६ तासापेक्षा जास्त काळ कामावर ठेवले जाणार नाही अशी तरतूद करण्यात आली आहे. परंतु वीटभट्टी व्यवसायात कामाचे स्वरुप व कामाचा आवाका यानुसार बालके ६ ते ८ तास व ८ तासापेक्षाही जास्त काळ काम करत असल्याचे दिसून येत आहे.

### ४.४.४ वीटभट्टी कामाव्यतिरिक्त मुली करत असलेली घरगुती कामे :

सर्वेक्षण करण्यात आलेल्या व प्राथमिक माहिती घेतलेल्या वीटभट्टीवरील १६१ कुटुंबांपैकी १०३ कुटुंबामध्ये मुली आहेत. मुलांपेक्षा कुटुंबातील मुलींना वीटभट्टीच्या कामांबरोबरच घरातील इतरही कामे करावी लागत असल्याचे दिसून येते. याबाबतची सविस्तर माहिती पुढील आलेख क्र. ४.५ मध्ये देण्यात आली आहे.

**आलेख क्र. ४.५**

**मुली करत असलेल्या घरातील कामांचे स्वरुप**

**(बहुपर्यायी प्रश्न)**




सोबतचा आलेख क्र. ४.५ वरुन असे स्पष्ट होते की, याबाबत पालकांनी बहुपर्यायी मते मांडलेली आहेत व यानुसार मुली ही घरातील विविध कामे करत असल्याचे दिसून येते. सर्वाधिक ३१ टक्के मुली घरातील धुणी-भांडी करणे तसेच ३१ टक्के मुली घरात पिण्याचे व वापरण्याचे पाणी भरणे अथवा दुरुन वाहून आणणे ही कामे करत आहेत. सर्वात कमी १३ टक्के मुली लहान भावंडांना संभाळण्याचे काम करत असून २५ टक्के मुली घरातील स्वयंपाकही करतात. एकूणच वीटभट्टी कामाव्यतिरीक्त मुली घरातील धुणी-भांडी व पाणी भरणे ही कामे अधिक प्रमाणात करतात.

प्रत्यक्ष निरीक्षणात भट्टीचे काम झाल्यानंतर संध्याकाळच्या वेळी घरामध्ये स्वयंपाक करताना मुली दिसून आल्या. तसेच भांडी घासताना, लहान भावंडांना संभाळताना, पाणी भरताना बहुतेक मुली भट्टीवर प्रत्यक्षात दिसून आल्या.

थोडक्यात वीटभट्टी व्यवसायात मुले व मुली कुटुंबाच्या बरोबरीने कामे करतात. परंतु मुलांच्या तुलनेत मुलींना अधिक कामे करावी लागतात. कारण वीटभट्टीचे काम करुन मुली घरातील इतर सर्व कामेही करतात.

### ४.४.५ वीटभट्टी व्यवसायातील बालमजुरीची कारणे :

वीटभट्टी व्यवसायात बालकामगारांची संख्या जास्त असून यात बालके विविध प्रकारची कामे करतात. कुटुंबातील मुलीही वीटभट्टी व घरातील इतर सर्व कामे करताना दिसून येतात. यानुसार वीटभट्टी व्यवसायातील बालमजुरीच्या कारणांचा तपशील पुढील आलेख क्र. ४.६ मध्ये दर्शविण्यात आला आहे.

**आलेख क्र. ४.६**

**वीटभट्टी व्यवसायातील बालमजुरीची कारणे**

(**बहुपर्यायी प्रश्न**)




सोबतचा आलेख क्र. ४.६ वरुन असे स्पष्ट होते की, कुटुंबाला ठरवून दिलेले वीटांचे लक्ष्य पुर्ण करणे व कुटुंबाला आर्थिक हातभार लावणे यादृष्टीने बालके वीटभट्टीवर कामे करत असून हे प्रमाण सर्वाधिक ४६ टक्के आहे. शाळेत जात नसल्याने दिवसभर नुसते बसून राहण्यापेक्षा काम करत असलेल्या बालकांचे प्रमाणही जास्त असून ते ३० टक्के आहे. हंगामी स्थलांतराच्या काळात बालकांना गावाकडे संभाळण्यासाठी कोणाही नसते. त्यामुळे कुटुंबासोबत बालकांचेही स्थलांतर होते व कुटुंबासोबत बालके वीटभट्टीची कामे करतात असे २३ टक्के पालकांनी सांगितले. वर्षानुवर्षे कुटुंबातील सदस्य वीटभट्टीची कामे करत असल्याने भविष्यात बालकांनाही वीटभट्टीचेच काम करायचे आहे, त्यामुळे बालकांना हे काम शिकणे आवश्यक आहे म्हणून बालकांना कामास लावले जात असल्याचे १ टक्का पालकांनी सांगितले.

थोडक्यात कुटुंबाला दिलेले वीटांचे लक्ष्य पुर्ण करण्यासाठी बालके मदत करतात व त्यामुळे कुटुंबाला आर्थिक हातभार लागतो. हेच वीटभट्टी व्यवसायातील बालमजुरीचे प्रमुख कारण असल्याचे दिसून येते.

CHD, YASHADA, च्या अहवालानुसारही २०१३-१४ मध्ये या व्यवसायातील बालमजुरीची बहुतांशी कारणेही सद्यस्थितीत आढळून आलेल्या कारणांप्रमाणेच होती.

तसेच NCPCR, GOI च्या अहवालानुसार ही कुटुंबाला अधिक उत्पन्न मिळण्याच्या दृष्टीने, कामासाठी अधिक हातांची गरज म्हणून कुटुंबातील बालकांना कामास लावणे, गावाकडे बालकांना सांभाळण्यासाठी कोणी नसल्याने बालके कुटुंबासोबत येतात व काम करु लागतात हीच कारणे वीटभट्टी व्यवसायातील बालमजुरीस कारणीभूत असल्याचे दिसून आले आहे.

पालकांशी केलेली चर्चा तसेच प्रत्यक्ष निरीक्षणातून असे दिसून येते की, बहुतांशी कुटुंबाचा मुख्य व्यवसाय वीटभट्टी आहे. त्यामुळे पिढ्यानपिढ्या व वर्षानुवर्षे कुटुंबे हेच काम करत असल्याचे दिसून येते. असे एकाच प्रकारचे काम केल्याने कुटुंबातील सदस्यांना इतर कामे करता येत नाही. तसेच वीटभट्टीच्या काळात मिळविलेल्या मजुरीतूनच उर्वरित कालावधीत कुटुंबांचा उदरनिर्वाह करावा लागतो. त्यामुळे वर्षानुवर्षे अशा कुटुंबांच्या आर्थिक व इतर स्थितीत कोणतीच सुधारणा झालेली दिसून येत नाही. पर्यायाने हे दृष्टचक्र असेच चालू राहते व कुटुंबातील बालके ही या व्यवसायात आपोआप ओढली जातात. त्यामुळे वीटभट्टी व्यवसायातील कुटुंबे व कुटुंबातील बालके ही बालमजुरीच्या समस्येतून बाहेर येत नसल्याचे दिसून येते.

## ४.५ वीटभट्टी व्यवसायातील बालकांची शैक्षणिक स्थिती व समस्या :

शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ नुसार १४ वर्षापर्यंतच्या प्रत्येक मुलाला प्राथमिक शिक्षण सक्तीचे करण्यात आले आहे. म्हणजेच कायद्यान्वये १४ वर्षापर्यंतचे प्रत्येक बालक हे शाळेत असणे अपेक्षित आहे. यानुसार वीटभट्टीवरील ३२० कामगार कुटुंबातील १४ वर्षाखालील बालकांची शैक्षणिक स्थिती जाणून घेण्यात आली. तसेच ५ ते १४ वयोगटातील काम करणारी बालके असलेल्या १६१ कुटुंबातील पालकांकडून बालकांच्या शाळेत न जाण्याची कारणे, त्यांच्या शैक्षणिक समस्या, उपलब्ध शैक्षणिक सुविधा या विषयी प्राथमिक माहिती घेण्यात आली.

### ४.५.१ बालकांची सद्य शैक्षणिक स्थिती :

वीटभट्टीवरील ५ ते १४ वयोगटातील बालकांच्या सद्य शैक्षणिक स्थिती विषयी पालकांशी चर्चा करण्यात आली. प्राप्त माहितीच्या आधारे बालकांच्या सद्य शैक्षणिक स्थितीचा तपशील पुढील सारणीमध्ये दर्शविण्यात आला आहे.

**सारणी क्र. ४.८**

**बालकांच्या सद्य शैक्षणिक स्थितीचा तपशील**

| अ. क्र. | बालकांची सद्य शैक्षणिक स्थिती | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | गावाकडे शाळेत जातात परंतु सद्यस्थितीत शाळेत जात नाहीत | ५७ | १७% |
| २ | सद्यस्थितीत शाळा व काम करणारी बालके | ९८ | ३०% |
| ३ | सद्यस्थितीत नियमितपणे शाळेत जाणारी बालके | ४ | १% |
| ४ | शाळेत न जाणारी बालके | १४७ | ४४% |
| ५ | अंगणवाडीत जाणारी बालके | ८ | २% |
| ६ | अंगणवाडीत न जाणारी बालके | १९ | ६% |
| **एकूण** | | **३३३** | **१००%** |

सारणी क्र. ४.८ वरुन असे स्पष्ट होते की, सर्वेक्षणातील ३२० कामगार कुटुंबात ५ ते १४ वयोगटातील एकूण ३३३ बालके आहेत. या बालकांमध्ये शाळेत न जाणाऱ्या बालकांचे प्रमाण सर्वाधिक ४४ टक्के आहे. गावाकडे शाळेत जातात परंतु सद्यस्थितीत शाळेत जात नाहीत अशी एकूण १७ टक्के बालके आहेत. म्हणजेच सद्यस्थितीत कधीच

शाळेत न जाणारी व वीटभट्टी कामाच्या कालावधीत शाळेत न जाणारी अशी एकूण ६१ टक्के बालके शाळेत जात नसल्याचे दिसून येते व हे प्रमाण सर्वाधिक आहे. तसेच सद्यस्थितीत शाळा व काम असे दोन्ही करणाऱ्या बालकांचे प्रमाण जास्त असून ते ३० टक्के आहे. केवळ १ टक्के बालके अशी आहेत की, जी पुर्ण वेळ व नियमितपणे शाळेत जातात. तसेच अंगणवाडीत जाणाऱ्या बालकांचे प्रमाण केवळ २ टक्के आहे.

वीटभट्टी व्यवसायातील बालकांमध्ये शाळेत न जाणाऱ्या बालकांचे प्रमाण अधिक आहे. तसेच जी बालके शाळेत जात आहेत त्यांना वीटांचे लक्ष्य पुर्ण करण्यासाठी व कुटुंबाला आर्थिक हातभार लावण्यासाठी काम करुन शाळा शिकावी लागत आहे. याबाबत प्रत्यक्ष निरीक्षणात एका भट्टीवरील १४ वर्षाचा मुलगा शाळेतून आल्यांनतर संध्याकाळच्या वेळी भट्टी लावण्यासाठी लागणारी राख डोक्यावरुन वाहून नेताना दिसून आला. तसेच गावाकडे गेल्यावर काही बालके शाळेत जात असल्याचे पालकांनी सांगितले आहे. परंतु प्रत्यक्षात गावी गेल्यावर बालके खरोखरच शाळेत जातात किंवा नाही हे तपासून पाहता आलेले नाही. तसेच सद्यस्थितीत बालके शाळेत जात असल्याचे बहुतांशी पालकांनी सांगितले परंतु प्रत्यक्ष निरीक्षणात बालके दिवसभर भट्टीवरच काम करताना दिसून आली.

एकुणच 'शिक्षणाचा अधिकार २००९' च्या अधिनियमानुसार वीटभट्टी व्यवसायातील बालके त्यास अपवाद ठरतात. कारण या व्यवसायातील बहुतांशी बालके ही आजही शिक्षणापासून वंचित असल्याचे दिसून येत आहे.

CHD, YASHADA, च्या अहवालानुसार २०१३-१४ मध्ये कराड तालुक्यातील १४१ वीटभट्टयांच्या सर्वेक्षणात शाळेत जाण्याचे वय असलेल्या ६ ते १४ या वयोगटातील एकूण ४०१ बालके होती. या ४०१ बालकांपैकी केवळ २०८ (५२ टक्के) बालके शाळेत जाणारी होती. शाळेत जाणाऱ्या २०८ बालकांमध्ये ८४ (४० टक्के) मुले होती व १२४ (६० टक्के) मुली होत्या. तसेच ३ ते ६ वयोगटातील २०५ बालके होती व त्यापैकी केवळ ३९ बालके अंगणवाडीमध्ये जात होती. यावरुन २०१३-१४ मधील वीटभट्टीवरील काम करणाऱ्या बालकांची शैक्षणिक स्थिती व सद्य शैक्षणिक स्थिती यामध्ये फारसा फरक नसल्याचेच दिसून येते. यानुसार शाळेत जाणाऱ्या बालकांचे प्रमाण कमी असल्याचेच दिसून येते.

तसेच NCPCR, GOI च्या अहवालानुसार कुटुंबाला आर्थिक हातभार लावण्यासाठी बालके काम करत असल्याने या व्यवसायात शालाबाह्य मुलांचे प्रमाण जास्त असल्याचे दिसून आले. मुळ गावी असताना शाळेत जाणारी व कामाच्या ठिकाणी आल्यावरही शाळेत जाणारी बालके अत्यंत कमी होती. या अहवालानुसार महाराष्ट्रात हंगामी स्थलांतरापूर्वी व स्थलांतरानंतर वीटभट्टी व्यवसायातील शालाबाह्य बालकांचे प्रमाण (६३ टक्के कुटुंबातील बालके) सर्वाधिक होते. तसेच स्थलांतरापूर्वी शाळेत जाणाऱ्या ५८ टक्के बालकांपैकी केवळ ३० टक्के बालके ही मुळ गावी परतल्यानंतर शाळेत जात असल्याचे दिसून आले होते. तसेच मुळ गावी असताना अंगणवाडीत जात नसलेल्या ३ ते ६ वयोगटातील बालकांचे प्रमाण ७५ टक्के एवढे जास्त होते. यावरुन वीटभट्टी व्यवसायातील काम करणारी बहुतांशी बालके ही शिक्षणापासून वंचित राहत असल्याचे स्पष्ट होते.

### ४.५.२ वीटभट्टी परिसरात बालकांच्या शिक्षणासाठी उपलब्ध सुविधा :

सद्यस्थितीत वीटभट्टीच्या परिसरात बालकांच्या शिक्षणासाठी कोणत्या इयत्तेपर्यंत सुविधा उपलब्ध आहे याची १६१ कुटुंबातील पालकांकडून माहिती घेण्यात आली. प्राप्त माहितीचा तपशील पुढील सारणीमध्ये देण्यात आला आहे.

**सारणी क्र. ४.९**

**बालकांच्या शिक्षणासाठी उपलब्ध सुविधेचा तपशील**

| अ. क्र. | शिक्षणासाठी उपलब्ध सुविधा | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळा | ८० | ५०% |
| २ | माध्यमिक शाळा | ३ | २% |
| ३ | अंगणवाडीची सुविधा | ३ | २% |
| ४ | अंगणवाडी व प्राथमिक शाळा | १० | ६% |
| ५ | उपलब्ध सुविधेबद्दल माहिती नाही | ६५ | ४०% |
| **एकूण** | | **१६१** | **१००%** |

सारणी क्र. ४.९ वरुन असे स्पष्ट होते की, सर्वाधिक ५० टक्के पालकांच्या मते वीटभट्टीजवळ बालकांसाठी प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळेची सुविधा उपलब्ध आहे. माध्यमिक शाळा तसेच अंगणवाडीची सुविधा उपलब्ध असल्याचे अनुक्रमे २-२ टक्के पालकांनी सांगितले आहे. तसेच वीटभट्टीजवळ अंगणवाडी व प्राथमिक शाळा अशा दोन्ही सुविधा उपलब्ध असल्याचे ६ टक्के पालकांनी सांगितले आहे. वीटभट्टी जवळील परिसरात बालकांच्या शिक्षणासाठी उपलब्ध सुविधेबद्दल काहीच माहिती नसलेले ४० टक्के पालक आहे. हे प्रमाणही जास्त असून यावरुन बालकांच्या शिक्षणाबाबत पालक उदासिन असल्याचे दिसून येते व ही बाब प्रत्यक्ष निरीक्षणातूनही स्पष्ट होते.

तसेच NCPCR, GOI च्या अहवालानुसार वीटभट्टी परिसरात प्राथमिक, उच्च प्राथमिक, माध्यमिक तसेच खाजगी शाळांची सुविधा उपलब्ध होती.

**४.५.३ वीटभट्टीपासून शाळेचे अंतर :**

वीटभट्टी परिसरात शाळेची सुविधा उपलब्ध असल्याचे पालकांनी सांगितले. तसेच वीटभट्टीपासून शाळेचे अंतर नेमके किती आहे याबाबत पालकांनी दिलेल्या माहितीचा तपशील पुढील आलेख क्र. ४.७ मध्ये देण्यात आला आहे.

**आलेख क्र. ४.७**

**वीटभट्टीपासून शाळेचे अंतर**




सोबतचा आलेख क्र. ४.७ वरुन असे स्पष्ट होते की, वीटभट्टीपासून शाळेचे अंतर १ ते ३ कि.मी. असल्याचे ३० टक्के पालकांनी सांगितले आहे. वीटभट्टीपासून १ कि.मी. अंतरावर शाळा असल्याचे २६ टक्के पालकांनी सांगितले. वीटभट्टीपासून शाळेचे अंतर ३ किलोमीटर पेक्षा जास्त असल्याचे केवळ २ टक्के पालकांनी सांगितले आहे. तसेच सर्वाधिक ४२ टक्के पालकांना वीटभट्टीपासून शाळेचे अंतर किती आहे हेच माहिती नसल्याचे दिसून येते. एकूणच वीटभट्टीपासून सर्वाधिक शाळा १ ते ३ कि.मी. अंतरावरती असल्याचे दिसून येते.

वीटभट्टीवरील बहुतांशी पालकांना बालकांच्या शिक्षणासाठी कोणती सुविधा उपलब्ध आहे तसेच वीटभट्टीपासून शाळेचे अंतरही माहिती नाही. यावरुन कामगार कुटुंबातील पालकांची बालकांच्या शिक्षणाबाबतची उदासिनता लक्षात येते.

तसेच NCPCR, GOI च्या अहवालानुसार वीटभट्टीपासून १ ते ३ कि.मी. च्या अंतरावर शाळा व अंगणवाडीची सुविधा उपलब्ध आहे. परंतु वीटभट्टीवरील बालके शाळेत जात नसल्याचे प्रमाण जास्त आहे.

### ४.५.४ सद्यस्थितीत बालके शाळेत जात नसल्याची कारणे :

हंगामी स्थलांतराच्या काळात वीटभट्टी कामगार कुटुंबातील बहुतांशी बालके शाळेत जात नाहीत. तसेच कुटुंबातील काही बालके कधीच शाळेतच जात नसल्याचे दिसून येते. त्यामुळे कुटुंबातील बालकांच्या शाळेत न जाण्याची कारणे पालकांकडून जाणून घेण्यात आली. त्यानुसार प्राप्त माहितीचा तपशील पुढील आलेख क्र ४.८ मध्ये दर्शविण्यात आला आहे.

**आलेख क्र. ४.८**

**बालके शाळेत जात नसल्याच्या कारणांचा तपशील**

**(बहुपर्यायी प्रश्न)**




आलेख क्र. ४.८ वरुन असे स्पष्ट होते की, वीटभट्टी व्यवसायातील बालकांच्या शाळेत न जाण्याची बहुपर्यायी कारणे पालकांनी सांगितली आहेत. यानुसार बालके शाळेत जाण्यास तयार नसल्याचे सर्वाधिक ३५ टक्के पालकांनी सांगितले. या व्यवसायातील स्थलांतरीत कुटुंबे प्रामुख्याने कर्नाटक राज्यातून आलेली आहेत. त्यांची भाषा कन्नड असून कन्नड भाषेतून शिक्षणाची सुविधा उपलब्ध नसल्याने बालके शाळेत जात नसल्याचे प्रमाणही जास्त असून ते ३३ टक्के आहे. तसेच १५ टक्के पालकांच्या मतानुसार बालके शाळेत गेल्यास वीटा बनविण्याचे लक्ष्य पुर्ण करण्यात कुटुंबास अडचणी येतात. म्हणजेच या कामात बालकांची मदत कुटुंबासाठी अत्यंत महत्त्वाची असते व याचा परिणाम बालकांच्या शिक्षणावर होत असल्याचे दिसून येते.

तसेच बालकांच्या शिक्षणाचा खर्च परवडत नसल्याने बालकांना शाळेत पाठविले जात नाही असे ७ टक्के पालकांनी सांगितले आहे. वीटभट्टीपासून शाळेचे अंतर लांब आहे व वाहतुकीची व्यवस्था उपलब्ध नसल्याने बालकांना पायी शाळेत जावे लागते यामुळे बालकांना शाळेत पाठविले जात नसल्याचे ६ टक्के पालकांनी सांगितले आहे. तसेच कुटुंबातील लहान भावडांना संभाळणे (२ टक्के), पालकांची निरक्षरता व शिक्षणाबाबतची उदासिनता (२ टक्के) इ. कारणेही कारणीभूत आहेत मात्र त्याचे प्रमाण कमी असल्याचे दिसून येते.

तसेच वीटभट्टी कामगार कुटुंबातील ५ ते ६ वयोगटातील केवळ ८ बालके अंगणवाडीत जात असून हे प्रमाण अत्यंत कमी आहे. याबाबतही प्रामुख्याने वीटभट्टीपासून अंगणवाडीचे अंतर लांब असणे, बालकांची अंगणवाडीत जाण्याची इच्छा नसणे, भाषेची अडचण, पालकांची निरक्षरता व शिक्षणाबाबतची उदासिनता इ. कारणे कारणीभूत असल्याचे पालकांशी केलेल्या चर्चेतून लक्षात येतात.

सर्वाधिक पालकांच्या मतानुसार कुटुंबातील बालके शाळेत जाण्यास तयार नसतात किंवा त्यांना शिक्षण घेण्याची इच्छा नाही. यामागे अप्रत्यक्षरित्या पालकांची शिक्षणाबाबतची उदासिनता कारणीभूत असल्याचे दिसून येते. कारण बालके कुटुंबाला वीटा बनविण्याच्या कामात मदत करतात व त्याचा कुटुंबाला आर्थिक दृष्टीने फायदा होतो. त्यामुळे बालकांच्या शिक्षणासाठी पालक स्वतःहून पुढाकार घेताना दिसत नाहीत.

प्रत्यक्ष निरीक्षणात एका वीटभट्टीवर एक महाराष्ट्रीयन कुटुंब असे दिसून आले की, स्वतः आईवडील २० ते २५ वर्षापासून वीटभट्टीचे काम करत आहेत मात्र त्यांनी मुलांना शिक्षण दिले आहे. मुलगा इयत्ता १२ वीचे शिक्षण घेत असून मुलगी एम.एस.सी.करत आहे. वीटभट्टीच्या कामासाठी स्थलांतर करावे लागते त्यामुळे मुलीच्या शिक्षणात व्यत्यय येऊ नये याकरीता मुलीला वसतीगृहात ठेवण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. अशा प्रकारे क्वचितच एखादे पालक बालकांच्या शिक्षणाबाबत जागरुक असल्याचे दिसून येते.

CHD, YASHADA, च्या अहवालानुसार २०१३-१४ मध्ये वीटभट्टीवरील बालकांच्या शाळेत न जाण्यामागे प्रामुख्याने हंगामी स्थलांतर, बालकांना शाळेची आवड नसणे, वीटा बनविण्याच्या कामात बालकांची मदत लागणे, लहान भावंडांना सांभाळणे, भाषेची अडचण व पालकांची शिक्षणाबाबची उदासिनता इ. कारणे कारणीभूत असल्याचे दिसून आले होते. तसेच NCPCR, GOI च्या अहवालानुसारही कुटुंबाला आर्थिक हातभार

म्हणून काम करणे, बालकांना शाळेत व अंगणवाडीत दाखल करण्याबाबत पालकांची उदासिनता, लहान भावंडांना सांभाळणे, शाळेचे अंतर लांब असणे व भाषेची अडचण, सांस्कृतिक बदल व नवीन वातावरणात मिसळण्याची तयारी नसणे इ. सर्व कारणांमुळे कामाच्या ठिकाणी म्हणजेच वीटभट्टीवरील बालके शाळेत जात नसल्याचे स्पष्ट होते.

थोडक्यात वीटभट्टीवरील कामगार कुटुंबांचे सतत होणारे स्थलांतर यामुळे बालकांच्या शिक्षणात सातत्य राहत नाही. तसेच कुटुंबाची बिकट आर्थिक परिस्थिती, शिक्षणाबाबतची उदासिनता यामुळे कुटुंबातील बहुतांशी सदस्य शिक्षणापासून वंचित राहतात व वर्षानुवर्षे हीच स्थिती पुढे कायम राहते. त्यामुळे कुटुंबातील सुशिक्षित सदस्यांची संख्या कमी असते. अशा कुटुंबांमध्ये शिक्षणाबाबतची उदासिनता पिढ्यानपिढ्या पहावयास मिळते. म्हणूनच या व्यवसायातील बालकांची शैक्षणिक स्थिती खालावलेली दिसून येते.

### ४.५.५ सद्यस्थितीत शाळेत जाणाऱ्या बालकांच्या समस्या :

प्राथमिक माहिती घेण्यात आलेल्या १६१ कुटुंबापैकी ७३ कुटुंबातील बालके सद्यस्थितीत शाळेत जाणारी आहेत. शाळेत जाणाऱ्या बालकांच्या कोणत्या समस्या आहेत याबाबत पालकांशी चर्चा करण्यात आली. त्यानुसार प्राप्त माहितीचा तपशील पुढील सारणीमध्ये दर्शविण्यात आला आहे.

**सारणी क्र. ४.१०**

**सद्यस्थितीत शाळेत जाणाऱ्या बालकांच्या समस्या**

**(बहुपर्यायी प्रश्न)**

| अ. क्र. | शाळेत जाणाऱ्या बालकांच्या समस्या | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | भाषेची अडचण | २६ | ३६% |
| २ | शाळेचे अंतर लांब असून वाहतुकीची सुविधा उपलब्ध नाही | ३१ | ४२% |
| ३ | बालके महामार्गावरुन पायी शाळेत जात असल्याने रस्ते अपघाताची भीती वाटते | १३ | १८% |
| ४ | बालकांच्या शिक्षणाचा खर्च परवडत नाही | ३ | ४% |
| **एकूण** | | **७३** | **१००%** |

सारणी क्र. ४.१० वरुन असे स्पष्ट होते की, सद्यस्थितीत शाळेत जात असलेल्या बालकांच्या समस्यांविषयी पालकांनी बहुपर्यायी मते मांडली आहेत. त्यानुसार शाळेत जात असलेल्या सर्वाधिक ४२ टक्के बालकांची वीटभट्टीपासून शाळेचे अंतर लांब असून वाहतुकीची व्यवस्था उपलब्ध नसणे ही सर्वात मोठी समस्या असल्याचे दिसून येते. तसेच कन्नड भाषेत शिक्षण उपलब्ध नसल्याने शाळेत जाणाऱ्या बालकांना भाषेची अडचण निर्माण होत असल्याचे प्रमाण ३६ टक्के आहे. तसेच कराड तालुक्यातील बहुतांशी वीटभट्टया महामार्गाच्या बाजूनेच चालू आहेत. त्यामूळे बालकांना महामार्गावरुन पायी शाळेत जावे लागते. महामार्गावरील वाहनाची ये-जा ही अतिशय वेगाने होत असते त्यामुळे बालकांचे अपघात होण्याची सतत भीती वाटत राहते असे १८ टक्के पालकांनी सांगितले. सर्वात कमी ४ टक्के पालकांनी कुटुंबाच्या बिकट आर्थिक परिस्थितीमुळे बालकांच्या शिक्षणाचा खर्च परवडत नसल्याचे सांगितले आहे.

थोडक्यात वीटभट्टीवरील सद्यस्थितीत शाळेत जात असलेल्या बालकांना प्रामुख्याने शाळेचे लांब अंतर, शाळेत जाण्यासाठी वाहतुकीची व्यवस्था नसणे,

महामार्गावरुन पायी चालत शाळेत जावे लागणे, कुटुंबाची बिकट आर्थिक परिस्थिती व शिक्षणाचा खर्च इ. समस्या भेडसावत असल्याचे दिसून येते.

CHD, YASHADA, च्या अहवालानुसार २०१३-१४ मध्ये ही वीटभट्टीवरील शाळेत जात असलेल्या बालकांच्या संदर्भात वरीलप्रमाणेच सर्व अडचणी येत असल्याचे दिसून आले होते. त्यानुसार तत्कालीन स्थिती व सद्यस्थिती यात कोणताच बदल झाल्याचे दिसून येत नाही. तसेच NCPCR, GOI च्या अहवालानुसार वीटभट्टीपासून शाळेचे व अंगणवाडीचे अंतर लांब असणे हे सर्वात महत्त्वाचे कारण आहे की, ज्यामुळे वीटभट्टीवरील बालके शाळेत जात नाहीत किंवा पालक बालकांना शाळेत पाठवित नाहीत. तसेच वाहतुकीची योग्य व्यवस्था नसणे, बालकांना शाळेत नेऊन सोडणे व घेऊन येण्याइतपत पालकांकडे वेळ नसतो इ. कारणांमुळे बालके कामाच्या ठिकाणी असताना शाळेत जात नसल्याचे दिसून येते.

**४.५.६ बालकांच्या शिक्षणाबाबत पालकांचा दृष्टीकोन :**

बालकांच्या शिक्षणाबाबत पालकांचा दृष्टीकोन नेमका कसा आहे हे जाणून घेण्यात आले. याबाबत पालकांनी दिलेल्या मतांचा तपशील पुढील सारणीमध्ये दर्शविण्यात आला आहे.

**सारणी क्र. ४.११**

**बालकांच्या शिक्षणाबाबत पालकांचा दृष्टीकोन**

| अ. क्र. | बालकांच्या शिक्षणाबाबत पालकांची मते | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | बालकांनी शिक्षण घेणे महत्त्वाचे आहे | ७७ | ४८% |
| २ | शिक्षणापेक्षा काम करणे महत्त्वाचे आहे | ३२ | २०% |
| ३ | शिक्षण महत्त्वाचे वाटते परंतु आर्थिक परिस्थितीमुळे शिकविता येत नाही | ४६ | २८% |
| ४ | बालकांना काम व पैसा मिळेल असे शिक्षण मिळावे (व्यावसायिक शिक्षण) | ६ | ४% |
| **एकूण** | | **१६१** | **१००%** |

सारणी क्र. ४.११ वरुन असे स्पष्ट होते की, सर्वाधिक ४८ टक्के पालकांना बालकांनी शिक्षण घेणे महत्त्वाचे वाटते. बालकांनी शिक्षण घेणे महत्त्वाचे असले तरी कुटुंबाच्या बिकट आर्थिक परिस्थितीमुळे बालकांना शिकविता येत नसल्याचे २८ टक्के पालकांनी म्हटले आहे. शिक्षणापेक्षा कुटुंबांच्या उदरनिर्वाहासाठी काम करुन पैसे मिळविणे जास्त गरजेचे आहे असे २० टक्के पालकांना वाटते. म्हणजेच या पालकांना बालकांचे शिक्षण महत्त्वाचे वाटत नाही. तसेच काम व पैसा मिळेल अशा प्रकारचे शिक्षण (व्यावसायिक शिक्षण) बालकांसाठी अधिक उपयुक्त असल्याचे ४ टक्के पालकांनी सांगितले आहे.

एकूणच बालकांनी शिक्षण घेणे आवश्यक आहे असे ४८ टक्के पालकांना वाटत आहे. मात्र उर्वरित ५२ टक्के पालकांनी आर्थिक परिस्थितीमुळे बालकांना शिक्षण घेता येत नाही, कुटुबांच्या उदरनिर्वाहासाठी काम व पैसा महत्त्वाचा आहे, बालकांना काम व पैसा मिळू शकेल अशा स्वरुपाचे शिक्षण मिळावे इ. मते मांडली आहेत. म्हणजेच शिक्षणापेक्षा बालकांनी काम करुन पैसा मिळविणे अधिक महत्त्वाचे वाटत असलेले पालक सर्वात जास्त असल्याचे दिसून येते. यावरुन बालकांच्या शिक्षणाबाबतची पालकांची उदासिनता लक्षात येते.

CHD, YASHADA, यांच्या अहवालानुसार २०१३-१४ मध्येही बालकांच्या शिक्षणाबाबत पालकांनी अशाच प्रकारची मते मांडली होती. अद्यापही बालकांच्या शिक्षणाबाबत पालक उदासिन असल्याचेच दिसून येत आहे. तसेच NCPCR, GoI च्या अहवालानुसारही बालकांच्या शिक्षणाबाबत पालक मोठ्या प्रमाणात उदासिन असल्याचे दिसून येते. सदर अहवालामध्ये वीटभट्टी व्यवसायातील कामगार कुटुंबांची शैक्षणिक स्थिती अत्यंत दयनीय असल्याचे म्हटले आहे. कुटुंबातील पालकांचे शिक्षणाचे प्रमाण अत्यल्प असून त्यात एकूण पालकांपैकी ५६ टक्के पिता व ७८ टक्के माता निरक्षर असल्याचे दिसून आले. पालकांची सदर शैक्षणिक स्थिती पाहता कुटुंबातील बालकांची शैक्षणिक स्थिती लक्षात येते. त्यामुळे बालकांच्या शिक्षणाबाबत पालकांच्या दृष्टीकोनात बदल होणे आवश्यक आहे. तसेच 'मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क कायदा' याविषयी पालकांमध्ये जागृती निर्माण करणे गरजेचे आहे. अन्यथा हे चक्र सतत पुढे चालू राहील व या व्यवसायातील बालके शिक्षणापासून वंचित राहतील असे सदर अहवालात म्हटले आहे.

- **कुटुंबातील मुलींची शैक्षणिक स्थिती** :

**४.५.७ मुलींची सद्य शैक्षणिक स्थिती** :

सर्वेक्षणातील ३२० वीटभट्टी कामगार कुटुंबात ५ ते १४ वयोगटातील एकूण ३३३ बालके आहेत. त्यामध्ये १८९ मुले असून १४४ मुली आहेत. या मुलींची सद्य शैक्षणिक स्थिती जाणून घेणे महत्त्वपूर्ण असल्याने त्यासंबंधी पालकांकडून प्राथमिक माहिती घेण्यात आली. यानुसार प्राप्त माहितीचा तपशील पुढील सारणीमध्ये देण्यात आला आहे.

**सारणी क्र. ४.१२**

**मुलींच्या सद्य शैक्षणिक स्थितीचा तपशील**

| अ. क्र. | बालकांची सद्य शैक्षणिक स्थिती | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | गावाकडे शाळेत जातात परंतु सद्यस्थितीत शाळेत जात नाहीत | २७ | १९% |
| २ | सद्यस्थितीत शाळा व काम असे दोन्ही करणाऱ्या मुली | ३८ | २६% |
| ३ | सद्यस्थितीत पुर्ण वेळ व नियमितपणे शाळेत जाणाऱ्या मुली | ३ | २% |
| ४ | शाळेत न जाणाऱ्या मुली | ६६ | ४६% |
| ५ | अंगणवाडीत जाणाऱ्या मुली | ३ | २% |
| ६ | अंगणवाडीत न जाणाऱ्या मुली | ७ | ५% |
| **एकूण** | | **१४४** | **१००%** |

सारणी क्र. ४.१२ वरुन असे स्पष्ट होते की, शाळेत न जाणाऱ्या मुलींचे प्रमाण सर्वाधिक असून ते ४६ टक्के आहे. तसेच सद्यस्थितीत शाळेत जात नाहीत परंतु गावाकडे शाळेत जात असलेल्या मुलींचे प्रमाण १९ टक्के आहे. म्हणजेच कधीच शाळेत न जाणाऱ्या व वीटभट्टी कामाच्या कालावधीत शाळेत न जाणाऱ्या अशा एकूण सद्यस्थितीत शाळेत न जाणाऱ्या मुलींचे प्रमाण ६५ टक्के आहे व हे प्रमाण सर्वाधिक आहे. तसेच शाळा व काम असे दोन्ही करत असलेल्या मुलींचे प्रमाण २६ टक्के आहे. पुर्ण वेळ व नियमितपणे शाळेत जात असलेल्या मुलींचे प्रमाण केवळ २ टक्के आहे. तसेच ५ ते ६ वर्षाच्या आतील केवळ २ टक्के मुली अंगणवाडीत जात असून ५ टक्के मुली अंगणवाडीत जात नाहीत.

थोडक्यात शाळेत न जाणाऱ्या बालकांमध्ये मुलींचाही मोठ्या प्रमाणात समावेश असल्याचे स्पष्ट होते.

**४.५.८ मुला-मुलींच्या शिक्षणाचे प्रमाण :**

सर्वेक्षणातील ३२० कामगार कुटुंबात ५ ते १४ वयोगटातील एकूण ३३३ बालके आहेत. त्यापैकी सद्यस्थितीत शाळेत जाणाऱ्या व शाळेत न जाणाऱ्या मुला-मुलींचे तुलनात्मक प्रमाण पुढील आलेख क्र. ४.९ मध्ये दर्शविण्यात आले आहे.

**आलेख क्र. ४.९**

**सद्यस्थितीत शाळेत जाणाऱ्या व शाळेत न जाणाऱ्या मुला-मुलींचा तपशील**




सोबतचा आलेख क्र. ४.९ वरुन असे स्पष्ट होते की, सद्यस्थितीत शाळेत जाणाऱ्या व न जाणाऱ्या मुला - मुलींची एकूण संख्या ३०६ इतकी आहे. त्यामध्ये एकूण मुलांमध्ये शाळेत जात असलेल्या मुलांचे प्रमाण २० टक्के आहे व शाळेत न जाणाऱ्या मुलांचे प्रमाण ३६ टक्के आहे. तसेच एकूण मुलींमध्ये शाळेत जाणाऱ्या मुलींचे प्रमाण १४ टक्के असून शाळेत न जाणाऱ्या मुलींचे प्रमाण ३० टक्के आहे. यावरुन शाळेत जाणाऱ्या मुला-मुलींचा तुलनात्मक विचार केल्यास मुलांच्या तुलनेत मुलींचे शाळेत जाण्याचे प्रमाण कमी असल्याचे दिसून येते.

CHD, YASHADA, यांच्या संशोधन अहवालानुसार सन २०१३-१४ मध्ये वीटभट्टीवरील ६ ते १४ वयोगटातील ४०१ बालकांमध्ये केवळ २०८ (५२ टक्के) बालके शाळेत जाणारी होती. शाळेत जाणाऱ्या २०८ बालकांमध्ये ८४ (४० टक्के) मुले होती व १२४ (६० टक्के) मुली होत्या. थोडक्यात त्यावेळी शाळेत जाणाऱ्या बालकांमध्ये मुलींचे प्रमाण अधिक होते. मात्र सद्यस्थितीत शाळेत जाणाऱ्या मुलांचे प्रमाण मुलींपेक्षा जास्त असल्याचे दिसून येत आहे.

#### ४.५.९ कामगार कुटुंबातील मुलींचे शिक्षण :

वीटभट्टी व्यवसायातील मुलींच्या शिक्षणाचे प्रमाण कमी असल्याचे दिसून येते. त्यामुळे कुटुंबातील मुलींची शैक्षणिक स्थिती नेमकी कशी आहे हे जाणून घेण्यात आले. म्हणजेच साधारणपणे मुलींना कितव्या इयत्तेपर्यंत शिकू दिले जाते याबाबत १०३ (कुटुंबात मुली आहेत) पालकांशी चर्चा करण्यात आली. याबाबतचा तपशील पुढील सारणीमध्ये देण्यात आला आहे.

**सारणी क्र. ४.१३**

**कुटुंबातील मुलींची सामान्य शैक्षणिक स्थिती**

| अ. क्र. | मुलींची सामान्य शैक्षणिक स्थिती | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | इयत्ता १ ते ५ वी पर्यंत | १४ | १४% |
| २ | इयत्ता ६ ते ८ वी पर्यंत | ५२ | ५०% |
| ३ | इयत्ता ९ ते १० वी पर्यंत | ८ | ८% |
| ४ | इयत्ता ११ ते १२ वी पर्यंत | ३ | ३% |
| ५ | मुलींची इच्छा असेल तोपर्यंत | ११ | ११% |
| ६ | मुलींना शाळेत पाठविले जात नाही | १५ | १४% |
| **एकूण** | | **१०३** | **१००%** |

सारणी क्र. ४.१३ वरुन असे स्पष्ट होते की, कुटुंबातील मुलींना इयत्ता ६ ते ८ वी पर्यंत शिकू दिले जात असल्याचे प्रमाण सर्वाधिक ५० टक्के आहे. तसेच मुलींना इयत्ता ११ ते १२ वी पर्यंत शिकू दिले जात असल्याचे प्रमाण सर्वात कमी ३ टक्केच आहे. मुलींना केवळ इयत्ता ५ वी पर्यंत शिकू दिले जात असल्याचे १४ टक्के पालकांनी म्हटले आहे, तर १४ टक्के पालकांनी मुलींना शाळेतच पाठविले जात नसल्याचे सांगितले आहे. तसेच मुलींना इयत्ता ९ ते १० वी पर्यंत शिकू दिले जाते व मुलींची शिकण्याची इच्छा असेपर्यंत त्यांना शिकू दिले जाते असे अनुक्रमे ८ टक्के व ११ टक्के पालकांनी सांगितले आहे.

वीटभट्टी व्यवसायातील मुलींना इयत्ता ८ वी पर्यंत शिक्षण घेण्याची मुभा कुटुंबाकडून दिली जाते असे सांगणारे सर्वाधिक पालक आहेत. मात्र वीटभट्टीवर प्रत्यक्ष निरीक्षणात कुटुंबातील मुली शिक्षण घेत असतील असे कुठेच दिसून आले नाही. कारण मोठ्या प्रमाणात मुली वीटभट्टीचे व घरातील कामे करताना दिसून आल्या. तसेच वीटभट्टीवरील मुली शाळेत गेल्यास वीटांचे लक्ष्य पूर्ण करण्यात अडचणी येतात व

प्रामुख्याने घरकामाचा प्रश्न निर्माण होतो असे चर्चा करताना पालकांनीच सांगितले आहे. त्यामुळे मुलींनी शाळेत जाणे म्हणजेच कुटुंबाला आर्थिक दृष्ट्या परवडणारे नसते.

तसेच सारणी क्र. ४.१२ वरुनही असेच दिसून येते की, वीटभट्टी कामगार कुटुंबातील शिक्षण घेणाऱ्या मुलींचे प्रमाण खुप कमी आहे. त्यामुळे मुलींना शिकू दिले जाते असे पालकांनी म्हटले असले तरी प्रत्यक्षात मात्र तसे दिसून येत नाही.

### ४.५.१० मुलींच्या शिक्षणाबाबत पालकांचा दृष्टीकोन :

वीटभट्टी व्यवसायातील बालकांमध्ये मुलांपेक्षा मुलींचे शिक्षण घेण्याचे प्रमाण कमी आहे. त्यामुळे प्रामुख्याने मुलींच्या शिक्षणाबाबत पालकांचे मत व त्यांचे विचार जाणून घेणे महत्त्वपूर्ण ठरते. वीटभट्टीवरील १६१ कुटुंबापैकी १०३ कुटुंबामध्ये मुली होत्या. या पालकांचा मुलींच्या शिक्षणाबाबत असलेला दृष्टीकोन पुढील सारणीमध्ये दर्शविण्यात आला आहे.

**सारणी क्र. ४.१४**

**मुलींच्या शिक्षणाबाबत पालकांचा दृष्टीकोन**

**(बहुपर्यायी प्रश्न)**

| अ. क्र. | मुलींच्या शिक्षणाबाबत पालकांचा दृष्टीकोन | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | मुलींनी शिक्षण घेतले पाहिजे | ६० | ४३% |
| २ | मुलींच्या शिक्षणावर खर्च करुन काही उपयोग नाही | ७२ | ५१% |
| ३ | मुलींची घरकामात मदत होते | २ | १% |
| ४ | मुलींनी घरकाम शिकावे सासरी गेल्यावर हेच काम करायचे असते | ५ | ४% |
| ५ | मुलींची शाळा शिकण्याची तयारी नसते | २ | १% |
| **एकूण** | | **१४१** | **१००%** |

सारणी क्र. ४.१४ वरुन असे स्पष्ट होते की, मुलींच्या शिक्षणाबाबत पालकांचा दृष्टीकोन अधिक नकारात्मक असून हे पालकांनी दिलेल्या बहुपर्यायी मतांवरुन स्पष्ट होते. मुलींनी शिक्षण घेतले पाहिजे असे ४३ टक्के पालकांनी म्हटले असले तरी सर्वाधिक ५१ टक्के पालकांच्या मते मुलींना शिक्षणाची गरज नाही. मुलींनी शिक्षण घेतले तरी त्या लग्न करुन सासरी जातात त्यामुळे त्यांच्या शिक्षणावर खर्च करुन काहीच फायदा कुटुंबाला होत नाही असे पालकांना वाटते. तसेच ४ टक्के पालकांच्या मते मुलींनी शाळा शिकण्यापेक्षा घरकाम चांगल्या पध्दतीने शिकावे. कारण सासरी गेल्यानंतर हेच काम त्यांना करायचे असते. तसेच मुलींचा घरकामात हातभार लागतो, मुली घरातील सर्व कामे करु लागतात, त्या शाळेत गेल्यास घरकामाचा प्रश्न निर्माण होतो त्यामुळे मुलींनी शाळा शिकणे महत्त्वाचे वाटत नाही असे १ टक्का पालकांनी म्हटले आहे. मुलींचे शिक्षण पालकांना महत्त्वाचे वाटते परंतु मुलींची स्वतःची शिकण्याची इच्छा नसल्याचे १ टक्का पालकांनी म्हटले आहे.

थोडक्यात ५७ टक्के पालकांचा कुटुंबातील मुलींच्या शिक्षणाबाबतचा दृष्टीकोन उदासिन व मागासलेला असल्याचे दिसून येते. म्हणजेच मुलींचे लवकर लग्न करणे, मुलींनी घरकाम चांगले शिकावे कारण सासरी गेल्यावर घरकामात त्यांना अडचण येऊ नये. तसेच मुली लग्न करुन दुसऱ्यांच्याच घरी जाणार, त्यामुळे मुलींच्या शिक्षणावर खर्च कशासाठी करायचा अशी विचारसरणी असणारे पालक अधिक प्रमाणात असल्याचे दिसून येते.

अशाच प्रकारचा मुलींच्या शिक्षणाबाबचा दृष्टीकोन २०१३-१४ मध्ये वीटभट्टीवरील पालकांचा असल्याचे CHD, YASHADA यांच्या अहवालवरुन दिसून येते. थोडक्यात परंपरागत विचारसरणीचा पगडा अद्यापही पालकांवर असून मुलींच्या शिक्षणाकडे पालक दुर्लक्ष करत असल्याचेच दिसून येते.

**४.५.११ सद्यस्थितीत बालकांच्या शिक्षणासाठी उपलब्ध शासकीय सुविधा** :

वीटभट्टीवरील कामगार कुटुंबातील बालकांना सद्यस्थितीत शिक्षणाच्या बाबतीत कोणत्या शासकीय सुविधांचा लाभ मिळालेला आहे. याचा सविस्तर तपशील पुढील सारणीमध्ये देण्यात आला आहे.

**सारणी क्र. ४.१५**

**बालकांना प्राप्त झालेल्या शैक्षणिक सुविधा**

| अ. क्र. | शैक्षणिक सुविधा | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | शाळेत मोफत गणवेश, शालेय साहित्य, पोषक आहार इ. सुविधा उपलब्ध होत आहेत | २८ | १७% |
| २ | ३ ते ६ वयोगटातील बालकांना अंगणवाडीतून अनौपचारिक शिक्षणाचा लाभ मिळत आहे | ८ | ५% |
| ३ | कोणत्याही शासकीय सुविधांचा लाभ मिळत नाही/मिळालेला नाही | १२५ | ७८% |
| **एकूण** | | **१६१** | **१००%** |

सारणी क्र. ४.१५ वरुन असे स्पष्ट होते की, शाळेत जात असलेल्या केवळ १७ टक्के बालकांना मोफत गणवेश, शालेय साहित्य, पोषक आहार इ. सुविधा मिळाल्या आहेत. जी बालके अंगणवाडीत जात आहेत अशा ५ टक्के बालकांना अंगणवाडीतून अनौपचारिक शिक्षणाचा लाभ मिळत आहे. उर्वरित ७८ टक्के पालकांच्या मते बालकांच्या शिक्षण संदर्भात कोणत्याही शासकीय योजनांचा लाभ मिळालेला नाही. एकूणच वीटभट्टीवरील कामगार कुटुंबातील शाळेत जाणाऱ्या बालकांचे प्रमाण अत्यल्प असल्याने या बालकांना शाळेमध्ये उपलब्ध शासनाच्या कोणत्याच सुविधांचा लाभ मिळत नसल्याचे दिसून येते. तसेच वीटभट्टीवरील बालकांसाठी प्रामुख्याने वीटभट्टीवरतीच किंवा वीटभट्टीच्या जवळील परिसरात बालकांच्या शिक्षणासाठी औपचारिक/अनौपचारिक/ व्यावसायिक अशा कोणत्याही स्वरुपाची शैक्षणिक सुविधा शासनाकडून उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही.

CHD, YASHADA यांच्या २०१३-१४ मधील वीटभट्टीच्या सर्वेक्षणातुनही असेच स्पष्ट होते की, वीटभट्टीवरील फारच कमी बालकांना शासकीय सुविधांचा लाभ मिळालेला आहे. NCPCR, GOI च्या अहवालानुसारही इतर विद्यार्थ्यांच्या तुलनेत वीटभट्टी व्यवसायातील बालके म्हणजेच हंगामी स्थलांतरीत बालकांना सर्व शासकीय

सुविधांचा पुरेशा प्रमाणात लाभ मिळत नाही. तसेच महाराष्ट्रामध्ये वीटभट्टी व्यवसायातील बालकांच्या शिक्षणाच्या दृष्टीने विशेष अशा कोणत्याही शासकीय योजना राबविल्या जात नाहीत. शासकीय व अशासकीय पातळीवर इतर कोणतेच विशेष प्रयत्न केले जात नसल्याचे सदर अहवालामध्ये म्हटले आहे. त्याचप्रमाणे सद्यस्थितीत कराड तालुक्यातही वीटभट्टीवरील बालकांच्या शिक्षणासाठी कोणतेच विशेष शासकीय प्रयत्न केलेले नसल्याचे दिसून येते.

### ४.५.१२ बालकांच्या शिक्षणासाठी आवश्यक सुविधांविषयी पालकांचे मत :

वीटभट्टी कामगार कुटुंबातील बालके शिक्षणाच्या बाबतीत मागासलेले असल्याचे दिसून येते. विविध अडचणींमुळे बालकांना शिक्षण घेता येत नाही. बालकांच्या शिक्षणाबाबत पालकच मोठ्या प्रमाणात उदासिन असल्याचे दिसून येते. त्यामुळे काय केल्यास वीटभट्टीवरील बालकांना शाळेत जाता येईल किंवा त्यांना शाळेत पाठविले जाईल, याबाबत पालकांचीच मते जाणून घेण्यात आली. याचा सविस्तर तपशील पुढील सारणीमध्ये दर्शविण्यात आला आहे.

**सारणी क्र. ४.१६**

**बालकांच्या शिक्षणासाठी आवश्यक असलेल्या सुविधांचा तपशील**

**(बहुपर्यायी प्रश्न)**

| अ. क्र. | बालकांच्या शिक्षणासाठी आवश्यक सुविधा | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | वीटभट्टीवरती औपचारिक व अनौपचारिक तसेच निवासी शिक्षणाची सोय असावी | ८२ | ४१% |
| २ | वीटभट्टीपासून शाळेचे अंतर जवळ असावे | ३८ | १९% |
| ३ | बालकांसाठी भविष्यकालीन रोजगारभिमुख व्यावसायिक शिक्षणाची सोय असावी | ५० | २५% |
| ४ | वीटभट्टीवरती पाळणाघर व अंगणवाडीची सुविधा असावी | ३ | २% |
| ५ | कन्नड भाषेत शिक्षण उपलब्ध असावे | २५ | १३% |
| **एकूण** | | **१९८** | **१००%** |

सारणी क्र. ४.१६ वरुन असे स्पष्ट होत की, बालकांना शिक्षण घेता यावे याकरीता आवश्यक सुविधांविषयी पालकांनी बहुपर्यायी मते नोंदविलेली आहेत. यानुसार सर्वाधिक ४१ टक्के पालकांनी बालकांसाठी वीटभट्टीवरतीच औपचारिक वा अनौपचारिक तसेच निवासी शिक्षणाची सोय असावी असे मत मांडले आहे. तसेच २५ टक्के पालकांनी भविष्यात बालकांना रोजगार उपलब्ध होईल अशा स्वरुपाचे व्यावसायिक शिक्षण मिळणे गरजेचे असल्याचे सांगितले आहे. वीटभट्टीपासून शाळेचे अंतर जवळ असावे असे मत १९ टक्के पालकांनी व्यक्त केले आहे. त्याचबरोबर वीटभट्टीवरील सर्वाधिक कुटुंबे ही कन्नड भाषिक असल्याने बालकांसाठी कन्नड भाषेत शिक्षण उपलब्ध व्हावे असे मत १३ टक्के पालकांनी मांडले आहे. तर २ टक्के पालकांच्या मते १ ते ६ वयोगटातील बालकांसाठी वीटभट्टीवरतीच पाळणाघर व अंगणवाडीची सुविधा असावी. या प्रकारच्या सर्व आवश्यक

सुविधा उपलब्ध असल्यास किंवा झाल्यास बालके शाळेत जाऊ लागतील असे पालकांचे म्हणणे आहे.

एकूणच वीटभट्टी व्यवसायातील बालकांची शैक्षणिक स्थिती पाहता असे लक्षात येते की, मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण अधिनियमानुसार ६ ते १४ वयोगटातील बालकांनी इयत्ता ८वी पर्यंतचे प्राथमिक शिक्षण घेणे महत्त्वपूर्ण आहे. मात्र विविध कारणांमुळे वीटभट्टी व्यवसायातील बालकांमध्ये शाळेत जाणाऱ्या बालकांचे प्रमाण हे अत्यल्प आहे. तसेच या व्यवसायातील मुलींची शैक्षणिक स्थिती ही मुलांपेक्षा अधिक दयनीय असल्याचे दिसून येते. कायद्यान्वये बालकांनी शिक्षण घेणे म्हणजेच त्यांनी पुर्ण वेळ व नियमितपणे शाळेत बसणे आवश्यक आहे. मात्र वीटभट्टी व्यवसायातील जी बालके शाळेत जात आहेत त्यामध्ये सर्वाधिक बालके ही शाळा व काम असे दोन्ही करत असल्याचे दिसून येते. त्यामुळे पूर्ण वेळ व नियमितपणे शाळेत जाणाऱ्या बालकांचे प्रमाणही कमी आहे. तसेच बालकांना शिक्षणाच्या संदर्भात शासकीय सोई-सुविधांचा लाभ फार कमी प्रमाणात मिळत असल्याचे दिसून येत आहे.

### ४.६ वीटभट्टी व्यवसायातील बालकांची आरोग्य स्थिती :

व्यवसायानुरुप बालकांच्या आरोग्याला विविध प्रकारचे धोके निर्माण होतात. या संदर्भात अनेक दुय्यम साहित्यामधून माहिती मिळालेली आहे. त्यानुसार वीटभट्टी व्यवसायातील बालकांना कामाच्या स्वरुपानुसार आरोग्याच्या दृष्टीने कोणकोणते धोके असतात याचा अभ्यास करणे आवश्यक आहे. यानुसार वीटभट्टीवरील बालकांची आरोग्य स्थिती जाणून घेण्यासाठी पालकांशी चर्चा करण्यात आली होती. त्याचे सविस्तर विश्लेषण पुढीलप्रमाणे आहे.

#### ४.६.१ वीटभट्टी व्यवसायात बालकांना असणारे आरोग्य विषयक धोके :

वीटभट्टीवर बालके विविध प्रकारची कामे करतात. अशी कामे करताना बालकांच्या आरोग्याला विविध प्रकारचे धोके निर्माण होऊ शकतात. याबाबत पालकांशी केलेल्या चर्चेचा तपशील पुढील सारणीमध्ये दर्शविण्यात आला आहे.

**सारणी क्र. ४.१७**

**व्यवसायानुरुप बालकांना निर्माण होणारे आरोग्यसंबंधी धोके**

**(बहुपर्यायी प्रश्न)**

| अ. क्र. | बालकांना आरोग्य विषयक धोके | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | शारिरीक इजा | १०४ | १७% |
| २ | चक्कर, थकवा येणे तसेच सर्दी-खोकला, ताप इ. संसर्गजन्य आजार | १५६ | २५% |
| ३ | शारिरीक वाढ व उंची खुंटणे | ४३ | ७% |
| ४ | श्वसनाचा त्रास | ७८ | १२% |
| ५ | अंग व डोकेदुखी | ८२ | १३% |
| ६ | त्वचेचे आजार | ५० | ८% |
| ७ | मणका व पाठदुखीचा त्रास | ११० | १७% |
| ८ | आरोग्यसंबंधी काही धोके नाहीत | ६ | १% |
| **एकूण** | | **६२९** | **१००%** |

सारणी क्र. ४.१७ वरुन असे स्पष्ट होते की, वीटभट्टीचे काम करत असताना बालकांना आरोग्यविषयक अनेक धोके असतात हे पालकांनी दिलेल्या बहुपर्यायी मतांवरुन लक्षात येते. बालकांना सतत उन्हात काम केल्याने चक्कर येणे, थकवा येणे, तसेच थंडीत काम केल्याने सर्दी, खोकला, ताप इ. संसर्गजन्य आजार होत असल्याचे

सर्वाधिक २५ टक्के पालकांनी सांगितले आहे. या व्यवसायात बालकांना मणका तसेच पाठदुखीचा त्रास होत असल्याचे प्रमाणही जास्त असून ते १७ टक्के आहे. बालकांना शारिरीक इजा होणे जसे की, बालकांचे हात, पायाची बोटे, नखे तसेच इतर अवयवयांना इजा/जखमा होत असल्याचे १७ टक्के पालकांनी सांगितले आहे. अशा स्वरुपाचे आरोग्यसंबंधी धोके निर्माण होण्याचे प्रमाण अधिक असल्याचे दिसून येत आहे.

तसेच कामाच्या स्वरुपानुसार बालकांना अंग व डोकेदुखीचा त्रास होत असल्याचे मत १३ टक्के पालकांनी व्यक्त केले आहे. माती-वीटांच्या धुळीने, भट्टीच्या धुराने बालकांना श्वसनाचा त्रास होतो तसेच चिखलात किंवा मातीत काम केल्याने बालकांना त्वचेचे आजार होत असल्याचे अनुक्रमे १२ टक्के व ८ टक्के पालकांनी म्हटले आहे. तसेच ७ टक्के पालकांच्या मते या व्यवसायातील कामामुळे बालकांची शारिरीक वाढ तसेच शारिरीक उंची खुंटते. त्याचबरोबर वीटभट्टी व्यवसायात बालकांच्या आरोग्याला काहीच धोका नसल्याचे केवळ १ टक्का पालकांनी सांगितले आहे. थोडक्यात पालकांच्या बहुपर्यायी मतांनुसार असे लक्षात येते की, वीटभट्टी व्यवसायानुरुप बालकांना आरोग्य संबंधीत अनेक धोके असून त्यामध्ये संसर्गजन्य आजारांचा सर्वाधिक धोका संभवतो.

CHD, YASHADA, सन २०१३-१४ च्या संशोधन अहवालानुसारही वीटभट्टीवरील बालकांना हातपाय दुखणे, हाताचे मनगट दुखणे, सांधेदुखी, उन्हात काम केल्याने चक्कर येणे तसेच डोकेदुखीचा त्रास होणे यांसारखे आरोग्यसंबंधी धोके असल्याचे दिसून येते.

- **वीटभट्टी व्यवसायातील कामांच्या स्वरुपानुसार बालकांच्या आरोग्याला धोका निर्माण होत असतो. हे पुढील स्पष्टीकरणावरुन लक्षात येते** :

वीटभट्टी व्यवसायाचा कालावधी नोव्हेंबर ते एप्रिल/ मे असा असून हा व्यवसाय प्रामख्याने हिवाळा व उन्हाळा या दोन ऋतुमध्ये चालतो. तसेच वीटभट्टीवर कामाच्या गरजेनुसार दिवसा, रात्री, मध्यरात्री, पहाटे अशा कोणत्याही वेळेत काम केले जाते. त्यामुळे ऋतूमान व कामाची वेळ याचा बालकांच्या आरोग्यावर परिणाम होताना दिसून येतो. जसे की, हिवाळ्यातील कडक थंडीत बालके पहाटे, मध्यरात्री तसेच रात्री उठून कुटुंबासोबत कामे करतात. त्यामुळे हिवाळ्यामध्ये सर्दी, खोकला, ताप यासारख्या संसर्गजन्य आजारांना बालके बळी पडत असल्याचे प्रमाण जास्त आहे. तसेच

उन्हाळ्यातील कडक उन्हामध्ये काम करताना बालकांना चक्कर येणे, थकवा येणे, अंगदुखी, डोकेदुखी इ. आरोग्यसंबंधी तक्रारी मोठ्या प्रमाणात जाणवतात.

वीटभट्टीवरती बालके प्रामुख्याने चिख्खल कालविणे, वीटा थापणे, वीटा पलटी करणे, वीटा थापण्यासाठी जमीन सपाट करणे इ. कामे अधिक प्रमाणात करत असतात. अशी कामे करताना बालकांना अनेक प्रकारे शारिरीक इजाही होत असतात. जसे की, बालके पायाने चिख्खल तुडवितात. त्यामुळे सततचा चिख्खल व पाणी याच्या ओलाव्यामुळे बालकांच्या पायांच्या बोटांमध्ये जखमा होतात. या व्यवसायातील बालकांच्या हाता-पायांची नखे खुंटलेली असून त्यामध्ये माती साचलेली दिसून येते. वीटा थापून हाताला सुरकुत्या पडतात. वीटा थापण्याचा साचा लागून बालकांच्या हाताला इजा होते. तसेच काही बालके भट्टीसाठी वीटा वाहून नेतात व भट्टी पेटलेली असल्याने बालकांना भाजले जाते.

वीटभट्टीची सर्व कामे बालकांना सतत खाली वाकून किंवा बसूनच करावी लागतात. ही सर्व कामे बालके दररोज ६ ते ८ तास किंवा त्यापेक्षा जास्त तास करत असतात. त्यामुळे त्यांना पाठ व मणके दुखीचा त्रास होत असल्याचे दिसते. सततच्या मातीतील कामांमुळे बालके संसर्गजन्य आजारांना बळी पडतात. या व्यवसायातील बालकांना त्वचेचे आजारही होतात. वीटभट्टीवर एका ७ वर्षाच्या मुलांच्या अंगावर खुप खवले झालेले होते. अस्वच्छता, नियमितपणे अंघोळ न करणे यामुळे बालकांच्या शरीरावर मातीचे थर साचल्याचे प्रत्यक्ष निरीक्षणात दिसून आले आहे. बालकांचे केस विस्कटलेले, हाता-पायाची नखे वाढलेली व नखांमध्ये मातीचे थर साचलेले दिसत होते. त्यांची त्वचा नेहमी काळवंडलेली दिसते. थंडीत काम केल्याने बालकांच्या त्वचेवर खवले पडतात. त्यात साचलेली माती व ओलाव्याने खाज सुटून जखमा होतात. तसेच उन्हाळ्यांच्या दिवसात कडक उन्हात काम केल्याने त्यांची त्वचा भाजल्यासारखी दिसते. अशा प्रकारे या व्यवसायात बालकांना त्वचेच्या आजारांचा धोका संभवतो.

वीटभट्टी कामामुळे बालकांचे शारिरीक वजन कमी व उंची खुंटत असल्याचे काही पालकांनी सांगितले आहे. वीटभट्टीवरील बालके वय व शारिरीक क्षमतेच्या तुलनेत अधिक प्रमाणात कामे करतात. त्यातुलनेत पुरक व पोषण आहाराचा अभाव असल्याने वयानुसार बालकांचे वजन व उंची गरजेपेक्षा खूपच कमी राहत असल्याचे प्रत्यक्ष निरीक्षणातही दिसून आले आहे. भट्टीवर एक बालक १२ वर्षाचे होते परंतु त्याची उंची व

वजन ६ ते ७ वर्षाच्या मुलाइतके होते. तसेच त्याची बौध्दीक क्षमताही वयानुसार कमी होती. तसेच भट्टीवर काम करणाऱ्या मुलींची शारिरीक स्थिती पाहता त्या खूपच अशक्त, थकलेल्या, वयाच्या मानाने अधिक कष्ट करत असल्याचे निरीक्षणात दिसून येत होते.

वीटभट्टीवरील मातीची, वीटांची धुळ व भट्टीचा धूर यामुळे बालकांना श्वसनाचाही त्रास होताना दिसून येतो. तसेच काम करत असताना बालकांचा अपघात होणे, रक्तस्त्राव होणे इ. गंभीर स्वरुपाचे धोके या व्यवसायात असू शकतात असे एका पालकाने सांगितले आहे. याबाबत त्यांच्याशी केलेल्या चर्चेतून असे लक्षात आले की, एक मुलगा भट्टीवर वीटा वाहण्याचे काम करत असताना त्याला चक्कर आली व तो भट्टीवरुन जोरात खाली पडला. तेंव्हा गरम भट्टीमुळे त्याच्या हाताला भाजले, तसेच वरुन खाली पडल्याने डोक्याला मार लागला व रक्तस्त्रावही झाल्याचे त्यांनी सांगितले.

वीटभट्टीवरील बालकांच्या आरोग्यसंबंधी समस्यांचे नेमके स्वरुप खात्रीशीरपणे जाणून घेणे आवश्यक होते. यासाठी वीटभट्टी परिसरातील खाजगी दवाखाने व सरकारी दवाखान्यातील डॉक्टर्स यांच्याशी चर्चा करुन सविस्तर माहिती घेण्यात आली. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार वीटभट्टीवरील बालकांमध्ये अशक्तपणा, अंग, कंबर व डोकेदुखी, विषाणूजन्य ताप, सर्दी- खोकला, जुलाब व उलट्या, कुपोषण, श्वसनाचे आजार, पोटांचे विकार, इ. स्वरुपाचे आजारांचे प्रमाण अधिक असते. तसेच वीटभट्टीवरील बालकांचे लसीकरण वेळेवर न होणे, मासिक पाळीसंबंधी मुलींच्या अनेक तक्रारी असल्याचेही सांगण्यात आले.

तसेच वीटभट्टीवरील बालकांमध्ये स्वच्छतेचा अभाव असल्याचे वीटभट्टी परिसरातील अंगणवाडी सेविकांनी सांगितले आहे. त्यांच्या मते बालके सतत चिखलात काम करतात त्यामुळे ते अस्वच्छ असतात. त्यांच्या डोक्याला तेल नसते, ही बालके दररोज अंघोळ करत नाहीत. तसेच वीटभट्टीवर कुपोषित बालके आढळून येत नसली तरी कमी वजनाची बालके अधिक प्रमाणात आहेत. तसेच किशारेवयीन मुली अंगणवाडीत येत नसल्याने त्यांच्या आरोग्य विषयक तक्रारी वा समस्या समजू शकत नसल्याचे त्यांनी सांगितले आहे.

थोडक्यात वरील माहितीवरुन वीटभट्टी व्यवसायात कामाच्या स्वरुपानुसार बालकांच्या आरोग्य विषयक समस्या किंवा धोक्यांचे स्वरुप वेगळे व अधिक गंभीर असल्याचे स्पष्ट होते.

### ४.६.२ बालकांच्या आजारी पडण्याचे सर्वसामान्य प्रमाण :

वीटभट्टीवरील बालकांच्या आरोग्यसंबंधी विविध समस्या असतात. यानुसार कुटुंबातील बालकांच्या आजारी पडण्याचे प्रमाण कसे आहे किंवा एका महिन्यात बालके किती वेळा आजारी पडतात हे जाणून घेण्यात आले. याबाबतचा तपशील पुढील आलेख क्र. ४.१० मध्ये देण्यात आला आहे.

**आलेख क्र. ४.१०**

**बालकांच्या सर्वसाधारण आरोग्य स्थितीचा तपशील**




सोबतचा आलेख क्र. ४.१० वरुन असे स्पष्ट होते की, वीटभट्टी कामगार कुटुंबामध्ये महिन्यातून एकदाही आजारी न पडलेल्या बालकांचे प्रमाण सर्वात जास्त असून ते ५३ टक्के आहे. उर्वरित बालके ही महिन्यातून एकदा, दोनदा, तसेच तीन ते चार वेळा आजारी पडलेली असून यामध्ये सतत आजारी असणारीही बालके आहेत. आजारी पडलेल्या बालकांमध्ये महिन्यातून एकदा आजारी पडणारी ३४ टक्के बालके असून ती सर्वाधिक आहेत. महिन्यातून दोनदा आजारी पडणारी ९ टक्के बालके असून एका महिन्यात तीन ते चार वेळा आजारी पडलेली १ टक्का बालके आहेत की जी सर्वात कमी आहेत. तसेच नेहमीच आजारी असणारी ३ टक्के बालके आहेत.

वीटभट्टी कामगार कुटुंबात एका महिन्यात आजारी न पडलेली बालके ५३ टक्के दिसत असली तरी तुलनेने महिन्याभरात आजारी पडलेल्या बालकांचे प्रमाणही जास्त असून ते ४७ टक्के आहे. म्हणजेच कामगार कुटुंबातील बालकांच्या आजारी पडण्याचे प्रमाणही अधिक असल्याचे दिसून येते.

### ४.६.३ बालकांच्या आजाराचे स्वरुप :

वीटभट्टी कामगार कुटुंबात महिन्यातून एकदा व महिन्यातून ३ ते ४ वेळा आजारी पडलेली बालके आहेत. या बालकांच्या आजारपणाचे नेमके स्वरुप कोणते होते हे पालकांकडून जाणून घेण्यात आले. एकूण १६१ कुटुंबापैकी ७५ कुटुंबातील बालके आजारी पडलेली होती. म्हणून ७५ कुटुंबातील बालकांच्या पालकांशी केलल्या चर्चेचा सविस्तर तपशील पुढील सारणीमध्ये दर्शविण्यात आला आहे.

**सारणी क्र. ४.१८**

**बालकांच्या आजाराचे स्वरुप**

**(बहुपर्यायी प्रश्न)**

| अ. क्र. | बालकांच्या आजाराचे स्वरुप | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | थकवा | १३ | ९% |
| २ | चक्कर येणे | १४ | १०% |
| ३ | सर्दी, खोकला, ताप | ४६ | ३४% |
| ४ | जुलाब | २५ | १८% |
| ५ | उलट्या | १२ | ९% |
| ६ | अंगदुखी व डोकेदुखी | २७ | २०% |
| **एकूण** | | **१३७** | **१००%** |

सारणी क्र. ४.१८ वरुन असे स्पष्ट होते की, बालकांच्या आजाराचे स्वरुप सांगताना पालकांनी बहुपर्यायी मते मांडलेली आहेत. मागील एका महिन्याभरात बालकांना विविध प्रकारचे आजार झाले असल्याचे दिसून येते. यामध्ये सर्वाधिक ३४ टक्के बालके ही सर्दी, खोकला व तापाने आजारी पडल्याचे दिसून येते. तसेच बालकांना थकवा येणे व उलट्या होण्याचे प्रमाण सर्वात कमी असून ते अनुक्रमे ९-९ टक्के आहे. त्याचबरोबर अंगदुखी व डोकेदुखीचा त्रास झालेली २० टक्के बालके आहेत. जुलाबाचा त्रास झालेली १८ टक्के बालके असून चक्कर आलेली १० टक्के बालके आहेत.

याबाबत पालकांनी दिलेल्या बहुपर्यायी मतांवरुन असे लक्षात येते की, बालकांच्या आजाराचे स्वरुप हे प्रामुख्याने थकवा येणे, चक्कर येणे, जुलाब, उलट्या, अंगदुखी व डोकेदुखी तसेच सर्दी, खोकला व ताप या संसर्गजन्य आजाराची लागण होणे इ. प्रकारचे आहे. यामध्ये बालकांना सर्दी, खोकला व ताप यासारखे संसर्गजन्य आजार सर्वाधिक प्रमाणात होत आहेत.

एकूणच कामाच्या ठिकाणी किंवा काम करताना बालकांना शारिरीक दुखापती व कामातून उद्भवणाऱ्या इतर आजारांपासून संरक्षण मिळणे आवश्यक असून तो बालकांचा हक्क आहे. तसेच ही बाब बालकांची शारिरीक वाढ, विकास व निरोगी आरोग्याच्या दृष्टीने आवश्यक आहे. परंतु वीटभट्टी व्यवसायातील बालकांना काम करताना अनेक शारिरीक धोके निर्माण होतात. तसेच बालकांच्या आजारी पडण्याचे प्रमाणही अधिक असून त्यांच्या आजाराचे स्वरुप वीटभट्टी कामाच्या स्वरुपावर अवलंबून असल्याचे दिसून येते. तसेच व्यक्तिगत अस्वच्छता, वीटभट्टीवर कामाच्या ठिकाणची व राहत्या ठिकाणची अस्वच्छताही बालकांच्या आरोग्यसंबंधी समस्यांना कारणीभूत ठरत असल्याचे निरीक्षणात दिसून आले आहे.

### ४.६.४ बालकांच्या खेळण्याचे ठिकाण :

साधारणतः ५ ते १४ वय हे बालकांचे आनंदाने खेळण्याचे, बागडण्याचे असते. परंतु वीटभट्टी व्यवसायातील बालके या वयात काम करताना दिसून येतात. बालके ज्या ठिकाणी खेळतात त्याचा परिणाम त्यांच्या आरोग्यावर होत असतो म्हणून बालकांना खेळण्यासाठी स्वच्छ परिसर असणे आवश्यक आहे. यानुसार वीटभट्टीवरील बालकांना खेळण्यासाठी कोणती सुविधा उपलब्ध असते, बालके नेमकी कुठे खेळतात हे जाणून घेण्यात आले. याविषयी पालकांशी केलेल्या चर्चेचा तपशील पुढील सारणीमध्ये दर्शविण्यात आला आहे.

**सारणी क्र. ४.१९**

**बालकांच्या खेळण्याच्या ठिकाणाबाबत तपशील**

**(बहुपर्यायी प्रश्न)**

| अ. क्र. | बालकांच्या खेळण्याचे ठिकाण | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | वीटभट्टीवरील माती व चिखलात खेळतात | १४७ | ७५% |
| २ | आजुबाजूच्या परिसरात खेळण्यासाठी जातात | ३७ | १९% |
| ३ | घरामध्येच खेळतात | ९ | ५% |
| ४ | बालके खेळतच नाहीत | ३ | १% |
| **एकूण** | | **१९६** | **१००%** |

सारणी क्र. ४.१९ वरुन असे स्पष्ट होते की, वीटभट्टीवर काम करणाऱ्या बालकांना खेळण्यासाठी स्वतंत्र जागा व खेळण्यासाठी कोणतीही साधने उपलब्ध नाहीत. याबाबत पालकांनी बहुपर्यायी मते मांडलेली आहेत. सर्वाधिक ७५ टक्के पालकांच्या मते बालके वीटभट्टीवरील माती व चिखलात खेळतात. बालके वीटभट्टी जवळील आजुबाजूच्या परिसरात खेळण्यासाठी जात असल्याचे १९ टक्के पालकांनी म्हटले आहे. तसेच बालके घरामध्येच खेळत असल्याचे ५ टक्के पालकांनी व बालके खेळतच नाहीत असे १ टक्का पालकांनी म्हटले आहे.

पालकांशी केलेल्या चर्चेनुसार असे लक्षात येते की, बालके ही वीटभट्टीवर तसेच वीटभट्टी जवळील आजुबाजूच्या परिसरात खेळण्यासाठी जातात. वीटभट्टीवरती बालकांना खेळण्यासाठी कोणतीही स्वतंत्र सुविधा उपलब्ध नाही. प्रत्यक्ष निरीक्षणात वीटभट्टीवरती एक ६ व ३ वर्षाचे बालक मातीतून खेळून आलेले दिसले. त्या दोघांचेही अंग पुर्ण मातीने माखलेले होते व ते तशाच अवस्थेत वीटभट्टीवर दिवसभर वावरत होते.

म्हणजेच बालके मातीत/चिखलात खेळतात ही बाब बालकांच्या आरोग्याच्या दृष्टीने घातक असून यामुळे ते अनेक आजारांना बळी पडू शकतात. त्यांना त्वचेचे आजार, जंतुसंसर्ग होण्याचा धोका संभवतो. तसेच मातीत खेळल्यामुळे मुलांमध्ये अस्वच्छता मोठ्या प्रमाणात दिसून येते.

तसेच वीटभट्टीवरील प्रत्यक्ष निरीक्षणात असे दिसून आले की, सतत मातीतील काम व मातीतच खेळल्यामुळे बालकांचे संपूर्ण अंग हे मातीने माखलेले असते व त्यांच्या त्वचेवर खवले पडलेले दिसून येतात. तसेच अंघोळ न करणे, अस्वच्छ कपडे, काळवंडलेला रंग, हाता-पायांची खुंटलेली नखे व त्यात साचलेली माती इ. स्वरुपाची शारिरीक अस्वच्छता बालकांमध्ये अधिक प्रमाणात दिसून येते.

### ४.६.५ बालकांच्या विश्रांतीचा कालावधी :

मुख्यतः ५ ते १४ या वयात बालकांनी अधिक काळ व अधिक कष्टाची कामे केल्यास त्यांच्या शारिरीक, मानसिक व बौध्दीक वाढीवर विपरीत परिणाम होतो. त्यामुळे कामगार कायद्यान्वये १४ वर्षाखालील बालकांना ६ तासापेक्षा अधिक काळ काम करण्यास बंदी व काम करताना बालकांना १ तासाची विश्रांती देणे आवश्यक आहे. त्यानुसार वीटभट्टी कुटुंबातील ५ ते १४ वयोगटातील बालकांना किती वेळ विश्रांती मिळते याचा सविस्तर तपशील पुढील सारणीमध्ये देण्यात आला आहे.

**सारणी क्र. ४.२०**

**बालकांच्या विश्रांतीच्या कालावधीचा तपशील**

| अ. क्र. | बालकांच्या विश्रांतीचा कालावधी | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | १ तास विश्रांती मिळते | ४८ | ३० % |
| २ | २ तास विश्रांती मिळते | ७३ | ४५ % |
| ३ | २ तासापेक्षा जास्त | १३ | ८ % |
| ४ | बालकांना वाटेल तितका वेळ | १६ | १० % |
| ५ | बालकांना विश्रांती मिळत नाही | ११ | ७ % |
| **एकूण** | | **१६१** | **१००%** |

सारणी क्र. ४.२० वरुन असे स्पष्ट होते की, कामगार कुटुंबातील काम करणाऱ्या बालकांना कामाच्या दरम्यान विश्रांती मिळते. यामध्ये बालकांना २ तास विश्रांती मिळत असल्याचे सर्वाधिक ४५ टक्के पालकांनी सांगितले. बालकांना २ तासापेक्षा जास्त काळ विश्रांती मिळत असल्याचे ८ टक्के पालकांनी सांगितले. तसेच ३० टक्के पालकांच्या मते बालकांना कामाच्या दरम्यान १ तास विश्रांती मिळते. काम करताना बालके त्यांना वाटेल तेंव्हा व वाटेल तितक्या वेळ विश्रांती घेत असल्याचे १० टक्के पालकांनी म्हटले आहे. उर्वरित ७ टक्के पालकांच्या मते बालकांना विश्रांतीच मिळत नाही.

याबाबत पालकांशी केलेल्या चर्चेतून असे लक्षात येते की, प्रामुख्याने जी कामगार कुटुंबे सकाळ ते संध्याकाळ या कालावधीत भट्टीचे काम करतात अशा कुटुंबाना पर्यायाने बालकांना कामाच्या दरम्यान १ तासाची विश्रांती मिळते. तसेच जी कुटुंबे मध्यरात्री, रात्रीपासून, सकाळ व दुपारपर्यंत कामे करतात अशा कुटुंबाना व बालकांना दिवसातून २ तास किंवा त्यापेक्षा अधिक तास विश्रांती मिळत असल्याचे दिसून येते. बालकांच्या आरोग्य दृष्टीने २ तास किंवा त्यापेक्षा जास्त काळ विश्रांती मिळणे ही चांगली बाब आहे.

### ४.६.६ बालकांना विश्रांती न मिळण्याची कारणे :

वीटभट्टीवर कामाच्या दरम्यान बालकांना २ तास विश्रांती मिळत असल्याचे प्रमाण सर्वाधिक असल्याचे दिसून येत आहे. असे असले तरीही प्रत्यक्षात बालकांना विश्रांती मिळत नसल्याचे पालकांनी म्हटले आहे. यामागील प्रमुख कारणे जाणून घेण्यात असून त्याची माहिती पुढील सारणीमध्ये देण्यात आली आहे.

**सारणी क्र. ४.२१**

**बालकांना विश्रांती न मिळण्याच्या कारणांचा तपशील**

| अ. क्र. | विश्रांती न मिळण्याची कारणे | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | वीटांचे लक्ष्य पुर्ण करावयाचे असते | ११ | ७% |
| २ | पहाटे, रात्री, मध्यरात्र उठून काम करावे लागते त्यामुळे खऱ्या अर्थाने विश्रांती मिळत नाही | ५२ | ३२% |
| ३ | विश्रांतीच्या वेळेत घरातील कामे करावी लागतात | २६ | १६% |
| ४ | काहीही मत न मांडलेले पालक | ७२ | ४५% |
| **एकूण** | | **१६१** | **१००%** |

सारणी क्र. ४.२१ वरुन असे स्पष्ट होते की, एकूण १६१ पालकांपैकी ८९ पालकांनी बालकांना खऱ्या अर्थाने विश्रांती मिळत नसल्याचे सांगितले आहे. वीटभट्टीवरील कामाच्या स्वरुपानुसार कुटुंबातील इतर सदस्यांप्रमाणेच बालकांना रात्री, मध्यरात्री, तसेच पहाटे उठून कामे करावी लागतात. त्यामुळे दिवसा बालकांना विश्रांती मिळत असली तरी प्रत्यक्षात त्यांना विश्रांती मिळत नसल्याचे सर्वाधिक ३२ टक्के पालकांनी सांगितले आहे. तसेच कामाच्या दरम्यान मिळणाऱ्या विश्रांतीच्या वेळेत घरातील सर्व कामे करावी लागतात त्यामुळे खऱ्या अर्थाने विश्रांती मिळत नसल्याचे १६ टक्के पालकांनी सांगितले आहे. कुटुंबाला दिलेले दिवसाचे वीटांचे लक्ष्य पूर्ण करावयाचे असते त्यामूळे विश्रांती मिळत नाही किंवा घेतली जात नाही असे ७ टक्के पालकांनी सांगितले. उर्वरित ४५ टक्के पालकांनी याबाबत काहीही मत मांडलेले नाही.

पालकांशी केलेल्या चर्चेतून असे स्पष्ट होते की, वीटभट्टी कामाचे स्वरुप व कामाचे लक्ष्य पुर्ण करण्यासाठी केंव्हाही व कोणत्याही वेळेत कामे करावी लागतात. त्यानुसार कुटुंबातील सदस्य रात्री, मध्यरात्री तसेच पहाटे उठून कामे करतात व पुन्हा दिवसभरही कामे करतात. या कालावधीत कुटुंबातील बालकेही मोठ्या सदस्यांप्रमाणे तेवढ्याच ताकदीची व तेवढ्याच वेळेची कामे करतात. तसेच कामाच्या दरम्यान दिवसा

विश्रांती मिळत असली तरी त्यावेळेत घरातील कामे पुर्ण करावी लागतात. त्यामुळे खऱ्या अर्थाने मिळणाऱ्या विश्रांतीचा कालावधी हा अत्यंत कमी असतो किंवा विश्रांती घ्यायला वेळच मिळत नाही असे पालकांचे म्हणणे आहे.

यामध्ये मुली वीटभट्टीच्या कामाबरोबर घरातील कामेही करु लागतात त्यामुळे प्रामुख्याने मुलींना विश्रांती मिळत नसल्याचेही पालकांनी सांगितले. तसेच जी बालके शाळा व काम असे दोन्ही करतात त्यांना दिवसा विश्रांती घेताच येत नाही. त्यामुळे पालकांच्या मते कामातून विश्रांती मिळत असली तरी खऱ्या अर्थाने ती विश्रांती नसते. एकूणच अपुऱ्या विश्रांतीमुळेही बालकांच्या आरोग्यावर विपरित परिणाम होऊ शकतो किंवा होत असतो.

**४.६.७ बालकांची आरोग्य तपासणी (वजन, उंची व रक्त तपासणी) :**

वीटभट्टी व्यवसायातील बालकांच्या कामांचे स्वरुप व त्यांची आरोग्य स्थिती पाहता या बालकांची नियमितपणे आरोग्य तपासणी होणे आवश्यक आहे. जसे की, बालकांचे वजन, उंची व रक्त तपासणी इ. यानुसार बालकांची नियमितपणे आरोग्य तपासणी होते की नाही याबाबत पालकांशी चर्चा करण्यात आली. याबाबतचा तपशील पुढील आलेख क्र. ४.११ मध्ये दर्शविण्यात आला आहे.

**आलेख क्र. ४.११**

**बालकांच्या आरोग्य तपासणीचा तपशील**




आलेख क्र. ४.११ वरुन असे स्पष्ट होते की, वीटभट्टी व्यवसायातील बालकांची नियमितपणे आरोग्य तपासणी होत नाही. यामध्ये सर्वाधिक ९९ टक्के बालकांची नियमित आरोग्य तपासणी होत नसल्याचे दिसून येत आहे. तर केवळ १ टक्का बालकांची नियमित तपासणी होत असल्याचे दिसून येत असून हे प्रमाण अत्यंत कमी आहे. यावरुन वीटभट्टीवरील पालक बालकांच्या आरोग्याबाबत जागरुक नसल्याचे दिसून येते.

### ४.६.८ बालकांची नियमित आरोग्य तपासणी न होण्याची कारणे :

वीटभट्टी व्यवसायातील बालकांची नियमितपणे आरोग्य तपासणी होत नसल्याचे दिसून येते. बालकांची नियमितपणे तपासणी न होण्याची कोणती कारणे आहेत हे पालकांकडून जाणून घेण्यात आले. त्याचा सविस्तर तपशील पुढील सारणीमध्ये दर्शविण्यात आला आहे.

**सारणी क्र. ४.२२**

**बालकांची आरोग्य तपासणी न होण्याची कारणे**

| अ. क्र. | आरोग्य तपासणी न होण्याची कारणे | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | कामामुळे वेळ मिळत नाही | ६ | ४% |
| २ | आरोग्य तपासणीची गरज वाटत नाही | ८७ | ५४% |
| ३ | गंभीर आजारासाठी दवाखान्यात नेले जाते | ६६ | ४१% |
| ४ | बालकांची नियमित तपासणी केली जाते | २ | १% |
| **एकूण** | | **१६१** | **१००%** |

सारणी क्र. ४.२२ वरुन असे स्पष्ट होते की, सर्वाधिक ५४ टक्के पालकांनी बालकांच्या नियमित आरोग्य तपासणीची गरज वाटत नसल्याचे सांगितले आहे. तसेच बालकांना गंभीर स्वरुपाच्या आजारपणात किंवा बालक जास्त आजारी असेल तरच दवाखान्यात नेण्यात येत असल्याचे ४१ टक्के पालकांनी सांगितले आहे. कामामुळे पुरेसा वेळ मिळत नसल्याने बालकांची तपासणी केली जात नसल्याचे ४ टक्के पालकांनी सांगितले आहे.

थोडक्यात वीटभट्टी व्यवसायातील बालकांची नियमितपणे आरोग्य तपासणी केली जात नाही. यामागे आरोग्य तपासणीबाबत पालकांची उदासिनता किंवा पालकांना त्याचे गांभीर्य नसणे हे प्रमख कारण कारणीभूत आहे.

### ४.६.९ वीटभट्टी कामगार कुटुंबातील दैंनदिन आहारातील घटक :

५ ते १४ या वयात शारिरीक वाढ व विकासाच्या दृष्टीने बालकांना पुरक व पोषण आहार मिळणे आवश्यक असते. वीटभट्टी व्यवसायात बालके दिवसभर काम करत असतात. त्यामुळे बालकांच्या आरोग्य दृष्टीने कामगार कुटुंबातील दैंनदिन आहारात कोणकोणत्या पौष्टीक घटकांचा समावेश असतो हे जाणून घेण्यात आले. याची सविस्तर माहिती पुढील आलेख क्र. ४.१२ मध्ये देण्यात आली आहे.

**आलेख क्र. ४.१२**

**बालकांच्या दैंनदिन आहारातील समाविष्ट घटक**

**(बहुपर्यायी प्रश्न)**




सोबतचा आलेख क्र. ४.१२ वरुन असे स्पष्ट होते की, वीटभट्टी कामगार कुटुंबातील दैंनदिन आहारातील समाविष्ट घटकांची माहिती देताना पालकांनी बहुपर्यायी मते मांडली आहेत. या कामगार कुटुंबातील दैंनदिन आहारामध्ये दुध, अंडी, मांसाहार, पालेभाज्या, कडधान्ये, डाळी, फळभाज्या, फळे इ. सर्वच पदार्थांचा समावेश असल्याचे सर्वाधिक ५६ टक्के पालकांनी सांगितले आहे. तसेच आहारामध्ये पालेभाज्या (८ टक्के), डाळी (८ टक्के) व दुध (८ टक्के) यांचा समावेश अधिक असल्याचे दिसून येते. मांसाहार, अंडी व कडधान्ये यांचाही समावेश असल्याचे अनुक्रमे ६ टक्के व ४ - ४ टक्के पालकांनी सांगितले आहे. तसेच आहारात सर्वात कमी प्रमाणात फळभाज्या (३ टक्के) व फळे (३ टक्के) या घटकांचा समावेश होत असल्याचे दिसून येते. थोडक्यात बालकांचे उत्तम आरोग्य व पोषक आहाराच्या दृष्टीने आवश्यक घटकांचा आहारात समावेश होत असल्याचे दिसून येते.

### ४.६.१० आहारातील पोषक घटकांची वारंवारिता :

कुटुंबातील दैनंदिन आहारामध्ये पुरक व पोषक पदार्थांचा समावेश होत असल्याचे दिसून येत असले तरी बालकांचे उत्तम आरोग्य, निकोप वाढीसाठी हा आहार नियमितपणे असणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रत्यक्ष आहारात या घटकांची वारंवारिता कशी असते हे जाणून घेणे महत्त्वाचे ठरते. याविषयी पालकांशी केलेल्या चर्चेचा तपशील पुढील सारणीमध्ये दर्शविण्यात आला आहे.

**सारणी क्र. ४.२३**

**आहारातील समाविष्ट पोषक घटकांची वारंवारिता**

| अ. क्र. | आहारातील घटकाची वारंवारिता | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | आठवड्यातून कधीतरी | ४६ | २९% |
| २ | पंधरा दिवसातून कधीतरी | २६ | १६% |
| ३ | महिन्यातून कधीतरी | ८ | ५% |
| ४ | दररोजच्या आहारात कोणत्या ना कोणत्या पौष्टीक पदार्थाचा समावेश असतो | ८ | ५% |
| ५ | नियमित नाही परंतु आहारात पोषक पदार्थाचा समावेश असतो | ७० | ४३% |
| ६ | नेमके सांगता येत नाही | ३ | २% |
| **एकूण** | | **१६१** | **१००%** |

सारणी क्र. ४.२३ वरुन असे स्पष्ट होते की, वीटभट्टी कामगार कुटुंबातील रोजच्या आहारात पोषक घटकांचा समावेश होत असला तरी तो नियमित नसतो असे सर्वाधिक ४३ टक्के पालकांनी सांगितल्याचे दिसून येते. तसेच आठवडी बाजाराच्या दिवशी बहुतांशी वीटभट्टी कामगार कुटुंबे घरातील बाजार भरतात. त्यामुळे बाजाराच्या दिवशी किंवा त्या आठवड्यात कधीतरी कुटुंबातील आहारात पोषक पदार्थांचा समावेश केला जातो असे २९ टक्के पालकांनी सांगितले. तसेच पंधरा दिवसातून कधीतरी पोषक पदार्थांचा आहारात समावेश होत असल्याचे १६ टक्के पालकांनी सांगितले. महिन्यातून कधीतरी आहारामध्ये पौष्टीक पदार्थांचा समावेश होत असल्याचे ५ टक्के पालकांनी सांगितले. तसेच दररोजच्या आहारात कोणत्या ना कोणत्या पौष्टीक पदार्थांचा समावेश होतो असे ५ टक्के पालकांनी सांगितले आहे. त्याचबरोबर आहारातील समाविष्ट पोषक पदार्थांविषयी नेमकी माहिती सांगता येत नसलेले २ टक्के पालक आहेत.

थोडक्यात कामगार कुटुंबातील आहारामध्ये नियमितपणे पोषक पदार्थांचा समावेश नसतो. आठवडयातून, पंधरा दिवसातून केंव्हातरी पौष्टीक घटकांचा आहारात समावेश होतो. याबाबत पालकांशी केलेल्या सविस्तर चर्चेतून असे लक्षात आले की, कुटुंबाच्या बिकट आर्थिक परिस्थितीमुळे पालक रोजच्या जीवनात दुध देखील खरेदी करु शकत नाहीत. त्यामुळे बालकांना दुध पिण्यासाठी मिळू शकत नाही. अंडी, मांसाहार इ. घटकही महागाईमुळे रोजच्या आहारात समाविष्ट केले जात नाहीत. फळे ही खुप कमी प्रमाणात आणली जातात असे दिसून आले.

तसेच बालकांच्या आरोग्य दृष्टीने आवश्यक पोषक पदार्थांचे महत्त्व किंवा बालकांसाठी पुरक व पोषक आहार काय असतो हे पालकांना माहिती नसल्याचे लक्षात आले. रोजच्या आहारात काय खाल्ले जाते याकडे ते फारसे लक्ष देताना दिसून येत नाहीत. कुटुंबातील एकूण सदस्यसंख्या, त्यात बालकांची संख्या ही जास्त असल्यास बालकांच्या पुरक व पोषण आहाराकडे स्वतंत्रपणे लक्ष दिले जात नसल्याचे दिसते. NCPCR, GOI च्या अहवालामध्येही वीटभट्टीवरील कामगार कुटुंबांच्या बिकट आर्थिक परिस्थितीमुळे पालक बालकांचा आहार व आरोग्य याची विशेष काळजी घेऊ शकत नाहीत असे दिसून आल्याचे म्हटले आहे.

**४.६.११ आरोग्यसंबंधी उपचाराची सुविधा :**

वीटभट्टी कामगार कुटुंबातील बालके आजारी असल्यास उपचारासाठी कुठे नेले जाते हे पालकांकडून जाणून घेण्यात आले. या बाबतचा सविस्तर तपशील पुढील आलेख क्र. ४.१३ मध्ये दर्शविण्यात आला आहे.

**आलेख क्र. ४.१३**

**आरोग्यसंबंधी उपचाराच्या सुविधेचा तपशील**




आलेख क्र. ४.१३ वरुन असे स्पष्ट होते की, वीटभट्टीवरील सर्वाधिक ९५ टक्के कामगार कुटुंबे आरोग्य संबंधीत उपचारासाठी खाजगी दवाखान्यात जातात. तसेच ३ टक्के कुटुंबे ही प्राथमिक आरोग्य केंद्र व २ टक्के कुटुंबे ही उपकेंद्रात जातात. म्हणजेच केवळ ५ टक्के कुटुंबे ही सरकारी दवाखान्यात जात असल्याचे दिसून येत आहे.

CHD, YASHADA, सन २०१३-१४ च्या अहवालावरुनही वीटभट्टीवरील बहुतांशी कामगार उपचारांसाठी खाजगी दवाखान्यातच जात असल्याचे दिसून येते. NCPCR, GOI च्या अहवालातही वीटभट्टी व्यवसायातील सर्वाधिक ३७ टक्के कुटुंबे ही खाजगी दवाखान्यात उपचारासाठी जात असल्याचे म्हटले आहे.

### ४.६.१२ उपचारासाठी सरकारी दवाखान्यात न जाण्याची कारणे :

बहुतांशी वीटभट्टी कामगार कुटुंबे आजारावरील उपचारासाठी खाजगी दवाखान्यात जातात. सरकारी दवाखान्यात जाणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण अत्यल्प आहे. त्यामुळे उपचारासाठी कामगार कुटुंबे सरकारी दवाखान्यात का जात नाहीत व तेथील उपलब्ध मोफत सुविधांचा लाभ का घेत नाहीत याविषयी पालकांशी चर्चा करण्यात आली. पालकांनी दिलेल्या मतांचा सविस्तर तपशील पुढील सारणीमध्ये देण्यात आला आहे.

**सारणी क्र. ४.२४**

**सरकारी दवाखान्यात न जाण्याच्या कारणांचा तपशील**

(**बहुपर्यायी प्रश्न**)

| अ. क्र. | सरकारी दवाखान्यात न जाण्याची कारणे | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | दवाखान्याचे अंतर खूप लांब आहे | २९ | १३% |
| २ | दवाखान्यात जास्त वेळ लागतो व कामामुळे तेवढा वेळ मिळत नाही | २८ | १२% |
| ३ | डॉक्टर व आरोग्य सेविकेंकडून योग्य तपासणी व औषधोपचार मिळत नाहीत | ३६ | १६% |
| ४ | दवाखान्यात व्यवस्थित वागणूक मिळत नाही | ६८ | ३०% |
| ५ | दवाखान्यातील औषधोपचाराचा गुण येत नाही | १७ | ८% |
| ६ | सरकारी दवाखाना कोठे आहे हेच माहिती नाही | ४८ | २१% |
| **एकूण** | | **२२६** | **१००%** |

सारणी क्र. ४.२४ वरुन असे स्पष्ट होते की, वीटभट्टीवरील कामगार कुटुंबे उपचारासाठी सरकारी दवाखान्यात जात नसल्याची बहुपर्यायी कारणे पालकांनी सांगितली आहेत. यामध्ये सर्वाधिक ३० टक्के पालकांच्या मते सरकारी दवाखान्यात डॉक्टर, आरोग्य सेविका तसेच इतर कर्मचाऱ्यांकडून व्यवस्थित वागणूक मिळत नाहीत. सरकारी दवाखान्यातील डॉक्टर व आरोग्य सेविका यांच्याकडून योग्य तपासणी व औषधोपचार मिळत नसल्याचे १६ टक्के पालकांनी म्हटले आहे. वीटभट्टीपासून सरकारी दवाखान्याचे अंतर खूप लांब असणे (१३ टक्के) तसेच सरकारी दवाखान्यात जास्त वेळ लागतो व कामामुळे तेवढा वेळ मिळत नाही (१२ टक्के) असे पालकांनी म्हटले आहे. सरकारी दवाखान्यातील औषधांचा गुणच येत नसल्याचे ८ टक्के पालकांनी म्हणणे असून २१ टक्के पालकांना सरकारी दवाखाना कुठे आहे हेच माहिती नाही.

थोडक्यात वरील स्पष्टीकरणावरुन असे लक्षात येते की, सरकारी दवाखान्या बाबत कामगार कुटुंबांचा नकारात्मक दृष्टीकोन आहे. म्हणूनच सर्वाधिक १४९ पालकांनी (६६ टक्के) सरकारी दवाखान्यातील डॉक्टर किंवा आरोग्य सेविकेंकडून योग्य तपासणी व औषधोपचार मिळत नाहीत, त्यांच्याकडून व्यवस्थित वागणूक मिळत नाही, दवाखान्यात उपचारासाठी खूप वेळ लागतो व सरकारी दवाखान्यातील औषधांचा गुण येत नसल्याचे म्हटले आहे.

NCPCR, GOI च्या अहवालातही सरकारी दवाखान्यात स्थलांतरीत कामगारांना व्यवस्थित वागणूक व उपचार मिळत नाही असे कामगार कुटुंबांनी म्हटल्याचे नमुद आहे. यावरुन वीटभट्टीवरील कामगारांना आरोग्यसंबंधी सर्व शासकीय सुविधांचा लाभ घेता यावा याकरीता त्यांना सरकारी दवाखान्यात योग्य वागणूक व उपचार मिळणे आवश्यक असल्याचे दिसून येते.

**४.६.१३ आरोग्यसंबंधीत शासकीय सुविधांचा लाभ :**

वीटभट्टीवरील कामगार कुटुंबातील बालके व इतर सदस्यांना आरोग्य विषयक कोणकोणत्या शासकीय सुविधांचा लाभ मिळाला आहे. याबाबतचा सविस्तर तपशील पुढील सारणीमध्ये दर्शविण्यात आला आहे.

**सारणी क्र. ४.२५**

**आरोग्यसंबंधी प्राप्त झालेल्या शासकीय सुविधांचा तपशील**

| अ. क्र. | उपलब्ध झालेल्या शासकीय सुविधा | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | ३ ते ६ वयोगटातील बालकांना अंगणवाडीत पुरक व पोषण आहार | ५ | ३% |
| २ | गंभीर स्वरुपाच्या आजारात सरकारी दवाखान्यात मोफत उपचार | १ | १% |
| ३ | कोणत्याही शासकीय सुविधांचा लाभ मिळालेला नाही | १३४ | ८३% |
| ४ | इतर | २१ | १३% |
| **एकूण** | | **१६१** | **१००%** |

सारणी क्र. ४.२५ वरुन असे स्पष्ट होते की, कामगार कुटुंबातील बालके व इतर सदस्यांना आरोग्यसंबंधी शासकीय सुविधा आवश्यक त्या प्रमाणात उपलब्ध होत नाहीत किंवा झालेल्या नाहीत असे सर्वाधिक ८३ टक्के पालकांनी सांगितले आहे. कुटुंबात ३ ते ६ वयोगटातील बालकांना अंगणवाडीतून पुरक व पोषण आहार मिळाल्याचे ३ टक्के पालकांनी सांगितले. गंभीर स्वरुपाच्या आजारात सरकारी दवाखान्यात मोफत उपचार मिळत असल्याचे केवळ १ टक्का पालकांनी सांगितले आहे. तसेच इतर बाबीमध्ये सरकारी दवाखान्यातून गरोदर व स्तनदा मातांची नियमित तपासणी, औषधोपचार व लसीकरण व ५ वर्षाखालील बालकांना पोलिओ डोस इ. मोफत सुविधा उपलब्ध झाल्याचे १३ टक्के पालकांनी सांगितले.

पालकांशी केलेल्या चर्चेतून असे लक्षात आले की, वीटभट्टी पासून सरकारी दवाखान्यांचे अंतर लांब आहे. तसेच सरकारी दवाखान्यात व्यवस्थित वागणूक व उपचार मिळत नाहीत म्हणून ते सरकारी दवाखान्यात जात नाहीत. ३ ते ६ वयोगटातील बालके अंगणवाडीत जात नसल्याने अंगणवाडीतून पुरक व पोषण आहार मिळत असलेली बालके खूप कमी आहेत. तसेच वीटभट्टीवरील गरोदर व स्तनदा मातांनाही आवश्यक शासकीय

सुविधा उपलब्ध होत नाहीत. केवळ कुटुंबातील ५ वर्षाखालील बालकांना पोलिओ डोस देण्यासाठी दवाखान्यातील सेविका वीटभट्टीवर येत असल्याचे पालकांनी सांगितले.

एकूणच वीटभट्टीवरील कामगार कुटुंबांना आरोग्यसंबंधी शासकीय सुविधांचे लाभ मिळण्याचे प्रमाण अत्यल्प आहे. कारण बहुतांशी वीटभट्टी कामगार कुटुंबे ही खाजगी दवाखान्यात जात असल्याने त्यांना शासकीय सुविधांचा लाभ मिळत नसल्याचेही दिसून येते. तसेच बहुतांशी कामगार कुटुंबातील सदस्यांना सरकारी दवाखाना व अंगणवाडीतून उपलब्ध होणाऱ्या सुविधांची माहितीच नाही.

सन २०१३-१४ मध्येही कामगार कुटुंबांची हीच स्थिती असल्याचे CHD, YASHADA यांच्या संशोधन अहवालावरुन दिसून येते. त्यावेळीही वीटभट्टीवरील सर्व ३ ते ६ वयोगटातील बालके, गरोदर व स्तनदा माता यांना शासकीय सुविधांचा लाभ मिळाला नसल्याचे दिसून येते. म्हणजेच त्यावेळीची स्थिती व सद्यस्थिती सारखीच असल्याचे दिसून येते. तसेच NCPCR, GOI च्या अहवालावरुन असे स्पष्ट होते की, ३ ते ६ वयोगटातील बालकांना अंगणवाडीतून सर्व सुविधांचा लाभ मिळत नाही. लहान बालकांचे लसीकरणही होत नसल्याचे दिसून आले आहे. तसेच या अहवालानुसार स्थलांतरीत कुटुंबामध्ये संस्थात्मक प्रसुतीचे प्रमाण अत्यल्प असून बहुतांशी महिलांची प्रसुती प्रशिक्षित व्यक्ती व साधनाशिवाय घरीच होते. यावरुन वीटभट्टीवरील कामगार कुटुंबातील पालकांचे आरोग्यासंबंधीचे अज्ञान लक्षात येते.

- **वीटभट्टी कामगार कुटुंबातील मुलींची आरोग्य स्थिती :**

वीटभट्टी व्यवसायातील कामगार कुटुंबातील बालकांच्या आरोग्य स्थिती विषयी यापुर्वी एकत्रित माहिती घेण्यात आलेली आहे. वीटभट्टी कामगार कुटुंबामध्ये मुलाप्रमाणे मुलींची संख्या सुध्दा जास्त आहे. तसेच मुलांच्या तुलनेत मुलींची आरोग्य स्थिती वेगळी असू शकते. मुली वीटभट्टीच्या कामांबरोबरच घरातील इतरही कामे करतात. त्यामुळे मुलांच्या तुलनेत कुटुंबातील मुलींना अधिक कामे करावी लागत असल्याचे दिसून येते. तसेच १४ वर्षाखालील मुलींमध्ये होणाऱ्या शारिरीक, मानसिक बदलानुसार मुलींची आरोग्य स्थिती ही वेगळी असते. त्यामुळे वीटभट्टीची कामे, घरातील कामे तसेच इतर जबाबदाऱ्या पार पाडत असताना मुलींच्या आरोग्य विषयक कोणत्या समस्या असतात याबाबत पालकांशी चर्चा करण्यात आली.

वीटभट्टी व्यवसायातील १६१ कामगार कुटुंबापैकी १०३ कुटुंबामध्ये मुली आहेत. केवळ याच कुटुंबातील पालकांकडून प्राथमिक माहिती घेण्यात आली. पालकांकडून प्राप्त माहितीचे विश्लेषण पुढील प्रमाणे आहे.

### ४.६.१४ मुलींच्या आरोग्य विषयक समस्या:

कुटुंबातील सदस्यांबरोबर कुटुंबातील मुलीही वीटभट्टीची कामे करतात. त्याचबरोबर मुली घरातील धुणी-भांडी करणे, पाणी भरणे, स्वयंपाक करणे, लहान भावंडांना संभाळणे इ. सर्व कामे करताना दिसून येतात. त्यामुळे ५ ते १४ या अतिशय लहान वयातील मुली वीटभट्टी व घरातील कामांची जबाबदारी पार पाडताना दिसून येतात. या कामांचा मुलींच्या आरोग्यावर नेमकी काय परिणाम होतो, मुलींना आरोग्य विषयक कोणत्या तक्रारी असतात याबाबत पालकांकडून माहिती घेण्यात आली. याचा सविस्तर तपशील पुढील आलेख क्र. ४.१४ मध्ये दर्शविण्यात आला आहे.

**आलेख क्र. ४.१४**

**मुलींच्या आरोग्यसंबंधी तक्रारींचा तपशील**




**(बहुपर्यायी प्रश्न)**

सोबतचा आलेख क्र. ४.१४ वरुन असे स्पष्ट होते की, याबाबत पालकांनी बहुपर्यायी मते मांडलेली

आहेत व पालकांच्या बहुपर्यायी मतांनुसार मुलींच्या आरोग्यविषयी अनेक तक्रारी असल्याचे दिसून येते. यात सर्वाधिक २५ टक्के पालकांच्या मते मुलींचे वजन न वाढणे व शारिरीक दृष्ट्या मुली कमकुवत असल्याचे दिसून येते. काम करताना मुलींना थकवा येणे, चक्कर येणे व अशक्तपणा जाणवणे इ. तक्रारी असल्याचे २३ टक्के पालकांनी सांगितले. तसेच मुलींना सतत अंगदुखी व डोकेदुखीचा त्रास होत असल्याचे २१ टक्के पालकांनी म्हटले आहे, तर १८ टक्के पालकांच्या मते मुली सतत संसर्गजन्य आजारांना बळी पडतात. मुलींमध्ये हिमोग्लोबिनची कमतरता असल्याचे ९ टक्के पालकांनी सांगितले आहे. तसेच मुलींना आरोग्यसंबंधी काहीही तक्रारी किंवा समस्या नसल्याचे ४ टक्के पालकांनी म्हटले आहे.

पालकांशी केलेली चर्चा तसेच वीटभट्टीवर केलेले प्रत्यक्ष निरीक्षण यावरुन असे लक्षात येते की, वीटभट्टींच्या कामाबरोबर घरातील सर्व कामे पार पाडताना मुलींना विविध आजारांना सामोरे जावे लागते. वीटभट्टीवरील काम करणाऱ्या मुली ह्या शारिरीक दृष्ट्या अतिशय कमकुवत असल्याचे प्रत्यक्ष निरीक्षणात दिसून आले. तसेच वयाच्या मानाने त्यांचे वजन व उंची अत्यंत कमी असल्याचे दिसून आले. याबाबत प्रत्यक्ष मुलींशी केलेल्या चर्चेत थकवा येणे, कंबर दुखी, अंगदुखी, डोकेदुखी यासारखे त्रास अधिक प्रमाणात होत असल्याचे मुलींनी सांगितले. तसेच जुलाब, सर्दी-खोकला इ. संसर्गजन्य आजारही होत असल्याचे मुलींनी सांगितले.

प्रत्यक्ष निरीक्षणात एका कुटुंबातील १३ वर्षाच्या मुलीला जुलाब व पोटदुखीचा त्रास होत असल्याचे दिसून आले. याबाबत मुलीच्या आईच्या म्हणण्याप्रमाणे वीटभट्टी कामाच्या कालावधीतच मुलीला हा त्रास होत आहे. तसेच पिण्यासाठी वापरण्यात येत असलेल्या बोअरवेलच्या पाण्यामुळे अधिक त्रास होत असल्याचे त्यांनी सांगितले. यावरुन मुलींना आरोग्यसंबंधी अनेक प्रकाराच्या समस्या असल्याचे दिसून येते.

**४.६.१५ वयात आलेल्या किंवा येणाऱ्या मुलींना मार्गदर्शन :**

वीटभट्टी कामगार कुटुंबातील ५ ते १४ वयोगटातील व त्यामध्ये प्रामुख्याने वयात येणाऱ्या मुलींना शारिरीक आरोग्य, स्वच्छता, व्यक्तिगत काळजी याविषयी मार्गदर्शन केले जाते का याबाबत पालकांकडून माहिती घेण्यात आली. याबाबतचा सविस्तर तपशील पुढील सारणीमध्ये दर्शविण्यात आले आहे.

**सारणी क्र. ४.२६**

**मुलींना मिळत असलेल्या मार्गदर्शनाचा तपशील**

| अ. क्र. | मुलींना मार्गदर्शन | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | पालकच (माता) मार्गदर्शन करतात | ७१ | ६९% |
| २ | मुलींना कोणीही मार्गदर्शन करत नाही | ७ | ७% |
| ३ | इतर | २५ | २४% |
| **एकूण** | | **१०३** | **१००%** |

सारणी क्र. ४.२६ वरुन असे स्पष्ट होते की, वीटभट्टी कामगार कुटुंबातील वयात आलेल्या मुलींना स्वतःची शारिरीक स्वच्छता व आरोग्य याची काळजी कशी घ्यावी याबाबत केवळ कुटुंबातूनच मार्गदर्शन मिळते. वयात आलेल्या सर्वाधिक ६९ टक्के मुलींना कुटुंबातील मुलींची आईच (पालक) मार्गदर्शन करते. तसेच मुलींना आरोग्यसंबंधी इतर कोणीही मार्गदर्शन करत नसून मुली स्वतःला जमेल तशी स्वतःची काळजी घेतात असे ७ टक्के पालकांनी सांगितले आहे. मुली अद्याप लहान आहेत व याबाबत काहीही मत न मांडणाऱ्या पालकांचा (२४ टक्के) इतर बाबींमध्ये समावेश होतो.

वयात येणाऱ्या मुलींना आरोग्य दृष्टीने योग्य वेळी मार्गदर्शन मिळणे गरजेचे असते. परंतु वीटभट्टी कामगार कुटुंबातील पालकांशी चर्चा केल्यानंतर असे लक्षात आले की, वीटभट्टीवर काम करणाऱ्या व वयात आलेल्या मुलींना कुटुंबातील आई व्यतिरिक्त इतर कोणाकडूनही मार्गदर्शन मिळत नाही. तसेच मुलींच्या आई त्यांना स्वतःला जेवढी माहिती असते तेवढेच मुलींना सांगत असतात. याबाबतीत मुळात पालकच अज्ञानी असल्याचे दिसून येते व या अज्ञानातून मुलींना मार्गदर्शन केले जात आहे हे प्रत्यक्ष निरीक्षणातही दिसून आले. जसे की, वयात येताना मुलींमध्ये होणारे शारिरीक बदल व त्यामुळे मुलींच्या आरोग्यावर होणारे परिणाम इ. बाबत पालकांचेच अज्ञान असल्याने याविषयी मुलींनाही काहीच मार्गदर्शन केले जात नाही. तसेच प्रत्यक्ष निरीक्षणातही दैंनदिन जीवनात मुलींचे राहणीमान अतिशय गलिच्छ व अस्वच्छ असल्याचे दिसून आले.

**४.६.१६ मुलींची नियमित आरोग्य तपासणी (वजन, उंची व रक्त तपासणी) :**

लहान वयातच वीटभट्टीची तसेच घरातील कामे पार पाडताना मुलींना अनेक आरोग्य विषयक समस्यांना सामोरे जावे लागते. दैंनदिन जीवनात मुलींचे वजन, उंची व रक्त तपासणी इ. तपासण्या नियमितपणे होणे आवश्यक असते. त्यानुसार वीटभट्टीवरील ५ ते १४ वयोगटातील मुलींच्या तपासण्या केल्या जातात कि नाही याची पालकांकडून माहिती घेण्यात आली. त्याचा सविस्तर तपशील पुढील आलेख क्र. ४.१५ मध्ये दर्शविण्यात आला आहे.

**आलेख क्र. ४.१५**

**मुलींच्या नियमित आरोग्य तपासणींचा तपशील**




सोबतचा आलेख क्र. ४.१५ वरुन असे स्पष्ट होते की, ५ ते १४ वयोगटातील मुलींचे वजन, उंची व रक्त इ. आरोग्य दृष्टीने आवश्यक नियमित तपासण्या होत नसल्याचे सर्वाधिक ९४ टक्के पालकांच्या मतावरुन स्पष्ट होते. केवळ ६ टक्के पालकांनी मुलींच्या नियमितपणे तपासण्या करत असल्याचे सांगितले.

मुलींची नियमितपणे आरोग्य तपासणी करत असल्याचे ज्या पालकांनी सांगितले अशा पालकांना मुलींची तपासणी कधी केली होती हे विचारण्यात आले. तेंव्हा ६ पालकांपैकी ३ पालकांनी ६ महिन्यापुर्वी व उर्वरित ३ पालकांनी खूप दिवसांपूर्वी तपासणी केल्याने नेमके आठवत नसल्याचे सांगितले. म्हणजेच मुलींची आरोग्य तपासणी नियमितपणे होते असे पालकांनी म्हटले असले तरी प्रत्यक्षात मात्र ती होत नसल्याचेच दिसून येते.

• **मासिक चक्रावेळेची मुलींची आरोग्य स्थिती** :

मासिक चक्राच्या वेळी मुलींना आरोग्यसंबंधी विशेष काळजी व विश्रांतीची गरज असते. या काळात मुलींच्या आरोग्य विषयक अनेक तक्रारी असू शकतात. त्यामुळे मासिक चक्रावेळी मुलींची आरोग्य स्थिती  जाणून घेणेही आवश्यक आहे. त्यानुसार मुली असलेल्या १०३ कुटुंबातील पालकांकडून मुलींच्या मासिक चक्राविषयी माहिती घेण्यात आली.

**४.६.१७ मासिक चक्राबाबत मुलींची संख्यात्मक माहिती** :

मासिक चक्रावेळेची मुलींची आरोग्य स्थिती जाणून घेण्याकरीता किती मुलींना मासिक चक्र सुरु आहे हे जाणून घेणे आवश्यक होते. याबाबत पालकांकडून प्राप्त झालेल्या माहितीचा तपशील पुढील आलेख क्र. ४.१६ मध्ये दर्शविण्यात आला आहे.

**आलेख क्र. ४.१६**

**मासिक चक्राविषयी मुलींचा संख्यात्मक तपशील**




सोबतचा आलेख क्र. ४.१६ वरुन असे स्पष्ट होते की, मुली असलेल्या १०३ कुटुंबामध्ये ५ ते १४ वयोगटातील एकूण १३५ मुली आहेत. त्यापैकी ५७ (४२ टक्के) मुलींचे मासिक चक्र सुरु असून उर्वरित ७८ (५८ टक्के) मुलींचे मासिक चक्र अद्याप सुरु झालेले नाही. वीटभट्टी कामगार कुटुंबातील बहुतांशी मुलींना वयाच्या १० व्या वर्षापासून मासिक चक्र सुरु झालेले आहे. या मुली ५ ते ६ वर्षाच्या असल्यापासून कुटुंबातील इतर सदस्यांच्या बरोबरीने खुप लहान वयात कष्टाची कामे करतात. त्यामुळे त्यांचे मासिक चक्र लवकर सुरु होत असल्याचे दिसून येते.

**४.६.१८ मासिक चक्रावेळी वापरवयाची साधने :**

मासिक चक्राच्या वेळी मुली कपडा, सॅनेटरी नॅपकीन अथवा पॅडस् यापैकी कोणत्या साधनाचा वापर करतात हे जाणून घेणे आवश्यक आहे. याबाबत मासिक चक्र सुरु असलेल्या ५१ कुटुंबातील पालकांशी (आई) चर्चा करण्यात आली होती. प्राप्त माहितीचा तपशील पुढील आलेख क्र. ४.१७ मध्ये देण्यात आला आहे.

**आलेख क्र. ४.१७**

**मासिक चक्रावेळी वापरण्यात येणारी साधने**




आलेख क्र. ४.१७ वरुन असे स्पष्ट होते की, सर्वाधिक (३७ पालक) मुली मासिक चक्राच्या वेळी कपड्याचा वापर करत असल्याचे दिसून आले, तर सॅनेटरी नॅपकीन अथवा पॅडस् वापरत असलेल्या मुली कमी (१२ पालक) आहेत. मासिक चक्राच्या दरम्यान केवळ कपडाच वापरला जातो तसेच सॅनेटरी नॅपकीन अथवा पॅडस् याविषयी काहीच माहिती नसल्याचे २ पालकांनी सांगितले आहे. एकूणच वीटभट्टी व्यवसायातील मासिक चक्र सुरु असलेल्या सर्वाधिक मुली अद्यापही कपड्याचा वापर करत असल्याचे दिसून येते.

**४.६.१९ मासिक चक्रावेळेची शारिरीक स्वच्छता :**

मासिक चक्रावेळी मुली कपडा, सॅनेटरी नॅपकीन अथवा पॅडस् यापैकी कोणत्या साधनाचा वापर करतात व त्याबाबतीत स्वच्छता कशी राखतात हे आरोग्य दृष्टीने महत्त्वाचे असते. मासिक चक्रावेळी स्वच्छतेबाबत वीटभट्टीवरील मुलीं कशी काळजी घेतात, त्या स्वच्छता पाळतात किंवा नाही हे पालकांकडून जाणून घेण्यात आले. त्याचा तपशील पुढील सारणीमध्ये दर्शविण्यात आला आहे.

**सारणी क्र. ४.२७**

**मासिक चक्रावेळीच्या स्वच्छतेबाबतचा तपशील**

| अ. क्र. | मासिक चक्रावेळची स्वच्छता | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | दिवसातून ३-४ वेळा कपडा/ नॅपकीन बदलण्यात येते | १५ | १५% |
| २ | सकाळी एकदाच कपडा / नॅपकीन बदलण्यात येते | ३२ | ३१% |
| ३ | इतर (दिवसातून २ वेळा तसेच गरज वाटेल तेंव्हा कपडा/नॅपकीन बदलण्यात येते) | ४ | ४% |
| ४ | कुटुंबातील मुलींचे मासिक चक्र सुरु झाले नाही | ५२ | ५०% |
| **एकूण** | | **१०३** | **१००%** |

सारणी क्र. ४.२७ वरुन असे स्पष्ट होते की, मासिक चक्रावेळी मुलींकडून आवश्यक त्या स्वच्छता पाळल्या जात नाहीत. मासिक चक्रावेळी आरोग्यसंबंधी काळजी घेताना स्वच्छतेच्या दृष्टीने कपडा, नॅपकीन अथवा पॅडस् विशिष्ट कालावधीनंतर बदलणे आवश्यक असते. प्रत्यक्षात केवळ १५ टक्के मुली दिवसातून ३ ते ४ वेळा कपडा/नॅपकीन अथवा पॅडस् बदलत असल्याचे दिसून येते. सर्वाधिक ३१ टक्के मुली दिवसातून केवळ एकच वेळा कपडा/नॅपकीन अथवा पॅडस् बदलत असल्याचे दिसून येते. दिवसातून २ वेळा व गरज वाटल्यास कपडा/नॅपकीन अथवा पॅडस् बदलणाऱ्या केवळ ४ टक्के मुली आहेत.

याबाबत मुली तसेच पालकांशी केलेल्या चर्चेतून असे दिसून येते की, मासिक चक्रावेळी घ्यावयाच्या काळजी, स्वच्छता इ. बाबत मुलींना कुटुंबाव्यतिरिक्त इतर कोणाकडूनही मार्गदर्शन मिळत नाही. जसे की, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर, शाळेतील शिक्षिका इ. तसेच मासिक चक्रावेळी आरोग्यविषयक स्वच्छता पाळली पाहिजे याची जाणीवही बहुतांशी मुलींना नसल्याचे दिसून आले. दिवसभर काम करावे लागते,

कामाचे लक्ष्य पुर्ण करावयाचे असते त्यामुळे आवश्यक स्वच्छतेकडे लक्ष देण्यास वेळ मिळत नसल्याचेही काही मुलींनी सांगितले. थोडक्यात वीटभट्टी व्यवसायात काम करणाऱ्या मुलींना मासिक चक्रादरम्यानची शारिरीक स्वच्छता तसेच स्वतःच्या आरोग्याची घ्यावयाची काळजी इ. बाबीविषयी मार्गदर्शन मिळणे हे अत्यंत आवश्यक आहे.

### ४.६.२० मुलींच्या मासिक चक्रासंबंधीत तक्रारी :

कामगार कुटुंबातील मुलींना लहान वयात शारिरीक क्षमतेपेक्षा अधिक प्रमाणात वीटभट्टीची व घरातील कामे करावी लागतात. ही सर्व कामे करत असताना मासिक चक्राच्या वेळी मुलींची आरोग्य स्थिती कशी असते हे जाणून घेणे महत्त्वपूर्ण ठरते. याविषयी मुलींच्या पालकांकडून (आई) माहिती घेण्यात आली. मुलींना मासिक चक्रासंबंधी कोणत्या तक्रारी असतात याचा तपशील पुढील सारणीमध्ये दर्शविण्यात आला आहे.

**सारणी क्र. ४.२८**

**मुलींच्या मासिक चक्रासंबंधीत तक्रारींचा तपशील**

**(बहुपर्यायी प्रश्न)**

| अ. क्र. | मासिक चक्रासंबंधी मुलींच्या तक्रारी | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | पोट दुखणे | ३७ | ३०% |
| २ | अधिक प्रमाणात कंबर दुखणे | ३९ | ३१% |
| ३ | उलट्या होणे | ५ | ४% |
| ४ | अंगदुखी तसेच थकवा येणे | १८ | १५% |
| ५ | कमी वा अधिक रक्तस्त्राव | १७ | १४% |
| ६ | काहीही त्रास होत नाही | ८ | ६% |
| **एकूण** | | **१२४** | **१००%** |

सारणी क्र. ४.२८ वरुन असे स्पष्ट होते की, मुलींच्या मासिक चक्राशी संबंधित तक्रारीविषयी पालकांनी बहुपर्यायी मते मांडलेली आहेत. त्यानुसार मासिक चक्रावेळी मुलींना आरोग्य विषयक विविध तक्रारी असल्याचे दिसून येते. सामान्यतः मासिक चक्रावेळी मुलींना पोट दुखणे, कंबर दुखणे, उलट्या होणे, अंगदुखी तसेच थकवा जाणवणे, कमी किंवा अधिक रक्तस्त्राव होणे इ. स्वरुपाचे त्रास होत असल्याचे दिसून येते. यामध्ये मुलींना सर्वाधिक (३२ टक्के पालक) त्रास कंबर दुखीचा होत असल्याचे दिसून येते. त्याचबरोबर मुलींना पोट दुखणे (३० टक्के पालक), अंगदुखी तसेच थकवा येणे (१५ टक्के पालक) इ. त्रास होत असल्याचे दिसून येते. मासिक चक्रावेळी मुलींना कमी किंवा अधिक रक्तस्त्राव होत असल्याचे १४ टक्के पालकांनी सांगितले असून उलट्या होणे (४ टक्के पालक) यासारख्या तक्रारी असल्याचे दिसून येते. तर मुलींना मासिक चक्रावेळी काहीच त्रास होत नसल्याचे ६ टक्के पालकांनी सांगितले आहे.

याबाबत मुलींशी केलेल्या चर्चेतून असे लक्षात आले की, सर्वसामान्य मुलींपेक्षा या मुलींना होणाऱ्या त्रासाचे स्वरुप हे अधिक तीव्र असते व लहान वयामुळे त्याची तीव्रता अधिक जाणवत असल्याचे दिसून येते. वीटभट्टीवर मुली खाली वाकून वा बसून वीटा थापणे, वीटा भरणे तसेच वीटा वाहणे यांसारखी कामे अधिक प्रमाणात करतात. त्यामुळे कामांच्या स्वरुपानुसार त्यांना मोठ्या प्रमाणात कंबर दुखीचा त्रास होत असतो व पाळीच्या दिवसात तो त्रास जास्त जाणवतो. रक्तस्त्रावाचे प्रमाणही कमी किंवा अधिक असल्याचे मुलींनी सांगितले आहे. थोडक्यात वीटभट्टीवर काम करणाऱ्या मुलींच्या मासिक चक्रासंबंधी विविध समस्या किंवा तक्रारी असतात हे स्पष्ट होते.

### ४.६.२१ आरोग्यसंबंधी तक्रारी असताना मुलींच्या कामाची स्थिती :

वीटभट्टीचे काम करणाऱ्या मुली लहान वयापासून कामे करतात. त्यामुळे कामाच्या स्वरुपानुसार तसेच मासिक चक्रावेळी मुलींच्या आरोग्यसंबंधी विविध तक्रारी असतात. अशा प्रकारच्या आरोग्यसंबंधी तक्रारी असतानाही मुलींना वीटभट्टीची व घरातील कामे करावी लागतात का याविषयी जाणून घेणे महत्त्वाचे आहे. याबाबत पालकांशी केलेल्या चर्चेनुसार प्राप्त माहितीचे विश्लेषण पुढील आलेख क्र. ४.१८ मध्ये दर्शविण्यात आले आहे.

**आलेख क्र.४.१८**

**आरोग्यसंबंधी तक्रारी असताना मुलींच्या कामाची स्थिती**




आलेख क्र. ४.१८ नुसार सर्वाधिक ९३ टक्के पालकांच्या मते आरोग्यसंबंधी तक्रारी असतानाही मुली वीटभट्टीची तसेच घरातील कामे करतात. तसेच आरोग्यसंबंधी तक्रारी असताना मुली कामे करत नसून पुरेशी विश्रांती घेत असल्याचे ७ टक्के पालकांनी सांगितले. यानुसार आरोग्यसंबंधी तक्रारी असतानाही मुली वीटभट्टीची तसेच घरातील कामे करतात व हे प्रमाण सर्वात जास्त आहे. म्हणजेच याचा विपरित परिणाम मुलींच्या आरोग्यावर होत असतो हे स्पष्ट होते.

### ४.६.२२ आरोग्यसंबंधी तक्रारी असताना मुली काम करतात : कारणीमींमासा

मासिक चक्र तसेच आरोग्यसंबंधी इतर तक्रारी असतानाही मुली वीटभट्टी व घरातील सर्व कामे करताना दिसून येतात. त्यामुळे मुलींच्या आरोग्यसंबंधी तक्रारी असतानाही त्यांना कामे का करावी लागतात. गरजेनुसार त्यांना विश्रांती का दिली जात नाही याची माहिती पालकांकडून घेण्यात आली. त्याचा सविस्तर तपशील पुढील सारणीमध्ये दर्शविण्यात आला आहे.

**सारणी क्र. ४.२९**

**आरोग्य तक्रारी असतानाही मुली कामे करतात : कारणांचा तपशील**

**(बहुपर्यायी प्रश्न)**

| अ. क्र. | कारणीमींमासा | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | वीटभट्टीचे नाही मात्र घरात कोणीही नसल्याने घरातील कामे मुलींना करावीच लागतात | ४५ | २६% |
| २ | कुटुंबाचे आर्थिक नुकसान होते | ५ | ३% |
| ३ | आजारपणात काम केल्याने काही होत नाही | १०२ | ५८% |
| ४ | मुलींना पुरेशी विश्रांती दिली जाते व त्या करु शकतील तेवढेच काम दिले जाते | २२ | १३% |
| **एकूण** | | **१७४** | **१००%** |

सारणी क्र. ४.२९ वरुन असे स्पष्ट होते की, आरोग्यसंबंधी तक्रारी असतानाही मुली कामे करतात यामागे अनेक कारणे कारणीभूत असून याविषयी पालकांनी बहुपर्यायी मते मांडलेली आहेत. मुलींच्या आरोग्यसंबंधी तक्रारी असल्या तरी काम केलेच पाहिजे, काम केल्याने काही होत नाही असे मत असणारे व मुलींना कामास लावणारे सर्वाधिक ५८ टक्के पालक आहेत. आरोग्यविषयक तक्रारी असल्यास मुली वीटभट्टीचे काम करत नाहीत परंतु कुटुंबातील पालक दिवसभर वीटभट्टीची कामे करतात, त्यामुळे घरातील कामे मुलींनाच करावी लागतात असे २६ टक्के पालकांनी सांगितले आहे.

तसेच आरोग्यविषयक तक्रारी असताना मुलींना कामाच्या दरम्यान पुरेशी विश्रांती दिली जाते व मुलींच्या इच्छेप्रमाणे त्या करतील तेवढेच काम त्यांना करु दिले जाते असे १३ टक्के पालकांनी सांगितले आहे. तसेच वीटभट्टीवरील कामात प्रत्येक कुटुंबाला दिवसाचे वीटा बनविण्याचे लक्ष्य ठरवून देण्यात आलेले असते. त्यामुळे वीटांचे लक्ष्य पूर्ण करण्यासाठी कुटुंबातील सर्व सदस्य, त्यात बालकेही कामे करत असतात. वीटा

बनविण्याच्या कामात बालकांचा मोठा हातभार लागत असल्याने कुटुंबातील बालके आजारी असतील तर कुटुंबाचे आर्थिक नुकसान होते. त्यामुळे मुली आजारी असल्या तरी त्यांना काम करावे लागते असे ३ टक्के पालकांनी म्हटले आहे.

वरील स्पष्टीकरणावरुन असे लक्षात येते की, या व्यवसायातील मुली आरोग्यविषयक तक्रारी असताना देखील कामे करतात. आरोग्यविषयक तक्रारी चालू असताना प्रामुख्याने विश्रांतीची आवश्यकता असते. तसेच लहान वयातील बालकांना त्याची नितांत गरज असते. परंतु जर अशा अवस्थेतही बालकांना कामे करावी लागत असतील तर त्यांच्या शारिरीक आरोग्यावर विपरित परिणाम घडून येतो. मात्र या व्यवसायातील पालक मुलींच्या आरोग्याविषयी फारसे गंभीर नसल्याचे दिसून येते. म्हणजेच बालकांच्या आरोग्यापेक्षा कुटुंबाचा उदरनिर्वाह व कुटुंबांची आर्थिक मिळकत पालकांना महत्त्वाची वाटत असल्याचे दिसून येते.

### ४.६.२३ मुलींसाठी उपलब्ध शासकीय सुविधा : 'सबला' योजना

सातारा जिल्ह्यामध्ये ९ ते १८ वयोगटातील किशोरवयीन मुलींच्या शारिरीक, मानसिक, भावनिक विकासाच्या दृष्टीने 'सबला' नावाची योजना अंगणवाडी मार्फत राबविण्यात येते. सदर योजनेअंतर्गत किशोरवयीन मुलींचे गट तयार करणे, अंगणवाडीमध्ये सत्रे भरविणे, मुलींना शारिरीक बदल व वाढ, मासिक चक्राविषयी मार्गदर्शन करणे, मुलींसोबत विविध कृती कार्यक्रम करणे, मुलींचे वजन, उंची व रक्त तपासणी करणे, त्यांना व पोषण आहार पुरविणे (टी.एच.आर) इ. सुविधांचा लाभ किशोरवयीन मुलींना देण्यात येतो. त्यानुसार वीटभट्टीवरील काम करणाऱ्या ९ ते १४ वयोगटातील मुलींना या सबला योजनेचा लाभ मिळत आहे किंवा नाही हे १०३ मुलींच्या पालकांकडून जाणून घेण्यात आले.

याबाबत सर्वाधिक ७६ टक्के पालकांनी कुटुंबातील मुलींना 'सबला' योजनेअंतर्गत कोणताही लाभ मिळाला नसल्याचे सांगितले आहे. तसेच आरोग्याची काळजी, पुरक व पोषण आहार, व्यक्तिगत व मासिक चक्रावेळी पाळावयाची स्वच्छता इ. विषयी अंगणवाडी सेविकेकडून मार्गदर्शन मिळाल्याचे केवळ २ पालकांनी सांगितले आहे. तसेच योजनेअंतर्गत उपलब्ध सुविधांचा लाभ घेण्यासाठी कुटुंबातील ९ ते १४ वयोगटातील मुलीही नसल्याचे पालकांनी सांगितले. अंगणवाडीत जात नाहीत. तसेच मुलींसाठी

उपलब्ध असलेल्या सुविधांबद्दल पालकांना (८० पैकी ७८ पालक) काहीही माहिती नसल्याचे दिसून आले.

थोडक्यात वीटभट्टीवर काम करणाऱ्या मुलींना आरोग्याशी संबंधित शासकीय योजनांचा लाभ मिळत नाही. व्यक्तिगत आरोग्य व मासिक चक्रासंबंधी मार्गदर्शन, शारिरीक वाढ व विकासाच्या दृष्टीने आवश्यक असा पुरक व पोषण आहार (टी.एच.आर), वजन, उंची व रक्ततपासणी इ. सर्व सुविधांपासून वीटभट्टी व्यवसायातील मुली वंचित राहत असल्याचे दिसून येते.

**४.६.२४ वीटभट्टीवरील मुलींच्या लग्नाची वयोमर्यादा :**

साधारणतः वयाच्या १८ व्या वर्षापर्यंत मुलींना शारिरीक, मानसिकदृष्टया परिपक्वता आलेली असते. मुलींना येणारे गर्भारपण, बाळाचे संगोपन इ. साठी मुली शारिरीक व मानसिक दृष्ट्या सक्षम झालेल्या असतात. म्हणूनच आरोग्य दृष्टीने विचार करता कायद्याने मुलींच्या लग्नाची वयोमर्यादा १८ वर्षे निश्चित केलेली आहे. परंतु प्रत्यक्षात वीटभट्टी कामगार कुटुंबातील पालक या सर्व बाबींचा विचार करतात का, मुलीं १८ वर्षाच्या पुर्ण झाल्यानंतरच त्यांचे लग्न केले जाते का, नसेल तर कितव्या वर्षी मुलींचे लग्न केले जाते या सर्व बाबी जाणून घेणे आवश्यक असल्याने यासंबंधी मुलींच्या पालकांकडून माहिती घेण्यात आली. यानुसार प्राप्त माहितीचा तपशील पुढील सारणीमध्ये देण्यात आला आहे.

**सारणी क्र. ४.३०**

**वीटभट्टीवरील मुलींच्या लग्नाची वयोमर्यादा**

| अ. क्र. | मुलींच्या लग्नाची वयोमर्यादा | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | ११ ते १२ वर्ष | ७ | ७% |
| २ | १३ ते १४ वर्ष | ५८ | ५६% |
| ३ | १५ ते १६ वर्ष | २५ | २४% |
| ४ | १७ ते १८ वर्ष पुर्ण | १३ | १३% |
| **एकूण** | | **१०३** | **१००%** |

सारणी क्र. ४.३० वरुन असे स्पष्ट होते की, साधारणपणे वीटभट्टी कामगार कुटुंबातील मुली वयात आल्यानंतर म्हणजेच मासिक चक्र सुरु झाल्यानंतर लगेचच त्यांच्या लग्नाची तयारी सुरु केली जात असल्याचे दिसून येते. कारण अगदी वयाच्या ११ ते १२ व्या वर्षीही मुलींचे लग्न करण्यात येते असे ७ टक्के पालकांनी सांगितले आहे. तसेच मुली १३ ते १४ वर्षाच्या झाल्यावर त्यांची लग्ने केली जातात असे ५६ टक्के पालकांनी सांगितले असून हे प्रमाण सर्वाधिक आहे. २४ टक्के पालकांनी मुलींचे लग्न १५ ते १६ वर्षाच्या झाल्यावर केले जाते असे सांगितले. तसेच १३ टक्के पालकांनी १७ ते १८ वर्ष पुर्ण झाल्यांनतर मुलींचे लग्न केले जात असल्याचे सांगितले आहे. थोडक्यात या व्यवसायातील काम करणाऱ्या मुलींचे वयाच्या १३ ते १४ व्या वर्षीच लग्न होत असल्याचे दिसून येते.

वीटभट्टीवरील प्रत्यक्ष निरीक्षणात असे दिसून आले की, एका वीटभट्टीवर एक १६ वर्षाची विवाहीत मुलगी होती, तिला ३ वर्षाचे एक व ६ महिन्याचे एक अशी दोन मुले होती. तिचे लग्न वयाच्या १२ व्या वर्षी झाले होते. अशा प्रकारच्या अनेक मुली निरीक्षणात आल्या आहेत की ज्यांचे लग्न वयाच्या १२ ते १४ व्या वर्षी झालेले आहे व सद्यस्थितीत त्यांना मुले आहेत. अपरिपक्व वयात लग्न करणे हे मुलींच्या शारिरीक व मानसिक आरोग्याच्या दृष्टीने धोकादायक असते. यामुळे खुप लहान वयात मोठ्या जबाबदारी मुलींवर येतात. बालवयात त्या स्वतः लहान बालकांच्या पालक झालेल्या दिसून येतात. याचे दिर्घकालीन दुष्परिणाम मुलींच्या आरोग्यावर होताना दिसून येतात.

एकूणच वीटभट्टीवरील बालकामगारांची आरोग्य स्थिती पाहता असे दिसून येते की, वीटभट्टीवरील ५ ते १४ वयोगटातील बालकांच्या आरोग्य विषयक गरजा पुर्ण होत नाहीत. पालकांचे बालकांच्या आरोग्याकडे होणारे दुर्लक्ष, आरोग्यसंबंधी योग्य मार्गदर्शन न मिळणे, बालकांना नियमितपणे पुरक व पोषण आहार न मिळणे, आवश्यक व मोफत औषधोपचार तसेच आरोग्याशी संबंधित शासकीय सुविधांचा लाभ न मिळणे इ. मुळे वीटभट्टी व्यवसायातील बालकांची आरोग्य स्थिती अधिक गुंतागुंतींची व दयनीय असल्याचे दिसून येते.

## ४.७ वीटभट्टी मालकांकडून पुरविण्यात आलेल्या सोईसुविधा :

### ४.७.१ भौतिक सोईसुविधा :

कायद्यान्वये कामाच्या ठिकाणी कामगार तसेच बालकांचे आरोग्य व सुरक्षिततेप्रती मालकांची काही कर्तव्ये वा नियम आहेत. यानुसार मालकांनी कामाच्या ठिकाणी किमान पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. उदा. पिण्याचे पाणी, शौचालय, तात्काळ औषधोपचार (फस्ट-एड-बॉक्स), मोकळी हवा व स्वच्छ परिसर, धुळ व धूर विरहित स्वच्छ वातावरण, विश्रांती घेण्यासाठी जागा इ. यानुसार वीटभट्टी व्यवसायात कामगार कुटुंबे व बालकांसाठी मालकांकडून कोणकोणत्या सुविधा पुरविण्यात येतात किंवा आलेल्या आहेत याबाबत १६१ कामगार कुटुंबाकडून प्राथमिक माहिती घेण्यात आली. याचा सविस्तर तपशील पुढील आलेख क्र. ४.१९ मध्ये दर्शविण्यात आला आहे.

**आलेख क्र. ४.१९**

**वीटभट्टी मालकांकडून पुरविण्यात आलेल्या सुविधांचा तपशील**

**(बहुपर्यायी प्रश्न)**




सोबतचा आलेख क्र. ४.१९ वरुन असे स्पष्ट होते की, याबाबत पालकांनी बहुपर्यायी मते दिलेली आहेत. त्यानुसार सर्वाधिक २५ टक्के कुटुंबाना वीटभट्टी मालकांकडून पिण्याचे व वापरण्यासाठी पाणी उपलब्ध करुन देण्यात आले आहे. वीटभट्टीवर राहण्यासाठी घराची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कुटुंबांचे प्रमाणही २५ टक्के आहे. तसेच कराड तालुक्यात वीटभट्टी कामासाठी सर्वाधिक कुटुंबे ही कर्नाटक राज्यातून आलेली आहेत. या कुटुंबाना भट्टीच्या कामासाठी आणणे व पुन्हा नेऊन सोडण्याची व्यवस्था वीटभट्टी मालक करतात किंवा कुटुंबाना पैसे देण्यात येतात. तसेच स्थानिक कामगारांनाही रोज वीटभट्टीवर कामाला येण्या-जाण्यासाठीचा प्रवास खर्च मालक देतात. त्यानुसार २२ टक्के कुटुंबातील सदस्यांना मोफत वाहतुकीची सुविधा पुरविण्यात आल्याचे दिसून येते.

वीटभट्टीवरील २२ टक्के कुटुंबांना घरामध्ये वीज उपलब्ध करुन देण्यात आली आहे. तसेच एकाही वीटभट्टीवर बालकांना खेळण्यासाठी स्वतंत्र व स्वच्छ जागा उपलब्ध नाही.

वीटभट्टी मालकांकडून सर्वाधिक कामगार कुटुंबाना राहण्यासाठी घर, पिण्याचे व वापरावयाचे पाणी या सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्याचे दिसून येते. मात्र शौचालयाची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कुटुंबांचे प्रमाण अत्यंत कमी असून ते केवळ ६ टक्के आहे. त्यातही बहुतेक कुटुंबे ही सार्वजनिक शौचालयाचा वापर करत आहेत. उर्वरित सर्व कुटुंबातील सदस्य उघड्यावरती शौचास जात असल्याचे सांगण्यात आले. तसेच बहुतांशी घरामध्ये अंघोळीसाठी न्हाणीची व्यवस्था नसल्याने कामगार कुटुंबांनी घराच्या मागे किंवा आडोशाला न्हाणीची तात्पुरती व्यवस्था केल्याचे दिसते. तर काही कुटुंबातील सदस्य हे उघड्यावरच अंघोळ करत असल्याचे दिसून येते.

घरात न्हाणी नसल्याने उघड्यावर अंघोळ करणे तसेच शौचालयाची सुविधा नसल्याने उघड्यावर शौचास जाणे या बाबी कुटुंबातील महिला व मुलींचे आरोग्य तसेच सुरक्षिततेच्या दृष्टीने अत्यंत धोकादायक आहेत. याबाबत सर्वेक्षण करण्यात आलेल्या ४० वीटभट्टी मालकांशीही चर्चा करण्यात आली होती. त्यानुसार वीटभट्टीवर शौचालयाची सुविधा उपलब्ध करुन दिली तरी कामगार कुटुंबांकडून त्याचा योग्य वापर, आवश्यक स्वच्छता, पुरेश्या प्रमाणात पाण्याचा वापर इ. बाबी केल्या जात नाही. यामुळे त्यांना शौचालयाची सुविधा पुरविली जात नसल्याचे मालकांनी सांगितले. तसेच कामगार कुटुंबे ही अल्प काळासाठी वीटभट्टीवर राहत असल्याने वीटभट्टी मालक त्याकडे फारसे लक्ष देत नसल्याचे दिसून आले.

CHD, YASHADA, च्या अहवालानुसार २०१३-१४ मध्येही याच सर्व सुविधा वीटभट्टी मालकांनी कामगार कुटुंबांना पुरविल्या असल्याचे दिसून येते. म्हणजेच कामगार कुटुंबांना पुरविण्यात येणाऱ्या सुविधांमध्ये कोणत्याच सुधारणा झाल्या नसल्याचे स्पष्ट होते. जसे की, २०१३-१४ मध्येही उघड्यावर शौचास जाणाऱ्या कामगार कुटुंबांचे प्रमाण जास्त होते व ते अद्यापही आहे. तसेच NCPCR, GoI च्या अहवालानुसार वीटभट्टी व्यवसायातील सर्वाधिक ९६ टक्के कामगार कुटुंबे कच्चे व अर्धे पक्के या स्वरुपातील घरांमध्ये राहत असल्याचे दिसून येते. कुटुंबातील बालकांचे आरोग्य व स्वच्छतेचा विचार करता पिण्याचे व वापरण्यासाठी पुरविले जाणारे पाणी मोठ्या प्रमाणात अस्वच्छ

असल्याचे दिसून आले आहे. कोणत्याही प्रतिबंधात्मक उपाययोजने शिवाय अस्वच्छ पाणी कामगार कुटुंबे वापरतात.

या अहवालानुसार सर्वाधिक दयनीय स्थिती ही शौचालयाच्या बाबतीत असून महाराष्ट्रातील सर्वाधिक ९८ टक्के वीटभट्टी कामगार शौचासाठी उघड्यावर जात आहेत. यानुसार सद्यस्थितीतही वीटभट्टी मालकांनी कामगार कुटुंबांना शौचालयाची सुविधा पुरविली नसल्याचेच दिसून येते व ही बाब व्यक्तिगत तसेच सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने घातक आहे.

**४.७.२ बालकांचे शिक्षण** :

सर्वेक्षणातील ४० वीटभट्टयांपैकी ३६ वीटभट्टींवरती ५ ते १४ वयोगटातील काम करणारी बालके असलेली कामगार कुटुंबे आढळून आली. त्यामुळे ३६ वीटभट्टी मालकांकडून या सदंर्भात प्राथमिक माहिती घेण्यात आली.

वीटभट्टी कामासाठी ५ ते ६ महिन्याच्या हंगामी स्थलांतरामुळे कामगार कुटुंबातील बहुतांशी बालके शाळेत जात नाहीत. त्यामुळे या बालकांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये याकरिता वीटभट्टी मालकांनी विशेष कोणते प्रयत्न केले आहेत हे जाणून घेण्यात आले. जसे की, बालकांना शाळेत व अंगणवाडीत प्रवेश मिळवून देणे, पोषण आहाराचा लाभ मिळवून देणे, शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन देणे, शाळेचे अंतर लांब असल्यास त्यांच्या वाहतुकीची व्यवस्था करणे, वीटभट्टीवरती बालकांसाठी शिक्षणाची व्यवस्था करणे तसेच वीटभट्टीवरील बालकांच्या शिक्षणासाठी शासनाकडे पाठपुरावा करणे इ. याबाबत वीटभट्टी मालकांशी चर्चा करण्यात आली.

याबाबत मालकांशी केलेल्या चर्चेतून असे लक्षात आले की, एकाही वीटभट्टी मालकाने बालकांच्या शिक्षणासाठी पुढाकार घेऊन कोणतेही प्रयत्न केलेले नाहीत. याउलट बालके शाळेत जाण्यास तयार होत नाहीत, बालके केवळ ५ ते ६ महिनेच इथे असतात, कन्नड भाषेमुळे बालके मराठी शाळेत जात नाहीत, कुटुंबाचे आर्थिक नुकसान होते म्हणून पालक बालकांना शाळेत पाठवित नाहीत तसेच बालकांना शाळेत पाठविण्याविषयी समजून सांगितले तरी पालक आपले म्हणणे ऐकत नाहीत अशी विविध कारणे मालकांनी सांगितली. तसेच बालकांच्या शिक्षणाबाबत पालकांवर जबरदस्ती केल्यास पुढील वर्षी कामगार वीटभट्टीवर कामासाठी येत नसल्याचेही मालकांनी

सांगितले. या सर्व कारणांमुळे बालकांसाठी शिक्षणाची व्यवस्था करणे शक्य होत नसल्याचे मालकांनी सांगितले.

तसेच बहुतांशी वीटभट्टी मालक बालकांच्या शिक्षणाबाबत उदासिन असल्याचे दिसून येते. बालकांना शिक्षणासाठी प्रवृत्त करणे, त्यांच्या शिक्षणासाठी प्रयत्न करणे ही आपली जबाबदारी नाही असे मानणारे वीटभट्टी मालक अधिक आहेत. त्याचबरोबर बालके शाळेत गेली तर कुटुंबाना ठरवून देण्यात आलेले वीटांचे लक्ष्य पुर्ण करण्यात अडचण निर्माण होते व पर्यायाने यात मालकांचे आर्थिक नुकसान होते. त्यामुळे बालकांना शाळेत न पाठविण्यामध्ये मालकांचीही स्वार्थी भावना असल्याचे दिसून येते व म्हणूनच बालकांच्या शिक्षणासाठी मालक प्रयत्नशील नसल्याचे दिसून येते.

याबाबत CHD, YASHADA यांच्या अहवालानुसार २०१३-१४ मधील स्थिती व सद्यस्थिती यात काहीच फरक नसल्याचे दिसून येते. म्हणजेच त्यावेळी देखील एकाही वीटभट्टी मालकाने बालकांच्या शिक्षणासाठी कोणतेही विशेष प्रयत्न केलेले नव्हते. तसेच NCPCR, GoI च्या संशोधन अहवालानुसारही महाराष्ट्र तसेच इतर राज्यातील कोणत्याही वीटभट्टी मालकाने वीटभट्टीवरील बालकांना शाळेत तसेच अंगणवाडीत दाखल करणे, त्यांच्या शिक्षणाची व्यवस्था करणे वा बालकांच्या शिक्षणासाठी कोणतेही विशेष प्रयत्न केलेले नाहीत.

**४.७.३ बालकांचे आरोग्य** :

वीटभट्टीवर काम करताना बालकांच्या आरोग्य विषयक अनेक समस्या असतात. त्यामुळे वीटभट्टी मालकांकडून बालकामगारांना आरोग्यसंबंधी कोणत्या सुविधा पुरविण्यात येतात याबाबत मालकांशी चर्चा करण्यात आली. त्यानुसार बालकांच्या किरकोळ आजार वा दुखापतींवर मोफत औषधोपचार करत असल्याचे सर्व वीटभट्टी मालकांनी सांगितले. तसेच गंभीर स्वरुपाचा आजार असल्यास कुटुंबांना योग्यवेळी व आवश्यक पैसा पुरविला जातो व हा पैसा कामगारांच्या एकत्रित वेतनातून वजा करुन घेतला जात असल्याचे सांगण्यात आले.

बालकांचा अपघात, गंभीर आजार तसेच गरोदर महिलेची प्रसुती अशा प्रसंगात वाहतुकीची व्यवस्था करणे किंवा डॉक्टरांना वीटभट्टीवर बोलविणे किंवा घेऊन येणे इ. सुविधा पुरविण्यात येत असल्याचे काही मालकांनी सांगितले. केवळ एकाच मालकाने वीटभट्टीवरती फस्ट-एड-बॉक्सची सुविधा उपलब्ध करुन दिल्याचे दिसून आले. तसेच

कुटुंबातील लहान बालकांचे लसीकरण करवून घेण्याबाबत पालकांना समजावल्याचे ८ वीटभट्टी मालकांनी सांगितले. मात्र पालकांना समजावून सांगणे याव्यतिरिक्त प्रत्यक्ष लाभ मिळवून देण्याकरीता मालकांनी कोणतेच प्रयत्न केलेले नाहीत. तसेच ३ ते ६ वयोगटातील बालके, किशोरवयीन मुली यांना अंगणवाडीतून उपलब्ध होणाऱ्या आरोग्य सुविधांचा लाभ मिळवून देण्यासाठी एकाही वीटभट्टी मालकांने कोणतेच प्रयत्न केलेले नाहीत.

थोडक्यात वीटभट्टीवरील बालकांची आरोग्य स्थिती किंवा समस्या याबाबत मालकांनी विशेष प्रयत्न केल्याचे दिसून येत नाही. तसेच NCPCR, GoI च्या अहवालानुसारही महाराष्ट्र तसेच इतर राज्यातील वीटभट्टी मालकांनी बालकांच्या आरोग्यासंदर्भात स्वतःहून कोणतेही प्रयत्न केलेले नाहीत.

## ४.८ वीटभट्टीवरील बालकांसाठी उपलब्ध शासकीय सुविधा वा योजना :

वीटभट्टी व्यवसायात काम करणाऱ्या बालकांना कोणकोणत्या शासकीय सुविधा वा योजनांचा लाभ मिळालेला आहे किंवा देण्यात आलेला आहे याबाबत विविध शासकीय अधिकाऱ्यांकडून माहिती घेण्यात आली. तसेच शासकीय सुविधा किंवा योजनांचा लाभ वीटभट्टीवरील बालकांना मिळत नसल्यास त्यातील अडचणी व उपाययोजना याविषयी त्यांच्याशी सविस्तर चर्चा करण्यात आली.

याकरीता प्रामुख्याने सरकारी कामगार अधिकारी, शिक्षणाधिकारी, महिला व बाल विकास अधिकारी, समाज कल्याण अधिकारी, वैद्यकिय अधिकारी, शाळेचे मुख्याध्यापक व अंगणवाडी सेविका यांच्याशी चर्चा करण्यात आली. त्यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीचे विश्लेषण पुढीलप्रमाणे आहे.

### ४.८.१ बालमजुरी निर्मुलन विषयक कायद्याची अंमलबजावणी :

सातारा जिल्ह्यातील तसेच प्रामुख्याने वीटभट्टी व्यवसायातील बालमजुरी निर्मुलन संदर्भातील कायदेशीर प्रयत्नांविषयी सरकारी कामगार अधिकारी यांच्याशी चर्चा करण्यात आली. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार बालमजुरी निर्मुलनासाठी सातारा जिल्ह्यामध्ये 'बालमजुरी निर्मुलन व प्रतिबंध कायदा' १९८६ व 'कृती दल' २००६ यामार्फत कार्यवाही केली जाते. साधारणतः २०१३ पासून या कायद्यांच्या कार्यवाही अंतर्गत ८ वेळा धाडसत्रांचे आयोजन करण्यात आले होते. या धाडसत्रांमध्ये वीटभट्टीचा समावेश नव्हता. तसेच २०१५-१६ च्या धाडसत्रांमध्ये केवळ ३ बालकामगार आढळून आले. मात्र ते बालक १७ ते १८ वयोगटातील असल्याचे सांगण्यात आले. तसेच २०११ मध्ये जिल्हाधिकारी कार्यालयाकडून सातारा जिल्हा 'बालकामगार मुक्त' म्हणून घोषित करण्यात आला होता. तेंव्हा पासून १४ वर्षाखालील एकही बालकामगार सापडला नसल्याचे त्यांनी सांगितले.

एकूणच सातारा जिल्ह्यात 'वीटभट्टी व्यवसायातील बालमजुरी' विरुध्द कोणतीच कायदेशीर कार्यवाही झाली नसल्याचे दिसून येते. म्हणजेच या व्यवसायातील बालकामगारांना कायद्याच्या माध्यमातून कामातून मुक्तता करणे तसेच त्यांचे कौटुबिंक व शैक्षणिक पुनर्वसन करणे यासारख्या कोणत्याच सुविधांचा लाभ मिळालेला नाही.

**अ) कायद्याच्या कार्यवाहीतील अडचणी :**

सातारा जिल्ह्यामध्ये २०१५-१६ पर्यंतच्या धाडसत्रामध्ये १४ वर्षाखालील एकही बालकामगार सापडला नसल्याचे सरकारी कामगार अधिकारी यांनी सांगितले. प्रत्यक्षात मात्र संशोधन अभ्यासावेळी वीटभट्टीवर काम करणारी एकूण २९७ बालके आढळून आलेली आहेत. त्यामुळे वीटभट्टी व्यवसायातील बालकांच्या विरुध्द कायदेशीर कार्यवाही विषयी कामगार अधिकाऱ्यांशी चर्चा करण्यात आली.

याबाबतीत कामगार अधिकाऱ्यांनी अशी माहिती दिली की, वीटभट्टी व्यवसायाला घरगुती व्यवसायाचे (Domestic Work) स्वरुप असून कुटुंबातील सर्व सदस्य एकत्रितपणे कामे करतात. यामध्ये बालके वीटभट्टीच्या कामात कुटुंबाला मदत करत असतात. तसेच बऱ्याच वेळा जेंव्हा वीटभट्टीची पाहणी करण्यात येते तेंव्हा कुटुंबातील बालके वीटभट्टीवर खेळताना दिसून येतात. त्यामुळे १९८६ च्या कायद्यान्वये अशा बालकांना 'बालकामगार' म्हणून गणले जात शकत नाही. तसेच वीटभट्टी व्यवसायाला आस्थापना नसते, भट्टीवरील बालके विखुरलेल्या स्वरुपात असतात तसेच कामगार कुटुंबाना मराठी भाषा समजत नसल्याने संभाषणात अनेक अडचण येतात इ. कारणांमुळे त्यांच्याविरुध्द कार्यवाहीत अडचणी येत असल्याचे सांगण्यात आले.

तसेच कृती दलामार्फत वीटभट्टीवर कार्यवाही करताना अनेक अडचणी येत असल्याचे सांगण्यात आले. प्रामुख्याने धाडसत्रांचे आयोजन करण्यापासून पुढील सर्व प्रक्रिया पार करण्यामध्ये पोलिस विभाग, महिला व बाल विकास विभाग, आरोग्य विभागातील अधिकारी किंवा सदस्यांचे अपेक्षित सहकार्य मिळत नाही. तसेच कामगार विभागातील मनुष्यबळाचा अभाव, वर्षानुवर्षे कामगार विभागातील अनेक महत्त्वाची पदे रिक्त आहेत, जे अधिकारी आहेत त्यांच्यावरील अतिरिक्त कामांचा ताण इ. कारणांमुळे वेळोवेळी धाडसत्रांचे आयोजन करण्यात अडचण येत असल्याचे सांगितले.

तसेच कृती दलामार्फत मुक्त करण्यात आलेल्या बालकांना निरीक्षण गृहात दाखल केले जाते. तिथे बालकांना शिक्षण, आरोग्य, मनोरंजन, पोषक आहार इ. सर्व सुविधा पुरविल्या जातात. परंतु बालके निरीक्षण गृहात दाखल झाल्यानंतर त्या पुढील २ ते ३ दिवसांत त्यांचे पालक आवश्यक कागदपत्रांची पुर्तता करुन बालकांना घेऊन जातात. यामुळे बालकांच्या कौटुबिंक व शैक्षणिक पुनर्वसनात मोठी अडचण येत असल्याचे महिला व बाल विकास अधिकारी यांनी सांगितले.

थोडक्यात वीटभट्टी व्यवसायातील १४ वर्षाखालील बालकांविरुध्द कायदेशीर कार्यवाहीत अनेक अडचणी येत असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळेच या व्यवसायात बालकामगारांची संख्या जास्त असून त्यांचे योग्यरित्या पुनर्वसन होत नसल्याचे दिसते.

**ब) कायद्याच्या योग्य कार्यवाहीकरीता सुचविलेल्या उपाययोजना** :

बालमजुरी निर्मुलन तसेच त्या संदर्भातील कायद्यांविषयी सर्वसामान्य व्यक्ती, आस्थापनांचे मालक व असंघटित क्षेत्रातील व्यावसायिक यांच्यामध्ये जागृती घडवून आणणे आवश्यक असल्याचे सरकारी कामगार अधिकारी यांनी सांगितले. तसेच मनुष्यबळाचा अभाव असल्याने कायदेशीर कार्यवाहीत अडचणी येतात. त्यामुळे आवश्यकतेप्रमाणे अधिकारी वर्ग उपलब्ध करुन देणे महत्त्वाचे आहे. तसेच धाडसत्रात सहभागी होणारे विविध शासकीय विभागातील अधिकारी व कर्मचारी यांना वेळोवेळी प्रशिक्षण देणेही गरजेचे असल्याचे सुचविण्यात आले.

**४.८.२ वीटभट्टीवरील बालकांसाठी शैक्षणिक सुविधा किंवा लाभ** :

वीटभट्टी व्यवसायातील बालकांना शिक्षणाची सुविधा उपलब्ध व्हावी, त्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये याकरीता शासकीय पातळीवर (शिक्षण विभागाकडून) कोणते प्रयत्न करण्यात आले आहेत. तसेच वीटभट्टीवरील बालकांना शैक्षणिक सुविधांचा लाभ देण्यात आला आहे किंवा नाही हे जाणून घेण्यात आले. याबाबत सर्वेक्षण केलेल्या वीटभट्टी परिसरातील प्राथमिक शाळांचे मुख्याध्यापक तसेच उप शिक्षणाधिकारी (प्राथ. जिल्हा सातारा) यांच्याशी चर्चा करण्यात आली. त्यांनी दिलेल्या माहितीचे सविस्तर स्पष्टीकरण पुढील प्रमाणे आहे.

सर्वेक्षण करण्यात आलेल्या ४० वीटभट्टीजवळील परिसरात एकूण ६ प्राथमिक शाळा येतात. यामध्ये वडोली, मलकापूर, गोटे, शिवडे, खोडशी व विंग येथील शाळांचा समावेश होतो. या शाळा वीटभट्टीपासून जवळ असल्याने वीटभट्टीवरील काही बालके या शाळांमध्ये जात असल्याचे दिसून येते. त्यानुसार संबंधित शाळांच्या मुख्याध्यापकांशी चर्चा करण्यात आली होती.

मुख्याध्यापकांनी दिलेल्या माहितीनुसार आरटीईच्या नियमानुसार वीटभट्टीवरील २० बालकांना या शाळांमध्ये स्थलांतराच्या काळात वयानुरुप समकक्षेत दाखल करुन घेतले आहे. मुख्याध्यापकांच्या मते शाळेमध्ये स्थानिक वीटभट्टी कामगार कुटुंबातील

बालकांचे प्रमाण अधिक असून ते नियमित शाळेत येतात. त्यामुळे त्यांना मोफत गणवेश, पोषक आहार, शालेय पाठ्यपुस्तके इ. सर्व शालेय सुविधांचा लाभ देण्यात येतो. मात्र शाळांमध्ये हंगामी स्थलांतरीत कुटुंबातील बालके कमी प्रमाणात येतात व ती अनियमित असतात. त्यामुळे या बालकांना सर्वच शालेय सुविधांचा लाभ देता येत नाही. कारण ही बालके नोव्हेंबर ते एप्रिल या कालावधीत शाळेत येतात. त्यामुळे शालेय गणवेश, पाठ्यपुस्तके शिल्लक असल्यास त्यांना पुरविण्यात येते. अन्यथा केवळ रोजच्या पोषक आहाराचा लाभ बालकांना देण्यात येतो असे सांगण्यात आले.

तसेच वीटभट्टीवरील बालकांच्या शिक्षणासाठी जिल्ह्यातील शिक्षण विभागाकडून तसेच वीटभट्टी परिसरातील शाळेतील शिक्षक व मुख्याध्यापक यांनी विशेष कोणतेही प्रयत्न केलेले दिसून येत नाहीत. तसेच वीटभट्टीवरील बालकांच्या शिक्षणासाठी शासनाची कोणतीही स्वतंत्र योजना राबविली जात नाही. तसेच सातारा जिल्ह्यामध्ये २०११ च्या शासन निर्णयानुसार हंगामी स्थलांतरीत बालकामगारांसाठी वसतीगृहाची योजना राबविण्यात येत आहे. परंतु ही वसतीगृहे वीटभट्टी परिसरापासून खूप दूर असल्याने या वसतीगृहांचा लाभ वीटभट्टीवरील बालकांना होत नाही.

एकूणच वीटभट्टीवरील हंगामी स्थलांतरील कामगार कुटुंबातील बालकांना शालेय सुविधांचा फारसा लाभ मिळत नसल्याचे दिसून येते.

**अ) शैक्षणिक सुविधांचा लाभ देण्यातील अडचणी** :

वीटभट्टी परिसरातील शाळेचे मुख्याध्यापक तसेच सातारा जिल्ह्याचे उप शिक्षणाधिकारी यांच्याशी चर्चा केली असता असे सांगण्यात आले की, वीटभट्टीवरील बालकांना शैक्षणिक सुविधांचा लाभ मिळवून देण्यामध्ये अनेक महत्त्वाच्या अडचणी येतात. जसे की, वीटभट्टीवरील हंगामी स्थलांतरील कामगार कुटुंबातील बालकांना शालेय सुविधांचा लाभ देता येत नाही. कारण ही बालके ६ महिन्यासाठी शाळेत दाखल होतात व ती नियमितपणे शाळेत येत नाहीत.

तसेच बालकांसाठी हंगामी कालावधीत शाळा सुरु करावयाची असल्यास वीटभट्टीवर एका ठिकाणी कमीत कमी ८-१० व जास्तीत जास्त २०-२५ बालके एकत्रितपणे उपलब्ध होणे आवश्यक असते. परंतु वीटभट्टीवरील बालके मोठ्या प्रमाणात विखुरलेली असल्याने एका ठिकाणी एवढ्या संख्येने बालके एकत्रितपणे उपलब्ध होऊ शकत नाही. वीटभट्टीवरील बालके कन्नड भाषिक असल्याने त्यांना मराठी भाषेत शिक्षण

घेणे कठीण जाते व आपल्याकडे कन्नड भाषेतील शिक्षक उपलब्ध होऊ शकत नाहीत. या कारणांमुळे वीटभट्टीवरील बालकांच्या शिक्षणासाठी विशेष प्रयत्न करणे शक्य होत नसल्याचे सांगण्यात आले.

**ब) शैक्षणिक सुविधांचा लाभ देण्याकरीता उपाययोजना :**

वीटभट्टीवरील बालकांच्या शिक्षणासाठी काय करता येऊ शकेल याबाबत मुख्याध्यापकांशी चर्चा करण्यात आली होती. याबाबत मुख्याध्यापकांनी दिलेल्या मतांनुसार वीटभट्टी ठेकेदारांनी कामगार कुटुंबे कामासाठी वीटभट्टीवर आल्यांनतर बालकांच्या शिक्षणासाठी आग्रही राहणे व पालकांना समजावून सांगणे आवश्यक आहे. तसेच वीटभट्टी मालकांनी पुढाकार घेऊन वीटभट्टीवरील सर्व बालकांना एकत्रित केल्यास त्यांना त्या ठिकाणी शिक्षण देण्याची हंगामी व्यवस्था करता येऊ शकेल. तसेच गावातील निवृत्त शिक्षक व सुशिक्षित बेरोजगार यांच्या मदतीने बालकांसाठी शाळा किंवा शैक्षणिक केंद्र चालविता येऊ शकते. अशा प्रकारे वरील उपाययोजना मुख्याध्यापकांनी सुचविल्या आहेत.

तसेच उप शिक्षणाधिकारी यांच्या मते अधिकाधिक वीटभट्टया असलेल्या भागात जिल्हा परिषदेकडून सर्वेक्षण करण्यात यावे. तसेच वीटभट्टीवरील बालकांच्या शिक्षणाबाबत स्थानिक ग्रामस्थांकडून जिल्हा परिषदेकडे प्रस्ताव पाठविण्यात आल्यास जिल्हा परिषद मान्यतेसाठी तो प्रस्ताव पुढे महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षण परिषदेकडे पाठवू शकते. त्यामुळे वीटभट्टीवरील बालकांच्या शिक्षणाबाबत शासन निर्णय घेऊ शकेल. तसेच कन्नड भाषेतील शिक्षक उपलब्ध होतील यासाठी प्रयत्न करता येऊ शकेल. याबरोबरच खाजगी संस्थांच्या पुढाकारानेही बालकांच्या शिक्षणासाठी प्रयत्न करता येऊ शकतील.

**४.८.३ अंगणवाडीमार्फत उपलब्ध सुविधा किंवा लाभ :**

वीटभट्टीवरील ३ ते ६ वयोगटातील बालके व किशोरवयीन मुलींना अंगणवाडी मार्फत कोणकोणत्या शासकीय सुविधा पुरविण्यात आल्या आहेत. याची माहिती घेण्यासाठी अंगणवाडी सेविकांची भेट घेण्यात आली होती. यानुसार सर्वेक्षणातील वीटभट्टी परिसरात भोसलेनगर, शिवडे, हनुमंतवाडी, वडोली, गणेशनगर, कार्वे, गोळेश्वर, मसूर रोड, खोडशी, विंग अशा एकूण १० अंगणवाडी येत होत्या. त्यामुळे या अंगणवाडीतील सेविकांकडून माहिती घेण्यात आली.

अंगणवाडी सेविकांनी दिलेल्या माहितीनुसार बहुतांशी वीटभट्टीवरील ३ ते ६ वयोगटातील बालके अंगणवाडीत येत नाहीत. वीटभट्टीवरील केवळ ४५ बालके या सर्व १० अंगणवाड्यामध्ये येत असल्याचे दिसून आले. त्यातही वीटभट्टीवर काम करणाऱ्या स्थानिक कुटुंबातील बालके अंगणवाडीत जात आहेत. हंगामी स्थलांतरीत कुटुंबातील बालके अंगणवाडीत जात नाहीत किंवा त्याचे प्रमाण नगण्य (८ बालके) आहे. स्थानिक कामगार कुटुंबातील बालके अंगणवाडीमध्ये पूर्ण वेळ बसतात व अनौपचारिक शिक्षण, लसीकरण, पुरक व पोषण आहार इ. सर्व सुविधांचा लाभ घेतात. मात्र हंगामी स्थलातंरीत कुटुंबातील बालके पुर्ण वेळ अंगणवाडीत बसत नाहीत. केवळ पुरक व पोषण आहार घेण्यासाठी अंगणवाडीत येत असल्याचे सांगण्यात आले. तसेच कामगार कुटुंबातील बालके उपलब्ध सुविधांचा लाभ घेण्यासाठी अंगणवाडीत येत नाहीत व या सर्व सुविधांचा लाभ बालकांना घरपोच देता येणे शक्य नाही. त्यामुळे वीटभट्टीवरील बालके या सर्व सुविधांपासून वंचित राहतात असे सेविकांकडून सांगण्यात आले.

तसेच सातारा जिल्ह्यामध्ये ९ ते १८ वयोगटातील शाळेत न जाणाऱ्या किशोरवयीन मुलींकरीता शासनामार्फत 'सबला' नावाची योजना राबविली जाते. या योजनेची कार्यवाही प्रामुख्याने अंगणवाडीतून होते. या योजनेअंतर्गत किशोरवयीन मुलींना आरोग्याबाबत मार्गदर्शन तसेच २५ दिवसाचा पुरक व पोषण आहार देण्यात येतो. परंतु वीटभट्टीवरील ९ ते १४ वयोगटातील किशोरवयीन मुलींना एकाही अंगणवाडीतून सदर योजनाचा लाभ देण्यात आलेला नाही. याबाबत ज्या वीटभट्टीवर किशोरवयीन मुली होत्या त्या अंगणवाडीत येत नसल्याने त्यांना योजनेचा लाभ देण्यात आलेला नाही असे सांगण्यात आले.

तसेच NCPCR,GoI च्या अहवालानुसारही महाराष्ट्रात हंगामी स्थलांतरीत कुटुंबापैकी ७१ टक्के कुटुंबे अद्यापही अंगणवाडी सुविधांपर्यंत पोहचलेली नाहीत किंवा अंगणवाडी मार्फत त्यांच्यापर्यंत सुविधा पोहचलेल्या नाहीत. तसेच १५ टक्के कुटुंबांच्या मते त्यांना या सर्व सुविधांची आवश्यकताच वाटत नाही. यावरुन अंगणवाडी व त्यामार्फत उपलब्ध शासकीय सोईसुविधा बद्दलचे पालकांचे अज्ञान प्रकर्षाने दिसून येते. यामध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी प्रयत्न होणे आवश्यक असल्याचे वाटते.

**अ) अंगणवाडीमार्फत सुविधांचा लाभ देण्यातील अडचणी :**

वीटभट्टी कामगार कुटुंबातील बालके, किशोरवयीन मुली यांना अंगणवाडीमार्फत शासकीय सुविधा पुरविण्यात अनेक अडचणी येत असल्याचे अंगणवाडी सेविकांनी तसेच बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले.

प्रामुख्याने वीटभट्टीवरील कन्नड भाषिक कुटुंबांशी मराठी भाषेत संवाद साधताना अडचण येत असल्याचे सेविकेंनी सांगितले. तसेच कन्नड भाषेमुळेच वीटभट्टीवरती ३ ते ६ वयोगटातील बालकांसाठी ६ महिन्याच्या कालावधीत हंगामी अंगणवाडी सुरु करता येऊ शकत नाही. कारण कन्नड भाषेतील सेविका उपलब्ध होणे शक्य नाही. तसेच वीटभट्टीवरती ३ ते ६ वयोगटातील बालके संख्येने खुप कमी असतात व ती मोठ्या प्रमाणात विखुरलेली आढळून येतात. त्यामुळे आवश्यक संख्येइतकी व विखुरलेल्या बालकांना एका ठिकाणी एकत्रित करुन त्यांच्यासाठी अंगणवाडी सुरु करणे अवघड असल्याचे सांगण्यात आले.

वीटभट्टीवरील काही किशोरवयीन मुलींना समजावून सांगण्यात आले होते. मात्र मुली अंगणवाडीत येत नाहीत किंबहुना पालक त्यांना पाठवित नाहीत. त्यामुळे या मुलींना अंगणवाडीमार्फत तसेच 'सबला' योजनेअंतर्गत उपलब्ध सुविधांचा लाभ देता येत नसल्याचे सेविकेंनी सांगितले आहे.

**ब) अंगणवाडीमार्फत सुविधांचा लाभ देण्याविषयी उपाययोजना :**

वीटभट्टीवरील ३ ते ६ वयोगटातील बालके व किशारेवयीन मुलींना मिळणाऱ्या अंगणवाडीतील सुविधांचा लाभ देण्याकरीता काय प्रयत्न केले जाऊ शकतात याविषयी अंगणवाडी सेविकांशी चर्चा करण्यात आली.

अंगणवाडी सेविकेंच्या मतांनुसार वीटभट्टी कामगार कुटुंबातील स्त्रीया व मुलींशी सतत संवाद साधणे आवश्यक आहे व त्यासाठी कन्नड भाषिक व्यक्ती उपलब्ध झाल्यास ते अधिक फायदेशीर ठरु शकेल. तसेच अंगणवाडी सोडून सेविका बाहेर जाऊ शकत नाहीत. परंतु जर त्यांना भट्टीवर जाता आले तर त्या मुलींसाठी व बालकांसाठी वीटभट्टीवरतीच मार्गदर्शन सत्रे आयोजित करु शकतील व त्यांना समजावून सांगू शकतील. साधारणतः १० ते १५ वीटभट्टी मिळून एक हंगामी अंगणवाडी सुरु केल्यास

अंगणवाडीतील अनौपचारिक शिक्षणासहित इतर सर्व सुविधांचा लाभ वीटभट्टीवरील बालकांना मिळू शकेल असे सांगण्यात आले.

तसेच NCPCR,GoI च्या अहवालामध्येही वीटभट्टी व्यवसायातील तसेच हंगामी स्थलांतरीत कुटुंबातील बालकांचे अनौपचारिक शिक्षण, त्यांच्या पुरक व पोषण आहाराची आवश्यकता, चांगले आरोग्य तसेच आय.सी.डी.एस मार्फत पुरविल्या जाणाऱ्या सर्व शासकीय सुविधा या सर्वांविषयी पालकांमध्ये जागृती घडवून आणणे आवश्यक असल्याचे म्हटले आहे.

**४.८.४ आरोग्यसंबंधीत शासकीय सुविधा किंवा लाभ** :

वीटभट्टी कामगार कुटूंबातील सदस्य व बालकांना सरकारी दवाखान्यातून पुरविण्यात येणाऱ्या आरोग्य सुविधांविषयी माहिती घेण्यात आली. यासाठी वीटभट्टी परिसरातील प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी तसेच खाजगी दवाखान्यातील डॉक्टर यांच्याशी चर्चा करण्यात आली.

वैद्यकीय अधिकारी व आरोग्य सेविका यांनी दिलेल्या माहितीनुसार वीटभट्टीवरील कामगार तसेच बालके, किशोरवयीन मुली, गरोदर व स्तनदा माता यांना सरकारी दवाखान्यात सर्व औषधोपचार व सुविधा मोफत पुरविल्या जातात. त्यांच्यामते वीटभट्टीवरील कामगार तसेच बालकांना प्रामुख्याने खोकला, सर्दी, दमा, ताप, कंबरदुखी, अंग व डोकेदुखी, पल्स पोलिओ डोस, उलट्या व जुलाब तसेच बालकांचे कुपोषण, अशक्तपणा इ. वरील तपासण्या व औषधोपचाराच्या मोफत सुविधा पुरविण्यात आल्या आहेत. तसेच त्यांना HIV तपासणी, लसीकरण, इतर संदर्भ सेवाही मोफत उपलब्ध करुन देत असल्याचे सांगण्यात आले.

वीटभट्टीवरील गरोदर व स्तनदा मांताना आहार, लसीकरण, पाळणा लाबंविणे तसेच गरोदरपणातील आवश्यक तपासण्या इ. विषयी मार्गदर्शन करण्यात येते किंवा आले आहे. तसेच वीटभट्टीवरील किशोरवयीन मुलींना मासिक पाळी, त्यांसबंधीत तक्रारी, आहार व व्यक्तिगत स्वच्छता याविषयी मार्गदर्शन करण्यात येत असल्याचे आरोग्य सेविकांनी सांगितले. मात्र वीटभट्टीवरील बालकांच्या आरोग्य संदर्भात सरकारी दवाखाना तसेच वैद्यकीय अधिकारी यांच्याकडून कोणतेही विशेष प्रयत्न करण्यात आलेले नाहीत.

**अ) आरोग्यविषयक सुविधांचा लाभ देण्यातील अडचणी :**

सरकारी दवाखान्यात सर्व उपचार मोफत केले जात असले तरी सर्वाधिक वीटभट्टी कामगार उपचारासाठी खाजगी दवाखान्यात जातात. सरकारी दवाखान्यात एका दिवसात किंवा आठवड्यात केवळ ३ ते ४ वीटभट्टी कामगार वा बालके येतात असे सांगण्यात आले. वीटभट्टीपासून दवाखान्याचे अंतर लांब असल्याने रोजची मजुरी बुडते याचबरोबर सरकारी दवाखान्याविषयी वीटभट्टी कामगारांची पुर्वग्रहदुषित विचारसरणी असल्याने अधिक प्रमाणात वीटभट्टी कामगार खाजगी दवाखान्यांमध्ये जातात असे वैद्यकीय अधिकारी यांनी सांगितले. जसे की, सरकारी दवाखान्यात योग्य औषधोपचार केले जात नाहीत, तेथील औषधांचा गुण येत नाही इ. तसेच कन्नड भाषेच्या अडचणीमुळे कामगारांशी संवाद साधण्यात अडचण येत असल्याचे सांगण्यात आले.

**ब) आरोग्यसंबंधीत शासकीय सुविधांचा लाभ देण्याविषयी उपाययोजना :**

वीटभट्टीवरील कामगार तसेच बालकांना विविध आजार व त्याचे दुष्परिणाम याबाबत वेळोवेळी माहिती देणे व मार्गदर्शन करणे आवश्यक आहे. वीटभट्टीवरील बालकांचे कुपोषण, आजार, मुलींचे आरोग्य इ. विषयी पालकांमध्ये जागृती घडवून आणणे गरजेचे आहे. त्यादृष्टीने वीटभट्टीवरती वेळोवेळी जनजागृती कार्यक्रम तसेच आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन करणे आवश्यक असल्याचे सांगण्यात आले. भट्टीवरील कामगार आरोग्यसंबंधी उपचारासाठी सरकारी दवाखान्यात येतील यादृष्टीने त्यांचे मतपरिवर्तन करणे गरजेचे आहे असे मत वैद्यकीय अधिकाऱ्यांनी व्यक्त केले आहे.

तसेच वीटभट्टी परिसरातील खाजगी डॉक्टरांशीही याबाबत चर्चा करण्यात आली होती. त्यांच्यामते वीटभट्टीवरती खाजगी व सरकारी पातळीवर एकत्रितपणे जनजागृती कार्यक्रम तसेच आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन करणे आवश्यक आहे. तसेच वीटभट्टीवरील बालकांच्या आरोग्य सुधारणेसाठी स्वयंसेवी संस्थाच्या मदतीने कार्य केले जाऊ शकते असे मत एका खाजगी डॉक्टरने मांडले आहे. वीटभट्टीवरील कामगार व बालकांना कमी खर्चात औषधोपचार मिळवून देण्यात खाजगी डॉक्टरांच्या संघटनेने प्रयत्न करावेत असे ही सुचविण्यात आले.

**४.८.५ सामाजिक सुरक्षितता लाभाविषयी :**

असंघटित क्षेत्रातील कामगारांना सामाजिक सुरक्षितता मिळवून देण्याकरीता २००८ मध्ये 'सामाजिक सुरक्षा कायदा' करण्यात आला आहे. यामध्ये जननी सुरक्षा

योजना, जनश्री विमा योजना, आम आदमी बिमा योजना, राष्ट्रीय स्वास्थ बिमा योजना, राष्ट्रीय कौटुंबिक लाभ योजना इ. योजनांचा लाभ समाविष्ट आहे. वीटभट्टी व्यवसाय व त्यातील कामगार हेही असंघटित क्षेत्रात मोडतात. मात्र वीटभट्टीवरील एकाही कामगारांस सदर योजनांचा लाभ मिळालेला नाही. वीटभट्टीवरील पालक तसेच वीटभट्टी मालक यांना सदर योजनांविषयी काहीच माहिती नसल्याचे दिसून आले. त्यामुळे कामगारांना सदर योजनांचे लाभ मिळवून देण्यासाठी मालकांकडूनही काहीच प्रयत्न झाले नसल्याचे दिसून येते.

### अ) **सामाजिक सुरक्षा योजनांचा लाभ देण्यातील अडचणी** :

या संदर्भात सरकारी कामगार अधिकारी यांच्याशीही चर्चा करण्यात आली होती. सामाजिक सुरक्षा कायदा व त्याअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजनांचा लाभ बांधकाम व्यवसायातील कामगारांना दिला जातो. उदा. गंवडी, बांधकाम मजुर इ. वीटभट्टी व्यवसायात वीटा तयार करण्याचे काम केले जाते व हे काम बांधकाम व्यवसायातील प्रत्यक्ष कामात मोडत नाही. त्यामुळे या योजनांचा लाभ वीटभट्टी कामगारांना देण्यात येत नसल्याचे सांगण्यात आले. थोडक्यात वीटभट्टी कामगार हे असंघटित कामगार असूनही योजनेतील तरतुदीनुसार सामाजिक सुरक्षेच्या लाभापासून ते वंचित राहत असल्याचे दिसून येते.

## ४.९ **सारांश** :

सदर प्रकरणात संशोधन अभ्यासाच्या उद्दिष्टांनुसार प्राथमिक माहितीचे विश्लेषण करण्यात आले आहे. यामध्ये अनेक प्रश्न हे बहुपर्यायी स्वरुपाचे होते तसेच उद्दिष्टांनुरुप आवश्यक अशाच प्रश्नाचे स्पष्टीकरण देण्यात आले आहे. त्याआधारे वीटभट्टी व्यवसायात काम करणाऱ्या ५ ते १४ वयोगटातील बालकांची व तुलनेने मुलींची शैक्षणिक व आरोग्य स्थिती योग्यरित्या स्पष्ट होते.

तसेच वीटभट्टी व्यवसाय व त्यातील बालकामगार या संदर्भात पूर्वी झालेल्या संशोधनाच्या आधारे हेच स्पष्ट होते की, वीटभट्टी व्यवसायातील बालकांच्या कामाची स्थिती, त्यामागील कारणे, बालकांची शैक्षणिक व आरोग्य स्थिती ही सार्वत्रिक स्वरुपाची आहे. यामध्ये काही अंशी फरक सोडल्यास महाराष्ट्र तसेच इतर बाहेरील राज्यांमध्ये सारखेपणाच दिसून आलेला आहे.

# प्रकरण पाचवे
# निष्कर्ष, गृहितकृत्यांची पडताळणी, शिफारशी व संशोधन अभ्यासाचा सारांश

## ५ संशोधन अभ्यासातील निष्कर्ष: प्रस्तावना

संशोधन अभ्यासाच्या उद्दिष्टांनुसार संकलित करण्यात आलेल्या प्राथमिक माहितीचे विश्लेषण करण्यात आले आहे. सदर माहितीच्या विश्लेषणावरुन महत्त्वाचे निष्कर्ष निदर्शनास येतात. संशोधन अभ्यासाच्या उद्दिष्टांनुसार आलेल्या निष्कर्षांची मांडणी पुढील प्रमाणे करण्यात आलेली आहे.

## ५.१ कामगार कुटुंबाच्या सर्वसामान्य स्थिती विषयक निष्कर्ष :

१. कराड तालुक्यात सर्वेक्षणातील ४० वीटभट्टयांवरती एकूण ३२० कामगार कुटुंबे आढळून आलेली आहेत.

२. कराड तालुक्यात वीटभट्टी व्यवसायामध्ये हंगामी स्थलांतरीत तसेच सर्वाधिक ८१ टक्के कुटुंबे ही कर्नाटक राज्यातून आलेली आहेत. उर्वरित १९ टक्के कामगार कुटुंबे ही महाराष्ट्र राज्यातील आहेत.

३. वीटभट्टीवरील ३२० कामगार कुटुंबांमध्ये एकूण १३२७ सदस्य आहेत. यामध्ये ५ ते १४ वयोगटातील ३३३ बालके आहेत. या ३३३ बालकांमध्ये ५७ टक्के मुले व ४३ टक्के मुली आहेत.

४. वीटभट्टी व्यवसायामध्ये कन्नड भाषिक कुटुंबांची संख्या सर्वाधिक असून ती ७८ टक्के आहे. उर्वरित कुटुंबापैकी १२ टक्के कुटुंबाची मातृभाषा मराठी व १० टक्के कुटुंबाची मातृभाषा कन्नड व ऊर्दु आहे.

५. वीटभट्टी कामगार कुटुंबामध्ये सर्वाधिक ३१ टक्के कुटुंबे अनुसूचित जातीची आहेत. तसेच ७० टक्के कुटुंबे ही हिंदू धर्मीय असून हे प्रमाण जास्त आहे.

## ५.२. कामगार कुटुंबांच्या कामाचे सामान्य स्वरुप यासंबंधीत निष्कर्ष :

१. कामगार कुटुंबांमध्ये वीटभट्टी हा मुख्य व्यवसाय असणारी सर्वाधिक ५९ टक्के कुटुंबे आहेत.

२. वीटभट्टीवरील सर्वाधिक ३८ टक्के कुटुंबे दिवसाला १००० ते १५०० वीटा बनवितात. तसेच दिवसाला ५०० ते १००० वीटा बनविणारी २८ टक्के कुटुंबे असून २३ टक्के कुटुंबे दिवसाला १५०० ते २००० वीटा बनवितात.

३. वीटभट्टीवरील कामगार कुटुंबांची कामाची वेळ ही वेगवेगळी असते. मध्यरात्र, सकाळ, दुपार, रात्र व संध्याकाळ अशा कोणत्याही वेळेत ते काम करतात. तसेच जास्त वीटा बनविण्यासाठी ते दिवस रात्रही कामे करतात.

४. सर्वात जास्त ४२ टक्के कुटुंबे ही सकाळपासून संध्याकाळपर्यंत वीटांचे काम करत असल्याचे दिसून येते. त्यामुळे कुटुंबातील बालके ही इतर सदस्यांबरोबर त्याच वेळेत वीटभट्टीची कामे करताना दिसून येतात.

५. वीटभट्टीवर ८ ते १० तास काम करणारी सर्वाधिक ६३ टक्के कुटुंबे आहेत. सर्वात कमी १५ टक्के कुटुंबे ही ६ ते ८ तास काम करणारी आहेत. तसेच सर्वाधिक १० ते १२ तास कामे करणारीही कुटुंबे असून ती २२ टक्के आहेत.

६. वीटभट्टी व्यवसायात बालकांच्या मदतीने एक कुटुंब जास्त वीटा बनवू शकते व त्यातून कुटुंबाला जास्त वेतन मिळते. म्हणूनच या व्यवसायातील बालके कुटुंबांच्या अर्थोत्पादनामध्ये प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्या सहभागी असतात.

### ५.३ वीटभट्टी व्यवसायातील बालकामगार व त्यांच्या कामाचे स्वरुप याविषयी निष्कर्ष :

१. वीटभट्टीवरील ३२० कुटुंबामध्ये ५ ते १४ वयोगटातील एकूण ३३३ बालके असून त्यामध्ये २९७ (८९ टक्के) बालके वीटभट्टीची कामे करत आहेत.

२. वीटभट्टीचे काम करणारी २९७ (८९ टक्के) बालके भट्टीवरील १६१ कामगार कुटुंबांमध्ये आढळून आली आहेत. या बालकांमध्ये १६८ (५० टक्के) मुले असून १२९ (३९ टक्के) मुलीं आहेत.

३. वीटभट्टी व्यवसायात प्रामुख्याने ७ वर्षापुढील काम करणाऱ्या बालकांचे प्रमाण अधिक असल्याचे दिसून येते.

४. सर्वाधिक ३४ टक्के बालके वीटा थापण्याचे काम करतात. तसेच वीटा वाहणे व भट्टी लावण्यासाठी मदत करण्याचे काम अनुक्रमे २८ टक्के व ३ टक्के बालके करत असून हे प्रमाण सर्वात कमी आहे.

५. वीटा पलटी करणे (३३ टक्के), वीटा थापण्यासाठी जमिन एकसमान करणे (३२ टक्के), वीटा रांगेत उभ्या करणे (३२ टक्के), माती कालविणे (३१ टक्के) इ. सर्वच प्रकारची कामे बालके कमी-अधिक प्रमाणात करताना दिसून येतात.

६. भट्टीवरती ५ ते ७ वर्षांची लहान बालके ही वीटा थापण्यासाठी जमिन सपाट करणे, वीटा पलटी करणे, वीटा रांगेत उभ्या करणे इ. हलक्या स्वरुपाच्या कामे अधिक प्रमाणात करताना दिसून येतात.

७. वीटभट्टी व्यवसायात कामाचे स्वरुप व गरजेनुसार सर्वाधिक ५४ टक्के बालके ही ६ ते ८ तास काम करत असून ८ तासापेक्षा जास्त वेळ कामे करणारी २८ टक्के बालके आहेत.

८. वीटांचे लक्ष्य पुर्ण करण्यासाठी कुटुंबियांसोबत बालके पहाटे, दुपारी, सकाळी, रात्री, संध्याकाळी अशा कोणत्याही वेळेत व पालक करतात तितका वेळ म्हणजचे जास्त वेळ काम करत असल्याचे दिसून येते.

## ५.४ कुटुंबातील मुलींच्या कामाच्या स्थिती विषयक निष्कर्ष :

१. वीटभट्टीवरील १६१ कुटुंबांपैकी १०३ कुटुंबामध्ये मुली आहेत.

२. वीटभट्टीच्या कामाबरोबर कुटुंबातील सर्वाधिक मुली घरातील धुणी-भांडी करणे (३१ टक्के) तसेच पिण्याचे व वापरण्याचे पाणी भरणे अथवा दुरुन वाहून आणणे (३१ टक्के) ही कामे करत असल्याचे दिसून येते. सर्वात कमी मुली (१३ टक्के) कुटुंबातील लहान भावंडांना संभाळण्याचे काम करताना दिसून येतात.

३. वीटभट्टी व्यवसायात कुटुंबातील मुलांच्या तुलनेत मुलींना अधिक कामे करावी लागतात असे दिसून येते. कारण वीटभट्टीचे काम करुन मुलींना घरातील सर्व कामे करावी लागतात.

४. एकूणच सातारा जिल्ह्यातील कराड तालुक्यातील वीटभट्टयांवरती मोठ्या संख्येने १४ वर्षाखालील बालके काम करताना दिसतात.

## ५.५ वीटभट्टी व्यवसायातील बालमजुरीच्या कारणासंबंधीत निष्कर्ष :

१. प्रामुख्याने कुटुंबाला ठरवून दिलेले वीटांचे लक्ष्य पुर्ण करावयाचे असते व बालकांनी काम केल्यास कुटुंबाला आर्थिक हातभार लागतो म्हणून बालकांना काम करावे लागत असल्याचे प्रमाण सर्वाधिक असून ते ४६ टक्के आहे.

२. शाळेत जात नसल्याने दिवसभर नुसते बसून राहण्यापेक्षा वीटभट्टीची कामे करतात (३० टक्के) तसेच स्थलांतराच्या काळात गावी संभाळण्यासाठी कोणीही नसल्याने बालके कुटुंबासोबत येतात व वीटभट्टीची कामे करु लागतात (२३ टक्के) इ. कारणे बालमजुरीस कारणीभूत असल्याचे दिसून येते.

३. वीटभट्टी व्यवसायात कामगार कुटुंबांना वीटा थापण्याच्या कामात बालकांची सर्वात जास्त मदत होते. जास्त वीटा तयार झाल्यास जास्त मजुरी मिळते म्हणूनच या व्यवसायात आजही बालमजुरी आढळते.

४. प्रामुख्याने शिक्षणाचा अभाव व कुटुंबांचे स्थलांतर यामुळे वीटभट्टी व्यवसायातील बालमजुरीत भर पडते.

## ५.६ बालकांच्या शैक्षणिक स्थिती विषयक निष्कर्ष :

१. वीटभट्टीवरील ५ ते १४ वयोगटातील एकूण ३३३ बालकांमध्ये शाळेत न जाणाऱ्या बालकांचे प्रमाण सर्वाधिक ४४ टक्के आहे. गावाकडे शाळेत जातात परंतु सद्यस्थितीत शाळेत जात नाहीत अशी एकूण १७ टक्के बालके आहेत.

२. वीटभट्टीवरील सर्वाधिक ६१ टक्के बालके सद्यस्थितीत शाळेत जात नाहीत.

३. सद्यस्थितीत शाळेत जात असलेली एकूण १०२ (३१ टक्के) बालके आहेत. परंतु त्यामध्ये शाळा व काम असे दोन्ही करणाऱ्या बालकांचे प्रमाण जास्त असून अशी ९८ बालके आहेत.

४. वीटभट्टीवरील ५ ते ६ वर्षांची केवळ ८ (२ टक्के) बालके अंगणवाडीत जात असून १९ (६ टक्के) बालके अंगणवाडीत जात नसल्याचे दिसून येते.

५. वीटभट्टीवरील बालकांमध्ये शाळेत न जाण्याऱ्या बालकांचे प्रमाण अधिक आहे. यामागे बालकांची शाळेत जाण्याची इच्छा नसणे हे प्रमुख कारण (सर्वाधिक ३५ टक्के) असल्याचे सांगण्यात आले आहे.

६. कन्नड भाषेतून शिक्षण उपलब्ध नसल्याने बालके शाळेत जात नसल्याचे प्रमाणही जास्त असून ते ३३ टक्के आहे.

७. कुटुंबांचे होणारे आर्थिक नुकसान व पालकांची शिक्षणाबाबतची उदासिनता या कारणांमुळेही बालके शाळेत जात नसल्याचे दिसून येते.

८. बालकांच्या शिक्षणासाठी उपलब्ध असलेल्या सुविधा तसेच वीटभट्टीपासून शाळेचे वा अंगणवाडीचे अंतर माहिती नसलेले ४२ टक्के पालक आहेत. यावरुन बालकांच्या शिक्षणाबाबत पालक उदासिन असल्याचे दिसून येते.

९. सद्यस्थितीत शाळेत जात असलेल्या १०२ बालकांना शाळेचे अंतर लांब असून शाळेत जाण्यासाठी वाहतुकीची व्यवस्था नसणे व भाषेची अडचण ह्या समस्या तीव्रतेने जाणवत असून त्याचे प्रमाण अनुक्रमे ४२ टक्के व ३६ टक्के आहे.

१०. शाळेत जाणाऱ्या बालकांना महामार्गावरुन पायी शाळेत जावे लागते (१८ टक्के) तसेच बिकट आर्थिक परिस्थितीमुळे बालकांच्या शिक्षणाचा खर्च परवडत नाही (४ टक्के) इ. समस्या जाणवत असल्याचे दिसून येते.

११. वीटभट्टीवरील बालकांच्या शिक्षणाबाबत पालक उदासिन असल्याचे दिसून येते. कारण केवळ ४८ टक्के पालकांना बालकांचे शिक्षण महत्त्वाचे वाटते.

१२. आर्थिक परिस्थितीमुळे बालकांना शिक्षण घेता येत नाही, कुटुबांच्या उदरनिर्वाहासाठी काम व पैसा महत्त्वाचा आहे तसेच बालकांना काम व पैसा मिळू शकेल असे शिक्षण मिळावे असे सर्वाधिक ५२ टक्के पालकांना वाटते.

१३. शिक्षणापेक्षा बालकांनी काम करुन पैसा मिळविणे पालकांच्या दृष्टीने अधिक महत्त्वपुर्ण असल्याचे दिसून येते.

१४. शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ नुसार वीटभट्टी व्यवसायातील बालके त्यास अपवाद ठरतात. कारण या व्यवसायात शाळेत जाणाऱ्या बालकांचे प्रमाण अत्यल्प आहे.

## ५.७ कुटुंबातील मुलींच्या शैक्षणिक स्थिती विषयक निष्कर्ष :

१. वीटभट्टीवरील ५ ते १४ वयोगटातील ३३३ बालकांमध्ये १४४ मुली आहेत.

२. वीटभट्टीवरील १४४ मुलींमध्ये कधीच शाळेत न जाणाऱ्या मुलींचे प्रमाण सर्वाधिक ४६ टक्के आहे. गावाकडे शाळेत जातात परंतु सद्यस्थितीत शाळेत जात नाहीत अशा एकूण १९ टक्के मुली आहेत.

३. वीटभट्टीवरील सर्वाधिक ६५ टक्के मुली सद्यस्थितीत शाळेत जात नाहीत.

४. शाळा व काम असे दोन्ही करत असलेल्या मुलींचे प्रमाण २६ टक्के असून पुर्ण वेळ व नियमितपणे शाळेत जात असलेल्या केवळ २ टक्के मुली आहेत.

५. वीटभट्टीवरील ५ ते ६ वर्षाच्या केवळ २ टक्के मुली अंगणवाडीत जात असून ५ टक्के मुली अंगणवाडीत जात नाहीत.

६. मुला-मुलींच्या शैक्षणिक स्थितीचा तुलनात्मरित्या विचार केल्यास शाळेत जाणाऱ्या मुलांचे प्रमाण (२० टक्के) हे मुलींपेक्षा (१४ टक्के) जास्त आहे.

७. वीटभट्टीवरील १६१ कुटुंबांपैकी १०३ कुटुंबात मुली आहेत. या कुटुंबातील मुलींना केवळ इयत्ता ६ वी ते ८ वी पर्यंत शिक्षण दिले जात असल्याचे प्रमाण सर्वाधिक ५० टक्के आहे.

८. कुटुंबातील मुलींना इयत्ता १२वी पर्यंत शिकू दिले जात असल्याचे प्रमाण सर्वात कमी ३ टक्केच असल्याचे दिसून येते.

९. मुलींच्या शिक्षणाबाबत पालकांचा दृष्टीकोन नकारात्मक असल्याचे दिसून येते. कारण सर्वाधिक ५७ टक्के पालकांना मुलींना शिक्षणाची गरज नाही असे वाटते. तसेच मुलींनी शिक्षण घेतले पाहिजे असे ४३ टक्के पालकांना वाटते.

१०. सर्वाधिक ५७ टक्के पालकांच्या मते मुली लग्न करुन सासरी जात असल्याने त्यांच्या शिक्षणावर खर्च करुन कुटुंबाला काहीच फायदा होत नाही.

११. मुलींची स्वतःची शाळा शिकण्याची इच्छा नसते तसेच मुली घरातील सर्व कामे करतात त्यामुळे मुली शाळेत गेल्यास घरकामाचा प्रश्न निर्माण होतो. या कारणांमुळे मुलींचे शिक्षण पालकांना महत्त्वाचे वाटत नसल्याचे दिसून येते.

## ५.८ सद्यस्थितीत वीटभट्टीवरील बालकांना उपलब्ध झालेल्या शैक्षणिक सुविधांविषयी निष्कर्ष :

१. वीटभट्टीवरील ५ ते १४ वयोगटातील शाळेत जाणाऱ्या बालकांपैकी केवळ १७ टक्के बालकांना मोफत गणवेश, शालेय साहित्य, पोषक आहार इ. सुविधा मिळाल्या आहेत. तसेच ५ टक्के बालकांना अंगणवाडीतून अनौपचारिक शिक्षणाचा लाभ मिळालेला आहे.

२. एकूण ७८ टक्के बालकांना शाळेमध्ये कोणत्याच शासकीय सुविधांचा लाभ मिळाला नसल्याचे दिसून येते.

३. वीटभट्टीवरील बालकांच्या शिक्षणासाठी वीटभट्टीवरती किंवा वीटभट्टी जवळील परिसरात औपचारिक/अनौपचारिक/व्यावसायिक अशा कोणत्याही स्वरुपाची शैक्षणिक सुविधा उपलब्ध नसल्याचे दिसून येते.

४. बालकांसाठी वीटभट्टीवरतीच औपचारिक वा अनौपचारिक शिक्षणाची तसेच निवासी शिक्षणाची सुविधा उपलब्ध झाल्यास बालके शाळेत जातील असे सर्वाधिक ४१ टक्के पालकांना वाटत आहे.

५. वीटभट्टीपासून शाळेचे अंतर जवळ असेल (१९ टक्के), कन्नड भाषेत शिक्षण मिळाले (१३ टक्के) तसेच व्यावसायिक शिक्षणाची सुविधा उपलब्ध झाल्यास (२५ टक्के) बालके शाळेत जाऊ लागतील असे पालकांचे म्हणणे आहे.

## ५.९ बालकांच्या आरोग्य स्थिती विषयक निष्कर्ष :

१. वीटभट्टी व्यवसायात बालकांना सतत उन्हात काम केल्याने चक्कर येणे, थकवा येणे तसेच थंडीत काम केल्याने सर्दी, खोकला, ताप अशा स्वरुपाचे संसर्गजन्य आजार होत असल्याचे प्रमाण सर्वाधिक २५ टक्के आहे.

२. बालकांना मान व पाठदुखीचा त्रास (१७ टक्के), शारिरीक इजा (१७ टक्के), अंग व डोकेदुखी (१३ टक्के), धुळ व धुराने श्वसनाचे त्रास (१२ टक्के), मातीच्या कामाने त्वचेचे आजार (८ टक्के) इ. त्रासही होत असतात.

३. वीटभट्टीवरील बालकांच्या कामाचे स्वरुप पाहता त्याचा परिणाम बालकांच्या शारिरीक वाढ व उंचीवर होताना दिसतो.

४. वीटभट्टीवरील बालकांना अशक्तपणा, अंग, कंबर व डोकेदुखी, विषाणूजन्य ताप, सर्दी- खोकला, जुलाब व उलट्या, कुपोषण, श्वसनाचे आजार, पोटांचे विकार, इ. स्वरुपाचे आजार अधिक प्रमाणात होत असल्याचे खाजगी दवाखान्यातील डॉक्टर तसेच वैद्यकीय अधिकारी यांनी सांगितले आहे.

५. वीटभट्टीवरील बालकांचे लसीकरण वेळेवर होत नाही. तसेच किशोरवयीन मुलींच्या मासिक पाळी संबंधीच्या अनेक तक्रारी असल्याचे दिसून येते.

६. मागील एका महिन्याभरात वीटभट्टी कुटुंबातील एकदा तसेच ३-४ वेळा आजारी पडलेल्या बालकांचे प्रमाण हे ४७ टक्के असून एकदाही आजारी न पडलेली ५३ टक्के बालके आहेत.

७. मागील एका महिन्यात बालके प्रामुख्याने सर्दी, खोकला, ताप, थकवा येणे, उलट्या होणे याचबरोबर जुलाब, अंगदुखी व डोकेदुखी, चक्कर येणे इ. करणाने आजारी पडल्याचे दिसून येते.

८. बालकांची व्यक्तिगत अस्वच्छता, वीटभट्टीवरील कामाच्या ठिकाणची तसेच राहत्या ठिकाणची अस्वच्छता हे देखील बालकांच्या आरोग्यविषयक समस्यांना कारणीभूत ठरत असल्याचे दिसून येते.

९. बालकांच्या आरोग्याच्या दृष्टीने त्यांना खेळण्यासाठी स्वच्छ परीसर असणे आवश्यक आहे. परंतु वीटभट्टी व्यवसायातील सर्वाधिक ७५ टक्के बालके वीटभट्टीवरील माती तसेच चिखलात खेळत असल्याचे दिसून येते.

१०. वीटभट्टीवर बालकांना खेळण्यासाठी कोणतीही स्वतंत्र सुविधा व स्वच्छ परिसर उपलब्ध नसल्याचे दिसून येते.

११. वीटभट्टीवरील सर्वाधिक ४५ टक्के बालकांना कामाच्या दरम्यान २ तास विश्रांती मिळत असल्याचे दिसून येते. तसेच विश्रांती न मिळणारी ७ टक्के बालके आहेत.

१२. वीटभट्टी कामानुसार कुटुंबातील इतर सदस्यांप्रमाणे रात्री, मध्यरात्री व पहाटे उठून बालकांना कामे करावी लागतात. त्यामुळे बालकांना खऱ्या अर्थाने विश्रांती मिळत नसल्याचे सर्वाधिक ३२ टक्के पालकांनी म्हटलेले आहे.

१३. दिवसा विश्रांतींच्या दरम्यान घरातील सर्व कामे करावी लागतात (१६ टक्के) तसेच वीटांचे लक्ष्य पूर्ण करावयाचे असते (७ टक्के) यामुळे दिवसा बालकांना विश्रांती मिळत असली तरी प्रत्यक्षात त्यांना विश्रांती मिळत नसल्याचे दिसते.

१४. वीटभट्टीच्या कामाबरोबर मुली घरातील सर्व कामेही करु लागतात त्यामुळे प्रामुख्याने मुलींना विश्रांती मिळत नाही. तसेच जी बालके शाळा व काम असे दोन्ही करतात त्यांना दिवसा विश्रांती घेताच येत नसल्याचे दिसून येते.

१५. बालकांचे वजन, उंची, रक्त तपासणी इ. नियमित आरोग्य तपासण्या होत नसल्याचे प्रमाण सर्वाधिक ९९ टक्के आहे. याबाबत सर्वाधिक ५४ टक्के पालकांना बालकांच्या नियमित आरोग्य तपासणीची गरज वाटत नाही.

१६. वीटभट्टी कामगार कुटुंबातील दैंनदिन आहारामध्ये सर्वाधिक (५६ टक्के) प्रमाणात दुध, अंडी, मांसाहार, पालेभाज्या, कडधान्ये, डाळी, फळभाज्या, फळे इ. पदार्थांचा समावेश होत असल्याचे दिसून येते.

१७. बालकांच्या उत्तम आरोग्यासाठी पुरक व पोषक आहार नियमित असणे आवश्यक आहे. यानुसार कुटुंबातील आहारात सर्व पोषक घटकांचा समावेश होत असता तरी तो नियमित नसल्याचे प्रमाण सर्वाधिक ४३ टक्के आहे.

१८. कुटुंबातील एकूण सदस्य व बालकांची संख्या जास्त असल्याने पालक बालकांच्या पुरक व पोषण आहाराकडे स्वतंत्रपणे लक्ष देत नसल्याचे दिसते.

१९. वीटभट्टी व्यवसायातील कामाच्या स्वरुपानुसार बालकांच्या आरोग्याला निर्माण होणाऱ्या धोक्यांचे स्वरुपही वेगवेगळे असल्याचे स्पष्ट होते.

## ५.१० आरोग्यसंबंधी उपचाराच्या स्थिती विषयक निष्कर्ष :

१. वीटभट्टीवरील सर्वाधिक ९५ टक्के कामगार कुटुंबे उपचारासाठी खाजगी दवाखान्यात जात असून केवळ ५ टक्के कुटुंबे सरकारी दवाखान्यात जातात.

२. सरकारी दवाखान्यात डॉक्टर, परिचारिका व इतर कर्मचाऱ्यांकडून व्यवस्थित वागणूक मिळत नाही म्हणून सरकारी दवाखान्यात जात नसलेल्या कुटुंबाचे प्रमाण सर्वाधिक ३० टक्के आहे.

३. दवाखान्याचे अंतर लांब असणे (१३ टक्के), दवाखान्यात जास्त वेळ लागतो (१२ टक्के), औषधोपचाराचा गुण येत नाही (८ टक्के), योग्य तपासणी व औषधोपचार मिळत नाही (१६ टक्के) इ. कारणांमुळे कामगार कुटुंबे उपचारासाठी सरकारी दवाखान्यात जात नसल्याचे दिसून येते .

४. वीटभट्टीवरील सर्वाधिक ८३ टक्के कुटुंबांना आरोग्यसंबधी कोणत्याही शासकीय सुविधांचा लाभ मिळाला नसल्याचे दिसून येते.

५. वीटभट्टीवरील केवळ ३ ते ६ वयोगटातील बालकांना केवळ ३ टक्के बालकांना अंगणवाडीतून पुरक व पोषण आहाराचा लाभ मिळालेला आहे.

६. बहुतांशी कामगार कुटुंबातील सदस्यांना सरकारी दवाखाना तसेच अंगणवाडीतून उपलब्ध होणाऱ्या सुविधांची माहिती नसल्याचे दिसून येते.

७. वीटभट्टी व्यवसायातील कामगार तसेच बालकांना आरोग्यसंबंधी उपचारासाठी मोफत व योग्य औषधोपचार मिळविण्याची कोणतीच सुविधा उपलब्ध नसल्याचे प्रकर्षाने दिसून येते.

## ५.११ कुटुंबातील मुलींच्या आरोग्य स्थिती विषयक निष्कर्ष :

१. वीटभट्टी व्यवसायात ५ ते १४ या अतिशय लहान वयातील मुली वीटभट्टी कामाबरोबरच घरातील धुणी-भांडी करणे, पाणी भरणे, स्वयंपाक करणे, लहान भावंडांना संभाळणे इ. सर्व कामे करताना दिसून येतात.

२. वीटभट्टीवरील सर्वाधिक २५ टक्के मुलींना वजन न वाढणे तसेच शारिरीक कमकुवतता यांसारख्या आरोग्य विषयक तक्रारी असल्याचे दिसून येते.

३. मुलींना थकवा, चक्कर व अशक्तपणा येणे (२३ टक्के), अंग व डोकेदुखी (२१ टक्के), संसर्गजन्य आजार होणे (१८ टक्के) तसेच रक्तक्षय (९ टक्के) अशा विविध स्वरुपाच्या आरोग्य समस्या असल्याचे दिसून येते.

४. वीटभट्टीवर काम करणाऱ्या सर्वाधिक मुली शारिरीक दृष्ट्या कमकुवत, अधिक थकलेल्या तसेच वयाच्या मानाने वजन व उंची खूपच कमी असलेल्या आहेत असे प्रत्यक्ष निरीक्षणात दिसून आले.

५. वयात आलेल्या सर्वाधिक ६९ टक्के मुलींना स्वतःची शारिरीक स्वच्छता व आरोग्याची काळजी याबाबत कुटुंबातूनच (माता) मार्गदर्शन मिळत आहे.

६. वीटभट्टीवरील मुलींना आरोग्याच्या संदर्भात पालक (माता) मार्गदर्शन करतात. परंतु याबाबतीत पालकच अज्ञानी असल्याचे दिसून येते.

७. वीटभट्टीवरील ५ ते १४ वयोगटातील मुलींचे वजन, उंची व रक्त इ. नियमित आरोग्य तपासण्या होत नसून हे प्रमाण सर्वाधिक ९४ टक्के आहे. केवळ ६ टक्के मुलींच्या नियमितपणे तपासण्या होत असल्याचे दिसून येते.

८. वीटभट्टीवरील १०३ कुटुंबामध्ये ५ ते १४ वयोगटातील एकूण १३५ मुली आहेत. त्यापैकी ५७ मुलींचे मासिक चक्र सुरु असून उर्वरित ७८ मुलींचे मासिक चक्र अद्याप सुरु झालेले नाही.

९. मासिक चक्रावेळी सर्वाधिक (३७ पालक) मुली कपड्याचा वापर करत असल्याचे दिसून येते. तसेच सॅनेटरी नॅपकीन किंवा पॅडस् वापरणाऱ्या मुली (१२ पालक) कमी आहेत.

१०. सर्वाधिक ३१ टक्के मुली दिवसातून केवळ एकच वेळा कपडा/ नॅपकीन बदलत असल्याचे दिसून येते. दिवसातून ३ ते ४ वेळा कपडा/नॅपकीन बदलत असलेल्या केवळ १५ टक्के मुली आहेत.

११. मासिक चक्रावेळी मुलींकडून आवश्यक त्या स्वच्छता पाळल्या जात नाहीत. तसेच त्याची जाणीवही बहुतांशी मुलींना नसल्याचे दिसून येते. याबाबत वीटभट्टीवरील मुलींना योग्य मार्गदर्शन मिळत नसल्याचे दिसून येते.

१२. वीटभट्टी व्यवसायातील सर्वाधिक ३२ टक्के मुलींना मासिक चक्रावेळी कंबर दुखीचा अधिक त्रास होत असल्याचे दिसते.

१३. वीटभट्टीवर मुली खाली वाकून वा बसून वीटा थापणे, वीटा भरणे, वीटा वाहणे इ. कामे जास्त प्रमाणात करतात. त्यामुळे मुलींना मोठ्या प्रमाणात कंबर दुखीचा त्रास होत असतो व पाळीच्या दिवसात तो त्रास जास्त जाणवतो.

१४. मासिक चक्रावेळी मुलींना पोट दुखणे (३० टक्के पालक), अंगदुखी व थकवा येणे (१५ टक्के पालक), कमी - अधिक रक्तस्त्राव (१४ टक्के पालक), उलट्या होणे (४ टक्के पालक) यासारख्या तक्रारी असल्याचे दिसून येते.

१५. मासिक चक्रावेळी त्रास होतो व तो स्त्रीयांना सहन करावाच लागतो अशी धारणा मुलींच्या मनावर बिंबवली जाते. त्यामुळे मुलीही स्वतःला होणाऱ्या त्रासाबाबत जागृत नसल्याचे दिसून येते.

१६. मासिक पाळी तसेच इतर आरोग्य विषयक तक्रारी असतानाही वीटभट्टी व घरातील कामे करणाऱ्या मुलींचे प्रमाण सर्वाधिक ९३ टक्के आहे. उर्वरित ७ टक्के मुलींना पुरेशी विश्रांती दिली जात असल्याचे दिसून येते.

१७. मुलींच्या आरोग्य विषयक तक्रारी असल्या तरी काम केलेच पाहिजे, कामाने काही होत नाही तसेच कुटुंबातील बालके आजारी असल्यास कुटुंबाचे आर्थिक नुकसान होते. म्हणून मुली आजारी असल्या तरी त्यांना काम करावे लागते असे सर्वाधिक ६१ पालकांनी सांगितले आहे.

१८. सातारा जिल्ह्यामध्ये किशोरवयीन मुलींसाठी 'सबला' नावाची योजना राबविण्यात येते. मात्र वीटभट्टीवरील काम करणाऱ्या एकाही मुलीला 'सबला' योजनेचा लाभ मिळालेला नाही.

१९. कायद्यान्वये मुलींच्या लग्नाची वयोमर्यादा १८ वर्षे आहे. परंतु वीटभट्टीवरील मुलींचे १३ ते १४ व्या वर्षी लग्न केले जात असून हे प्रमाण सर्वाधिक ५६ टक्के आहे. तसेच वयाच्या ११ ते १२ व्या वर्षीही मुलींचे लग्न केले जाते (७ टक्के).

२०. वीटभट्टीवर काम करणाऱ्या ५ ते १४ वयोगटातील बालकांच्या आरोग्यविषयक गरजा पुर्ण होताना दिसून येत नाहीत. या व्यवसायातील बालकांची आरोग्य स्थिती अधिक गुंतागुंतीची व दयनीय असल्याचे दिसून येते.

२१. मुलांच्या तुलनेत मुलीं अधिक कामे करतात व त्यांनाही आरोग्याशी संबंधित अनेक तक्रारी असतात. परंतु तुलनेने मुलींच्या आरोग्याकडे मोठ्या प्रमाणात दुर्लक्ष होताना दिसते.

## ५.१२ वीटभट्टी मालकांकडून पुरविण्यात आलेल्या सुविधांबाबत निष्कर्ष :

१. वीटभट्टी मालकांनी सर्वाधिक कामगार कुटुंबाना राहण्यासाठी घर (२५ टक्के) तसेच पिण्याच्या व वापरावयाच्या पाण्याची सुविधा (२५ टक्के) उपलब्ध करुन दिलेली आहे.

२. वीटभट्टी कामासाठी २२ टक्के कुटुंबांना मोफत वाहतुकीची सुविधा तसेच वीटभट्टीवरील २२ टक्के कुटुंबांना वीज उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

३. वीटभट्टीवर शौचालयाची सुविधा पुरविण्यात आलेली केवळ ६ टक्के कुटुंबे आहेत. त्यातही बहुतेक कुटुंबे सार्वजनिक शौचालयाचा वापर करत आहेत.

४. शौचालयाची सुविधा नसलेली कुटुंबे उघड्यावरती शौचास जात आहेत. तसेच बहुतांशी घरांमध्ये न्हाणीची सुविधा उपलब्ध नसल्याचे दिसून आले.

५. उघड्यावर शौचास जाणे व अंघोळ करणे या बाबी वीटभट्टी व्यवसायातील महिला व मुलींचे आरोग्य व सुरक्षिततेच्या दृष्टीने धोकादायक आहेत.

६. एकाही वीटभट्टी मालकांकडून बालकांना खेळण्यासाठी स्वच्छ व स्वतंत्र जागेची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही.

७. वीटभट्टी कामाच्या कालावधीत बालकांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये याकरिता एकाही वीटभट्टी मालकाने बालकांच्या शिक्षणासाठी स्वतःहून कोणतेही प्रयत्न केलेले नाहीत.

८. वीटभट्टी मालक बालकांच्या शिक्षणाबाबत उदासिन असून त्यात बालकांना शिक्षणासाठी प्रवृत्त करणे, त्यांच्या शिक्षणासाठी प्रयत्न करणे ही आपली जबाबदारी नाही असे मानणारे मालक अधिक आहेत.

९. बालके शाळेत गेल्यास कुटुंबाना ठरवून देण्यात आलेले वीटांचे लक्ष्य पुर्ण होत नाही. त्यामुळे मालकांचे आर्थिक नुकसान होते म्हणून बालकांच्या शिक्षणाबाबत वीटभट्टी मालक कोणतेही प्रयत्न करत नसल्याचे दिसून येते.

१०. वीटभट्टी मालकांकडून बालकांचे किरकोळ आजार किंवा दुखापतींवर मोफत औषधोपचार केले जात असल्याचे दिसते.

११. गंभीर स्वरुपाच्या आजारासाठी कामगार कुटुंबाना योग्यवेळी व आवश्यक पैसा पुरविला जातो व हा पैसा त्यांच्या वेतनातून वजा करुन घेतला जातो.

१२. केवळ एकाच वीटभट्टी मालकाने किरकोळ दुखापती किंवा आजार यासाठी वीटभट्टीवर फस्ट-एड-बॉक्सची सुविधा उपलब्ध करुन दिल्याचे दिसून आले.

१३. केवळ २ च वीटभट्टी मालकांनी खाजगी संस्थांच्या मदतीने भट्टीवरील कामगारांकरीता आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन केल्याचे सांगितले. मात्र असे कोणतेही शिबिर झाले नसल्याचे पालकांनी सांगितले आहे.

१४. कुटुंबातील लहान बालकांच्या लसीकरणाचे महत्त्व पालकांना समजावून सांगणारे ८ वीटभट्टी मालक आहेत. मात्र बालकांना त्याचा प्रत्यक्ष लाभ व्हावा म्हणून मालकांनी कोणतेही प्रयत्न केलेले नाहीत.

१५. वीटभट्टीवरील बालकांची आरोग्य स्थिती वा समस्यांबाबत मालकांनी विशेष प्रयत्न केल्याचे दिसून येत नाही.

### ५.१३ वीटभट्टीवरील बालकांसाठी उपलब्ध शासकीय सुविधा वा योजनांबाबत निष्कर्ष :

#### ५.१३.१ बालमजुरी निर्मुलन कायद्याची अंमलबजावणी व त्यातील अडचणी :

१. सातारा जिल्ह्यामध्ये 'बालमजुरी निर्मुलन कायदा' १९८६ व 'कृती दल' २००६ या कायद्याअंतर्गत बालमजुरी निर्मुलनासाठी कार्यवाही केली जाते.

२. सातारा जिल्ह्यात २०११ ते २०१६ या कालावधीत वीटभट्टीवरील एकाही बालकामगाराची कामातून मुक्तता व त्यांचे पुनर्वसन झालेले दिसून येत नाही.

३. सातारा जिल्ह्यात २०१३ पासून कायदेशीर कार्यवाहीमध्ये केवळ ८ धाडसत्रांचे आयोजन करण्यात आले आहे. त्यात २०१५-१६ च्या धाडसत्रांमध्ये १७ ते १८ वयोगटातील केवळ ३ बालकामगार आढळून आले होते.

४. सातारा जिल्हा २०११ मध्ये जिल्हाधिकारी कार्यालयाकडून 'बालकामगार मुक्त' म्हणून घोषित करण्यात आला होता व तेंव्हा पासून १४ वर्षाखालील एकही बालकामगार सापडला नसल्याचे सांगण्यात आले आहे.

५. प्रत्यक्ष संशोधन अभ्यासावेळी कराड तालुक्यातील वीटभट्टयांवरती २९७ बालकामगार आढळून आलेले आहेत.

६. मात्र कामगार कुटुंबातील बालके वीटभट्टीच्या कामात कुटुंबाला मदत करत असतात. त्यामुळे या व्यवसायाला घरगुती व्यवसायाचे (Domestic Work) स्वरुप प्राप्त होते. म्हणून सदर व्यवसायातील बालकांना १९८६ च्या कायद्यान्वये 'बालकामगार' म्हणून गणले जात नसल्याचे सांगण्यात आले आहे.

७. वीटभट्टीची पाहणी करताना कुटुंबातील बालके वीटभट्टीवर खेळताना दिसून येतात. त्यामुळे कार्यवाहीत अडचण येत असल्याचे सांगण्यात आले.

८. वीटभट्टी व्यवसायाला आस्थापना नसते, भट्टीवरील बालके विखुरलेली असतात, कन्नड भाषेमुळे कुटुंबांशी संवाद साधताना येणारी अडचण इ. कारणांमुळे या व्यवसायातील बालकामगारांविरुध्द कायदेशीर कार्यवाही करण्यात अनेक अडचणी येत असल्याचे दिसून येते.

९. शासकीय विभागातील अधिकारी किंवा सदस्यांचे अपेक्षित सहकार्य न मिळणे तसेच मनुष्यबळाचा अभाव यामुळे बालकामगारांविरुध्द कृती दलामार्फत धाडसत्रांचे आयोजन करण्यात अडचण येत असल्याचे दिसून येते.

**५.१३.२ बालकांसाठी शैक्षणिक सुविधा व त्यातील अडचणी** :

१. वीटभट्टी जवळील परिसरात एकूण ६ प्राथमिक शाळा असल्याचे आढळून आले. वीटभट्टीपासून या शाळेंचे अंतर जवळ असल्याने वीटभट्टीवरील काही बालके या शाळांमध्ये जात असल्याचे दिसून आले.

२. 'आरटीई'नुसार वीटभट्टी परिसरातील शाळांमध्ये स्थलांतरित कुटुंबातील २० बालकांना वयानुरुप समकक्षेत दाखल करुन घेतल्याचे दिसून येते.

३. शाळेमध्ये स्थानिक वीटभट्टी कामगार कुटुंबातील बालकांचे प्रमाण अधिक असून ते नियमित शाळेत येतात. त्यामुळे त्यांना मोफत गणवेश, पोषक आहार, शालेय पाठ्यपुस्तके इ. सर्व शालेय सुविधांचा लाभ देण्यात येतो.

४. शाळेमध्ये हंगामी स्थलांतरीत कुटुंबातील बालके कमी प्रमाणात येतात व ती अनियमित असतात. त्यामुळे या बालकांना सर्वच शालेय सुविधांचा लाभ देता येत नाही.

५. हंगामी स्थलांतरित बालकांना शालेय गणवेश, पाठयपुस्तके, लेखन साहित्य इ. शाळेकडे उपलब्ध असल्यास पुरविण्यात येते. अन्यथा केवळ रोजच्या पोषक आहाराची बालकांना देण्यात येत असल्याचे दिसून येते.

६. वीटभट्टीवरील बालकांच्या शिक्षणासाठी शाळेतील शिक्षक वा मुख्याध्यापक यांनी व्यक्तिगत पातळीवर विशेष कोणतेही प्रयत्न केलेले नाहीत. तसेच शिक्षण विभागाकडूनही स्वंतत्ररित्या कोणतीही विशेष योजना राबविली जात नाही.

७. शासन निर्णय २०११ नुसार सातारा जिल्ह्यात हंगामी स्थलांतरीत बालकामगारांसाठी वसतीगृहांची योजना राबविली जाते. परंतु ही वसतीगृहे वीटभट्टी परिसरापासून खूप दूर असल्याने या सुविधेचा लाभ वीटभट्टीवरील बालकांना होत नसल्याचे दिसून येते.

८. वीटभट्टीवरील बालके मोठया प्रमाणात विखुरलेली असतात तसेच कन्नड भाषिक शिक्षक उपलब्ध होऊ शकत नाही या प्रमुख अडचणींमुळे वीटभट्टीवरील बालकांचे शैक्षणिक पुनर्वसन करणे शक्य होत नसल्याचे दिसून येते.

**५.१३.३ अंगणवाडीमार्फत उपलब्ध सुविधांचा लाभ व त्यातील अडचणी** :

१. वीटभट्टी परिसरातील १० अंगणवाड्यांमध्ये कामगार कुटुंबातील ४५ बालके येत असून यामध्ये हंगामी स्थलांतरीत कुटुंबातील ८ च बालके आहेत.

२. स्थानिक कामगार कुटुंबातील बालके अंगणवाडीमध्ये पूर्ण वेळ बसतात व अनौपचारिक शिक्षण, लसीकरण, पोषण आहार इ. सर्व सुविधांचा लाभ घेतात.

३. हंगामी स्थलातंरीत कुटुंबातील बालके अंगणवाडीत पुर्ण वेळ बसत नसून केवळ पुरक व पोषण आहार घेण्यासाठी अंगणवाडीत येत असल्याचे सांगण्यात आले.

४. वीटभट्टीवरील ९ ते १४ वयोगटातील एकाही किशोरवयीन मुलींस अंगणवाडी मार्फत 'सबला' योजनाचा लाभ मिळालेला नाही.

५. विखुरलेली बालके, त्यांची कन्नड भाषा, कुटुंबातील पालकांचे व किशोरवयीन मुलींचे असहकार्य इ. मुळे वीटभट्टीवरील बालकांना अंगणवाडीतील उपलब्ध सुविधांचा लाभ मिळवून देण्यात अडचण येत असल्याचे दिसून येते.

**५.१३.४ आरोग्यसंबंधी उपलब्ध शासकीय सुविधा व त्यातील अडचणी** :

१. उपचारासाठी सरकारी दवाखान्यात येणारे वीटभट्टी कामगार तसेच बालके संख्येने खूप कमी आहेत. त्यामुळे दवाखान्यातील मोफत औषधोपचार व इतर सुविधांचा लाभ घेतलेले कामगार व बालकांचे प्रमाण हे अत्यंत कमी आहे.

२. वीटभट्टीवरील काही बालकांना सर्दी- खोकला, दमा, ताप, कंबरदुखी, अंग व डोकेदुखी, पोलिओ, उलट्या, जुलाब तसेच बालकांचे कुपोषण, अशक्तपणा इ. तपासण्या व औषधोपचाराच्या मोफत सुविधा पुरविण्यात आल्याचे दिसते.

३. वीटभट्टीवरील किशोरवयीन मुलींना मासिक पाळी, त्यांसबंधीत तक्रारी, आहार व व्यक्तिगत स्वच्छता याविषयी मार्गदर्शन करण्यात आल्याचे सांगण्यात आले.

४. वीटभट्टीवरील सर्वाधिक कामगार कुटुंबे उपचारासाठी खाजगी दवाखान्यात जातात. त्यामुळे त्यांना सरकारी दवाखान्यातील मोफत शासकीय सुविधांचा लाभ मिळत नसल्याचे दिसून येते.

५. कन्नड भाषेमुळे कामगार व बालकांशी संवाद साधणे, त्यांचा त्रास समजून घेणे व त्यानुसार औषधोपचार करण्यात अडचणी येत असल्याचे सांगण्यात आले.

एकूणच वीटभट्टी व्यवसायात काम करणाऱ्या बालकांची शैक्षणिक व आरोग्य स्थिती खालावलेली दिसून येते. शिक्षण, आरोग्य व इतर बाबतही या बालकांना शासकीय सुविधांचा लाभ योग्यरित्या व पुरेश्या प्रमाणात मिळत नसल्याचे दिसून येते. थोडक्यात वीटभट्टी व्यवसायात काम करणारी बालके त्यांचे बालपण, चांगले शिक्षण व आरोग्य मिळण्याच्या हक्कांपासून अद्यापही वंचित असल्याचे दिसून येते.

### ५.१४ गृहितकृत्यांची पडताळणी :

संशोधन अभ्यासासाठी मांडण्यात आलेल्या गृहितकृत्यांची पडताळणी SPSS (Statistical Package for the Social Sciences) च्या माध्यमातून करण्यात आलेली आहे. त्यानुसार गृहितकृत्यांचे सविस्तर विश्लेषण पुढील प्रमाणे आहे.

### ५.१४.१ वीटभट्टी व्यवसायात १४ वर्षाखालील बालके काम करतात.

१) याकरीता वीटभट्टी कामगार कुटुंबातील एकूण सदस्यांचे वय व त्यांच्या कामाची स्थिती यातील सहसंबंध पडताळून पाहण्यात आला.

**कामगार कुटुंबातील सदस्यांचे वय व कामाची स्थिती यातील सहसंबंध दर्शविणारी सारणी**

Age * Working Status Crosstabulation

| | | Working Status | | | Total |
|---|---|---|---|---|---|
| | | होय | नाही | लागू नाही | |
| Age | 1.00 | 0 | 0 | 14 | 14 |
| | 2.00 | 0 | 0 | 19 | 19 |
| | 3.00 | 0 | 1 | 22 | 23 |
| | 4.00 | 0 | 2 | 25 | 27 |
| | 5.00 | 2 | 21 | 0 | 23 |
| | 6.00 | 18 | 14 | 0 | 32 |
| | 7.00 | 29 | 1 | 0 | 30 |
| | 8.00 | 25 | 0 | 0 | 25 |
| | 9.00 | 24 | 0 | 0 | 24 |
| | 10.00 | 43 | 0 | 0 | 43 |
| | 11.00 | 27 | 0 | 0 | 27 |
| | 12.00 | 47 | 0 | 0 | 47 |
| | 13.00 | 37 | 0 | 0 | 37 |
| | 14.00 | 45 | 0 | 0 | 45 |
| | 15.00 | 53 | 0 | 0 | 53 |
| | 16.00 | 51 | 1 | 0 | 52 |
| | 17.00 | 30 | 1 | 0 | 31 |
| | 18.00 | 32 | 1 | 0 | 33 |
| | 19.00 | 25 | 0 | 0 | 25 |
| | 20.00 | 43 | 0 | 0 | 43 |
| | 21.00 | 15 | 0 | 0 | 15 |
| | 22.00 | 23 | 0 | 0 | 23 |
| | 23.00 | 11 | 0 | 0 | 11 |
| | 24.00 | 9 | 0 | 0 | 9 |
| | 25.00 | 54 | 1 | 0 | 55 |
| | 26.00 | 11 | 0 | 0 | 11 |
| | 27.00 | 9 | 0 | 0 | 9 |
| | 28.00 | 20 | 0 | 0 | 20 |
| | 29.00 | 3 | 0 | 0 | 3 |
| | 30.00 | 75 | 0 | 0 | 75 |
| | 31.00 | 8 | 0 | 0 | 8 |
| | 32.00 | 30 | 0 | 0 | 30 |
| | 33.00 | 10 | 0 | 0 | 10 |
| | 34.00 | 11 | 0 | 0 | 11 |
| | 35.00 | 72 | 2 | 0 | 74 |
| | 36.00 | 8 | 0 | 0 | 8 |
| | 37.00 | 15 | 0 | 0 | 15 |
| | 38.00 | 31 | 0 | 0 | 31 |
| | 39.00 | 6 | 0 | 0 | 6 |
| | 40.00 | 91 | 1 | 0 | 92 |
| | 41.00 | 4 | 0 | 0 | 4 |
| | 42.00 | 15 | 0 | 0 | 15 |
| | 43.00 | 4 | 0 | 0 | 4 |
| | 44.00 | 2 | 0 | 0 | 2 |
| | 45.00 | 51 | 0 | 0 | 51 |
| | 46.00 | 4 | 0 | 0 | 4 |
| | 47.00 | 8 | 0 | 0 | 8 |
| | 48.00 | 6 | 0 | 0 | 6 |
| | 49.00 | 3 | 0 | 0 | 3 |
| | 50.00 | 28 | 0 | 0 | 28 |
| | 51.00 | 4 | 0 | 0 | 4 |
| | 52.00 | 2 | 0 | 0 | 2 |
| | 53.00 | 4 | 0 | 0 | 4 |
| | 55.00 | 7 | 0 | 0 | 7 |
| | 56.00 | 2 | 0 | 0 | 2 |
| | 58.00 | 1 | 0 | 0 | 1 |
| | 60.00 | 4 | 1 | 0 | 5 |
| | 65.00 | 2 | 0 | 0 | 2 |
| | 70.00 | 1 | 0 | 0 | 1 |
| | 75.00 | 1 | 0 | 0 | 1 |
| | 99.00 | 4 | 0 | 0 | 4 |
| Total | | 1200 | 47 | 80 | 1327 |

| Chi-Square Tests | | | |
|---|---|---|---|
| | Value | Df | Asymptotic Significance (2-sided) |
| Pearson Chi-Square | 1991.121[a] | 120 | .000 |
| Likelihood Ratio | 844.024 | 120 | .000 |
| Linear-by-Linear Association | 182.737 | 1 | .000 |
| N of Valid Cases | 1327 | | |

a. 137 cells (74.9%) have expected count less than 5. The minimum expected count is .04.

वरील सारणी वीटभट्टी कामगार कुटुंबातील सर्व सदस्यांचे वय व कामाची स्थिती यांच्यातील सहसंबंध दर्शविते. या सदस्यांमध्ये कुटुंबातील ५ ते १४ वयोगटातील बालकांचाही समावेश आहे. जे सदर संशोधन अभ्यासाचे लक्ष्यगट आहे. सदस्यांचे वय व कामाची स्थिती यातील सहसंबंध दर्शविण्यासाठी संशोधकाने **Chi Square** चाचणीचा वापर केला आहे.

यातील Crosstab सारणीवरुन असे स्पष्ट होते की, वीटभट्टी कामगार कुटुंबांमध्ये एकूण १३२७ सदस्य आहेत. त्यामध्ये १ ते ४ वयोगटातील ८३ बालके असून ही बालके काम करत नाही. ५ ते १४ वयोगटातील एकूण ३३३ बालके असून त्यापैकी २९७ बालके वीटभट्टीवर कामे करत आहेत. १५ ते १८ वयोगटातील १६९ सदस्य असून त्यापैकी १६६ सदस्य काम करत आहेत. तसेच कामगार कुटुबांमध्ये ४० वर्षापुढील एकूण १५८ सदस्य असून त्यातील १५७ सदस्य काम करत आहेत. म्हणजेच वीटभट्टी कुटुंबातील एकूण सदस्यांपैकी १२०० सदस्य वीटभट्टीवरती काम करत आहेत. त्यामध्ये ५ ते १४ वयोगटातील २९७ बालकांचा समावेश असल्याचे स्पष्ट होते.

यानुसार वरील **Chi Square** चाचणीवरुन असे दिसून येते की, वीटभट्टी कामगार कुटुंबातील एकूण १३२७ सदस्यांचे वय व त्यांच्या कामाची स्थिती यातील सहसंबंध हा **Less than 0.05** च्या तुलनेत **0.04** इतका आलेला आहे. म्हणजेच वीटभट्टी कामगार कुटुंबातील सदस्यांचे वय व कामाची स्थिती या दोन्ही चलामधील सहसंबंध सकारात्मक असल्याचे स्पष्ट होते.

यावरुन असे निष्कर्षास येते की, वीटभट्टी व्यवसायात १४ वर्षाखालील बालके काम करत आहेत हे गृहितकृत्ये सिध्द होते.

२) तसेच वीटभट्टी कामगार कुटुंबातील केवळ ५ ते १४ वयोगटातील बालके व त्यांच्या कामाची स्थिती या दोन चलांमधील सहसंबंध दर्शविण्यासाठी **Correlation (2-tailed)** चाचणी वापरण्यात आली. याबाबतची सारणी पुढीलप्रमाणे आहे.

**५ ते १४ वयोगटातील बालके व कामाची स्थिती दर्शविणारी सारणी**

| Correlations | | | |
|---|---|---|---|
| | | Child Age | Working Status |
| Child Age | Pearson Correlation | 1 | -.554** |
| | Sig. (2-tailed) | | .000 |
| | N | 333 | 333 |
| Working Status | Pearson Correlation | -.554** | 1 |
| | Sig. (2-tailed) | .000 | |
| | N | 333 | 333 |
| **. Correlation is significant at the 0.01 level (2-tailed). | | | |

वरील **Correlation** (2-tailed) सारणीवरुन असे स्पष्ट होते की, वीटभट्टी कामगार कुटुंबामध्ये ५ ते १४ वयोगटातील एकूण ३३३ बालके आहेत. सदर ३३३ बालकांचे वय व त्यांच्या कामाची स्थिती यातील सहसंबंध हा **Less than 0.05** च्या तुलनेत **0.01** इतका आलेला आहे. म्हणजेच ५ ते १४ वयोगटातील बालके व त्यांच्या कामाची स्थिती या दोन चलांमधील सहसंबंध हा सकारात्मक आहे.

यावरुन वीटभट्टी व्यवसायात १४ वर्षाखालील बालके काम करतात हे गृहितकृत्य सिध्द होते.

**५.१४.२ बालमजुरीमुळे बालकांच्या शैक्षणिक स्थितीवर परिणाम होतो. बालके शाळाबाह्य राहतात.**

१) याकरीता वीटभट्टी कामगार कुटुंबातील एकूण सदस्यांच्या कामाची स्थिती व शैक्षणिक स्थिती यातील सहसंबंध पडताळून पाहण्यात आला.

**कामगार कुटुंबातील सदस्यांच्या कामाची स्थिती व शैक्षणिक स्थिती यातील सहसंबंध दर्शविणारी सारणी**

| Correlations | | | |
|---|---|---|---|
| | | Educational Status | Working Status |
| Educational Status | Pearson Correlation | 1 | .065* |
| | Sig. (2-tailed) | | .019 |
| | N | 1327 | 1327 |
| Working Status | Pearson Correlation | .065* | 1 |
| | Sig. (2-tailed) | .019 | |
| | N | 1327 | 1327 |

*. Correlation is significant at the 0.05 level (2-tailed).

वरील सारणी वीटभट्टी कामगार कुटुंबातील सर्व सदस्यांच्या कामाची स्थिती व शैक्षणिक स्थिती दर्शविते. वीटभट्टी कामगार कुटुंबामध्ये एकूण १३२७ सदस्य आहेत. यामध्ये ५ ते १४ वयोगटातील काम करणाऱ्या बालकांचा समावेश आहे. जे सदर संशोधन अभ्यासाचे लक्ष्यगट आहेत. तसेच कामाच्या स्थितीमध्ये कुटुंबातील सदस्य काम करत आहेत किंवा नाही हे दर्शविण्यात आले आहे. शैक्षणिक स्थितीमध्ये प्रामुख्याने कुटुंबातील सदस्य शाळेत/अंगणवाडी किंवा महाविद्यालयात जात आहेत किंवा नाही इ. घटकांचा समावेश आहे. यानुसार कामगार कुटुंबातील सदस्यांच्या कामाची स्थिती व शैक्षणिक स्थिती दर्शविण्यासाठी संशोधकाने **Correlation** (2-tailed) चाचणीचा वापर केला आहे.

याबाबत वरील **Correlation** (2-tailed) सारणीवरुन असे स्पष्ट होते की, सदस्यांच्या कामाची स्थिती व शैक्षणिक स्थिती यातील सहसंबंध हा **Less than 0.05** च्या तुलनेत **0.05** इतका आलेला आहे. म्हणजेच सदस्यांच्या कामाची स्थिती व शैक्षणिक स्थिती या दोन चलांमधील सहसंबंध हा सकारात्मक आहे.

कामगार कुटुंबातील सदस्यांमध्ये ५ ते १४ वयोगटातील काम करणाऱ्या बालकांचा तसेच त्यांच्या शैक्षणिक स्थितीचाही समावेश आहे. त्यामुळे कामाची स्थिती व शैक्षणिक स्थिती या दोन्ही चलामधील आलेला सकारात्मक सहसंबंध हा ५ ते १४ वयोगटातील बालकांसाठीही लागू होतो.

यावरुन असे निष्कर्षास येते की, बालमजुरीमुळे बालकांच्या शैक्षणिक स्थितीवर परिणाम होतो. बालके शाळाबाह्य राहतात हे गृहितकृत्य सिध्द होते.

२) तसेच वीटभट्टी कामगार कुटुंबामध्ये ५ ते १४ वयोगटातील एकूण ३३३ बालके आहेत. त्यातील २९७ बालके वीटभट्टीचे काम करत आहेत. त्यामुळे प्रामुख्याने ५ ते १४ वयोगटातील बालकांच्या कामाची स्थिती व त्यांची शैक्षणिक स्थिती यांच्यातील सहसंबंध दर्शविण्यासाठी संशोधकाने **Correlation** (2-tailed) चाचणीचा वापर केला आहे. याबाबतची सारणी पुढीलप्रमाणे आहे.

**५ ते १४ वयोगटातील बालकांच्या कामाची स्थिती व शैक्षणिक स्थिती यातील सहसंबंध दर्शविणारी सारणी**

**Correlations**

| | | Working Status | child education Status |
|---|---|---|---|
| Working Status | Pearson Correlation | 1 | .443** |
| | Sig. (2-tailed) | | .000 |
| | N | 333 | 333 |
| child education Status | Pearson Correlation | .443** | 1 |
| | Sig. (2-tailed) | .000 | |
| | N | 333 | 333 |

**. Correlation is significant at the 0.01 level (2-tailed).

वरील **Correlation** (2-tailed) सारणीवरुन कामगार कुटुंबातील ५ ते १४ वयोगटातील बालकांच्या कामाची स्थिती व शैक्षणिक स्थिती यातील सहसंबंध स्पष्ट होतो. यावरुन असे दिसून येते की, वीटभट्टी कामगार कुटुंबातील ५ ते १४ वयोगटातील एकूण ३३३ बालकांच्या कामाची स्थिती व शैक्षणिक स्थिती यातील सहसंबंध हा **Less than 0.05** च्या तुलनेत **0.01** इतका आलेला आहे. म्हणजेच बालकांच्या कामाची स्थिती व शैक्षणिक स्थिती या दोन्ही चलामधील सहसंबंध सकारात्मक असल्याचे स्पष्ट होते.

थोडक्यात वीटभट्टी व्यवसायात मोठ्या प्रमाणात ५ ते १४ वयोगटातील बालके काम करत आहे. ही बालके दिवसभर किंवा वीटभट्टी कामाच्या वेळेनुसार तसेच अधिक तास वीटभट्टीवर कामे करतात त्यामुळे बालके शाळेत जात नाहीत.

यावरुन असे निष्कर्षास येते की, वीटभट्टी व्यवसायात १४ वर्षाखालील बालके काम करत आहेत व बालमजुरीमुळे बालकांच्या शैक्षणिक स्थितीवर परिणाम होतो. बालके शाळाबाह्य राहतात हे गृहितकृत्य सिध्द होते.

**५.१४.३ वीटभट्टी व्यवसायानुरुप बालकामगारांच्या आरोग्य समस्या असतात.**

सदर संशोधन अभ्यासासाठी वीटभट्टी कामगार कुटुंबांकडून प्राथमिक माहिती घेण्यात आली होती. यानुसार वीटभट्टी व्यवसायात प्रामुख्याने ५ ते १४ वयोगटातील सर्वाधिक २९७ बालके काम करत आहेत. वीटभट्टीचे काम करताना बालके जी कामे करतात त्यानुसार बालकांच्या अनेक आरोग्य समस्या असल्याचे दिसून येते. याबाबत प्राप्त प्राथमिक माहितीच्या आधारे वीटभट्टी व्यवसायानुरुप ५ ते १४ वयोगटातील बालकांच्या आरोग्य विषयक धोक्यांची किंवा समस्यांची स्थिती दर्शविणारी सारणी पुढे देण्यात आली आहे.

**वीटभट्टी व्यवसायानुरुप बालकांच्या आरोग्य विषयक समस्या**

(**बहुपर्यायी उत्तरे**)

| अ. क्र. | बालकांच्या आरोग्य विषयक समस्या | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | शारिरीक इजा | १०४ | १७% |
| २ | चक्कर, थकवा येणे तसेच सर्दी-खोकला, ताप इ. संसर्गजन्य आजार | १५६ | २५% |
| ३ | शारिरीक वाढ व उंची खुंटणे | ४३ | ७% |
| ४ | श्वसनाचा त्रास | ७८ | १२% |
| ५ | अंग व डोकेदुखी | ८२ | १३% |
| ६ | त्वचेचे आजार | ५० | ८% |
| ७ | मणका व पाठदुखीचा त्रास | ११० | १७% |
| ८ | आरोग्यसंबंधी काही धोके नाहीत | ६ | १% |
| **एकूण** | | **६२९** | **१००%** |

वरील सारणीवरुन वीटभट्टी व्यवसायात कामानुसार बालकांच्या आरोग्यसंबंधीत अनेक समस्या असल्याचे स्पष्ट होते. याविषयी कामगार कुटुंबानी बहुपर्यायी मते मांडलेली आहेत. यामध्ये बालकांना सतत उन्हात काम केल्याने चक्कर व थकवा येणे तसेच सर्दी - खोकला, ताप इ. संसर्गजन्य आजार होत असल्याचे प्रमाण सर्वाधिक २५ टक्के आहे. तसेच मणका व पाठदुखीचा त्रास (१७ टक्के), शारिरीक इजा (१७ टक्के), अंग व डोकेदुखी (१३ टक्के), माती-वीटांच्या धुळीने, भट्टीच्या धुराने श्वसनाचे आजार (१२ टक्के) तसेच त्वचेचे आजार (८ टक्के), गरजेनुसार उंची व

वजन न वाढणे (७ टक्के) इ. अनेक प्रकारच्या आरोग्य विषयक समस्यांना बालकांना सामोरे जावे लागत असल्याचे स्पष्ट होते.

यावरुन असे निष्कर्षास येते की, वीटभट्टी व्यवसायानुरुप बालकामगारांच्या आरोग्य विषयक समस्या असतात हे संशोधन अभ्यासासाठी मांडण्यात आलेले गृहितकृत्य सिध्द होते.

### ५.१५ प्रमुख शिफारशी :

प्रमुख निष्कर्ष विचारात घेता वीटभट्टी व्यवसायातील बालमजुरी निर्मुलन, या व्यवसायातील बालकांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणे व टिकवून ठेवणे तसेच त्यांच्या आरोग्य स्थितीत सुधारणा घडवून आणणे यासाठी विशेष प्रयत्नांची गरज आहे. या दृष्टीने पुढील काही उपाययोजना सुचविण्यात आल्या आहेत.

### ५.१५.१ कामगार विभागासाठी शिफारशी :

१. वीटभट्टी व्यवसायातील बालमजुरी निर्मुलनासाठी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. त्याकरीता कायद्याची अंमलबजावणी करणारी यंत्रणा अधिक सक्षम करणे, ठराविक कालावधी नंतर अधिकारी वर्गासाठी प्रशिक्षणांचे आयोजन करण्यात यावे.

२. कामगार विभागातील रिक्त पदे त्वरित भरणे आवश्यक आहे. जेणेकरुन आवश्यक मनुष्य बळ उपलब्ध होईल व कायद्याच्या कार्यवाहीतील महत्त्वाचा अडथळा दूर करता येईल.

३. वीटभट्टी व्यवसायातील बालमजुरीस प्रतिबंध घालण्याच्या दृष्टीने वीटभट्टी हंगामात ६ महिन्याच्या कालावधीत वेळावेळी वीटभट्टीवरती धाडसत्रांचे आयोजन करणे. जेणेकरुन धाडसत्रांद्वारे बालकामगारांची मुक्तता करता येईल. तसेच वेळोवेळी केलेल्या धाडसत्रांमुळे कामगार कुटुंबांमध्ये भीती निर्माण होऊन कुटुंबांकडून बालकांना कामास लावण्याच्या कृतीस जरब बसेल.

### ५.१५.२ शिक्षण विभागासाठी शिफारशी :

वीटभट्टी कामगार कुटुंबातील ६ ते १४ वयोगटातील बालके वीटभट्टीवर राहिली तर ती कामे करणारचं. त्यामुळे जर ही बालके शाळेत गेली तर त्यांची बालमजुरीच्या चक्रातून सुटका होऊ शकते. त्याकरीता बालकांच्या शिक्षणाच्या दृष्टीने खालील शिफारशी सुचविण्यात आल्या आहेत.

१. उसतोड कामगार कुटुंबाच्या बालकांसाठी असलेल्या वस्ती शाळांप्रमाणे वीटभट्टीवरील बालकांसाठीही वीटभट्टयांवरती ६ महिन्याच्या कालावधीत औपचारिक शिक्षणाची सुविधा निर्माण करण्यात यावी. प्रामुख्याने कन्नड भाषिक शिक्षिकांची व्यवस्था करणे आवश्यक आहे.

२. साधारणतः वीटभट्टया एकमेकांपासून जवळील अंतरावरच असतात. त्यामुळे ९ ते १० वीटभट्टयावरील बालकांना एकत्रित करुन त्यांच्यासाठी वीटभट्टीवरती शिक्षणाची व्यवस्था निर्माण केली जावी.

३. वीटभट्टीवरती शिक्षणाची व्यवस्था निर्माण करणे शक्य न झाल्यास वीटभट्टीवरील बालकांना जवळील प्राथमिक शाळांमध्ये प्रवेश मिळवून देणे, आवश्यक सर्व शैक्षणिक सुविधा उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी शिक्षण विभागाकडून पार पाडण्यात यावी.

४. शिक्षण विभागामार्फत वीटभट्टीवरील बालकांना शाळेत जाण्यासाठी वाहतुकीची सुविधा उपलब्ध करुन देण्यात यावी. तसेच जवळील शाळेमध्ये कन्नड भाषिक शिक्षिक उपलब्ध करुन देण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

५. वीटभट्टीवरील बालकांसाठी ६ महिन्यासाठी तालुका स्तरावर वसतीगृह सुरु करता येऊ शकते. मात्र वसतीगृह हे वीटभट्टी जवळील परिसरात सुरु करुन त्यामध्ये वीटभट्टीवरील बालकांना प्रवेश देण्यासाठी प्रयत्न केले जावेत.

६. वीटभट्टीवरील ३ ते ६ वयोगटातील बालकांसाठी हंगामी अंगणवाड्यांची व्यवस्था करणे व बालकांना अंगणवाडीतील सर्व सुविधांचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे.

७. वीटभट्टीवरील पालकांना बालकांच्या शिक्षणाचे महत्त्व पटवून देण्याकरीता शिक्षण विभागाने विविध जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन करावे.

८. सातारा जिल्ह्यातील बालमजुरीचे निर्मुलन व बालकामगारांचे शैक्षणिक पुनर्वसन करता यावे या दृष्टीने जिल्ह्यामध्ये राष्ट्रीय बालकामगार निर्मुलन प्रकल्प सुरु करण्यात यावा. याकरीता शिक्षण विभाग तसेच कामगार विभाग यांच्याकडून एकत्रितपणे प्रयत्न तसेच शासनाकडे सतत पाठपुरावा करणे आवश्यक आहे.

**५.१५.३ आरोग्य विभागासाठी शिफारशी** :

१. सरकारी दवाखान्यामार्फत वीटभट्टीवरती महिन्यातून एकदा आरोग्य विषयक मार्गदर्शन सत्रे तसेच आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन करण्यात यावे. या कार्यात वीटभट्टी मालकांचे सहकार्य घेण्यात यावे.

२. अंगणवाडी सेविका, सरकारी दवाखान्यातील आरोग्य सेविका, आशा वर्कर यांनी वेळावेळी वीटभट्टीवरील कुटुंबांच्या गृहभेटी कराव्यात. कुटुंबातील बालके व

किशोरवयीन मुली यांच्या आरोग्य स्थितीची पाहणी करावी व आवश्यक त्या उपचारांच्या सुविधा त्यांना पुरवाव्यात.

३. वीटभट्टीवरील किशोरवयीन मुलींना 'सबला' योजनअंतर्गत सर्व सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी आरोग्य विभागाने आवश्यक ते प्रयत्न करावेत. किशोरवयीन मुली अंगणवाडीत किंवा दवाखान्यात येण्यास तयार नसतील तर वीटभट्टीवरती जाऊन उपलब्ध सुविधांचा लाभ त्यांना देण्यात यावा.

४. वीटभट्टी कामगार कुटुंबांमध्ये आरोग्यसंबंधी जागृती घडवून आणण्यासाठी आरोग्य विभागाने जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन करणे गरजेचे आहे.

५. खाजगी दवाखान्यातील डॉक्टरर्स तसेच स्वयंसेवी संस्थाच्या मदतीने वीटभट्टीवरील बालकांना आरोग्यसंबंधीत आवश्यक सुविधा पुरविण्यासाठी आरोग्य विभागाकडून प्रयत्न केले जाऊ शकतात. जसे की, तपासणी शिबिर, मोफत औषधोपचार, पुरक व पोषण आहाराचे वाटप इ.

**५.१५.४ वीटभट्टी मालकांसाठी शिफारशी** :

१. वीटभट्टी मालकाने कामगार कुटुंबातील बालकांना शाळेत पाठविण्याची जबाबदारी घ्यावी. त्यासाठी शिक्षण विभागाकडे पाठपुरावा करावा.

२. मालकांनी वीटभट्टीवरती बालकांना खेळण्यासाठी स्वच्छ व स्वतंत्र छोट्याशा परिसराची निर्मिती करावी. जेणेकरुन स्वच्छ वातावरणात बालके खेळण्याचा आनंद घेऊ शकतील.

३. वीटभट्टीवरील बालके, कामगार, किशोरवयीन मुली यांच्यासाठी वेळोवेळी आरोग्य विषयक मार्गदर्शन सत्रे व आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन करण्यासाठी पुढाकार घ्यावा. याकरीता सरकारी दवाखान्यांचे सहकार्य घ्यावे.

४. वीटभट्टी मालकांनी भट्टीवरील कामगार कुटुंबांसाठी शौचालयाची सुविधा प्रामुख्याने उपलब्ध करुन द्यावी.

**५.१५.५ महसुल विभागासाठी शिफारशी** :

१. वीटभट्टीवरील बालके शाळेत जातील याची शाश्वती (हमीपत्र) दिल्यानंतरच वीटभट्टी सुरु करण्याची परवानगी महसुल विभागाकडून देण्यात यावी.

२. वीटभट्टी सुरु झाल्यानंतर कामगार कुटुंबातील बालके शाळेत जात आहेत किंवा नाही याची पाहणी करण्यासाठी महसुल विभागामार्फत वीटभट्टीला क्षेत्रीय भेटी

देऊन त्याची शहानिशा करावी. या कामात कामगार विभाग तसेच शिक्षण विभागाचे सहकार्य घेतले जाऊ शकते. तसेच दोषी मालकांकडून दंड वसुल करण्याची तरतुद करणे आवश्यक आहे.

३. व्यवसायासाठी परवानगी देताना वीटभट्टीवरील कामगार तसेच बालके यांना आरोग्य सुविधा उपलब्ध करुन देणे तसेच त्या मिळवून देण्यासाठी आरोग्य विभागास आवश्यक ते सहकार्य करणे मालकांसाठी बंधनकारक करण्यात यावे.

अशा प्रकारे वीटभट्टी व्यवसायातील बालमजुरी नष्ट करण्यासाठी कामगार विभाग, शिक्षण, आरोग्य तसेच महसुल विभाग इ. सर्व विभागातील अधिकारी व कर्मचारी यांची इच्छा व प्रयत्न हे अत्यंत महत्त्वाचे आहे. या सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न केले व वरील सुचविलेल्या उपाययोजनांचा अवलंब केल्यास वीटभट्टी व्यवसायातील बालमजुरी नष्ट करण्यास मदत होऊ शकेल.

## ५.१६ **सारांश** :

प्राथमिक माहिती संकलनाच्या आधारे प्राप्त माहितीचे सविस्तर विश्लेषण करण्यात आले. माहिती विश्लेषणातून संशोधन अभ्यासाच्या उद्दिष्ट्यानुसार प्राप्त झालेल्या महत्त्वपूर्ण निष्कर्षांची सविस्तर माहिती या प्रकरणामध्ये देण्यात आलेली आहे. तसेच सदर संशोधन अभ्यास विषयाची काही गृहितकृत्ये ठरविण्यात आली होती. त्यांची पडताळणी करण्याची महत्त्वाची जबाबदारी संशोधकास पार पाडावयाची होती. यासाठी SPSS (Statistical Package for the Social Sciences) च्या माध्यमातून गृहितकृत्यांची पडताळणी करण्यात आली. त्याचे सविस्तर विश्लेषणही सदर प्रकरणामध्ये देण्यात आलेले आहे.

एकूणच वीटभट्टी व्यवसायात बालकामगारांची संख्या जास्त असून त्यांची शैक्षणिक व आरोग्य स्थिती अतिशय खालावलेली व दयनीय असल्याचे सदर संशोधनातून स्पष्ट होते. त्यामुळे या व्यवसायातील बालमजुरी कमी करणे, बालकांना त्यांचे शैक्षणिक व आरोग्य विषयक हक्क उपभोगता यावेत यादृष्टीने शासकीय तसेच अशासकीय पातळीवर प्रयत्न होणे अत्यंत गरजेचे आहे. त्यासाठी प्रामुख्याने कोणकोणते प्रयत्न किंवा उपाययोजना करता येतील याबाबत संशोधकाने काही शिफारशी सुचविलेल्या आहेत. ज्या वीटभट्टी व्यवसायातील बालमजुरीची समस्या सोडविण्यासाठी नक्कीच उपयुक्त ठरतील.

## ५.१७ संशोधन विषयाचा सारांश :

"प्रामुख्याने १४ वर्षाखालील शाळेत जाणारी अथवा न जाणारी, कामाचा मोबदला मिळत असो वा नसो तसेच पुर्णवेळ वा अर्धवेळ काम करणारी बालके ही बालमजुरीमध्ये मोडतात".

बालमजुरी ही जागतिक पातळीवरील एक प्रमुख समस्या आहे. आज जगात सर्वत्र व मोठ्या संख्येने बालकामगार आढळून येत आहेत. भारतात १,०१,२८,६६३ तर महाराष्ट्रात ७,२७,९३२ इतके बालकामगार आहेत. त्याचबरोबर बदलता काळ व गरजेनुसार सद्यस्थितीत असंघटित क्षेत्रात बालमजुरीचे प्रमाण वाढत चालल्याचे दिसून येते. २०११च्या जणगणनेनुसार भारतात व महाराष्ट्रातील ५७ टक्के व ३४ टक्के बालकामगार हे हंगामी व असंघटित व्यवसायात गुंतलेले आहेत. तसेच पूर्वी झालेल्या विविध संशोधन अहवालानुसार मोठ्या प्रमाणात व वारंवार स्थलांतर होत असलेल्या महाराष्ट्र राज्यात सर्वाधिक स्थलांतरीत कुटुंबे व सर्वाधिक बालकामगार हे वीटभट्टी व्यवसायात आढळून आलेली आहेत.

म्हणूनच वीटभट्टी व्यवसायातील बालकामगारांची व्याप्ती व त्यांची एकूणच स्थिती अभ्यासणे गरजेचे होते. याकरीता सदर संशोधन विषय हाती घेण्यात आला. महाराष्ट्रात सातारा जिल्ह्यातील कराड तालुक्यात वीटभट्टी व्यवसाय व त्यात काम करणाऱ्या बालकांची संख्या सर्वात जास्त आहे. तसेच बालकामगारांचे शैक्षणिक व कौटुंबिक पुनर्वसनासाठी NCLP व कृतीदल हे दोन प्रकल्प अत्यंत महत्त्वाचे आहेत. सातारा जिल्ह्यात NCLP प्रकल्प राबविला जात नाही. जिल्ह्यात वीटभट्टी व्यवसायातील बालकामगारांच्या बाबतीत कृतीदलामार्फत कार्यवाही करताना अनेक अडचणी येत असल्याचे दिसून येते. त्यामुळे वीटभट्टी व्यवसायातील बालकामगारांची नेमकी स्थिती अभ्यासण्यासाठी कराड तालुक्याची निवड करण्यात आली.

प्रामुख्याने वीटभट्टी व्यवसायातील बालकामगारांची संख्या, बालमजुरीची कारणे अभ्यासणे, या व्यवसायातील कामगार मुला-मुलींची शैक्षणिक व आरोग्य स्थिती व त्यासंबंधीत समस्या जाणून घेणे, बालकामगारांना वीटभट्टी मालक तसेच शासनाकडून उपलब्ध होणाऱ्या सुविधांची माहिती घेणे इ. उद्दिष्ट्ये समोर ठेऊन सदर संशोधन अभ्यास करण्यात आला आहे. तसेच संशोधन पध्दतीतील महत्त्वाची पायरी म्हणून संशोधन अभ्यासाची तीन गृहितकृत्ये ठरविण्यात आली असून त्या आधारे संशोधन विषयाचा

अभ्यास करण्यात आला. सदर संशोधन अभ्यासासाठी वर्णनात्मक संशोधन आराखडा वापरण्यात आला आहे.

संशोधन अभ्यासासाठी कराड तालुक्यातील महसुल विभागाकडून नोंदणीकृत वीटभट्टयांची यादी मिळाली होती. परंतु वीटभट्टीवरील कामगार कुटुंबांतील ५ ते १४ वयोगटातील काम करणाऱ्या बालकांची संख्या व यादी उपलब्ध नव्हती. म्हणून मागील काही संशोधन अहवालाचा आधार घेऊन एका वीटभट्टीवर सरासरी ७ ते ८ याप्रमाणे १८४८ कामगार कुटुंबे असतील हे ठरविण्यात आले. नमुना आकार तंत्राचा वापर करुन १८४८ कुटुंबांपैकी ३१८ कामगार कुटुंबे इतका नमुना आकार ठरविण्यात आला. सरासरी ७ ते ८ प्रमाणे ३१८ कुटुंबे एकूण ४० वीटभट्टयांवरती आढळून येतील म्हणून वीटभट्टयांचा नमुना आकार ४० इतका ठरविण्यात आला. वीटभट्टयांची यादी उपलब्ध असल्याने नमुना निवडीसाठी संभाव्यता नमुना निवड पध्दतीचा (Probability Sampling) अवलंब करण्यात आला. यामध्ये साधा यादृच्छिक नमुना निवड पध्दती अंतर्गत नियमित अंकन पध्दतीने ४० वीटभट्टयांची निवड करण्यात आली.

तसेच ५ ते १४ वयोगटातील काम करणारी बालके असणारी कुटुंबे सदर संशोधन अभ्यासाचे लक्ष्यगट होती. त्यामुळे अशी कुटुंबे शोधण्यासाठी ४० वीटभट्टयांचे सर्वेक्षण करण्यात आले. सर्वेक्षणात ४० वीटभट्टयांवरती एकूण ३२० कामगार कुटुंबे आढळून आली. त्यामध्ये ५ ते १४ वयोगटातील काम करणारी बालके असलेली १६१ कुटुंबे इतका नमुना आकार निश्चित केला गेला. त्यानुसार गैर-असंभाव्यता नमुना निवड पध्दतीतील (Non-Probability Sampling) सहेतुक नमुना निवड पध्दतीचा (Purposive Sampling) अवलंब करुन ही सर्व १६१ कुटुंबे संशोधन अभ्यासासाठी निवडण्यात आली. तसेच वीटभट्टी मालक, विषयाशी संबंधित शासकीय अधिकारी, वीटभट्टी परिसरातील शाळा मुख्याध्यापक, वैद्यकीय अधिकारी, अंगणवाडी सेविका व खाजगी डॉक्टरर्स यांच्याकडूनही आवश्यक प्राथमिक माहिती घेण्यात आली.

सदर संशोधन अभ्यासांतर्गत प्राथमिक माहिती संकलनासाठी मुलाखत अनुसूची, कुटुंब तक्ता, निरीक्षण अनुसूची ही साधने वापरण्यात आली. तसेच संशोधन विषयाशी संबंधित विविध दुय्यम साधनांचा देखील आधार घेण्यात आला. प्राप्त माहितीचे 'एक्सेल' सॉफ्टवेअरच्या माध्यमातून सारणीकरण व माहितीचे गुणात्मक व संख्यात्मक विश्लेषण

करण्यात आले. सविस्तर माहिती विश्लेषणावरुन उद्दिष्टांनुसार काही प्रमुख निष्कर्ष मांडण्यात आले आहेत.

सदर संशोधन अभ्यासात कराड तालुक्यातील वीटभट्टी व्यवसायात कर्नाटक राज्यातून आलेल्या स्थलांतरित कुटुंबांचे प्रमाण जास्त असल्याचे दिसून आले. वीटभट्टीवरील १६१ कामगार कुटुंबांमध्ये ५ ते १४ वयोगटातील २९८ (८९ टक्के) बालके वीटभट्टीची कामे करताना दिसून येतात. या बालकांमध्ये १६८ मुले असून १२९ मुलीं होत्या. १४ वर्षाखालील बालके भट्टी वीटा थापणे, वीटा पलटी करणे, वीटा रांगेत उभ्या करणे, वीटा वाहणे, माती कालविणे, जमीन सपाट करणे इ. सर्व प्रकारची कामे करताना दिसून आली. यामध्ये सर्वाधिक बालके वीटा थापण्याचे काम करत असल्याचे दिसून येते. तसेच मुलांच्या तुलनेत मुली अधिक कामे करतात. कारण मुली वीटभट्टीची कामे करुन घरातील धुणी-भांडी, पाणी भरणे, स्वयंपाक करणे, लहान भावंडांना संभाळणे इ. सर्व कामे करतात.

वीटभट्टीवरील बहुतांशी बालके शाळेतच जात नाहीत. त्यामुळे दिवसभर बसून राहण्यापेक्षा ते भट्टीची कामे करतात. स्थलांतराच्या काळात गावाकडे संभाळण्यासाठी कोणी नसल्याने बालके कुटुंबासोबत येतात व काम करु लागतात. तसेच कुटुंबांचा व्यवसाय म्हणून परंपरेने बालकेही हेच काम करत असल्याचे दिसून येते. प्रामुख्याने वीटांचे जेवढे जास्त लक्ष्य कुटुंबाकडून पूर्ण होईल तेवढा जास्त मोबदला कुटुंबाला मिळतो त्यामुळे वीटांचे लक्ष्य पूर्ण करण्यासाठी व कुटुंबाला आर्थिक हातभार लागावा इ. कारणांमुळे वीटभट्टी व्यवसायात मोठ्या संख्येने बालकामगार आढळून येत आहेत.

संशोधन अभ्यासाच्या दरम्यान भट्टीवरील सर्वाधिक ६१ टक्के बालके सद्यस्थितीत शाळेत जात नसल्याचे दिसून आले. मुलींच्या बाबतीत हे प्रमाण ६५ टक्के इतके आहे. प्रामुख्याने वीटभट्टीवरील बालकांची शिक्षण घेण्याची इच्छा नसल्याचे दिसून येते. तसेच बालकांच्या व विशेषतः मुलींच्या शिक्षणाबाबत या व्यवसायातील पालकही उदासिन असल्याचे दिसून येते. प्रामुख्याने कुटुंबाच्या बिकट आर्थिक स्थितीमुळे मुलांच्या शिक्षणावर खर्च करणे पालकांना शक्य होत नाही ही देखील वस्तुस्थिती आहे. एकूणच कामासाठी कुटुंबांचे वारंवार होणारे स्थलांतर व वीटभट्टीच्या कामात बालकांची होणारी मदत कुटुंबांसाठी आर्थिक दृष्ट्या अत्यंत गरजेची असल्याने बहुतांशी बालके शिक्षणापासून वंचित राहतात.

वीटभट्टी व्यवसायातील बालकांच्या आरोग्य स्थितीचा अभ्यास केला असता असे लक्षात येते की, या व्यवसायात कामाची वेळ व तास हे अनिश्चित असतात. वीटभट्टी व्यवसायाचा हंगाम व कामाची वेळ यामुळे बालकांना प्रामुख्याने सर्दी, खोकला, ताप, जुलाब, उलट्या इ. संसर्गजन्य आजाराची लागण होत असल्याचे प्रमाण अधिक आहे. तसेच बालकांना मान व पाठदुखी, शारिरीक इजा, अंग व डोकेदुखी, धुळ व धुराने श्वसनाचे त्रास, मातीच्या कामाने त्वचेचे आजार इ. त्रास होत असतात. उन्हाळ्यात कडक उन्हात काम केल्याने बालकांना चक्कर येणे, थकवा येणे, अंगदुखी, डोकेदुखी यासारखे त्रासही होतात. तसेच या बालकांमध्ये शारीरिक स्वच्छतेचा अभाव दिसून येतो. बहुतांशी मुला-मुलींची उंची व वजन हे वयाच्या मनाने खूप कमी असून बालके खूप अशक्त असल्याचे दिसून येते. या व्यवसायातील बालकांना पुरेशी विश्रांती मिळत नाही. कुटुंबातील बालके सतत आजारी पडत असून महिन्यातून एकदा, दोनदा, तीन ते चार वेळा तसेच नेहमीच आजारी असणारी एकूण ४७ टक्के बालके वीटभट्टीवर आढळून आलेली आहेत.

या व्यवसायातील मुलींच्या प्रामुख्याने वजन न वाढणे, थकवा, चक्कर व अशक्तपणा येणे, अंग व डोकेदुखी, संसर्गजन्य आजार तसेच रक्तक्षय इ. आरोग्य समस्या आहेत. तसेच कामाच्या स्वरुपानुसार मासिक चक्रावेळी मुलींना कंबर दुखीचा त्रास जास्त होत असल्याचे दिसून येते. बहुतांशी मुली मासिक चक्रावेळी कपड्याचा वापर करत असून तो कपडा दिवसातून केवळ एकदाच बदलला जातो. मुलींना व्यक्तिगत आरोग्य, शारीरिक बदल व स्वच्छता याबाबत योग्य मार्गदर्शन मिळालेले नाही किंवा मिळत नाही. एकूणच वीटभट्टीवरील बालकांची शैक्षणिक व आरोग्य स्थिती अतिशय खालावलेली व बिकट असल्याचे दिसून येते.

वीटभट्टी मालकांनी बालकांना शिक्षण व आरोग्य संबंधी सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी स्वतःहून कोणतेही प्रयत्न केल्याचे दिसत नाही. वीटभट्टीवरील स्थलांतरीत कुटुंबातील जी थोडी बालके शाळेत किंवा अंगणवाडीत जातात ती अनियमित असतात. त्यामुळे बालकांना सर्व शासकीय सुविधांचा लाभ देता येत नाही किंवा मिळत नाही. वीटभट्टीवरील सर्वाधिक ९५ टक्के कामगार कुटुंबे उपचारासाठी खाजगी दवाखान्यात जातात. वीटभट्टीवरील विखुरलेली बालके व त्यांची कन्नड भाषा यामुळे बालकांसाठी स्वतंत्रपणे शिक्षणाची सुविधा निर्माण करण्यात अडचण येत असल्याचे दिसून येते. तसेच वीटभट्टी हा घरगुती स्वरुपाचा व्यवसाय आहे, यातील बालके विखुरलेली असतात व

वीटभट्टी व्यवसायाला आस्थापना नसते इ. कारणांमुळे या व्यवसायातील बालकामगारांविरुध्द कायदेशीर कार्यवाही करण्यात अनेक अडचणी येत असल्याचे दिसून आले आहे.

एकूणच सदर संशोधन अभ्यासातून असे स्पष्ट होते की, वीटभट्टी व्यवसायातील बालके चांगले शिक्षण व आरोग्य तसेच मनोरंजन, खेळ, निकोप वाढ व विकासाच्या हक्कांपासून वंचित राहत आहेत. त्यामुळेच या व्यवसायातील बालमजुरी कमी करणे किंवा नष्ट करणे यासाठी विशेष प्रयत्नांची तसेच उपाययोजनांची गरज असल्याचे सदर संशोधन अभ्यासावरुन स्पष्ट होते.

# परिशिष्ट - १
# संदर्भ सूची


**१ शोध निबंध :**

१.१ Barman Bhupen[1] and Barman Nirmalendu[2] (Feb.2014), "A Study on Child Working Population in India", IOSR Journal Of Humanities And Social Science (IOSR-JHSS) Volume 19, Issue 2, Ver. I, PP 01-05 e-ISSN: 2279-0837, p-ISSN: 2279-0845 www.iosrjournals.org

१.२ Yadav Surendra Kumar and Sengupta Gowri (2009), "Environmental and Occupational Health Problems of Child Labours : Some Issues and Challenges for Future", J Hum Ecol, 28(2) : Page No. 143-148, ©Kamla-Raj 2009, www.ncpcr.com

**२ संशोधन अहवाल :**

२.१ डॉ. वायदंडे शशिकांत, टि. म. विद्यापीठ, पुणे (एप्रिल २०११), "महाराष्ट्रातील असंघटित क्षेत्रातील बालमजुरी निर्मुलनासंबंधी धोरणांचा चिकित्सक अभ्यास", विद्यावाचस्पती (समाजशास्त्र) पदवीसाठी प्रबंध, पुणे. पान नं. ६ व ७, १८ ते २२.

२.२ Human Development Centre, Yashada, Pune (2011-12), "Survey of Child Labours in Non NCLP Districts in Maharashtra" Yashada, Pune. Page no.15,16,74 to 76.

२.३ मानव विकास केंद्र, यशदा, पुणे (२०१२-१३), "बालकामगारांचे अनुधावन : कृतीदल व राष्ट्रीय बालकामगार प्रकल्पाद्वारे शैक्षणिक पुनर्वसन केलेले बालकामगार", संशोधन अहवाल. निर्मिती : यशदा, पान नं. ५ व ६५

२.४ मानव विकास केंद्र, यशदा, पुणे (२०१३-१४), राष्ट्रीय बालकामगार प्रकल्पांतर्गत जिल्ह्यांचे क्षेत्रनिहाय मॅपिंग "सातारा जिल्ह्यातील वीटभट्टीवर काम करणाऱ्या बालकांचा अभ्यास", संशोधन अहवाल. यशदा, पुणे.

२.५ National Commission for Protection of Child Rights, GoI (Jan 2015), "Status Report on School Participation and availing of Health and Nutrution services for children of Migrant Labourers", Study conducted on behalf of NCPCR www.ncpcr.com

## ३ कायदे विषयक साहित्य :

३.१ बालन्याय (काळजी व संरक्षण) अधिनियम २००० आणि सुधारित २००६, www.maharashtra.gov.in

३.२ The Child Labour (Prohibition and Regulation) Act 1986, The Schedule (See Sec.3) www.maharashtra.gov.in

३.३ The Right of Children to Free and Compulsory Education ACT, 2009, No. 35 of 27 August 2009, New Delhi. शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्रमांक : विकाक २००९ / प्र. क्र. २९२ / प्राशि १ दिनांक १० मे २०१०. www.maharashtra.gov.in

## ४ इतर सामग्री : संदर्भ ग्रंथ वा पुस्तके

४.१ केंद्र सरकार व प्रसारण मंत्रालय प्रकाशन विभागातर्फे (जुलै १९९५),

"योजना : नियोजन व विकास समर्पित", अंक १२, प्रसिध्द. Vol. XXII, No. XII, पान नं. ११ ते १४, www.yojana.gov.in

४.२ Census of India (जनगणना अहवाल), २०११ www.censusindia.gov.in

४.३ डॉ. वैद्य शांता (२००५), "बालकांचे हक्क", मराठी अनुवादीत पुस्तिका, युनिसेफ प्रकाशन.

४.४ डॉ. प्रदिप आगलावे (२०१५), "सामाजिक संशोधन पध्दतीशास्त्र प तंत्रे", श्री संत प्रकाशन, नागपूर.

४.५ महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे (२०११), "बाल न्याय अधिनियम व बालकांचे हक्क", माहिती पुस्तिका, पुणे.

४.६ महिला व बाल विकास विभागाचे विविध कार्यक्रम व योजना : शासकीय वेबसाईट - www.womenchild.maharashtra.com

४.७ मानव विकास केंद्र, यशदा, पुणे (मे २०१२), "कृतीदल सदस्यांकरीता मार्गदर्शिका", यशदा, पुणे. शासन निर्णय क्र : सीएलए-२००७/(४)/काम-४ मंत्रालय, मुंबई-३२, २ मार्च २००९.

४.८ Non-Government Organizations (अशासकीय वा स्वयंसेवी संस्था) :

अ) चाईल्ड लाईन संस्था : www.childline.org.in

ब) युनिसेफ : www.unicef.org

क) सेव द चिल्ड्रेन : www.savethechildren.in

४.९ तुकाराम जाधव व महेश शिरापूरकर (जाने २०११), “भारतीय राज्यघटना व घटनात्मक प्रक्रिया-खंड १”, युनिक ॲकॅडमी प्रकाशन, पान क्र. ५४,५८,५९,७२.

४.१० यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे (२००९), “बालमजुरी निर्मलन प्रकल्प : संदर्भ साहित्य”, बाल हक्क कक्ष-संशोधन व प्रलेखन विभाग, पुणे.

४.११ यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे (२०१३), “राष्ट्रीय बालकामगार प्रकल्प- कार्यात्मक मार्गदर्शिका”, महाराष्ट्र शासन, कामगार विभाग, निर्मिती : यशदा, पुणे. पान नं. १ ते ७, www.yashada.org

# परिशिष्ट - २
## कराड तालुका नकाशा



# परिशिष्ट - ३
# पालकांसाठी (बालकांसाठी) मुलाखत अनुसूची

---

**बालकाचे नाव** :...........................................................................

**पालकाचे नाव** :....  ............................................................................

---

**सूचना : योग्य पर्यायासमोरील चौकटीत (✓) अशी खूण करावी.**

---

**सर्वसामान्य माहिती (भौतिक सोईसुविधांविषयी)**

**प्रश्न १) तुमच्या राहण्याचे ठिकाण कोठे आहे?**

१) विटभट्टीवरतीच
२) विटभट्टीपासून १ ते ३ कि.मी.
३) विटभट्टीपासून ३ ते ५ कि.मी.
४) ५ कि.मी. पेक्षा अधिक
५) इतर (नमूदकरावे)

**प्रश्न २) विटभट्टीच्या कामासाठी आल्यानंतर विटभट्टी मालकाकडून खालीलपैकी कोणकोणत्या सोईसुविधा उपलब्ध करुन देण्यात येतात?**

१) राहण्यासाठी घर/निवारा
२) घरामध्ये वीज
३) शौचालयाची सुविधा
४) पिण्याच्या तसेच वापरावयाच्या पाण्याची सुविधा
५) विटभट्टी कामासाठी येण्या-जाण्यासाठी मोफत वाहतुकीची सुविधा
६) वरीलपैकी सर्वच
७) वरीलपैकी काहीच नाही
८) इतर(नमूद करावे)

**प्रश्न ३) राहत्या घराचे स्वरुप कसे आहे?**

१) पक्के घर
२) कच्चे घर
३) तात्पुरता निवारा
४) इतर (नमूद करावे)

**प्रश्न ४) राहत्या घरात वीजेची कोणती सुविधा उपलब्ध आहे?**

१) वीजेची सुविधा नाही (रॉकेलचा दिवा, मेणबत्ती, इतर साधने वापरतो )
२) घरामध्ये उजेडापुरता एकच वीजेचा बल्ब आहे.
३) इतर (नमूद करावे)

**प्रश्न ५) राहत्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची कोणती सुविधा आहे?**

१) बोअरवेलचे पाणी
२) विहीरीचे पाणी
३) वैयक्तिक नळ आहेत
४) सार्वजनिक नळ
५) बोअरवेल अथवा विहीरीचे पाणी
७) इतर (नमूद करावे)

**प्रश्न ६) शौचालयासाठी खालील कोणती सुविधा उपलब्ध आहे?**

१) सार्वजनिक शौचालय सरकारी
२) व्यक्तिगत शौचालय
३) विटभट्टीवरील कुटुंबाकरीता सार्वजनिक शौचालय
४) उघडयावरती
५) इतर (नमूद करावे)

**प्रश्न ७) आंघोळीसाठी कोणती सुविधा उपलब्ध आहे?**

१) घरामध्ये न्हाणी आहे
२) घराच्या मागे किंवा आडोशाला मोकळया जागेत न्हाणीची तात्पुरती व्यवस्था

३) न्हाणीची सोय नसून पहाटे लवकर उठून उघड्यावरच आंघोळ केली जाते.
४) इतर (नमूद करावे)

**प्रश्न ८) कुटुंबाचा मुळ व्यवसाय कोणता?**
१) शेती २) शेतमजुरी ३) विटभट्टी
४) स्वयंरोजगार/व्यवसाय ५) इतर मजुरीची कामे

**प्रश्न ९) विटभट्टीचे काम संपल्यानंतर उर्वरित कालावधीत कोणती कामे करता?**
१) स्वतःच्या मालकीची शेती २) शेतमजुरी
३) स्वयंरोजगार/व्यवसाय (नमूद करा) ४) इतर मजुरीची कामे
५) बेरोजगार

**प्रश्न १०) विटभट्टी व्यवसायातून मिळणारे एकूण वार्षिक उत्पन्न किती?**

.................................................................................

**प्रश्न ११) विटभट्टीचे काम संपल्यानंतर उर्वरित कालावधीत इतर कामातून मिळणारे उत्पन्न किती?**

................................................................................

---

## कामाचे स्वरुप व कारणे

**प्रश्न १२) प्रामुख्याने वर्षातील कोणत्या कालावधीत विटभट्टीचे काम चालते?**
१) ऑक्टोबर ते मार्च/एप्रिल २) नोव्हेंबर ते एप्रिल/मे
३) डिसेंबर ते एप्रिल/मे ४) इतर (नमूद करावे)

**प्रश्न १३) विटभट्टीचे काम किती वर्षापासून करत आहात?**
१) ६ महिनेते १ वर्ष २) १ ते ३ वर्ष ३) ३ ते ६ वर्ष
४) ६ ते ९ वर्ष ५) ९ वर्षापेक्षा जास्त ६) इतर (नमूद करावे)

**प्रश्न १४) विटभट्टीच्या कामाची माहिती तुम्हाला कशी/कोणाकडून मिळते?**
१) मुकादमामार्फत २) मालक स्वतः विचारणा करतात
३) तुम्ही स्वतः मालकाशी संपर्क साधता
४) इतर ओळखीचे किंवा नातेवाईकांकडून ५) इतर (नमूद करावे)

**प्रश्न १५) विटभट्टी कामासंबंधी मालकासोबत लिखित करार केला जातो का?**
१) होय २) नाही

**प्रश्न १६) विटभट्टी कामासाठी मालकासोबत करार केल्यास किती वर्षासाठी केला जातो?**
१) ६ महिन्यासाठी २) १ वर्षासाठी ३) १ ते ३ वर्षासाठी
४) ३ वर्षापेक्षा जास्त कालावधी ५) कराराची आवश्यकता भासत नाही
६)इतर(नमूद करावे) ७) लागू नाही

**प्रश्न १७) विटभट्टीचे काम किती तास करावे लागते?**
१) तास ८ ते ६ २) ८ ते १० तास ३) तास १२ ते १०
४) ६ तासापेक्षा कमी ५) १२ तासापेक्षा जास्त ६) इतर (नमूद करावे)

**प्रश्न १८) विटभट्टी कामाची नेमकी वेळ कोणती असते?**
१) पहाटे ते दुपार या दरम्यान २) सकाळ ते संध्याकाळ

३) दुपार ते रात्र या दरम्यान ४) मध्यरात्र ते दुपार या दरम्यान

५) इतर (नमूद करावे)

**प्रश्न १९) कामाच्या स्वरुपानुसार कोणत्या वेळेत कोणती कामे करावी लागतात ते सांगा?** (कामाच्या वेळेनुसार बालकेही कामे करतात का इ.)

..............................................................................

..............................................................................

**प्रश्न २०) विटभट्टी व्यवसायात स्त्रीया (मुले) व पुरुष (मुली) हे लिंगनिहाय विचार करता कोणकोणती कामे करतात?**

..............................................................................

..............................................................................

**प्रश्न २१) कामाचे लक्ष्य (Target) किती असते किंवा किती काम पूर्ण करावे लागते?**

१) दिवसाला ५०० ते १००० वीटा २) दिवसाला १००० ते १५०० वीटा

३) दिवसाला १५०० ते २००० वीटा ४) दिवसाला २००० पेक्षा जास्त

५) इतर (नमूद करावे)

**प्रश्न २२) विटभट्टीचे काम कशाप्रकारे पूर्ण केले जाते?**

१) कुटुंबातील प्रत्येकजण स्वतंत्रपणे ठरवून दिलेले काम पूर्ण करतात

२) संपूर्ण कुटंब एकत्रितपणे ठरवून दिलेले काम पूर्ण करते ३) इतर(नमूद करावे)

**प्रश्न २३) कामाच्या दरम्यान किती वेळ विश्रांती मिळते?**

१) १/२ तास २) १ तास ३) २ तास

४) २ तासापेक्षा जास्त ५) विश्रांती मिळत नाही

**प्रश्न २४) विश्रांती मिळत नसल्यास त्याची कारणे सांगा?**

१) दिवसाचे ठरलेले वीटांचे लक्ष्य पुर्ण करावयाचे असते

२) पहाटे, मध्यरात्रीचेही काम करावे लागल्याने खऱ्या अर्थाने विश्रांती मिळत नाही.

३) मालक विश्रांती घेऊ देत नाही. ४) विटभट्टीवरील कामामध्ये विश्रांती मिळाली तरी त्यावेळेत घरातील कामे करावी लागतात

५) इतर (नमूद करावे) ६) लागू नाही

**प्रश्न २५) विटभट्टीवर बालके कोणकोणती कामे करतात?**

१) वीटांसाठी माती/चिख्खल कालवणे २) जमिन एकसमान करणे

३) वीटा थापणे ४) वीटा पलटी करणे

५) वीटा वाळविण्यासाठी रांगेत उभ्या करणे ६) वीटा वाहणे

७) भट्टी लावण्यासाठी मदत करणे ८) बालके वरील सर्वच कामे करतात

९) इतर (नमूदकरावे)

**प्रश्न २६) विटभट्टी कामांव्यतिरीक्त प्रामुख्याने मुलीं घरातील कोणकोणती कामे करतात?**

१) घरातील धुणी-भांडी २) लहान भावंडांना संभाळणे

३) स्वंयपाक करणे ४) पाणी भरणे / वाहूनआणणे ५) इतर

**प्रश्न २७) बालके विटभट्टीवर किती वेळ कामे करतात?**

१) १ ते २ तास २) २ ते ४ तास ३) ४ ते ६ तास

४) ६ ते ८ तास ५) ८ तासापेक्षा जास्त

६) बालके मनात असेल तो पर्यंत काम करतात  ७) बालके काम करत नाहीत

**प्रश्न २८) विटभट्टीवरती बालकांनी (१४ वर्षाखालील) काम का करतात किंवा विटभट्टीवरती बालकांना काम करण्यास का लावले जाते?**

१) मुलांना गावाकडे संभाळण्यासाठी कोणी नसल्याने ते सोबत येतात व येथे ते काम करु लागतात/करतात

२) मुले शाळेत जात नसल्याने दिवसभर नुसते बसून राहण्यापेक्षा काम करतात

३) कुटुंबास आर्थिक हातभार व वीटांचे लक्ष्य पुर्ण करण्यासाठी मुलांनी काम करणे गरजेचे आहे

४) पुढे जाऊन मुलांनाही हेच काम करावयाचे असल्याने काम जमले पाहिजे म्हणून त्यांना काम करण्यास लावले जाते

५) वरील सर्वच  ६) इतर (नमूद करावे)

**प्रश्न २९) बालकांना किती वेळ विश्रांती मिळते?** (मुला - मुलींना)

१) १/२ तास  २) १ तास  ३) २ तास

४) २ तासापेक्षा जास्त  ५) वाटेल तेंव्हा व वाटेल तितक्या वेळ विश्रांती घेतात

६) बालकांना विश्रांती मिळत नाही  ७) इतर (नमूद करावे)

**प्रश्न ३०) बालकांना (मुला-मुलींना) विश्रांती मिळत नसल्यास त्याची कारणे कोणती?**

१) दिवसाचे ठरलेले वीटांचे लक्ष्य पुर्ण करावयाचे असते

२) पहाटे ,मध्यरात्रीही काम करावे लागल्याने खऱ्या अर्थाने विश्रांती मिळत नाही.

३) मालक विश्रांती घेऊ देत नाही.  ४) कामामध्ये विश्रांती मिळाली तरी त्यावेळेत घरातील कामे करावी लागतात.  ५ ) इतर (नमूद करावे)

**प्रश्न ३१) मुला-मुलांचा दिनक्रम कसा असतो?** (सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत काय काय करतात, काम कधी व कोणत्या वेळेत करतात, खेळतात कधी व किती वेळ, त्यांचा नाश्ता, जेवण इत्यादींच्या वेळा इ.)

......................................................................................

......................................................................................

---

## वेतनाचे स्वरुप

**प्रश्न ३२) विटभट्टी कामाच्या वेतन खालीलपैकी कसे देण्यात येते?**

१) विटांच्या युनिटवर ठरलेले असते  २) कामाच्या तासांवर

३) दिवसाच्या मजुरीच्या स्वरुपात  ४) इतर (नमूद करावे)

**प्रश्न ३३) वेतन हे विटांवरविटांच्या युनिटवर देण्यात येत असल्यास ते किती मिळते/?**

१) १००० वीटांसाठी ५०० ते ७०० रुपये  २) १००० वीटांसाठी ७०१ ते १००० रु.

३) १००० वीटांसाठी१००० पेक्षा जास्त रुपये  ४) इतर (नमूद करावे)

**प्रश्न ३४) वेतन कधी मिळते?**

१) दिवसाला  २) आठवडयाला  ३) महिन्याला

४) विटभट्टीचे संपूर्ण काम पुर्ण झाल्यानंतर  ५) इतर (नमूद करावे)

**प्रश्न ३५) वेतन खालील प्रमाणे कशापध्दतीने देण्यात येते?**

१) कामानुसार कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीचे स्वतंत्र वेतन दिले जाते

२) संपुर्ण कुटंबाचे एकत्रित वेतन दिले जाते म्हणजेच बालकांना त्यांच्या कामाचे स्वतंत्र वेतन दिले जात नाही

३) इतर (नमूद करावे)

**प्रश्न ३६) कामाचे वेतन हे संपुर्ण काम पूर्ण झाल्यानंतरच दिले जात असेल तर दैनंदिन जीवनातील गरजा किंवा त्यासाठी लागणारा खर्च कसा पूर्ण करता?**

१) स्वतः जवळील पैसे खर्च करतो

२) दैनंदिन जीवनातील गरजा किंवा त्यासाठी लागणारा खर्च मालक स्वतः करतात

३) मालक आठवडयाला खर्चासाठी पैसे देतात व ते पैसे वेतनातून वजा केले जातात

४) इतर (नमूद करावे)

**प्रश्न ३७) मालकांकडून कामाची आगाऊ रक्कम घेतली जाते का?**

१) होय
२) नाही

**प्रश्न ३८) प्रत्येकवेळी आगाऊ रक्कम घेतली जाते की गरज असेल त्यावेळीच घेतली जाते?**

१) प्रत्येक वेळी
२) गरज असेल त्याचवेळी

